
# दिशाभूल



A
891·462
Dev/Dis
5697

उषाः—दिवाकर असल्या या आपल्या संदिग्ध विनोदाचा अर्थ मी काय बरं घेऊं? [पृष्ठ २८]

किंमत १।] रुपाया.

सन १९२३

श्रीदत्त प्रसन्न

# दिशाभूल !

लेखक

रा. रा. गोपाळ माधव देवस्थळी,

" पितृवंचन " " अलौकिक स्वामीभक्ति, " " शरसंधान "

वगैरेंचे कर्ते.

व

रा. रा. गणेश कृष्ण फाटक,

" सं. प्रतिज्ञा-द्वंद्व, " " सोनेरी-चावी, " " प्रेमाचें वेड "

वगैरेंचे कर्ते.

प्रकाशक

ए[illegible]

बुकसे[illegible] हर.

( ग्रंथ कर्त्य[illegible] आहेत. )

सन १९२३

किंमत १॥ रुपाया.

891.462 - FAT

0 5697

891.462
Dev/Dis

MODERN COLLEGE OF ARTS, SCIENCE & COMMERCE
POONA 5.
Dt.

A15697

मुद्रकः—गणेश काशिनाथ गोखले; सेक्रेटरी,
श्री गणेश प्रिंटिंग वर्क्स; ४९५ शनवार पेठ पुणें शहर.

प्रकाशकः—अनंत पांडुरंग बापट;मालक,
पी. बापट अँड ब्रदर्स; बुकसेलर्स अँड पब्लिशर्स, पुणें शहर.

**श्रीगजानन प्रसन्न.**

# चार शब्द.

सुवासिनीला जसें कुंकु असणें अवश्य आहे त्याचप्रमाणें पुस्तकाला प्रस्तावना असणें जरूर आहे, असा हल्लींचा सर्वमान्य सांप्रदाय आहे. म्हणूनच चार घटका करमणूक व्हावी या हेतूनें लिहिलेल्या या नाटकाला "चार शब्दा"च्या प्रस्तावनेची पुस्ती जोडली आहे. त्यांत आम्हाला मुख्यत्वें चार गोष्टी रसिकांच्या नजरेस आणावयाच्या आहेत.

१ नाटकाच्या अंगीं कोणते गुण असावे याची सशास्त्र मीमांसा करून, त्याचा कीस काढणाऱ्यांच्या कसोटीला हें नाटक उतरणार नाहीं.

२ एकाद्या विश्वव्यापी सिद्धांताची कथानकांत मांडणी करून त्याचें प्रतिबिंब या दृश्यकाव्याच्या आरशांत समाजाला दाखवावें, असा हें नाटक लिहिण्याचा मूळ उद्देश नाहीं.

३ "केवळ करमणूक" म्हणून पैसे भरून आलेल्या प्रेक्षक-वृंदाला खर्चलेल्या पैशाच्या भुरदंडानें नाटकगृहांत डांबून ठेवून आपल्या आवडीच्या विषयावर व्याख्यानाचा भरपूर डोस् पाजून विकत-श्राद्ध घेऊन तर्पण करण्याचें पुण्य त्यांच्या पदरीं बांधण्याचा अट्टाहास या नाटकांत नाहीं.

हें नाटक म्हणजे "शिक्षणाची सजा नसून चार घटका मजा आहे" जीवन कलहाच्या झटापटींत श्रांत झालेल्या बहुजन समाजाला चार घटका करमणुकीची ही बाळवाटी ( light feast ) आहे.

Oscar wilde चें " The woman of no importance किंवा शेक्सपिअरची "Twelfth night " much ado about nothig" "Merry wives of windsor" अशा नाटकांप्रमाणेंच हें नाटक (A drama without a priniciple) आहे. ही एक light comedy आहे व त्याच दृष्टीनें त्याच्याकडे पहावें.

प्रस्तुत कृती ही आमची पहिलीच कृती आहे—अर्थात् ती सदोष असणारच-परंतु नाटकें व कादंबऱ्या कांहीं तरी विवक्षित हेतू धरूनच लिहिल्या पाहिजेत व त्यांनीं करमणुकीबरोबर कांहीं तरी शिक्षण दिलेंच

पाहिजे—अशा मताचे आम्ही नसल्यामुळें—कांहीं पुस्तकें केवळ करमणुकीचेंच काम करूं शकतील—अशा जातीचें हें नाटक लिहिलेलें आहे. ( Light literatrue ) विदग्ध वाङ्मय म्हणूनच हें समजावें.

अहमदनगर विश्रामबाग हायस्कूलच्या १९२२ च्या सोशल गॅदरिंगसाठीं या नाटकाचा अवतार झाला. पण तेवढंच कार्यक्षेत्र त्याला अगदींच अकुंचित वाटून त्या नूतन बालकानें संमेलनाच्या अंगणांत पायसुद्धां न ठेवतां, "गणेश नाटक मंडळी"चें विस्तृत व सुशोभित क्रीडांगण गांठलें; व एकाद्या अनोळखी पण गोंडस मुलाला, ज्याप्रमाणें एकादा परकी थोर गृहस्थ मुद्धां, सहज उचलून घेतो त्याप्रमाणें "गणेश नाटक मंडळी"च्या "मालकांनीं" त्याला अंगाखांद्यावर घेऊन त्याचें कोडकौतुक आरंभिलें आहे. तें आपल्या बाललीलांनीं त्यांना व इतरांना कितपत तोषवितें हा प्रश्न पुढचा आहे. तरी पण रंगभूमीच्या आश्रयाशिवाय नाटक, म्हणजे आईशिवाय असलेलें लेंकरूं—ती स्थिती या नाटकाची नाहीं—अर्थात् हें नाटक ज्या मातेच्या कडेवरून नाचणार, बागडणार, त्याच मातेची कृतज्ञतापूर्वक सेवा करील असा आम्हांस भरवंसा आहे व असेंच प्रत्येकाला वाटेल.

हें नाटक इतक्या तांतडीनें रंगभूमिवर आणल्याबद्दल "गणेश नाटक मंडळीचे" व सर्व कामें बाजूला ठेवून हें नाटक अत्यंत अल्प अवधींत छापवून काढल्याबद्दल रा. अनंतराव बापट यांचे आभार मानावे तितके थोडे आहेत. या नाटकांतील पठाणाच्या तोंडीं घातलेली हिंदी भाषा लिहून दिल्याबद्दल रा. जयरामपंत देशपांडे यांचे व रा. श्रीधरपंत कर्णीक यांनीं वेळोवेळीं सहाय्य केल्याबद्दल त्यांचे आभार मानल्यावांचून आम्हीं उपकार ऋणांतून अंशत: सुद्धां मुक्त होणार नाहीं.

विश्रामबाग हायस्कुल
अहमदनगर १५-१०-२३

आपले नम्र,
गोपाळ माधव देवस्थळी.
गणेश कृष्ण फाटक.

---

॥ श्रीगजानन प्रसन्न ॥

# दिशाभूल.

## अंक १ ला.

### प्रवेश १ ला.

( स्थळ:—माईची खोली. )

( पात्रें:—माई व दिवाकर बोलत बसलीं आहेत. )

**माई**:—डॉक्टर, आतां तरी आला का आमच्या फॅमिलीचा रोग लक्षांत ?

**डॉ. दिवाकर**:—आला...प...ण...

**माई**:—मग आतां पण कशाला ? एकादा जालीम डोस देऊन मुळांतच रोग नाहींसा करा.

**दिवाकर**:—जालीम डोस ? काय सांगतां हें माई ? अशा रोगाची ट्रीटमेंट युनिव्हर्सिटीच्या कॉलेजांत शिकवली जात नाहीं.

**माई**:—युनिव्हर्सिटीच्या कॉलेजमध्यें नसेल पण घरोघरीं संसारी कॉलेजांत अशा केसीस बऱ्याच ट्रीट केल्या जातात.

**दिवाकर**:—पण संसारी कॉलेजच्या एट्रन्सला मी अझून बसलों नाहीं.

**माई**:—अझून नाहीं तर आत्तां बसा; या परिक्षेला वयाची मर्यादा नसते.

**दिवाकर**:—(स्वगत) आणि जरी असती तरी माई ती तूं मला केव्हांच उल्लंघन करायला लावली आहेस. पण तुला तरी नांव ठेवण्यांत काय अर्थ आहे, हल्लीं वयाची मर्यादा कुठं कोण राखतो आहे ?

**माई**—रोगाचं अचुक निदान होऊन सुद्धां औषधयोजनेला इतका विचार ?

**दिवाकरः**—केस जरा..........जरा कां फारच काँप्लिकेटेड दिसते आहे. याला औ-ष-ध ( विचार ) छे बुवा आपल्याला तर कांहीं सुचत नाहीं.

**माईः**—औषध योजना नसेल तर ' ऑपरेशन '.

**दिवाकरः**—( चपापून ) ऑपरेशन !

**माईः**—कां इतका शॉक सा बसला ? डॉक्टरनं ऑपरेशनला घाबरायचं म्हणजे गारुड्यानं साप म्हणून दोरीच्या सावलीला भेदरण्यासारखं आहे. डॉक्टरी धंद्याला इतका नर्व्हसपणा कसा चालेल ? कां हातांखालीं नर्स नाहीं म्हणून बाऊ वाटतो ? दिवाकरपंत, अहो डॉक्टर, असं भांबावल्यासारखं काय करतां ? मी कोण आहे हें आहेना लक्षांत ?

**दिवाकरः**—( स्वगत ) तूं कोण ? तूं रमाकांताच्या सौख्याची चिता पेटवणारी सापत्न मत्सराची ठिणगी आहेस ! अविचाराच्या मुहूर्तानं लग्नाची चूड दाखवून सवतीचीं पोरं खाऊन, मेल्या सवतीचा जिता दावा साधणारी घरांत आणलेली वाघीण आहेस ! ध्रुवाच्या सापत्न मातेनें आपल्या सापत्न भावानं उत्तानपाद राजाची कीर्ति ध्रुवाइतकीच अढळ केली, त्याचप्रमाणं आपल्या मृत पतीच्या कुलकीर्तीचा डंका गगनभेदी करून त्याच्या कानांवर जाण्यासाठीं, दुष्कृत्याच्या अवसानानं व मत्सराच्या काठीनं पिटणारी डाकीण आहेस !!.

**माईः**—अझून विचार ? अहो त्या ऑपरेशनच्या वेळीं मी तुमच्या शेजारीं उभी राहणार नाहीं असं कां तुम्हाला वाटतं ? तुम्ही डॉक्टर व मी नर्स असा जोडीचा आधार असल्यावर, मृत्यूच्या सरहद्दीवर पाय ठेवणाऱ्या रोग्याला निमिषार्धांत मृत्यूलोकीं खेंचून आणूं.

**दिवाकरः**—किंवा दोन्ही पाय मृत्युलोकांत शाबूद असलेल्या धट्टयाकट्टया जिवाला जीवन्मुक्त करून, एका धक्यासरशीं स्वर्गांत लोटून देऊं.



**माईः**—हाच, हाच माझ्या ऑपरेशनचा अर्थ बरं. डॉक्टर तुमच्या हातून हें ऑपरेशन सकसेसफुली फार पडलं तर...तुम्हाला काय सांगूं ? टाईम्स ऑफ इंडियाच्या बोर्डाएवढा—नव्हे त्याहूनही लांबरुंद बोर्ड लावून सँडर्सरोडवर हजारों ऑपरेशन्स करण्यासाठीं दवाखाना थाटून जरी जन्मभर बसलांत, तरी सुद्धां जितकी फी मिळणार नाहीं, तितकी फी दवाखाना उघडण्यापूर्वी घरबसल्या हें एवढंच ऑपरेशन करून मिळणार आहे. तुमच्या मागणीच्या नाकारणीनं खाक झालेलं तुमचं आशेचं उद्यान या ऑपरेशनच्या दिव्य सिंचनानं पुन्हा फलपुष्प मंडित होईल. अहो अशा शून्य दृष्टीनं माझ्याकडे काय पहातां ? आतां तुम्हाला स्पष्टच सांगतें, कीं कल्पनासृष्टींतील कल्पवृक्षाच्या फलाच्या आशेनं त्याच्या सावलीखालीं बसणाऱ्या बुभुक्षित पांथस्थाला फलभारानं नम्र झालेल्या त्या कल्पवृक्षांचा मालक करते, डॉक्टर, तिकडून तुमच्या प्रेमाच्या मर्मस्थानीं घाव घातला, त्यानंतर ट्रस्टी म्हणून वामनरावांनीं त्या जखमेची कठोर नकाराच्या धक्यानं खपली काढली, त्याच जखमेला माझ्या उपेकडून प्रेमाची मलमपट्टी बांधवतें. बोला डॉक्टर, यापेक्षां शस्त्रक्रियेचं अधिक चीज कोण करील ?

**दिवाकरः**—त्या अपमानाची आठवण झाली म्हणजे पापाचे पाय धरून पृथ्विप्रलयाच्या पाण्यानंच ही अपमानाची आग विझवावी असं वाटतं. आणि ही कलीची करवली पापाच्या पश्यानं माझी कंबर बांधून तें साहस माझ्या हातून करवणार आणि विजयी वीराला उपारत्न अर्पण करणार काय ?

**माईः**—(स्वगत) याच्या या मनोदुर्गाला उपेची घोरपड चांगलीच चिकटली म्हणायची. आतां तो सर करायला कितीसा उशीर लागणार ? (उघड) काय डॉक्टर, तुमच्या तोंडाची खीळ काढायला पुढं आलेला उपेचा हात चार डोळ्यांनीं सुद्धां दिसत नाहीं अं ? दिवाकर, ती पहा उपा, तुमच्या नीरस आयुष्याची संजीवनी, तुमची अभिषिक्त पट्टराणी, तुमच्या प्रेमाची दामिनी व तुमची भावी भामिनी...निदान तुमच्यासारख्या इंग्रजी शिकलेल्या पुरुषांनीं तरी बायकांचा मान......

**उषा**:—(रागावलेली अशी प्रवेश करून, हातांत एक पत्र) बायकांचा मान—आणि तो पुन्हा पुरुषांकडून—

**माई**:—म्हणजे एकदम इतकी अगदीं उसळलीसशी ? आणि हें पत्र कसलं तुझ्या हातांत ?

**दिवाकर**:—पुरुषांच्या हातचं बायकांना मिळालेलं मानपत्रच असेल बहुतेक—होय ना ?

**उषा**:—होय तर—फक्त या पत्राचा मान राखतांना हातांची जागा पायांनीं पटकावली होती एवढंच.

**माई**:—हाताची जागा पायांनीं ?

**दिवाकर**:—अशी पायमल्ली कोणी केली बुवा ?

**उषा**:—बायकांशीं नेहमीं बेफाम असणाऱ्या पुरुषजातीच्या मल्लांशिवाय दुसरं कोण करणार अशी ही पायमल्ली ? त्यांतून लग्नमंडपांतील चौक्याच्या आखाड्यांत कळसवणी सांडून बायकोची माती मऊ केल्यावर अशीं पत्रं लाथेनं तुडविण्याचा दिग्विजय............

**माई**:—अस्सं, आतां आलं माझ्या ध्यानांत हे दिग्विजयी वीर बहुतेक आपले दादाच असले पाहिजेत नाहीं ?

**दिवाकर**:—कोण रमाकांत, शक्य नाहीं असली अरेरावी......

**उषा**:—ही अरेरावी नाहीं—हा :पुरुषांचा जन्मसिद्ध हक्क आहे. ही हिंदू नवरेपणाची जिवंत साक्ष आहे. हें प्रत्यक्ष हिंदुत्व आहे. हिंदूच्या ब्रीदाला बट्टा लावून कसं चालेल ?

**दिवाकर**:—( स्वगत ) पारा बराच चढल्यासारखा दिसतो आहे. पण हिच्या नेत्रकटाक्षांच्या कक्षेंत सांपडल्यामुळं पुरुषांवरच्या हिच्या कटाक्षांचं छेदन तितक्या तीव्रतेनं करतां उपयोगी नाहीं. सध्यां ' नरोवा कुंजरोवा ' याच धर्ममंत्राचा अवलंब केला पाहिजे. ( उघड ) हा आपला ठाम मताचा शिक्का सर्रास प्रत्येक हिंदू नवऱ्याच्या माथीं मारणं कदाचित् अविचारी उतावीळपणाच्या पश्चातापाला कारणीभूत होईल असं आपलं मला वाटतं हो.



**उषा**:—पण मला तर अविचारी उतावीळपणाऐवजीं उतावळ्या अविचाराचा पश्चातापच स्त्री जातीला जन्मभर भोंवतो असं वाटतं.

**दिवाकर**:—पण हें आपलं विधानसुद्धां साऱ्याच स्त्री जातीला सारखं लागू पडेल असं नाहीं. आतां आपण म्हणतां त्याप्रमाणं कांहीं कांहीं ठिकाणीं असं दिसून येतं खरं, पण गांव तिथं महारवाडा असायचाच. आणि तोही पुन्हां कांहीं सृष्टी नियमाला सोडून नाहीं. हिरा आणि कोळसा हे नाहीं का एकाच खाणींत जन्माला येत ?

**माई**:—कशाला उगीच वितंड वादानं हिऱ्याला हात घालून तो कोळशानं काळे करतां ?

**दिवाकर**:—अहो, वादे वादे जायते तत्वबोधः—

**माई**:—तें तुमचं संस्कृत कळायला मी कांहीं कोणी पंडीत नाहीं. मला आपलं एवढं कळतं कीं, या तुमच्या वितंडवादांत तत्वबोध तर राहील कुठल्या कुठंच, पण घशातलं सत्व जाऊन तो कोरडा मात्र पडेल निष्कारण.

**दिवाकर**:—आणि मग मधेंच सभा बरखास्त करून घशाला ओलावा आणण्याकरितां स्टोव्हची आराधना करावी लागेल असंच ना ?

**उषा**:—माझे विचार असे चहाच्या पाण्यांत विरघळणारे खास नाहींत हें मात्र पक्कं लक्षांत असूं द्या हो आपण. आज वहिनीवर हा प्रसंग आला उद्यां माझ्यावरही......

**माई**:—हं आजीबाई, हा भविष्यपुराणाचा अध्याय इथंच समाप्त करा—नाहीं तर मस्करीची कुष्करी होऊन त्याची भलतीच फलश्रुती व्हायची एकादी.

**दिवाकर**:—तितकं कांहीं भ्यायला नको. हें दादांनीं केलेल्या अरेरावी वर्तनाच्या श्रुतीचं फळ आहे हें मला कळतं आहे. त्याबद्दल उषेला काळजी करण्याचं कांहीं कारण नाहीं. समजलं का ?

**माई**:—हें मला कळून काय करायचं आहे ? कळायचं त्या माणसाला कळलं म्हणजे झालं.

उषा:—( स्वगत ) दादाच्या या अरेरावीनं माझ्यावर हा उपकारच केला म्हणायचा. ( जाते )

माई:—कां दिवाकर, या पत्रानं रमेचा अपमान झाला, पण तुमच्या तर मानाची खूण गांठ तुम्हांला पटली ना ? आहे कीं नाहीं गोंडस हाताची मलमपट्टी. आतां तरी ठेवालना या हाताचा मान ?

दिवाकर:—या हाताचा मान मी ठेवल्यानं जर तो हात माझा मान ठेवीत असेल तर हें घ्या वचन. ( वचन देतो. )

माई:—दिवाकर आजपर्यंत तुम्ही माझा हात कैक वेळेला धरला असेल नाहीं ? पण—

दिवाकर:—आजची खुमारी कांहीं और आहे.

माई:—आजचे आपले बेत सिद्धीस गेले म्हणजे एक आधुनिक "मानापमान" नाटकच होणार, आणि झिडकारलेल्या धैर्यधराप्रमाणें पुन्हा दिवाकराला उषा मिळणार.

दिवाकर:—होय, पण तोच बेत फसला तर 'माईसाहेब' नाटकावरही ताण व्हायची—

माई:—त्याची नको तुम्हाला काळजी, धैर्यधरानं भामिनीला खूप होण्याइतकं धैर्य दाखवलं त्याप्रमाणं तुम्हीही यावेळीं धैर्य दाखवून धैर्यधर बना म्हणजे उषा तुमची भामिनी झालीच समजा. बरं आजच्या या लग्न निश्चयानं तुम्ही माझं तोंड गोड केलंत तेव्हां तुमचंही तोंड मला गोड केलंच पाहिजे.

दिवाकर:—नुसत्या चहाच्या पांचट पाण्यानंच कीं नाहीं ?

माई:—छे छे, तुम्ही आपल्या कबूलीनं आपल्या अंगातलं पाणी मला दाखवलं. शिवाय आतां तुम्ही माझ्या उषेचं पाणिग्रहण करणार आहां, तेव्हां आतां रक्ताचं पाणी करणारं तें चहाच तांबडं पाणी कशाला ? कांहीं तरी स्निग्ध आणि तेंही स्निग्ध हातानंच ( जाते. )

दिवाकर:—दुहेरी नात्याच्या स्निग्ध मायेला आतां कांहीं तरी स्निग्ध हें पाहिजेच. पण......पण काय ......( पुढें होऊन ) दुहेरी नात्याच्या मोहमदिरेनं बेहोष होऊन का मी माईच्या दुष्ट कर्माला साथीदार झालों ? का



उषेच्या सौंदर्याच्या अभिलाषानं कांहीं एक विचार न करतां या कृष्णसमुद्रांत बुडी मारली ? का भावी श्रीमंतीच्या जादूनं भारला जाऊन माझा हात माईच्या हातांवर पडला ? नाहींतर माईच्या त्या थेरड्या नवऱ्यानं व व त्या वृद्धकपि ट्रस्टीनं उषेला मी घातलेल्या मागणीचा अव्हेर करतांना वैभवाच्या कमीपणाबरोबरच कुलशीलाचा नुसता हिणकसपणा जमेस धरून माझा व माझ्या घराण्याचा मानभंग केला. त्या मानभंगाच्या भुतांनीं माईच्या मत्सराची मित्रता पत्करून, सूडाच्या रुद्रतालावर माझ्या हृदयांत थैमान घालतांना, माझा हात धरला व माझ्या हातांत माईकडून कृष्णकृत्याचं कंकण बांधलं आणि म्हणूनच सैतानी सत्तेनं सात्विक वृत्तीचा खून करून मी असला अघोरकर्मा बनलों. अपमानाच्या शल्यानं विदीर्ण झालेलं अंतःकरण स्वतः कितीही कमकुवत असलं तरी दुसऱ्यांचीं अंतःकरणं विदीर्ण करण्याची कठोर शक्ती त्यांत उत्पन्न होते हेंच मला जगाला दाखवायचं आहे. ( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

( स्थळ—रमाकांताची खोली. )

रमाकान्त:—( स्वगत ) खरोखर, सृष्टी ही प्रणयाची शृंगार वाटिका आहे. त्या वाटिकेंतील कुशल मालाकार म्हणजे हे कवि व चित्रकार होत. बायरनची "कन्फेशन ऑफ ब्राईड" म्हणजे अत्यंत सुवासीक अशी एक प्रणयपुष्पमाला आहे. त्यांतील नाईकेकडे पाहिलं कीं स्त्री जातीबद्दल गौरव वाटतो; पण त्यानंतर या रडक्या रमेकडे पाहिलं म्हणजे लग्नाचा रौरव आठवतो. रविवर्म्याच्या या 'शकुंतला पत्रलेखना'च्या चित्रांत किती गोड प्रणयकथा भरली आहे. सेंटिमेंट किती 'हायर' आहे. तिकडे त्या चित्रांत दमयंती हंसाला दूत करून आपल्या मानससरोवरांत विहार करणाऱ्या हंसाला—महाभाग नलराजाला प्रणय-संदेश पाठवीत आहे. कविच्या कल्पनेंतील, व चित्रकाराच्या कुंचलींतील, तो प्रणय, ती रसिकता, तें सहजसौंदर्य, माझ्या बायकोच्या वेळीं अगदींच कसं फिकं

पडलं ? असे विचार मनांत आले कीं डोकं कसं अगदीं पिकून जातं.'

**दिवाकर**:—( प्रवेशून ) अहो, काव्यानंद, काव्य आणि व्यवहार यांची सांगड घालण्याच्या अट्टाहासांत खरोखरच आपलं हें काळं डोकं पिकून पांढरं होईल. काव्य आणि व्यवहार यांत काळं आणि पांढरं इतका भेद आहे-जमीन आस्मानचं अंतर आहे. काव्य हा भूमिवरील स्वर्ग असेल तर व्यवहार ही स्वर्गाखालची भूमी आहे. काव्याची सारी भिस्त कल्पनेवर तर व्यवहाराची सारी सत्यतेवर. काव्यकल्पनेनं मनोराज्याचे मनोरम मनोरे बांधतां येतात, पण व्यवहारांतील सत्यतेनं ते ढांसळतात. रमकांत, काव्याच्या चष्म्यांतून आकाशाकडे पाहिलं म्हणजे असं वाटतं कीं, सृष्टिसुंदरीला भुलविण्यासाठीं स्वर्गीय भांडारखान्यांतील दैदीप्यमान अशीं तारारत्नं गगनमंडपांत निळ्या बिछायतीवर मांडून ठेवलीं आहेत. आतां व्यवहारदृष्टी शाबूत नसेल त्यानं तुटलेला तारा पाहून, रत्नं पाहातां पाहातां सृष्टीसुंदरीचा धक्का लागून खालीं पडलेलं तें रत्न उचलण्यासाठीं त्या जागेकडे धूम ठोकली तर त्याच्या हातीं काय येईल बरं ? रत्नाच्या आशेनं गेलेल्या त्या व्यवहारशून्याच्या हातीं, निराशेचं लोखंडच लागणार !

**रमाकान्त**:—कविसृष्टींत निराशेचं साम्राज्य असतं असं म्हणतोस ?

**दिवाकर**:—अर्थात् ! आपल्या काव्यसुंदरीची बरोबरी करणारी एकही रसीक सुंदरी या शापभूमीवर न सांपडल्यामुळं, कवींना त्याबद्दल स्वर्ग धुंडाळायला जाण्याची घाई होते. आपल्या हस्तकौशल्यनिर्मित स्वर्गीय सौंदर्याचा प्रत्यक्ष आस्वाद स्वर्गाशिवाय इतरत्र मिळण्यांत निराशा झाल्यामुळंच रविवर्म्यानं स्वर्गांत जाण्याची इतकी घाई केली.

**रमाकान्त**:—तुझं म्हणणं कबूल आहे बुवा. !

**दिवाकर**:—माझंसं काय—पण शृंगारशतक लिहून कित्येक वर्षं कीर्तीचा श्रृंगार मिरविणारा भर्तृहरी--शृंगाररसाचा सम्राट यानं काव्याचा परमावधी साधला; पण अखेर त्याचीही निराशेची परमावधी झाल्यामुळं त्या उद्वेगाच्या भरांत वैराग्यशतक लिहून आपल्या दारुण निराशेची लेखी कबुली त्याला द्यावी लागली. फार लांब कशाला "राष्ट्र शाहीर गडकरी" यांचा काव्यनायक जयन्त-लीलेच्या प्रेमाच्या वैजयंतीनं भूषीत होण्यासाठीं आटोकाट प्रयत्न करीत असतां त्याच निर्घृण निराशेनं झपाटल्यामुळं, आपल्या प्रेमाचा संसार उधळून देऊन संन्याशी राहिला.



**रमाकान्त**:—खुद्द त्यांचीही तीच अवस्था होती असं म्हणतात. आधुनिक काव्यालंकारांत वैजयंतीप्रमाणं शोभणारी आपली "वाग्वैजयंती" महाराष्ट्राला अर्पण करून आधुनिक कवीमध्यें अग्रपूजेचा मान पटकावणाऱ्या गोविंदाग्रजाची सर्व आयुष्यभर या निष्ठुर निराशेनंच पुजा बांधली असं ऐकतों. पण सृष्टीची योजकता, अन्योन्याश्रयी अशा समान गुणधर्मावर, जोडीच्या जमातीवर, गाढ अशा दांपत्यप्रेमावर परमेश्वरानं केली आहे. मग त्याचा हा असा विजोड कोण करतो ? परमेश्वराला कुणी तरी प्रतिस्पर्धी उत्पन्न होऊन त्याच्यावर मात करण्याकरतां, आमच्यासारखीं विषम स्वभावाचीं विजोड जोडपीं निर्माण करून परमेश्वरी सृष्टीची घडी विसकटतो आहे असं वाटतं. अशीं विजोड जोडपीं निर्माण करून संसाराचा खेळखंडोबा करणारा सैतानाशिवाय दुसरा कोण असणार ? होय कीं नाहीं दिवाकर ?

**दिवाकर**:—काय छान बोललास ! दुनयेंत सैतान शिरल्याशिवाय असले हे सैतानीखेळ कोण करील ? पण तो कुठं आणि कसे आपले खेळ सुरु करील हें कुणाच्या स्वप्नांसुद्धां येणार नाहीं. तूं किंवा मी आपल्यापैकीं कुणीतरी सैतान आहे असं जर आपल्याला कुणी सांगितलं तर......

**रमाकान्त**:—छट् हें कधींच शक्य नाहीं ! स्वप्नांतसुद्धां हें शक्य नाहीं !

**दिवाकर**:—(स्वगत) स्वप्नांत नसेल तर जागेपणीं पहाशील (उघड) तुझ्या लग्नांत तुझी इतकी निराशा होईल असं तुला वाटलं होतं का ? नाहीं ! उलट गृहसौख्याचीं स्वप्नंच पडलीं असतील. मग ही निराशा कशी आली ?

**रमाकान्त**:—अरे, स्वप्नावस्थेंत पडलेल्या मंगल स्वप्नदर्शनाचा परिणाम अमंगल होतो असं म्हणतात.

**दिवाकरः**—पण पुढं होणाऱ्या अमंगल परिणामाचं मंगल स्वप्नदर्शन मात्र कधींही होत नाहीं.

**रमाकान्तः**—आणि म्हणूनच आत्यंतीक निराशा पदरीं पडून जीवित जड होतं. लग्नाचा परिणाम असा होईल असं जर मला स्वप्न पडलं असतं, तर स्वप्नांतसुद्धां मीं माझं लग्न होऊं दिलं नसतं. पण आतां काय ? अशा विषम विवाहाच्या गांठी ब्रह्मदेव तरी कां मारतो ?

**दिवाकरः**—अरे जो तो संसाररंगानं रंगला जाऊन जगज्जनकाच्या देवकार्याला विसरला म्हणून त्यांना शिक्षा सुनावण्याकरतां ही एक त्याची क्लृप्ती आहे.

**रमाकान्तः**—बरोबर आहे ! संसार रंगाचा भंग करणारं विषम विवाहाशिवाय दुसरं तीक्ष्ण हत्यारच नाहीं. मागच्यानां संसाराची ठेंच लागल्यामुळं पुढचे शहाणे होऊन बरींच लग्न रहीत होतील, व दिवसेंदिवस ब्रह्मचर्याची वाढती संख्या ज्ञानमार्गाचा अवलंब करून ह्या पापभूमीची पूर्वीप्रमाणं पुण्यभूमी करतील. फार नामी युक्ति काढलीस ही.

**दिवाकरः**—युक्तीच्या युक्ती, शिवाय करमणूक ! ठरलेल्या साचावर सृष्ट प्राणी अनादि कालापासून निर्माण करितां करितां त्या सृष्टिकाराला कंटाळा आला व त्यानं करमणूक म्हणून एक गंगाजमुनी घांटाची भट्टी काढली त्यांत हातपाय माणसाचे असून घोडमुखी तुंबर, टोगो टुथ पावडर ब्रँडचा मारुती, हत्तीची सोंड असणारा गणपती वगैरे मजेदार प्राणी निघाले, ते पाहण्यासाठीं तेथं पुष्कळ अबालवृद्ध जमा झाले; तेव्हां वयाच्या रंगाकडे किंवा स्वभावाच्या धर्माकडे न पहातां त्यांचा लग्नांचा थाट तेथंच जुळवून आणून घटकाभर मौज केली झालं.

**रमा०**:—त्याच्या घटकेच्या मौजेनं आम्हांला जन्माची सजा झाली त्याची काय वाट ?

**दिवा०**:—खरोखरच ती घटका म्हणजे अशा अभाग्यांचं मरणच.

**रमाः**—प्रेमाचा मृत्यू झाला म्हणून मला मृत्यूचं प्रेम वाटायला लागलं आहे.



**दिवा०**:—अरेरे ! हा तर अगदीं आत्महत्येपर्यंत आला आहे. याची थोडीशी थट्टा करून पुन्हां मूडमध्यें आणावा ( उघड ) कायहो रमाकांत आपल्या लग्नाचा तुम्हांला पश्चाताप......

**रमा०**:—पश्चात कां प्रत्यक्ष ताप होतो आहे. त्या लग्नाचं नांवसुद्धां घेऊं नकोस !

**दिवा०**:—पण तुमचं नांव घेतलं तरी लग्नाचं नांव निघतंच ! कारण आपल्या अर्धांगीचं नांव रमा आहे. बरं, जाऊं दे तें ! पण काय हो, ही अर्ध—नारी—नटेश्वराची तसबीर तुम्हीं आपल्या खोलींत कशी लावलीत ? हें विजोड ध्यान आपल्याला आवडतं वाटतं ?

**रमा०**:—म्हणून मला विषम स्वभावाच्या बायकोचं ध्यान आवडलं पाहिजे असं आपलं म्हणणं कीं काय ?

**दिवा०**:—गंगाजमनी घांटाच्या तांब्यांतलं पाणी बेचव लागत नाहीं, गंगाजमनी कांठाचं अंगवस्त्र अंगावर सावरतांना पोषाखाचा विजोड होत नाहीं, त्याच प्रमाणं जरा सांवरून घेतलं कीं गंगाजमनी स्वभावाचाही मेळ पटायला हरकत नाहीं. बिझीकमध्यें किलवर राणी व लालबदाम गुलाम या विरोधी रंगाच्या जोडप्यानं बिझीकचा संसार थाटतां आणि प्रत्यक्ष रंगाच्या स्वभावानं रण माजवितां तेव्हां तुम्हांला काय म्हणावं ?

**रमा०**:—अहो शद्बशूर वाग्विहारी, आपलं हें शद्बतांडव वाग्देवीच्या प्रसादकन्येचा कंठमणी होण्याच्या वाङ्निश्चयाच्या आनंदामुळं आहे हें मीं जाणून आहें तरी पण आपण नशिबाचे शिकंदर आहांत म्हणून, सृष्टी नियमाप्रमाणंच जरी नाहीं तरी त्या दिवाकराला उषा मिळणार म्हणून त्या दिवाकराप्रमाणंच या दिवाकराला अभिनंदनाचीं अर्घ्यं मी मोठ्या आनंदानं देतों. आय हार्टिली कॉंग्रॅचुलेट यू फॉर गेनिंग माय सिस्टर उषा.

**दिवा०**:—तूं निराश असतांना सुद्धां मला कॉंग्रॅच्युलेशन्स दिलेंस या बद्दल मी तुझा फार आभारी आहें. अरे वा ! उसनं फेडायची वेळ आलीच ! रमाकांत, तुझ्या निराशेच्या ढगांतून आशावृष्टीची सर ती पहा येत आहे ! तूं माझं भावी लग्नाबद्दल अभिनंदन केलंस, त्याचप्रमाणं तुम्हां

दोघांच्या मधुमीलनाबद्दल मीं तुझं अभिनंदन करतों. रमावैनी, माई वगैरे मंडळी इकडेच येत आहेत तीं पहा.

( माई, उषा, भालचंद्र, रमा येतात. )

**माईः**—रमाकांत, ही घे आपली रंभा. दिवाकर, ही गेल्यापासून हा आपला सारखा दुर्मुखलेला. पहा कसा अगदीं सहा महिन्यांचा आजारी दिसतो आहे तो.

**दिवा०ः**—म्हणून आल्या पावलीं इथं घेऊन आलांत वाटतं वहिनींना ? खरोखर रमाकांत उर्वशी गेल्यापासून पुरुरव्यालासुद्धां इतका विरह झाला नसेल !

**उषाः**—वैनी, दादाच्या अंतःकरणाला झालेली जखम फार नाजूक आहे बरं ? तिला आतां तुझ्या जाण्यानं धक्का लावूं नकोस. बघ बाई, माझा नाजूक प्रकृतीचा दादा आतां तुझ्या ताब्यांत आहे.

**माईः**—पुरे झाली हां थट्टा ! रमा तुझं सवाई उट्टं लवकरच काढील. होय कीं नाहीं दिवाकर ?

**दिवा०ः**—बरं हे पाहुणे कोण ?

**माईः**—हे रमेच्या चुलतीचे मावस भाऊ आहेत. त्यांचं नांव भालचंद्र. रमेच्या वडिलांनींच यांना वाढविलं आहे. सध्यां हे इथं कॉलेजांत असतात.

**दिवा०ः**—( स्व. ) लहानपणापासून रमेच्या घरींच वाढलेले आहेत—" मी कुमार तीही कुमारी " असं याचं बाळपण गेलं अं ( उ ) मि० भालचंद्रपंत नवीन—ओळख आहे. ( शेक् हॅन्ड. )

**भालचंद्रः**—होय-परिचयानं वाढेल मी इथंच असतों.

**उषाः**—अजून कॉलेज सुरु व्हायला अवकाश असेल, नाहीं दादा ?

**रमाः**—होय ! आणि म्हणूनच मि० " भालचंद्रपंतांनां आपले शब्द खरे करायला कोणतीच अडचण पडणार नाहीं, मि० " भालचंद्रपंत ?

**उषाः**—करतीलच ते आपले शब्द खरे म्हणजे तेवढेच चार दिवस पाहुण्यांच्या संगतींत सगळ्यांनाच मजा वाटेल.



**भाल०ः**—(स्व) हाऊ फॉर वर्ड ए गर्ल ! (उ०) पण मी आतां कार्टर्स मध्यें जातों.

**दिवा०ः**—पाव्हण्यांचे येतांचे पाय स्वतःचे असतात, पण जातांना मात्र यजमानाच्या मर्जीचा मुहूर्त पहावा लागतो.

**माईः**—उषे, स्टोव्ह पेटीव चल आटप ! दिवाकरपंत, पाहुण्यांना खोली वगैरे दाखवा व त्यांच्याबरोबर तुम्हींही गरम व्हा.

**दिवा०ः**—मी गरम झाल्या बरोबर बहुतेक सर्व थंड पडतात, असा माझा नेहमींचा अनुभव आहे.

**भाल०ः**—या दिवाकराचं या घरांत बरंच प्रस्थ असं काका म्हणाले ते खरं दिसतं एकूण.

**दिवा०ः**—( जातांना स्व० ) या भालचंद्राची दृष्टी एकसारखी उषेवर होती. या गोंडस बाळाचं प्रस्थान लवकरच हलवलं पाहिजे इथून.

( रमाकान्त रमेशिवाय सर्व जातात. )

---

## प्रवेश ३ रा.

### स्थळ रमाकांताची खोली

पात्रें ( रमा उभी, रमाकांत साचिंत )

**रमाः**—(जवळ जाऊन) हें काय, इतका वेळ झाला. सारखं उभं असायचं एक शब्दसुद्धां बोलायचा नाहीं. सासुबाई म्हणतात त्याप्रमाणें इकडची प्रकृती खरोखरच बिघडली आहे काय ?

**रमाकांतः**—होय बिघडली आहे खरी.

**रमाः**—मग तसं पत्र आलं असतं तर मी आधीं नसतें कां आलें ?

**रमाकांतः**—(स्वगत) तूं आधीं आली असतीस तर ती कदाचित आधिकच बिघडली असती.

**रमाः**—केव्हांपासून बरं वाटत नाहीं ?

**रमाकांतः**—तुझ्या कुंकवाचा डॅजरसिग्नल दिसल्यापासून.

**रमा**:—कां बोलायचं नाहीं वाटतं माझ्याशीं ?

**रमाकांत**:—काय बोलूं ?

**रमा**:—मी आज इतके दिवसांनीं आलें.......

**रमाकांत**:—मोठे उपकार झाले.

**रमा**:—फार दिवस राहिल्याचा राग आला वाटतं ?

**रमाकांत**:—छे छे ! मुळींच नाहीं तिकडे होतीस तेंच बरं होतं. आतां जाणार केव्हां ?

**रमा**:—क्षमा करावी गडे आतां; मी आतां पुन्हां कध्धीं माहेरीं जाणार नाहीं झालं ? पण इतक्या दिवसांत आपल्याकडून एक तरी खुशालीचं पत्र यायचं होतं ?

**रमाकांत**:—कांहीं कमीजास्त झालं असतं तर तुला कळवणं भागच होतं. नाहीं तर उगीच कळावें लोभ असावा या विनंतीचं कारण काय ? आणि विनंती करुनसुद्धां त्याला दुसऱ्यांनीं मान दिला पाहिजे ना ?

**रमा**:—दिला बरें. आपल्या आज्ञेप्रमाणें मी भाऊदादाजवळ शिकायला सुरवात केली आहे. हरीविजय शिवलीलामृत सुगृहिणी संसारशास्त्र इतकीं पुस्तकं मी वाचलीं.

**रमाकांत**:—डॅम् दॅट् हरीविजय ॲन्ड् लीलामृत.

**रमा**:—आपल्याला खोटं वाटत असेल पण त्याबद्दल बाबांनीं माझ्या बरोबर पत्र दिलं आहे त्यांत आपला रोष होऊं नये म्हणून मला पेटी बाजवणं, वाचणं, कशीदा काढणं, वगैरे शिकवायला सुरवात केली आहे. असं लिहून इथंही मला पुढें शिकवावं असं सुचविलं आहे.

**रमाकांत**:—आतां मी लवकरच एक मुलींची शाळा काढणार आहें तिथं तुला वाजवायला, गायला, नाचायला शिकवीन बरं ? (स्वगत) पंधराव्या शतकांतील डार्क एजीसमधील कुठली ही कृत्या माझ्या पाठीमागें लागली आहे कोण जाणें ? अशा मनोवृद्धेबरोबर मला काय सुख लागणार ?

**रमा**:—हें पाहिलं पत्र—आपल्या आज्ञेप्रमाणें वागण्याचा मी निश्चय केला आहे. (पत्र देते तो वाचतो व रागावून)



**रमाकांत**:—अग कवटाळणी हा तुझा वृद्धकपी मला विभक्त होण्याविषयीं उपदेश करतो आणि माई सर्वस्वी तुमचं नुकसान कदाचित भलताच प्रसंग तुमच्यावर आणील असं लिहितो, असं यानं विष ओकायला याला तूं असं सांगितलंस तरी काय ? काय आग लावलीस बोल.

**रमा**:—कोण मी ? काय ग बाई हे बोलणं ?

**रामाकांत**:—तूं नव्हे तर कुणी ? कर्ण पिशाश्चानं ?

**रमा**:—सवती सावत्राचं घर असलें म्हणजे लोकांनां नावें ठेवायला एक जागाच असते बाकी आपल्या घरांत तर अझून तसं कांहीं नाहीं.

**रमाकांत**:—काय मानभावीपणा आहे पहा ! विभक्त होऊन वडिलार्जित इस्टेटीवर चैन करून मालकी गाजवावी अशी तुझी इच्छा दिसते आणि म्हणूनच शिक्षणाच्या पुराणाचं हें पत्र लिहून सापत्नभावाचं पिशाच्च त्या थेरड्यानें माझ्यासमोर नाचवलं. तें पिशाच्च एकदां मानगुटीला बसलं म्हणजे मग वेगळें व्हायला काय उशीर. हा तुझा कावा काय ? थांब( अंगावर धाऊन ) पिशाच्चाप्रमाणें तुझ्या मानगुटीला बसून...... ( मारावयास धांवतो व धरतो. )

**रंगनाथ**:—रावसाहेब, दिवाणखान्यांत पाहुणे चहासाठीं वाट पहात आहेत.

**रमाकांत**:—( सोडून ) नको. तुझ्या क्षुद्र मनोवृत्तीबद्दल या शरिराला शिक्षा देऊन तरी काय होणार. नको तुझं मुखावलोकनसुद्धां नको. ( जातो ) ( रंगनाथ व रमा पुढें येतात. )

**रंग०**:—हें काय बाईसाहेब पहिल्याच भेटीला रावसाहेबांना मल्लविद्या शिकविली वाटतं ?

**रमा**:—रंगनाथ, प्रथम दर्शनाला हा तिकडून दिलेला नजराणा आहे. कर्म आपलं दुसरं काय ? ( जाते. )

**रंग०**:—शाला प्रकार काय सुतोवाच करतो ? आपण अगदीं थक्क झालों. तरीपण परमेश्वरा हें लक्ष्मीनारायणासारखं जोडपं अखंडसुखाचा

अनुभव घेत असतां त्याला सापत्नभावाची दृष्ट न लागो हेंच या आश्रितांचं तुझ्या चरणांजवळ हात जोडून मागणं आहे. ( जातो. )

---

## ( प्रवेश ४ था. )

( **पात्रें:**—रंगनाथ व भालचंद्र बोलत प्रवेश करतात. )

**भालचंद्र:**—एकूण रमाकांताच्या गृहसौख्याला ग्रासणाऱ्या या राहूनं आपला पाय बराच खोल रोंवला आहे म्हणायचा तुमच्या घरांत ?

**रंगनाथ:**—अहो नुसता एकटा राहूचसा काय बेऊन बसलांत तुम्ही ? या राहूनं बरोबर एक केतूही आणला आहे आपल्या मदतीला. या राहूकेतूची–दिवाकर अपडुडेटची नजर आकाशांतील सूर्यचंद्राप्रमाणें आमच्या या घरांतील सूर्यचंद्रावर–रमाकांत बाळासाहेबावर पडली आहे.

**भालचंद्र:**—सूर्यचंद्रानांच ग्रहण लागल्यानंतर बिचाऱ्या प्रभेला अंधःकारानें ग्रासून टाकल्यास काय नवल ? नशीब बिचाऱ्या रमाताईचं !

**रंग॰:**—अहो रमाताईचं सोडूनच द्या पण आमची ही उषासुद्धां त्या राहूच्या कक्षेत सांपडून चवचालपणाच्या आंधळ्या कोशिंबिरींत त्याच्या भोंवतीं पिंगा घालायला लागली.

उषा:—( प्र. करून बाजूला स्वगत ) कोण मी चवचाल ? रंगनाथाचेच कां हे शब्द ?

**रंग॰:**—भालचंद्रपंत काय सांगूं तुम्हाला, ज्या या बालबोध घराण्याचं वळण इतरांनीं कित्ता घेण्यासारखं होतं त्यालाच आतां लोकनिंदेच्या लत्ता बसत असल्याचं पाहून माझ्या पोटांत कसं अगदीं भडभडून येतं.

उषा:—( स्व. ) आणि म्हणूनच वाटतं तूं हें वीष यांच्याजवळ भडाभड ओकतोस ?

**रंग॰:**—दिवाकराच्या नादानं नादावलेली उषा अलीकडे अगदींच बेताल होऊं लागली आहे.



**भालचंद्र:**—पण अशा या स्वैराचाराला माईची संमति कशी मिळते ?

**रंग॰:**—तिथंच तर मूळ खात आहे घोडं पेंड.

**भाल॰:**—मग ठीकच आहे जें आहे तें. आईच्या घोड्यानें पेंड खाल्ली कीं मुलाचे घोडे बेलगामी व्हायचेच. शिव शिव, आईच्या शिकवणीमुळें संजयासारखे योद्धे ध्रुवबाळासारखे तपस्वी, शंकराचार्यासारखे धर्मवीर, शिवप्रभूसारखे कर्मवीर, बापूगोखल्यासारखे प्रतिज्ञाधीर ज्या या भरतखंडांत झाले त्यांत अशा कुचकामी मातांकडून आर्यसंस्कृतीची लांडगेतोड करणाऱ्या अपत्यांची निपज होऊं लागली यापेक्षां देशाच्या दुर्दैवाची परमावधी ती कोणती ?

**रंग॰:**—पंत जाऊं द्या झालं, अहो हा कलीचा प्रभाव दुसरं काय ?

उषा:—( उघड पुढें येऊन ) कलीचा प्रभाव कीं कळीचा प्रभाव ? रंगनाथ तूं स्वतःला समजतोस तरी कोण ? १०।२० वर्षे केलेल्या नोकरीच्या तुटपुंज्या अवसानाचं पर्यवसान मालकी हक्कामधें होतं अशी का तुझी समजूत आहे ? एके ठिकाणीं टिकून रहाण्याच्या मुळाशीं नोकराचा सद्गुण नसून मालकाचा चांगुलपणा असतो.

**भाल॰:**—आणि तो संपल्यामुळेंच नवीन भरपाईसाठीं रंगनाथाला ही कळकळीची कळ फिरवावी लागते आहे उषाताई......

उषा:—माफ करा मी एक स्वैराचारी आहें.

**भाल॰:**—आणि म्हणूनच त्याला आळा घालण्यासाठीं पाहुण्याच्या मर्यादेचं अतिक्रमण करून कठोर सत्याच्या आश्रयानें मला आपल्याला वेळींच सावध करावं लागत आहे. उषाताई आपण विसाव्या शतकांतील विद्याभूषित विचारी विदुषी आहां आपल्या घराबद्दल चारचौघांत काय कुजबुज चाललेली आहे, दिवाकराशीं आपलं कसलं नातं जोडलं जात आहे, तोंड दाबून बुक्याचा मार सदैव सोसावा लागत असल्यामुळें माझ्या ताईची कशी अवस्था होत आहे, त्याचा आपण एकदां शांतपणानें वेळांत वेळ काढून विचार करा, म्हणजे तुमच्या डोळ्यानां तुमच्या घराची फिसकटत चाललेली घडी स्पष्ट दिसेल.



MODERN COLLEGE

उषाः—पण तें दाखवायला पाहुण्यांचा चष्मा नको माझे डोळे अजून थंड आहेत.

भाल०:—आणि म्हणूनच मी पुन्हा एकदां सांगतों कीं ते थंड आहेत तोंवरच काय तें नीट पाहून घ्या. कारण एकदां दृष्टी अंध झाली कीं मनुष्य परावलंबी होतो. आणि मग कळत असूनही वळत नाहीं व अशाच वेळीं माझ्या सारख्याच्या बोलाची ओळख पटते.

उषाः—आपल्यासारख्याच्या बोलाची ओळख पुढें केव्हां पटेल तेव्हां पटेल. पण मला तर आतांच त्या वेदांती पाहुण्याची मात्र पुरी पुरी ओळख पटली आहे. भालचंद्रपंत लोकांची कुचेष्टा केल्यानें आपली प्रतिष्ठा वाढत नसते.

भाल०:—उषाताई माझी प्रतिष्ठा वाढावी म्हणून नव्हे तर आपली कुचेष्टा टळावी म्हणून हा माझा अल्पप्रयत्न आहे.

उषाः—तो त्या प्रयत्नाइतकाच अल्पकिंमतीचा आहे.

भाल०:—किंमत नुसत्या प्रयत्नांनीं अजमावायची नसून कार्यपूर्तीनें ती ठरवावी लागते.

उषाः—घरांतील यःकश्चित नोकराच्या कानीं लागून आपली कार्यनौका निराधार संशयसमुद्रांत हांकारणारा कर्णधार अखेरीस तिच्यासकट अपयशाच्या खडकावर आपटून जगांतून उठल्याशिवाय राहाणार नाहीं.

भाल०:—हा नोकर घरांतील एक हरकाम्या नसून एक अस्सल पाणबुड्या आहे आणि त्याच्याच सहाय्यानं संशयसमुद्राच्या पलीकडे असणाऱ्या अज्ञान समुद्रांत दिवाकरासारख्या देवमाशाच्या तडाख्यानें अविचाराची नौका फुटून तळीं गेलेल्या उतारूंना जिवंत वर आपल्या नौकेवर घेऊन मी पुन्हा जगांत आणून बसवणार आहें. मग त्या वेळेला तुमचे डोळे उघडतील ना ?

उषाः—असं होणं अशक्य आहे.

भाल०:—शक्याशक्यतेचा निकाल अखेर परिणाम लावील पण तुमचे डोळे कायमचे मिटतांना जर कोणी एकाद्या धन्वंतरीनें उघडले तर मग त्या धन्वंतऱ्याला तुम्ही तुमच्या नव्या मन्वंतराचा मनु समजाल ना ?



उषाः—दुर्दैवानें तसाच जर मनु पालटायची वेळ आली तर माझें मन कदाचित पालटेल—पण असं होणं अशक्य आहे. हे तुमचे मनचे मांडे तुम्हाला बहुतेक मनांतच खायचा प्रसंग येईल.

रंग०:—पंत, कां उगाच आपल्या जिभेला वृथा शीण देतां सुंभ जळाला तरी पीळ जळाला पाहिजे ना ? या दिवाकराच्या नव्या कारकीर्दीची कीर्द नानासाहेबांना लिहून कळवा म्हणजे झालं. तेच येऊन काय ती तोंड मिळवणी करतील.

दिवा०:—(रागानें प्र. करून) नानासाहेबांना लिहून पाठवा, काय लिहून पाठवा ?

उषाः—काय म्हणजे तुमचीं आमचीं कृष्ण कारस्थानं, डॉक्टर या चोमड्या रंगनाथाच्या मदतीनं हे पाव्हणे आपली कीर्ती अटकेपार करून पेशावरला नानासाहेबांच्या कानांवर घालणार आहेत.

दिवा०:—हे पाहुणे अर्ध्या हळकुंडानं पिवळे झालेले दिसतात. कांहो, पाव्हणे आपण काल मेलांत आणि आज पितर झालांत वाटतें ? असं बेजबाबदार बोलायला आपण आमचं असं काय पाहिलं आहे ?

भाल०:—(स्व) आपलं खरं स्वरूप काय तें अजून मला पुरतेपणीं दिसलं नाहीं पण............

दिवा०:—काल आमचे आपण बहुमानाचे पाहुणे होतां पण आजच्या या कुटाळीनं आपण आपली किंमत आपल्या हातानं कवडीमोल करून घेतलीत.

उषाः—डॉक्टर भलतंच कांहीं तरी. मोलाच्या परिमाणांचं कवडी हें चालें नाणं नाहीं. शिवाय व्यवहारांत 'पाहुण्याच्या' मागें नेहमीं 'पै'च लागलेली असते. आपण नेहमीं 'पै पाहुणाच' नाहीं का म्हणत ?

दिवा०:—मागं काय पुढं काय कुठंही असली तरी पैची किंमत थोडीच वाढणार आहे ? शिवाय पहिल्या दिवशीं पाहुणा दुसऱ्या दिवशीं पै आणि तिसऱ्या दिवशीं कांही नाहीं. हाच व्यवहार आहे खरा. बरं ठीक आहे. मि० भालचंद्र माझ्याविषयीं मन नसतं कलुषित झाल्यामुळें

तुम्ही स्वीकारणार नाहींच म्हणा तरी पण formality म्हणून Good day म्हणून मी आपली रजा घेतों. (स्व) या बाळाला लवकरच चांगली बाळबाटी चारली पाहिजे. (दोघेही जातात.)

रंग०:—पंत कोठून आपण बोलायला गेलों.........

भाल०:—अहो त्यांत काय एवढं ? केव्हांनां केव्हां तरी हें व्हायचं होतंच तें आज झालं आणि तें एकापरी बरंच झालं; शुभःश्च शीघ्रम्.

(जातात.)

---

## प्रवेश ५ वा.

स्थळ:—बाळासाहेबांची स्टडिरूम, ( बाळासा. अपटुडेट. )

मि. अपटुडेट:—( बाळासाहेब बह्या फेकतो त्यास ) अरे ह्या बह्या अशा फेकतोस कां ? त्यापेक्षां एखाद्या हलवायाला रद्दीच्या भावानें विकल्यास तर, चार दिवस मिठाई तरी खायला मिळेल.

बाळा०:—( रागानें ) काय करुंरे, असा संताप आला आहे कीं... अरे तें " डायरेस्ट इन्डायरेक्ट " त्याची कोण कटकट ! अनेलेसिस्चा कोण व्याप, आणि त्याचा उपयोग काय तर म्हणे कांहीं नाहीं. मास्तर उगीच जीव खातात झालं.

मि. अप०:—अरे "डायरेस्ट" इन्डायरेक्ट म्हणजे प्राणायाम व द्राविडी प्राणायामासारखं आहे. त्याचा उपयोग म्हणजे एखाद्याची जर पाण्यावांचून करायची असेल तर इन्डायरेक्ट करावी लागते. डायरेक्ट मेथडनं श्रीमुखांतच बसेल. एखाद्या धंद्याची जबाबदारी आपल्यावर इन्डायरेक्ट रीतीनें घ्यावी पण पैसा मात्र " डायरेक्ट " आपल्या खिशांत आला पाहिजे. अनेलेसिसचा उपयोग सॉर्टिंगला होतो. व्यवहारांत मनुष्यस्वभाव सॉर्ट करतां यावा हा खरा त्याचा उद्देश आहे. पण तें जरी साधलं नाहीं तरी अनेलेसिसमध्यें पुष्कळ मार्क मिळवणाराला रेलवेमध्यें सॉर्टरची जागा तावडतोब मिळते.



बाळा:—अहो विशाळशीर्ष, या डोक्याच्या कारवाईनं हल्लींच्या कुचकामी शिक्षणाची आपण महती वाढवली हेंच खास—

मि. अप०:—हल्लींचं शिक्षण महनीय आहेच मुळीं. आपली पितृत्रयी ज्यांच्या लक्षांत राहात नाहीं, संध्येंतील चोवीस नांवसुद्धां ज्यानां पूर्ण आठवत नाहींत अशा महांनां, मारे, वॉरन-हेंस्टिंग्ज पासून आज पर्यंतचे सगळे गव्हरनरजनरल घोकायला लावले कीं, त्यांच्या स्मरणशक्तीला बराच व्यायाम होऊन ती ताजी तवानी होते, आणि मग त्यांच्या डोक्यांत त्यांचे पितर सहज राहतात. गव्हरनर जनरलच्या कारकीर्दीच्या सनावळी पाठ असल्या कीं सगळ्या देवांच्या सहस्रनामावळी, गोत्रावळी, इतकंच नव्हे तर आपल्या मृतांच्या श्राद्धतिथी सुद्धां त्यांनां लक्षांत ठेवणं फार सोपं जातं, त्यांच्या जन्म मरणांच्या तारखांनीं पुढील, आयुष्यांत, स्थानिक स्वराज्यांत जन्ममृत्यु नोंदणीचं काम चांगलं करतां येतं. हे सर्व इतिहासापासून होणारे फायदे आहेत.

बाळा०:—फारच मोठे फायदे आहेत बोवा. हल्लींचा इतिहास नसता तर श्राद्ध कर्म आणि तिथी या त्रयीच्या अभावीं धर्म बंद पडून त्याचा लोप झाला असता नाहीं ? फारच मोठं नुकसान !

मि. अपटु०:—अरे बाबा ! तुला थट्टा वाटते आहे. पण हल्लींचा इतिहास नव्हता म्हणून मोठंच नुकसान झालं आहे. आणि तें सुद्धां एका महनीय महात्म्याचं—

बाळा०:—अरे ! काय म्हणतोस तूं हें ?

मि. अप०:—दत्तांनीं किती गुरु केलेरे !

बाळा०:—अरे चोवीस, बरं पुढें ?

मि. अप०:—पुढें काय कपाळ ! हा इतिहास जर दत्ताचे वेळीं असता तर त्या गझनीच्या सुलतानाला अक्कल शिकवणाऱ्या घुबडाला पंचवीसावा गुरु करून, सुलतानाचे गुरुबंधु होऊन हिंदुस्थानांतल्या मूर्ती त्याच्या गदेपासून त्यांनीं वांचविल्या नसत्या का ?

बाळा०:—आतां मात्र, कमाल झाली बोवा, इतकं सूक्ष्म अवलोकन शिकवणारा आपला गुरु तरी कोण ?

MODERN COLLEGE

**मि. अपटु**ः—अरे गुरु कुठला ? हा स्वयंनिर्णय आहे. गुरु जर असं बारीक मेणकाम शिकवूं लागेल तर त्यांनां गुरु कोण म्हणेल ?

**बाळा**ः—वर भूगोलाच्या रुक्ष अशा सहारा डेझर्टमधून उपयोगाचं कोणतं पीक आपण काढतां ? आपल्या गांवच्या नदीचा उगम माहीत नसला तरी चालेल, पण त्या " ॲमेझॉनची " लांबी कशालारे माहिती पाहिजे ?

**मि॰ अपटु**ः—घरांतल्या देवाला संबळीची हवा दाखवून वेशीच्या बाहेरच्या म्हसोबाला बकऱ्याचा बळी कां द्यायचा तर तो मानगुटीला बसतो म्हणून. ॲमेझॉनची लांबी चुकली तर परीक्षकाचा म्हसोबा, परिक्षेच्या वेळीं मानगुटी धरून वर्षभर लंबे करतो. गांवची गरीब बिचारी नदी मेल्यानंतर प्रेतें जाळायला जागा देते, पण ही नदी जिवंतपणीं पोट जाळायला जागा देते. नीरा कॅनालनं जमिनीची सुपीकता वाढवली का गांव उठवून बेकार मजुरांची संख्या वाढवली हें माहीत असून करायचं काय ! पण पनामा कॅनालसारख्या एखाद्या नव्या दिंडींतून किती परोपकारी पाहुणे हिंदुस्थान पुनीत करण्यासाठीं आले हें कळलंच पाहिजे. कारण परिक्षेचा चष्मा लावून, नोकरपेशाच्या नशिबाचा लेख तेच वाचणार आहेत—जें शिक्षण सहीचें महत्त्व व आपद्धर्म शिकवतें त्याचा म्हणे उपयोग काय ?

**बाळा**ः—फार गहन आहे बोवा हें ! उभ्या जन्मांत चुकून सुद्धां उपयोग होणार नाहीं अशा मेट्रिक सिस्टीमसारख्या विषयाची सुद्धां तुझ्या सुपीक डोक्यांतून उपयोगाची सुपीकता बाहेर पडेल.

**मि.अपटु**ः—अरे प्रत्येक विषय परिक्षेंत पास करण्याला उपयोगी पडतो हा उपयोग काय थोडा आहे ? शिवाय " एक धड ना भाराभर चिंध्या " म्हणशील कदाचित् पण माहिती काय थोडी मिळते ? सायन्सच्या पुस्तकांतून पक्षाचे रंग, चोंची, पाय वगैरे वर्णन जर तूं वाचलं नसतंस तर तुझ्या त्या पलिकडच्या पिंजऱ्यांत, पोपट म्हणून एखादं अपशकुनी घुबडच तूं ठेवलं असतंस. या शिक्षणाच्या अभावीं यज्ञासाठीं चालवलेल्या बोकडाचा,



पिसाळलेला कुत्रा झालाना ? " त्रयाणां धूर्तानां " वाचलं आहेसना आणि म्हणे शिक्षणाचा उपयोग काय ?

**बाळा**ः—राहूं देरे तुझं तें तर्कट ! आपलं तर असं स्पष्ट मत आहे कीं हल्लींच्या शिक्षणांत कांहीं अर्थ नाहीं.

**मि॰ अपटु**॰—यांतच पुष्कळ अर्थ मिळण्याचा संभव आहे. आतां असं पहा—माझा बाप कोण होतारे ?

**बाळा**ः—तुला ठाऊक नाहीं वाटतं ? काय हा प्रश्न; ( हांसतो. )

**मि॰ अपटु**ः—मलाच हंसूं नकोस. ( हॅपी इज द् चाईल्ड दॅट नोज् इटस् फादर ) अशी म्हण कांहीं उगीच नाहीं पडली ? माझा बाप शास्त्री होता. आतां माझ्याकडे पाहून असं सांग कीं त्या माझ्या वे. शा. सं. तीर्थरूपांनां हा माझाच मुलगा असं यज्ञोपवीताच्या शपथेवर तरी सांगतां येईल काय ? अशा या ड्रेसांत माझ्या बरोबर जर त्यांनां उभं केलं तर कल्पीकालानंतर, आपल्यावेळीं जगबुडी होऊन, नव्या युगांतील, नव्या प्रजेचे, आद्यजनक, म्हणून ते मला, फादर ॲडामचा मान देतील शिवाय आपण निपुत्रीक आहों असं आपल्या पुत्राच्या तोंडावर सांगून विनवारशी म्हणून इस्टेट सरकारजमा करायला सांगतील. आज मी असा जो दिसतों आहें तो कशामुळें ? तर केवळ आंग्लविद्या आणि तिची पाठीराखी प्रशासन यांच्या कृपाकटाक्षामुळें. हें सुरवंटाचं फुलपांखरूं जर का झालं नसतं तर मात्र या भिक्षुकीच्या पेशामुळं, आमचं वारसं ठेवले त्यांच्या बाराव्याला मला बसावं लागलं असतं. देव व भक्त यांची मध्यस्थी करण्याकरतां भटकी, बडवेशाही, पंडेगिरी इत्यादि मजला मारून, पुण्याईच्या हुंडीची दलाली म्हणून मिळणाऱ्या दक्षणेसाठीं दक्ष राहावं लागलं असतं. इतकंच नव्हे तर शंख, चक्र, गदा, पद्म, वगैरे आयुधं मूर्तिकारानं हातांत दिल्यामुळें अगर कमरेवर हात ठेवल्यामुळें हात असून थोट्या झालेल्या देवमूर्तींनां, अगर लाडू घेऊन, कैकवर्षं, रांगत असणाऱ्या लंगड्या बाळकृष्णाला " मुके आंधळे पांगळे आणि थोटे " अशा दुर्बलांनां करा साह्य मोठें. " या कवि न्यायाप्रमाणें रोज स्नान घालण्याची पाळी माझ्यावर आली असती. किंवा शंभो शिव

" हर हर " म्हणून जो तो नांवानें हांक मारून समाधी भंग करतो म्हणून वैतागानं स्मशानांत जाऊन बसणाऱ्या शिवाला, घंटा वाजवून जग जिवंत असल्याची जाणीव मला शिवरात्रीला तरी करून द्यावी लागली असती. पण अस्मादिकांचे हे सारे हाल या फ्याशननं वांचविले.

बाळा०:—या फ्याशननं तुझ्या शिक्षणाचा कमीपणा सुद्धां झांकला आहे.

मि० अपटु०:— आंग्लविद्या इकडे नांदायला आली तेव्हां तिची पाठराखीण म्हणून फ्याशन आली. आतां नांदायला आलेल्या मुलीचा कमीपणा झाकणं हें पाठराखणीचं कामच आहे. त्यांत पाठराखी चतुर असली म्हणजे मुलगी लहान असल्यामुळें तिचीं सगळींच कामं करून कोणत्याही गोष्टीचा बोभाटा म्हणून कसा तो होऊं देत नाहीं. नुसती पाठराखी राहाणं शक्य नाहीं म्हणून आंग्लविद्या व त्याबरोबरच ही फ्याशन अबादीत राहावी म्हणून तरी निदान दयाळू इंग्रज सरकारचं राज्य आमच्यावर यावच्चंद्र दिवाकरौ रहावं अशी मी नेहमीं परमेश्वराजवळ प्रार्थना करीत असतों.

बाळा०:—या फ्याशनच्या विषयामुळें तुझ्या जिभेवर आज नुसती सरस्वती नाचते आहे.

भाल०:—अरे नुसती सरस्वतीच काय पण लक्ष्मीसुद्धां तिच्या हातांत हात घालून फुगडी खेळत आहे असं या फ्याशननं तुला दिसेल.

बाळा०:—तूं म्हणतोस त्याप्रमाणें "फ्याशन" हा एक या शिक्षणापासून फायदा आहे.

मि०अपटु०:—अरे बाबा फ्याशन हा फायदा नसून फायद्याच्या अजबखान्याचें तें फाटक आहे. या फाटकांतून जो आंत जाईल तो यःकश्चित जरी आंगानं फाटका असला तरी त्याला त्या अजबखान्यांत जाऊन मनमुराद चैन करायला मिळते.

बाळा०:—तें कसं काय बुवा ?

मि०अपटु०:—अविवाहित तरुणींनां फॅशनेबल प्रियकर हवासा वाटतो तर दुर्दैवी विवाहित तरुणी, आपल्या चुकीच्या पश्चातापानं फॅशनेबलवर



प्रेम करायला प्रवृत्त होतात. विस्तारामुळें इंग्रजांच्या राज्यावरचा सूर्य कधींच मावळत नाहीं फॅशनमुळें प्रेमराज्यावरचा सूर्य कधींच मावळत नाही. कारण अकलेच्या नावानें पूज्य असलेले हे फॅशनेबल प्रियकर सुंदर तरुणींनां पूज्य वाटून त्यांच्या प्रेमलहरी उचंबळून सोडतो. सामान्य दर्जा कोणता हें फॅशनमुळं कळूनच येत नाहीं. सभ्यपणाचा आरोप तर त्याच्यावर कपडेच करतात, म्हणून राजरोस डल्ला मारला तरी कोणी फट म्हणायची छाती नाहीं.

बाळा०:—असं आहे खरं. गोल्डमध्यें लोळणाऱ्या गोल्डनगँगच्या लोकांचें ही फॅशनच रक्षण करते—

मि० अपटु०:—आगगाडींतून प्रवास करतांनां फॅशनेबल मनुष्याला चिकार गर्दीत सुद्धां मागाहून जागा मिळाल्याचं पाहून जुन्या मताच्या कर्मठांनां सुद्धां त्यांचा हेवा वाटून फॅशन कवटाळण्याचा मोह सुटतो.

बाळा०—तुझी फॅशन सर्वगामी आहे खरी—

मि० अपटु०:—अर्थात् फॅशनेबल मनुष्याला सहसा कुठेंही अटकाव होत नाहीं. थिएटरमध्यें मेन्नडोअरवर तिकीट विचारुन इनसल्ट करण्याची एखाद्या मुरलेल्या म्यानेजरची सुद्धां छाती होत नाहीं. बरी नाटकाची गोष्ट निघाली आज गंधर्वाचं " स्वयंवर " आहे.

बाळा०:—आपल्याला, सहकुटुंब सहपरीवार येऊन कार्यसिद्धी करावी अशी निमंत्रणपत्रिका आली आहे वाटतं—

मि०अपटु०:—होय ही पहा (हस्तपत्रिका) तुला काय खरोखरच स्वयंवर वाटलं वाटतं ? जसं कांहीं आजचं नाटक तुला माहीतच नव्हतं ?

बाळा०:—खरंच नव्हतं.

मि० अपटु०:—फॅशनेबल मनुष्याला सर्व कांहीं अपटुडेट माहिती पाहिजे.

बाळा०:—म्हणूनच तुला "मि० अपटुडेट" म्हणतात.

मि० अपटु०:—अरे हा कॉम्प्लिमेंट आहे. मी पोषाखांत अपटुडेट्, इन्फर्मेशनमध्यें अपटुडेट् गावांतील झाडून सारीं खेंगटीं, नवा जुना सारी माहिती कशी अगदीं अपटुडेट् माझं खरं नांव सुद्धां कित्येकांनां माहीत

नाहीं. आईबापांची एखाद्या देवाचें नेभळं नांव ठेवल्याची चूक अशा रीतीनें दुरुस्त केली आहे. आहे कीं नाहीं अपटुडेट् युक्ती.

बाळा०:—फीस्ट शिवाय तूं आपलं स्वतःचं बारसंच केलेंस म्हणायचं

मि० अपटु०:—अपटुडेट लग्नाला जसे भट आणि वाजंत्री लागत नाहींत त्याचप्रमाणें अपटुडेट बारशाला जेवणावळीचं कारण नाहीं.

बाळा०:—कायद्याचं कलम काढलंस बोवा!

मि० अपटु०:—अरे पहिलं नांव कलम केल्याचा एवढा तरी फायदा नको का? बरं तिकीटं आत्तांच काढलीं पाहिजेत. नाहीं तर मिळणार नाहींत—

बाळा०:—मग आत्तांच काढा चला—

मि० अपटु०:—पण पैसे.

बाळा०:—ते तर नाहींत बुवा आपल्या जवळ तूंच मला लेन्ड कर—

मि० अपटु०:—मी नांवाचा "अपटुडेट" आहें.

बाळा०:—होय समजलं आपण "अपटुडेट" आहांत ते पण द्यायला काय हरकत आहे?

मि० अपटु०:—मी अपटुडेट आहें. अगदीं अंतर्बाह्य अपटुडेट आहें.

बाळा०:—समजलं, समजलं, असं लिहून देऊं का?

मि० अपटु०:—अरे बाबा नाहीं समजलं. अरे डेट म्हणजे कर्ज अपटु म्हणजे पर्यंत म्हणजे मीच कर्जा पर्यंत आलों आहें तूंच मला लेन्ड कर—

बाळा०:—झालं भागलं—मजजवळ दांतावर मारायला पैसा नाहीं.

मि० अपटु०:—झालं ढवळ्या शेजारीं बांधला पवळा "वाण नाहीं पण गुण" लागला वाटतं?

बाळा०:—तुझे गुण लागायचेच. आजचा बेतच रद्द करावा असं मला वाटतं. मला आतां बजारांत जायचं आहे. (जाऊं लागतो)

मि० अपटु०:—जाशीलरे. बाजार म्हणजे कांहीं राजदर्शन नाहीं कीं वेळेवर गेलं नाहीं तर मोटार निघून जायची.

बाळा०:—अहो अक्कलशून्य, महिन्याचं सामान आणायचं आहे. तीस दिवसांचा वाणसवदा करायचा आहे—कळलं का?



मि० अपटु०:—तीस दिवस? (आनंदानें)

बाळा०:—हो हो तीस. तीन्हीवर शून्य बरं अहो अक्कलशून्य.

मि. अपटुः—अहो शून्यपंडीत. तीस दिवसांच्या वाणसवद्यांत तिकिटांचे तीन रुपये निघत नाहींत म्हणजे अक्कलेच्या नांवानं खरोखरीच शून्य आहांत—

बाळा०:—ते कसंकाय बोवा?

मि० अपटु०:—तें मी स्वतः तुला बाजारांतच समजाऊन देईन चल. (त्याला घेऊन जातांनां) अशा गोष्टीचा बाप्तीस्मा याला बाजारच्या चर्चमध्यें देतेवेळीं मलाच गॉड फादर झालं पाहिजे. (जातात.)

---

## प्रवेश ६ वा

(उषेची खोली)

उषाः—स्वतः हवे इतके फॅशनचे चाळे करीत असतांनां स्त्रियांच्या साध्या फॅशनलाच तेवढीं वाटेल तशीं नांवं ठेवून पुरुषांनीं फिदी फिदी कां हंसावं कांहीं कळत नाहीं. वास्तवीक पाहतां हसायचं म्हटलं तर पुरुषांनीं बायकांच्या फॅशनला हंसायच्या ऐवजीं बायकांनींच पुरुषांच्या फॅशनेबल सोंगाला हंसायची पाळी आली आहे आज. आम्हां बायकांच्या कपाळावर कपाळभर जरी नसलं तरी त्याच्याच कुत्सित टीकेप्रमाणें टिकलीच्या रूपानं कां होईना पण हिंदुत्वाची साक्ष अजून टिकली आहे, पण हल्लीच्या फॅशनेबल पुरुषांच्या कपाळावर हिंदुत्वाचा गंधाचा नुसता डागसुद्धां राहिलेला दिसत नाहीं. केंसांच्या बाबतींत तरी तसंच, आम्हीं काय म्हणे आंबाडेच घालतों, फुगेच काढतों, केंसच फिरवतों वाकडाच भांग काढतों, हो करतों आम्हीं या साऱ्या गोष्टी, पण आम्हीं निदान आमच्या प्रांतांत तरी या साऱ्या ढवळाढवळी करतों; पण पुरुष अर्थाअर्थी कोणत्याही प्रकारें संबंध नसतांना सुद्धां आपल्या डोक्यावर बायकी जबाबदारी ओढून घेतात. आमचा एकटा तंग पोलका पुरुषांच्या डोळ्यांत सलायला त्यांची ती ओझंभर कपड्याची खोगिरभरती तरी कितीशी सैल

असते ? शिंप्यानं कपडा जरा कुठं लूज शिवला तर लगेच या फॅशने- बल फक्कडरावांचा टॅंपर अगदीं लूज होऊन जातो. आमच्या झुळझुळीत पातळावरही पुरुषांच्या तलम धोतरांनीं ताण केलीच आहे. अशा एक ना दोन प्रत्येक बाबींत पुरुषांची फाजील फॅशन, बायकांच्या साध्या फॅशनची वडील व आचरट बहीणच ठरते. आणि इतकं असूनही चोरांच्या उलट्या बोंबाप्रमाणें हे पुरुषच आम्हाला हंसतात. आहे कि नाहीं खासा न्याय (केंसावरून हात फिरवायला जाते तों रिस्टवॉच दिसतें) अग बाई आठ वाजून गेले वाटतं ? विचारांच्या वादळांत वाहवल्यामुळें आज डॉक्टरकडे शिकायला जायचा विसरच पडला म्हणायचा. (उठून टेबलावरचीं पुस्तकं घेते) नको पण, नयेच जाऊं झालं डॉक्टरकडे आज. नाहीं तरी एवी तेवी उशीर हा झालाच आहे. बघूं तर खरं मीं त्यांच्याकडे नाहीं गेलें तर माझ्याकडं येतात कीं काय ते. ? अनायासेंच आज आजमावतां येईल त्यांच्या हृदयाचा ठाव माझ्या अटकळीप्रमाणें त्यांच्या हृदयांत मला खरोखरीच जागा मिळाली असेल का ? का हा माझ्या मनाचा पोकळ समजच आहे नुसता ? नाहीं पण संदिग्ध कां होईना पण माझ्याशीं त्यांच्या विनोदी वर्तनावरून नुसता पोकळ समजच म्हणतां येत नाहीं. त्यांत कांहीं तरी पसंतीचं, मला हवसं वाटणारं माझं असं कांहीं तरी आहे खास ! पण असं तरी एकदम ठासून म्हणायला मला काय आधार आहे ? त्यांचा तो नेचरच नसेल कशावरून ? दिवाकर असल्या या आपल्या संदिग्ध विनोदाचा अर्थ मीं काय बरं घेऊं ? माझ्याशीं आपला हा प्रेमाचा लपंडाव समजूं कीं आपल्या विनोदी नेचरनं घातलेला समजुतीचा घोंटाळा समजूं ? ( विचार करून ) नाहीं, पण मनाला असं घोंटा- ळ्यांत ठेवण्यापेक्षां काल लिहिलेलं तें लेटर डॉक्टरनां मिळेलसं करा- वयाचं......पण......छे बाई, कसा धीर होणार मला असं करायचा ? राहूनच द्यावं हें पत्र तसंच......( पत्राकडे पहात डोळे मिटून बसते. डॉ. दिवाकर प्र. करतो )

दिवाकरः—( तिच्याकडे पहात स्वगत ) वाः आज तर अगदीं



फुल कलर्समध्यें दिसते आहे स्वारी. कसलं तरी डीप मेडिटेशन चाल- लेलं दिसतं आहे. ( उषेच्या चेहऱ्यावर स्मित हास्याची छटा ) नाहीं मला पाहिल्यावर हिनं हे डोळे झांकलेले दिसतात. ती पहा प्रणय चंद्राच्या उदयाबरोबर सौंदर्य सागराला आलेल्या भरतीची पहिली ओझ- रती लाट माझ्या तर्काला धुवून टाकण्याकरितां आली. प्रणयाकडून डोळे झांकून घेऊन प्रेमाच्या लपंडावांतील पहिलं राज्य हिनं हें हटकून घेतल्यासारखं दिसतं आहे ( उषेचा चेहरा आणखी खुलतो ) अगदीं असंच, त्या पहा प्रेमाच्या लपंडावांतील लपलेल्या गड्याला आपण तेव्हांच हुडकून काढूं. या मनोराज्यांतील कल्पनादेवीनं केलेल्या गुद- गुल्या हिच्या गालावर कशा अगदीं स्पष्ट दिसत आहेत. ( उषा डोळे उघडून पत्र वाचण्यांत गढून जाते तिच्या तोंडावर पुन्हा हास्याची लाट उसळते. ) अहाहाहा आज कांहीं या दिवाकराचं हृदय ठिकाणावर रहात नाहीं. या सर्वांगसुंदरीच्या सौंदर्याला एका मागून एक येणाऱ्या चढत्या भरतीच्या लाटा त्याच्यावर आदळून त्याला खास आपल्या बरोबर त्याच सगराच्या तळाशीं घेऊन जाणार; उषे कोण हें तुझें मोहक तेज ! आजपर्यंत माझ्या नजरेखालून एकाचढी एक अशा कैक सुंदर स्त्रिया गेल्या, पण त्यांपैकीं एकींतही तुझ्या अर्ध्यानंही सौंदर्य मला आढळून आलं नाहीं. मग तुझ्या वेळेला सृष्टीच्या आरंभापासून सौंदर्याचे साचे घडविणाऱ्या ब्रह्मदेवाच्या हाताला हें असं एकाएकीं दुप्पट यश कसं आलं ? का कल्पनातीत स्त्रीसौंदर्याचीं वर्णनं करून किंवा त्यांचीं वारंवार चित्रं काढून—सुद्धां सत्यसृष्टिकर्त्या ब्रह्मदेवाला आतांपर्यंत तसलं एकही सॅंपल तयार करतां आलं नाहीं म्हणून कल्पनासृष्टींतील शेलक्या शेलक्या ब्रह्मदेवांचं एक ॲड्वायझरी बोर्ड त्यांच्याकडे गेलं व आपल्या कल्पनांप्रमाणं त्यानीं त्याला असली ही मूस व सौंदर्यमिश्रण तयार करून देऊन आपल्या नेतृत्वाखालीं या सौंदर्य- सर्वस्वाची मूर्ती ओतविली ? पण उषे, ब्रह्मदेवानं असली ही निरुपमेय कृती आपल्या अंतःकरणांत दडवून ठेवायची सोडून या सृष्टितलावर पाडली तरी कशी ? का सौंदर्याच्या अभिलाषाची पूर्वी एकदां आठवण

राहणारी अद्दल घडली म्हणून त्याच्यावरून त्यानं हा शहाणपणाचा धडा घेतला ? का भावी सापत्नभावाच्या मत्सराग्नीनं भडकून गेल्या-मुळं स्वर्गांतील साऱ्या देवांगनांनीं एकदिलानं तुला पृथ्वीवर ढकलून देऊन आपल्या पतींच्या दृष्टीआड केली ? कां तुझ्या सौंदर्याच्या लोभानं स्वर्गांतील सर्व सुरवृंदांमध्यें यादवी माजून स्वर्गलोक ओस पडेल या भीतीनं खुद्द ब्रह्मदेवानं शहाणपणाचा मार्ग म्हणून तुझी इकडे पाठवणी केली ? माझ्या या काव्यहीन दगडाच्या हृदयामध्यें अशा काव्यस्फूर्तीचा उगम एकाएकीं कोठून झाला ? हा उषेच्या सौंदर्याचा प्रयत्न आहे का आपल्या नजरेखालीं घडलेली ही कल्पनेची पुतळी सत्यसृष्टिमध्यें प्रत्यक्ष पाहून तिचं सुरस वर्णन करावं म्हणून स्वर्गांतून आलेले ॲडवायझरी बोर्डमधले आत्मे माझ्या शरिरांत शिरून आपली प्रतिभा प्रज्वलित करण्याची हौस पुरी करून घेताहेत ? होय तेच ते. स्वर्गवासी काव्यदेवाच्या पृथ्वीवरील आत्म्यानों तुम्हाला माझे शतशः नमस्कार असोत सोडा सोडा मला—मला तुमच्यासारखं वेडंपिसं बनून जगाच्या पाठीवर वणवण करीत फिरायचं नाहीं. ( उषा पुन्हा डोळे मिटून सचिंत ) नाहीं, आतां असं स्वस्थ बसून भागायचं नाहीं. उषेला डोळे उघडायला लावलेच पाहिजेत, त्याशिवाय हा कल्प-नांचा बाजार ओस पडायचा नाहीं (उषेच्या मागं जाऊन उभा राहातो) काय हें हिच्या पुढं ! Oh ! lo la love letter (थोडं वांकून मनांत वाचतो) आपल्या चरणाची नम्र दासी, हें असं आहे काय ? तरीच म्हटलं (तिचे डोळे झाकण्याकरितां हात पुढें करतो, उषा दचकून मागं पहाते व झटकन उभी राहते. )

उषाः—अगबाई डॉक्टर केव्हां आलांत आपण आणि माझ्या मागं उभं राहून काय चाललं होतं ? ( हळूच पत्र उचलून पाकिटांत घालते. )

दिवाकरः—बाजीरावाची मस्तानी म्हणे इतकी गोरी आणि नाजुक होती कीं तिनं गिळलेल्या विड्याचा पीक घशांतून खालीं उतरतांना इतर लोकांना दिसत असे. आपणही कांहीं गोरे-पणांत व नाजुक-पणांत कमी नाहीं तेव्हां आपला पडताळा पाहिला झालं.



उषाः—तो कसा ?

दिवाकरः—तो म्हणजे असा कीं मीं आलों तेव्हां आपण डोळे मिटून टेबलाकडे पहात स्वस्थ बसलां होतां. डोळे झांकले म्हणजे डोळ्यां-वर कातडी येतेच ती. तिच्यांतून आपल्या डोळ्यावरचा मोहक आणि रम्य लेख मला दिसला. तें टेबलावरच्या लेखाचं प्रतिबिंब आहे कीं काय हें पहायला तुझ्या जवळ आलों तों.........

उषाः—( एक कोऱ्या कागदाचा तुकडा उचलून ) हा कोऱ्या कागदाचा तुकडा पाहून पडताळा फसला असंच ना अगदीं ?

दिवाकरः—आँ कोरा कागद ? तर मग मघाशीं मला दिसलं तें आपल्या डोळ्यांवरच्या लेखाचं प्रतिबिंब होतं तर ? बरं कसं कां असेना. पडताळा पटला एवढी गोष्ट खरी—बरं तें असो, पण ध्यानाचा भंग केला म्हणून राग तर नाहींना आला ?

उषाः—( स्व. ) माझं पत्र पाहिलं वाटतं ? ( उघड ) इश्श कांहीं-तरीच. ध्यान कसलं असायचं त्यांत ? उगीच बसलें होतें झालं.

दिवाकरः—'ध्यान कसलं त्यांत' असं म्हणून का भागत असतं. सत्यावर असलेल्या नाजुक विरल बोलाचं आवरण घालून का कुठं तें झांकलं जातं ? आणि आवरण घाला तरी कां ? वयोमानाप्रमाणं शरीराच्या बदललेल्या रंगाबरोबर मनुष्याच्या ध्यानाचेही रंग पालटत असतात—पहिल्यानं बाळलीलेचं, दुसऱ्यानं प्रेमाचं, तिसऱ्यानं आपत्याचं चवथ्यानं संपत्तीचं, पांचव्यानं विवेचनेचं, सहाव्यानं देवाचं, आणि सातव्यानं स्वर्गाचं, असला हा सप्त शृंगारांचा साज सृष्टिमाता आपल्या प्रत्येक आपत्यावर त्याला साजेशा रीतीनं घालीत असतेच, आणि तशांत आपण तिच्या विशेष आवडत्या, तेव्हां—

उषाः—इतरांचं कांहींही असो पण सृष्टीमाता हा सप्तशृंगाराचा साज उषेच्या अंगावर स्वतः घालीत नसून दिवाकराच्या करवीं घालीत असते म्हणे.

दिवाकरः—आणि दिवाकराला आजन्म उषेच्या मागं तिची न होऊं देतां नाहक घिरट्या घालायला लावते असं नाहीं का म्हटलं ?

उषाः—(स्व.) धन्य असो बाई यांच्या या संदिग्ध विनोदापुढं !

दिवाकरः—कां शब्दाच्या आवरणानं सत्य झांकलं जात नाहीं म्हणून त्याला असं मुकाठ्यानं झांकायचा विचार चालला आहे वाटतं ? पण सत्वगुणी सत्य या रजोगुणी लाचेनं असं कांहीं लाचार व्हायचं नाहीं बरं ? तें या नाहीं त्या वाटेनं कुठून तरी बाहेर पडून स्वैरसंचार हें करायचंच. चोरून लपून रहाणं हा सत्याचा धर्मच नाहीं.

उषाः—पण हा सिद्धांत मला एकटीलाच लागू कीं आपणही आलांत त्यांत ?

दिवाकरः—माझा काय संबंध त्यांत ? मी थोडंच आपल्यासारखं लप्पं छप्पं करतों आहें तें कांहीं नाहीं इथं आपल्याजवळ जें आहे तें सारं सरळ अगदीं. बाकी बोलतां बोलतां लोकांना शब्दांत पकडण्याची हतोटी बरीच साधली आहे आपल्याला म्हणायची. कोणत्या गुरुपाशीं पैदा केलीत बुवा ही ?

उषाः—कोणत्या म्हणजे ? दुसऱ्या कोणत्या असणार ? माझ्याच या पुढं आहेत ह्याच.

दिवाकरः—आतां कां असं गळ्यांत पडायचा विचार आहे वाटतं ?

उषाः—(स्व.) हो मघाशीं आपण पडणार होतां तसंच. (उघड) यांत काय गळ्यांत पडायचं आलं ?

दिवाकरः—(स्व.) बायकोचं घोंगडं नी दुसरं काय ? (उघड) जाऊं द्या उगीच शब्दछल कशाला ? पण आपण आज शिकायला नाहीं आलांतशा ? फाटा द्यायचा......

उषाः—तसं कांहीं नाहीं, विचाराच्या भरांत जरा उशीर झाला तेव्हां वाटलं झालं जाऊं नये असं–

दिवाकरः—वा इतका अगदीं कसल्या विचारांनां बहार आला होता बुवा ? (तिच्याकडे वाकून पाहून) अरे वा अश्रुन सुद्धां आहे वाटतं कायम तें ? आला आहे खरा बुवा अगदीं बहारीचा गुलाबी बहर ! आणि त्यांतल्या त्यांत या वरच्या दवाच्या थेंबांनीं तर तो अगदीं विशेषच खुलून दिसतो आहे. खरोखर उषे हा बहार इतका कांहीं अंतःकरण उचंबळून



रंगनाथः—(स्वगत) नाहीं तर टाका या [illegible]

झालं आहे, हा संबंध गौप्य पाहून.

टाकणारा आहे कीं मी जर प्रतिभासंपन्न कवी असतों तर या काव्याच्या जोडीला इतकंच चटकदार रसभरीत असं दुसरं काव्य बनविलं असतं. जर खोदकाम करणारा असतों तर टाकीच्या घावांनीं दणगट दगडावर दुसरी उषा इतकी कांहीं बेमालूम कोरली असती कीं तुला त्या दगडी भिंगांत आपलं प्रतिबिंबच दिसलं असत. जर मी चित्रकार असतों तर कागदावर याच्या तोडीची खुलावट उठवून पहाणाराला कसं अगदीं आनंदातिशयानं उड्याच मारायला लावल्या असत्या. पण दुर्दैवानं मीं या तिहींपैकीं कोणीच नसून आपला एक चीरफाड करणारा मेडिकल स्टूडंट आहें.

उषाः—मग माझ्या प्रेमा......(जीभ चावते).

दिवाकरः—सोड सोड उषे जिभेवर नाचणाऱ्या त्या तुझ्या मानस सरोवरांतील राजहंसाला मोकळा सोड. येऊं दे त्याला माझ्या जवळ; असं दांताखालीं दाबून त्याला मुका मार देऊं नकोस. कां नाहींना अझुन त्या गरीब पक्षाची कींव येत ? स्त्री हृदयाच्या कोमलतेनं कठोर कवच धारण करून त्या बिचाऱ्या पक्षाच्या बाबतींत होत असलेला पक्षपात उषे तुला मान्य आहे का ?

उषाः—कां नाहीं असणार ? माझ्या आज्ञेशिवाय आपली जागा सोडून उगीच लुडबुडणारांना असा मुका मारच दिला पाहिजे.

दिवाकरः—पण त्यांत पात्रापात्रतेचा विचार नको का करायला ? दगडांना लाखो वर्षं उन्हांत राहून कांहीं सुद्धां होत नाहीं. पण त्याच फुलाना निर्जीव करायला नुसती उन्हाची झळईसुद्धां बरस होते. समज, तुझ्या हातांच्या या अविचारानं दुखावलेला तो पक्षी उद्यां माझ्याकडे आकाशावर गेला तर–

उषाः—काय अभद्र बोलतां आपण हें ? असं बोलवतं तरी कसं आपल्याच्यानं ? हं घ्या हा तो पक्षी–संभाळा बरं नीट त्याला इतकी कींव करतां त्याची ती ?

दिवाकरः—अखेरीस असा बंद करूनच दिलास ना ? स्वातंत्र्या-

साठीं अट्टाहास करणाऱ्या तुझ्यासारख्या स्त्रियासुद्धां आपल्या हृदयाशीं बाळगलेल्या आपल्या अगदीं आवडत्या वस्तूनांसुद्धां घटकाभर स्वतंत्रतेचं वारं लागूं देत नाहींत हें पाहून स्त्रीजात तितकी पायापुरती पहाणारी; अगदीं अस्सल स्वार्थी असते या वाक्यावरचा विश्वास दृढ होतो. का आपल्या बायकी समजुतीनं गुपित दान दिलं आहेस तूं मला हें ?

उषाः—हो तसंच हो !

दिवाकरः—अरे वा ! प्रथमग्रासे गुप्तचिन्हः! (पाकिटावर पत्ता नाहीं असें पाहून उघडून) पण मलाच उद्देशून हें लिहिलें हें कशावरून समजायचं बुवा आम्हीं ? माझ्या नांवाशीं संबंध जोडण्याच्या वेळीं माझं नांव सोडण्याची ही आर्यसंस्कृती वाटतं आपली ?

उषाः—नांव लिहिणार होतें पण...

दिवाकरः—आणि शेवटीं सही शिक्का दिसत नाहीं तो ?

उषाः—अगबाई, खरंच सहीही करायची राहिली वाटतं ? आणायचं, इकडे तें पत्र, मी आत्तां सही करून देतें.

दिवाकरः—छे छे आतां अशी सही करून नाहीं भागायचं आतां ! या चरणाच्या दासीनं सही शिक्का सारंकांहीं या कागदावर नाहीं तर या (तोंड पुढें नेतो, ती मागें सरते.) कां नाहीं लागत लहर आलांच, ठीक आहे; पुढं केव्हां तरी. पण आतांच्या यांत अंतर नाहीं पडायचं, पुढं मागं कधीं काळीं ? नाहींतर गुप्तदान बाहेर पडायच्या आधींच गुप्त होऊन जायचं.

उषाः—हें काय विचारणं हें ? असा प्रश्न आपल्या डोक्यांत उद्भवला तरी कसा ?

दिवाकरः—उषे, तूं अजून अजाण आहेस. जगाचा अजून तुला बिलकूल अनुभव आलेला नाहीं. उषे दुसऱ्याच्या उत्कर्षाकडे पाहताना दुनियेच्या डोळ्यांतल्या बाहुल्या उलट्या लागलेल्या असतात. म्हणून आपलं तुला विचारतों कीं दुनियेच्या दुराग्रहाला दळी पडून उद्यां तुझ्या दादानं, माईनं किंवा तुमच्या त्या ट्रस्टीनं आपल्या विवाहामध्यें



बिबा घातला तर तुझ्या प्रेमाच्या स्निग्धतेनं त्याला तूं उडवून लावशील ना ?

उषाः—ही काय भलतीच शंका ? आपण अजून आम्हाला ओळखलं नाहींसं दिसतं ?

दिवाकरः—तसं नव्हे, तुम्हा साऱ्यांना मी ओळखलं आहे. पण मत्सरी दुनियेच्या उलट्या बाहुल्या डोळ्यांपुढें चमक मारतात.

उषाः—उगीच मनांत कांहीं तरी शंका आणायच्या, झालं.

दिवाकरः—बरं राहिलं, नाहीं आणीत शंका; मग तर झालं. पण कांहो आजपर्यंत मी आपल्याला शेंकडों वेळां पाहिलं आहे पण आजच्या सारखं आपलं और तेज मला कधींच दिसलं नाहीं. अशी किमया तरी काय केली आहे आपण आज ?

उषाः—कांहीं नाहीं, नुसती न्हाल्यें आहे झालं आज मी.

दिवा०:—अशा कोणत्या बुवा कांतिवर्धक दिव्यजलानं न्हालां अहांत बुवा आपण ?

उषाः—(लाजून) आपल्या प्रेमजलानं नी दुसऱ्या कोणत्या ? (उषास्वप्नाच्या चित्राकडे पहात उभी रहाते.)

दिवा०:—भन्याच रोमांटिक अहांत म्हणावयाच्या. (ज्या चित्राकडे पहाते त्याकडे पाहून) कां त्या चित्राकडे पाहून मत्सरी स्त्रीस्वभाव जागा झाला वाटतं ? इतका नको कांहीं त्या चित्रांतल्या उषेचा हेवा वाटायला ! नाहीं तिला तर ते स्वप्नसुख मिळतं आहे. पण आमच्या या उषेला जागृतावस्थेमध्यें खरं सुख पायला हा पहा (तिच्या गालाकडे तोंड नेतो ती मागें सरकते) कां आतां दूरशा सरतां ? कां हा बायकी रुकार आहे ?

उषाः—हें काय भलें हें असं अगदीं ?

दिवा०:—हें काय म्हणजे ? हें आपल्या आज्ञेशिवाय किंवा अनुज्ञेनं म्हणा वाटल्यास लुडबुडणं म्हणा. हं ठोठ्या या हंसाला सधाऱ्या त्या हंसासारखी शिक्षा, कां, आतां कां उशीर ?

उषाः—अपराध करणं लोकांच्या हातीं असतं पण शिक्षा द्यायची [illegible] हें ती देणारावर अवलंबून असतं.

MODERN COLLEGE

दिवा०:—छे छे छे, अपराध म्हटला कीं त्याला शिक्षा ही झालीच पाहिजे या तत्वाचे आहोंत बुवा आपण ! मग ती न्यायाधिशांनीं नाहीं दिली तरी आरोपीनें सत्याग्रह करून घ्यावी असं आहे आपलं मत. हो कुणीकडून तरी तत्वाशीं गांठ पडली म्हणजे झालं ( तो पुढं सरकतो ती मागें सरकते इतक्यांत रंगनाथ हातांत केरसुणी घेऊन दार उघडतो काय हें पेटींत टाकायचं म्हणतां ? )

उषाः—( त्याला हळुंच ) टाकायचं नव्हे, आपल्या हृदयाच्या पेटींत नीट जपून ठेवायचं.

रंगनाथः—( स्वगत ) नाहीं तर टाका या म्हाताऱ्याच्या बोळक्यांत अनायासेंच पोष्टाच्या पेटीसारखं झालं आहे हा सांवळा गोंधळ पाहून.

( पडदा पडतो. )

---

### प्रवेश ७ वा.

अपटूडेटः—कमाल असो बुवा अगदीं या दिवाकरा पुढें! त्याच्या डोक्यांतून कसें आणि किती डिस्ट्रक्टिव्ह प्लॉटस् निघतील कांहीं पत्ता लागत नाहीं. घर तरी काय शोधून काढलें बाबानं कीं यंव ? बेञ्याला त्या माईशीं इतका नाजूक वशिला लावतां तरी कसा आला कोण जाणें ? खरोखर हा जर त्या घरांत आणखी चार सहा महिने राहिला तर शास्त्याच्या अभावीं घरांतल्या सांवळ्या गोंधळांत कुटुंबाचा कसा बोजवारा होतो याचें चित्र फार उठावदार रीतीनें जगाला दाखवील यांत कांहीं शंका नाहीं. आजचीच गोष्ट घ्याना. याला म्हणे रमेचे दागीने पाहिजेत. कशाला तें एक ईश्वर जाणें! (दिवाकर प्रवेश करतो.)

दिवाकरः—परमेश्वर कशाला ? हा दिवाकर जाणें. माझ्या तालावर त्या बाळ्याचं बाहुलं नाचवायचं सोडून, तुला ही नसती उठाठेव हवी कशाला ? चल, या घे किल्ल्या आणि सांगितल्या वेळीं आपल्या कामाला लाग कसा ? परवांच्या फोर्जरीनं तुरुंगांत पडणारं तुझं पाऊल, या एका



दिवाकराच्या आधारानं तुला बाहेर काढायचं आहे हें ध्यानांत असूंदा. ( जातो. )

अपटूडेटः—तें फोर्जरीचं प्रकरण फुटलं हें कांहीं चांगलं झालं नाहीं आणि त्यांतून दिवाकरानें मला बाहेर काढलं हें तर भारींच वाईट झालं. आतां हा किती ठिकाणीं आपली मालकी माझ्यावर गाजवून मला राबवतो कोणाला ठाऊक. लौकरच त्याच्या हातावर तुरी देऊन यःपलाय केलं पाहिजे. बाकी आजचं काम कांहीं तसं वाईट नाहीं फायद्याचं कलम आहे. याच्या हातांत दागिने देण्याच्या आधींच प्राप्तीचा अर्धा वाटा आपल्या खिशांत हळूंच पॅकेट केला कीं बस. ( बाळासाहेब येतात. ) गुडनाईट बाळासाहेब, कसं काय रात्रींच आलेंतना ?

बाळा०:—आपल्या छातीवरचं भीतीचं दडपण कांहीं अजून कमी होत नाहीं.

अपटूडेटः—काय, हॉटेल बिलाच्या दडपणानं छाती दडपून जाऊन जीव जायची वेळ आली तरी नसत्या भीतीचा बागुलबुवा अजून तुला भेडसावतोच आहे कां ? उद्यां तो हॉटेलवाला दारांत धरणं धरून बसला म्हणजे त्याला काय दांत पाडून देणार आपण आपले ?

बाळा०:—पण त्याकरतां ही चोरी...म्हणजे अंगावर शहारे येतात बघा आपल्या आणि तशांत वैनीच्या पलीकडच्या खोलींत ती भालचंद्राची आय आहे. त्या नंतर विशेषच धसका बसतो. हें पहा अपटूडेट मला वाटतं आजचा आपला बेत रद्द करावा. निदान वैनीच्या खोलींतला तरी करावाच रद्द.

अपटूडेटः—काय काढतोस एखाद्या भागुबाईसारख्या शंका ? बाळासाहेब, म्हणे मला वाटतं...रद्द, तें कांहीं नाहीं. आजचा बेत आजच उरकून घेतला पाहिजे. आणि तोही पुन्हां तुझ्या रमावैनीच्या खोलींत, सर्व ही पुरी.

बाळा०:—बरं बाबा, इलाज काय आहे त्याला आतां. गेल्या खेपेला मार देऊन कां होईना पण माईनें एकदां हॉटेल बिल चुकवलं आहे.

MODERN COLLEGE

आतां ही गोष्ट जर तिला कळली तर मला आपला रस्ताच सुधारावा लागेल बाहेरचा. शिव, शिव कोण हा भयंकर प्रसंग !

**अपटूडेट**:—अरे अरे, बासुंदी पुरी चापण्याचा आणि बर्डस आयचे झुरके घेण्याचा प्रसंग सुद्धां इतका शिव शिव म्हणण्याइतका वाईट होता नाहीं ?

**बाळा०**:—वाईट होता आणि चांगला होता ? आतां काय त्याचं. करावं तसं भरावं ? भोगा, बाळासाहेब, आपल्या पापाचीं प्रायश्चितं; मुकाट्यानं आईनं दिलेल्या माराच्या अंजनानं जर डोळे उघडले असते तर आज हा चोरीचा प्रसंग कशाला येता ?

**अपटूडेट०**:—कां ! अहो पश्चात्तापाचे पुतळे, असे अगदीं गप्प ! कां, चालूं द्या पश्चात्तापानंतरच्या वैराग्यांत आपल्या व्यवसाय बधूंना हॉटेलच्या व्यसनापायीं आपल्या सारखीं बहुमोल माणकं कशीं मातीमोल होतात याची ओळख करुं द्या. हं बोलवा बोलवा गडकऱ्यांच्या प्रतिभेला आपल्या मदतीला आणि करा सुरुवात हं म्हणा विद्यार्थी दशेंत हॉटेलच्या व्यसनाधीन झालेल्या माझ्या व्यवसाय बंधुनों, पहा, पाहतां पाहतां डोळ्यांचा जीव गेला तरी जिवाचा डोळा करून माझी ही करुण स्थिती पहा. आणि घरीं, दारीं, शाळेंत प्लेग्राऊंडवर कुठंही जो जो म्हणून तुम्हाला भेटेल त्याला त्याला ती ती सांगून माझा असा कळकळीचा अत्याग्रहाचा निरोप सांगा कीं बाबा, काय वाटेल तें कर पण जिभेचे चोंचले पुरविण्यासाठीं मित्रांच्या मोहबतीखातर, परिस्थितीच्या पिंजऱ्यांत सांपडल्यामुळं कोणच्याही कारणानं कां होईना पण हॉटेलची पायरी म्हणून चढूं नकोस. नाहीं तर आज नाहीं उद्यां उद्यां नाहीं परवां, कधीं ना कधीं तरी तुमच्यावर या अभागी बाळासाहेबासारखा चोरी करायचा प्रसंग हा ठेवलेलाच ! मित्रहो, माझ्या करुण कहाणीचीं पॅम्प्लेटस छापवून तीं चारी खंडांत वाटा. शिळा प्रेसवर माझ्या या शोचनीय स्थितीचीं चित्रं छापून त्यांचा गांवांत, स्टेशनवर, आगबोटींत, आगगाड्यांत चोंहोंकडे प्रसार करा. हीं पॅम्प्लेट्स आणि चित्रं शाळेंतील व कॉलेज मधील विद्यार्थ्यांच्या विशेष फायद्याचीं असल्याकारणानं त्यांना तीं फुकट वाटा. माझ्या या



करुण कथानकावर एक शोकपर्यवसायी नाटक रचून तें एखाद्या लोकमान्य नाटक कंपनीला व सिनेमा फिल्म कंपनीला फुकट द्या. माझ्या म्हणण्याप्रमाणें जर व्यवस्था न कराल तर लौकरच साऱ्या शाळा व कॉलेजें चोराचे अड्डे बनतील. आणि एक दोन पिढ्या जर अशाच आळसांत गेल्या तर सारें जग म्हणजे चोरांचा बाजार होऊन बसेल.

**बाळा०**:—अपटूडेड, अरे असल्या भयंकर प्रसंगीं सुद्धां तुला टोमणे मारायचं आणि थट्टा करायचं धैर्य होत नाहीं. तरी बरं कीं माझ्या प्रत्येक उधारीच्या व्यवहारांत तूं नेहमीं वाटेकरी असतोस.

**अपटूडेट**:—मग आतां चोरीच्या वेळीं तरी मी कुठं तुझा वाटेकरी होण्याला माघार घेतों ?

**बाळा०**:—बरं जाऊं दे झालं. विषाचा अनुभव घेऊं नये घेतला, आतां मरणाची भीती बाळगून काय होणार आहे ? अपटूडेट,* तुझ्या टोमण्याच्या व थट्टेच्या दुहेरी धक्क्यानें माझ्या छातीवरचं भीतिचं दडपण पार कुठल्या कुठं उडून गेलं.

**अपटूडेट**:—थँक्स, दॅटस इट. आतां कसा आलास ताळ्यावर. ह्या ये किल्ल्या आणि चल.

**बाळा०**:—चल बाबा. मान दिली आहे खरी या चोरीच्या सुरीखालीं (खोपडी जातात.)

(रमेची खोली–रमा झोंपली आहे. अपटूडेट व बाळासाहेब रमेच्या ट्रंकेपाशीं जाऊन ट्रंक किल्ली चालवून उघडतात. बाळासाहेब आंतील सामान इकडे तिकडे चाळून पाहतो आहे तों अपटूडेट दागीन्यांचा डबा बाजूला घेऊन उघडतो व दोन मोठाले दागीने स्वतःच्या खिशांत घालून ट्रंकेतल्याच हातरुमालांत बाकीचे दागिने आतून मोटली बांधतो व बाळासाहेबास म्हणतो ).

**अपटूडेट**:—कां कांहीं लागतं कां हाताला ? (बाळासाहेब दचकतो व ट्रंकेला त्याचा हिसका बसून धप्पदिशी ट्रंकेचं झांकण पडतं त्यानें जागी होऊन रमा उठून बसते.)

**रमा**:—कोण भाऊजी. (तिला अपटूडेट दिसतो; ती रंगनाथाला

MODERN COLLEGE POONA 5.

मोठ्यानें हांक मारते. अपटूडेट पळतो तों दारांत भालचंद्र कंदील घेऊन येत असतां त्याच्या अंगावर आदळतो. तो त्याला धरून. )

**भालचंद्रः**—कोण अपटूडेट, अरे वा; हा तर ओळखीचा चोर.

**अपटूडेटः**—आणि म्हणूनच जीवे न सोडी. ( असं म्हणून त्याच्या खिशांत दागिन्याची गठडी टाकतो.)

**अपटूडेटः**—त्याच्या अंगावरचा हा लठ्ठ कोट माझ्यावर पांघरूण घालून याला पाडणार खास; सद्दीचा जोर तो असा असतो.

( दिवाकर, रंगानाथ येतात. )

**दिवाकरः**—( स्वगत ) आंधळा मागतो एक डोळा आणि देव देतो दोन तशांतलं झालं हें. (इतकं होत आहे तों ट्रंकेला रेलून असलेला बाळासाहेब पडतो. ट्रंक त्याच्या उरावर पडते. भालचंद्राच्या हातून सुटून अपटूडेट दूर उभा राहातो) ( रमाकांत येतो. )

**दिवा०ः**—रंगनाथ, अरे असा शुंभासारखा पाहात काय उभा राहि-लास ? मालक ट्रंकेच्या बोजाखालीं दडपून गेला असतां हा आपला या चोराकडेच पाहतो आहे. अरे असें मालकाकडें दुर्लक्ष करून जर चोराकडे लक्ष पुरवलस तर तुझा मालक उद्यां भिकेला लागेल. बाहे-रच्या घुशीनां घरांतले उंदीर असे सामील झाले म्हणजे घर कोसळून पडायला कितीसा उशीर आहे. ( रंगनाथ बाळासाहेबास सोडवतो.)

**रमाकांतः**—कोण भालचंद्र ? आणि आपण या वेळीं इथंसे (माई येते)

**अपटूडेटः**—तो याचा खिसाच सांगतो (खिशावर काठी मारतो.)

**भाल०ः**—काय, खिसा (खिशांतून गाठोडं काढतो) हें काय ?

**माई०**—अगबाई ? हे तर आमच्या सूनबाईचे दागीने ? हा मेल्यानो.

**दिवा०**—काय पंत; काय आहे हें गारूड ? ट्रंकेंतलें दागीनें खिशांत कसे ? (भालचंद्र स्तंभीत उभा राहातो.)

**माई०**—अहो बोला, जें कांहीं ठरलें असेल तें बोला. एकेक ऐकावं तें अघटीतच.



**रमाः**—हें काय भलतंच वाकडं बोलणं ?

**रमाकान्तः**—हें वांकडं बोलणं ? आणि भालचंद्राचं असं भलत्या रात्रीं इथं येणं सरळ वाटतें. माहेरी शिकलीस ते हे मध्य रात्रीचे धडे वाटतं ?

**भाल०ः**—काय अविचाराचं बोलणं हें ! रमाकान्त जरा शांत व्हा. अशी एकदम डोक्यांत राख घालणं बरं नाहीं.

**रमाकान्तः**—मी बोलतों तें अविचाराचं आणि तुम्ही करतां तें अगदीं विचाराला धरून, नाहीं ? म्हणे शांत व्हा. माझ्या अंतःकरणाला आग लावून शांत होण्याचा उपदेश करणाऱ्या, माझ्या बायकोला आपली राख करून, माझ्या कुलाची राख—माझ्या डोक्यांत उडविणाऱ्या ( मानचोद ) भालचंद्रा असा मानभावी उपदेश कुणाला करतोस ?

**भालचंद्रः**—रमाकान्त, कांहींहीं माहिती नसतां आपल्या कुलस्त्रीचा असा अपमान करणं आपल्या सारख्यानां शोभत नाहीं.

**रमाकान्तः**—मग काय आपल्या सारख्या चोरांनां, जारांनां शोभतं वाटतं. कुलस्त्रीचा अपमान ! धडधडीत नवऱ्याच्या उरावर तुझ्यासारख्या हरामखोराबरोबर नंगानाच घालणाऱ्या कुलटेचा अपमान ! शीलाची राखरांगोळी करून साऱ्या कुटुंबाच्या तोंडाला काळं फांसणाऱ्या कैदाशिणीचा अपमान ?

**रमाः**—काय अर्थाचा अनर्थ होतो आहे हा ?

**रमाकान्तः**—अनर्थ होत नाहीं तर होऊन चुकला आहे, जारिणी ? ( म्हणून तिला मारण्यास धांवतो )

**दिवाकरः**—हां, हां रमाकान्त बायकोवर हात ! आणि तो पुन्हां तुझ्यासारख्या शिकलेल्या नवऱ्यानं ? नवऱ्यानं बायकोच्या अंगावर हात टाकणं चांगलं नाहीं.

**रमाकान्तः**—आणि तो दुसऱ्यांनीं टाकणं चांगलं वाटतं ?

**माई०ः**—भालचंद्र आतांचे आत्तां तुम्ही आपला रस्ता सुधारा. नाटकीक पाहतां आपल्याला दिन भाड्याच्या घराचा रस्ता दाखवायला पाहिजे होता, पण तुम्ही जशी आपली देशीला टांगली आहे तशी

MODERN COLLEGE

साऱ्यानीं नाहीं टांगली अजून. शिवाय तशानं आमच्या घराण्याची अब्रू चव्हाठ्यावर आणावी लागत आहे.

**रमाकान्तः**—आमच्या घराण्याची अब्रू ? अब्रूची होळी झाली, संसार सांखळी तुटली आणि रमाकान्त, जिवाची अशा सुटली. ( केस उपटीत पाय आपटीत जातो )

**भाल०ः**—परमेश्वरा, या भालचंद्राच्या भाळीं काय लिहून ठेवलंस हें ?

**दिवा०ः**—हें ठेवला आहे लिहून अर्धचंद्र. सुधारा आतां एकदम आपला मार्ग.

**रमाः**—दादा, ( हुंदका देते )

**माई०ः**—हां, दादाच्या ताई पुरे झाला इतका दादाचा प्रेमा, पुरे झाला. या बरं गुणाचे दादासाहेब. ( भालचंद्र जातो )

**दिवा०ः**—माई, आतां आधीं रमाकान्ताला शांत केला पाहिजे. ( दिवाकर, अपटूडेट शिवाय सारे जातात ) टाळी अपटूडेट, काय ह्याचा अर्थ ?

**अपटूडेटः**—अहो सांवळा गोंधळ !

**पहिला अंक समाप्त.**

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

### सीनः—रस्ता.

( चहावाला प्रवेश करतो. )

**दुकानदारः**—देवाची पुजा एक दिवस टळेल पण आम्हां धंदेवाल्यांच्या कपाळचे हे उधारी उकळायचे हिसके कधीं टळायचे नाहींत. या उधारीमुळें माझा जीव कसा अगदीं रंजीस होऊन गेला आहे. उधारीमुळें धंद्याला लागलेल्या क्षयरोगाचं रोजचं पुढचं पाऊल पाहून मला तर हा सारा बाजार आटपून कुठं तरी नोकरी करावी असं वाटूं लागलं आहे. पण म्हणताना खाल्लं तर बाधतं, आणि, टाकलं तर श्रापतं अशी झाली आहे माझी स्थिति. धंदा बंद करीन तर आजपर्यंतच्या साऱ्या कमाईवर पाणी पडायचं. बरं, उधारी बंद करून रोखीचा व्यवहार करीन म्हटलं तर दुकानचं भाडं सुद्धां घरांतलीं भांडीं विकून द्यायची पाळी यायची. कारण आजकाल गिऱ्हाइकांना काय आम्ही नाहीं आमचे काका पुतणे, आहेतच एका पायावर तयार उधार द्यायला. दुकानं दुकानं म्हणजे किती, त्याला सुमार. माझ्या लहानपणीं आमचं दुकान धरून सारीं तीन चहाचीं दुकानं होतीं इथं. आणि आतां पहावं तर घराआड दुकान व्हायची वेळ आली आहे. कित्येक ठिकाणीं तर दोन दुकानं शेजारीं शेजारीं असल्यामुळें, गर्दींत पैसे न देतां जर गिऱ्हाईक बाहेर पडलं तर तें आपल्या दुकानचं कीं दुसऱ्याच्या दुकानचं असा दोन्हीही दुकानदारांना प्रश्न येऊन पडतो; आणि गिऱ्हाइक राजरोसपणीं चालायला लागून ती सोडवतं. या पायलीच्या पन्नास दुकानदारांच्या मचळ्यांत. गिऱ्हाइकही आतांशा फार नाठाळ होऊं लागलं आहे. तशांत हल्लींच्या या सुधा-

लेल्या काळांत भलाबुरा ओळखून काढायची ही सोय उरली नाहीं. अशी ही, उपरकी तो खूपशी बनेल, अशी स्थिती झाली आहे. जिकडे तिकडे मारे मेहेरबानी करून उधार मागून घ्या ये असा अर्थ समजणाऱ्या अप-टूडेट गिऱ्हाइकांपुढें गोंडा घोळीत असतात. बरं उधारीची या अपटूडे-टांना पुढं कांहीं आठवण ! रामाचं नांव. आठवण कसली नसते. पैसेच नसतात या सोकाजीरावांजवळ. ही खालीं मिजाशीचीं गिऱ्हाइकं दुका-नांत आहेत तोपर्यंत कशीं अगदीं बिल्ली सारखीं असतात. तेंच तुम्हीं त्यांना रस्त्यांत भेटा तुम्हाला नुसती ओळख द्यायला राजी नसतात, हे पोझिशनचे साहेब, आणि तशांत रस्त्यांत थकलेल्या बिलाची गोष्ट का काढली तुम्हीं—कीं तुमच्यासारख्या हलकट माणसाच्या वासानं ह्या साहे-बांची पोझिशन त्यांना सोडून जाऊन हे साहेब मजकूर हलकटाहून हल-कट दिसायला लागतात. लोकांना ( दूर पाहून ) कोण बरं तें बागेंत तिथं. आमच्याच पोझिशनच्या साहेबांची दुकल दिसते आहे. सकाळ पासूनच्या हिंडण्याचें सार्थक झालं. निदान संभावीत कुळांच्या भेटीनं—पैशाच्या नांवानं हरीहरिच असणार. झालं, आतां जाऊन एकेकाला देतों फैलावर चांगला. आज कांहीं बिल वसूल केल्या शिवाय सोडीत नाहीं. कॅश नाहीं मिळाली तर त्यांच्या अंगावर काय असेल नसेल तें घेईन. पण रिकाम्या हातानं दुकानावर जाणार नाहीं आज.

( जातो. )

रंगनाथः—( प्रवेशकरून ) आतां आमच्या या श्रीमंतांच्या शिंगराला कुठं शोधावं बुवा ? सकाळपासून हिंडुन हिंडुन पायाचे कसे अगदीं तुकडे पडायची पाळी आली आहे. त्या अपटूडेटकडे चार चकरा घातल्या पण प्रत्येक वेळेला पाहावं तों दाराला कुलूप कसल्या तरी कुलंगड्यांत गुंतलेली दिसते ही दुकल. नाहीं तर चुकलेला फकीर निदान मशिदींत तरी सांपडायला हरकत नव्हती. का मागल्यासारखें हॉटेल बिलांत बुडाले आहेत ? खरोखर श्रीमंतांच्या या गोजीरवाण्या बाळानां एकदां का कलीच्या करणीनं झपाटलं की झालं. खालीं खातां पितां खातं पोतं बरोबर. शिलकेच्या सदराकडे मग कांहीं पाहायला नको यांचा दागदागिना



माडी कुंडीं, कपडालत्ता, शेतवाडी, घरदार, इतकंच काय पण मानपान अब्रू, लज्जा झाडून साऱ्या गोष्टी आस्ते आस्ते यांच्या खर्च खातें नावें पडायच्या. कलीच्या करणीचे कसब्री दिवाकर आणि अपटूडेट घरांत शिरल्यापासून आमचें घर म्हणजे संसारांतल्या खेळ खंडोबाचं एक देऊळच बनलं आहे.

नानासाहेबः—मग कांहीं गोंधळ बिंधळ घालतात कीं नाहीं कधीं ?

रंगनाथः—अहो कधीं कधीं कशाला नेहमींचाच आहे गोंधळ उभा; नमस्कार, नानासाहेब केव्हां आलांत आपण ? आमच्याकडे नाहीं उतरलात ते ? ( नाना०–त्याच्या कानांत सांगतात )

नाना०—कोणरे ते तिथं; बाळासाहेब वाटतं ?

रंगनाथः—कुठं कुठं ( वांकून पाहतो ) होय तेच ते. बरं झालं सांपडले एकदाचें.

नाना०:—म्हणजे ?

रंगनाथः—अहो सकाळपासून पत्ता कोठें आहे राजेश्रीचा घरीं ? मी गावांत शोधतों आहे सारखा. ( स्वगत ) अरेच्या तो कोण ? चहावाला वाटतं ? आणि तो त्यांच्याकडेच चाललेला दिसतो आहे. माझा तर्क खरा ठरतो कीं काय ?

नाना०:—सांगितल्या प्रमाणें संध्याकाळीं यायला चूकूं नकोस हो बाळचंद्राकडे आज ? ( जा. ला. )

रंगनाथः—नानासाहेब जरा थांबा. तो पहा त्या ठिकाणी आमच्या घराला गोंधळ उभा राहाणारसा दिसतो. वेळ असेल तर घाला नजरे-खालीं, या जरा आडबाजूला उभे राहूं. ( जातात पडदा उघडतो )

बाळासाहेबः—शेवटीं भालचंद्राची ब्यादच पथ्यावर पडली काल.

अपटूडेटः—अरे पडली कशी पाडली म्हण. बाळासाहेब अस्मा-दिकांची ही अपटूडेट स्वारी काल जर आपल्या जवळ नसती तर...

बाळा०:—ओ, हार्टी कॉम्प्लिमेंट्स् ॲंड कंग्रॅचुलेशन्स फॉर युअर सर्व्हिस. पण आजचं करा काय ? आजच्या वायद्याला वाटाण्याच्या अक्षता कशा लावायच्या ? चालवा चालवा आपलं अपटूडेट डोकं आणि

सोडवा बुवा या हॉटेल कीपरच्या कचाट्यांतून. आजचा अगदीं अखेरचा वायदा असल्या कारणानं सकाळपासून त्या दुकानदाराची मूर्ती माझ्या डोळ्यापुढें अशी दत्त म्हणून उभी आहे.

अपटूडेटः—कोण भित्रारे तूं हा ! इतकं भ्यायचं काय त्याला ? तो काय खातो कीं काय ?

दुकानदारः—खातो नव्हे खाण्याचे पैसे मागतो, पैसे टाका आधीं इथं. साहेब आज उद्यां करतांकरतां सहा महिने होऊन गेले आहेत त्या पैशाना ? आहांत कुठें ?

अपटूडेटः—अहो असं हमरीतुमरीवर काय येतां ? पैसे मागायची रीत झाली काय ही ?

दुका०ः—होय साहेब बाकी साऱ्या रीतीनं आपल्यापुढें हात टेकल्यामुळें आतां हीच रीत उरली आहे. माझ्या बिलाचे पैसे टाका आधी इथं.

अपटूडेटः—अहो हो. हो. हो. दैसे पैसे काय करतां तुम्ही ? असे आहेत तरी किती तुमचे पैसे ? २५१३० रुपड्याचना; त्यांत काय मोठंस !

दुका०ः—आणि दोनशें जरी असते तरी आपल्या सारख्यानां काय त्यांत मोठंस जिथं द्यायचेच नाहींत तिथं तीन काय आणि तीनशें काय सारखंच. बोलाच्या पैशाला काय लागतं मोठंस. म्हणे २५१३० रुपड्याच ना ? २५१३० कां चागले ५०।≈।।। आहेत आपल्या दोघांच्या नांवावर मिळून.

अपटूडेटः—५०।≈।।। इतकं बिल केव्हां झालं बुवा ? कांहीं उधारी तुंबली म्हणून फुगली.

दुका०ः—तर तर असे खिसे कापायलाच बसलों आहोंत कीं नाहीं बाजारांत ? नव्हता एव्हढा विश्वास तर चुकवायचीं होतीं बिलं वेळच्या वेळीं. कसं तरी करून उधार घ्या हो असं म्हणून मी कांहीं लोटांगण घालीत आलों नव्हतों ? कोणास ह्या झांकीच्या गोष्टी सुनावतां ? तुम्ही मोठे असाल तर आपल्या घरचे. आम्हाला काय त्याचं ?

अपटूडेटः—आम्हाला काय त्याचं ? हं तोंड संभाळून चालूं द्या. दुका०ः—अहो राव, असं दरडवतां कोणाला इथं ? म्हणे तोंड



संभाळून बोला मी तोंड संभाळून आहें. आपण मात्र आपला मान संभाळून काढा पैसे इथं ?

अपटूडेटः—हो हो आमच्या मानाची आपल्याला नको काळजी.

दुका०—मग पैसे वाजवा इथं आधीं ?

अपटूडेटः—इतके पैसे कां कोणी खिशांत घालून फिरत असतं कीं काय नेहमीं ? उद्यां घरीं या आणि आपले पैसे घेऊन जा. नाहीं तर तसंही नको. मी येईन उद्यां आपल्याकडे पैसे द्यायला. मला आपली वहीही पहायची आहे एकदां. चला हो बाळासाहेब. (बाळासाहेबांचा हात धरून)

दुका०ः—साहेब चालला कुठं इतक्या साहेबी सफाईनं ? बिल चुकतं केल्याशिवाय आपल्याला मी सोडणार नाहीं आज हे पक्कं लक्षांत ठेवा.

अपटूडेटः—काय चमत्कारिक मनुष्य आहात हो आपण ? सध्या नाहींत आमच्याजवळ पैसं तर द्यायचें कुठून ? आम्हाला काय तुमचे पैसे बुडवायचे आहेत कीं काय ?

दुकान०ः—दिसतेंच आहे किती पैसे द्यायची पात्रता आहे ती या सहा महिन्यांच्या वायद्यावरून आणि तोंड लपवण्यावरून. तें मला माहिती नाहीं. इथं जवळ नसले तर घरीं येतों मी तुमच्या बरोबर. पण माझं बिल मला आजच पाहिजे उद्यां नाहीं आणि परवां नाहीं.

अपटूडेट।—मग आजही नाहीं. जा करा तुम्हाला काय करून घ्यायचं असेल तें.

दुकान०।—असस काय ?

अपटूडेट।—हो हो असस ! चांगलीं माणसं सांगताहेत, पैसे उद्यां देऊं म्हणून तरी हे आपले घोड्यावरच. जा फिर्याद करा काय वाटेल तें करा कोर्ट कचेऱ्या उघड्या आहेत आपल्याला.

दुका०।—आम्हाला कशाला हव्यात कोर्ट कचेऱ्या गरीबांना. कोर्ट कचेऱ्यांचे नाजूक निकाल आपल्यासारख्या नाजूक अब्रुच्या साहेबांकरितां, आमच्या आपला रोकडा रावता कोणाला ऐकत नाहीं. ( त्याच्या कोटाला हात घालतो. )

अपटूडेट।—अरे हें काय करतां आपण ?

दुकान०:—उधारी वसूल करण्याकरतां आपला साहेबी साज उतरतों ( अपटूडेट व दुकानदारांची झटापट ) अपटूडेड पोलीस पोलीस ओरडतो दिवाकर पुढें येतो. )

दिवाकरः—( दुकानदाराला मागें ओढून ) काय आहे. काय ही एकदम मारामारी?

दुका०:—मारामारी नव्हे भाऊसाहेब उधारी आहे.

दिवा०:—इतकी अगदीं आंगावर हात टाकी पर्यंत ?

दुका०:—काय करावं भाऊसाहेब आज सहा महिने झाले सारखे वायदे होताहेत यांचे. बरं बिलही कांहीं कमी नाहीं. ५०।≊।। आहेत आजचा अगदीं अखेरचा वायदा होता. पण आज मला कोर्टाचाच मार्ग दाखवला—

दिवा०:—मग त्यानीं त्यांत वावगं काय सांगितलं-बरोबर आहे त्यांचं म्हणणं, असल्या संभावीत माणसांची अब्रू अशी भर चव्हाट्यावर घेणं म्हणजे काय? (दुकानदाराच्या तोंडाकडे पहात उभा राहतो) नाहीं तुमची मी थट्टा नाहीं करीत. यांनां कोर्टांत खेंचल्याशिवाय यांच्या या गुरम्या जिरायाच्या नाहींत. आणि याच्या पालकांचे डोळेही उघाडायचे नाहींत.

दुका०:—कोर्टांत जायचं काम काय सोपं आहे भाऊसाहेब? कोर्टांत पाऊल टाकयचं म्हणजे खिसा गरम असला पाहिजे—

दिवा०:—एवढंचना ? या संभावीत लोकांना धडा देण्याककरतां म्हणून तुम्ही कोर्टांत जाच मी तुम्हाला देतों पैसे. पुढं तुमचे वसूल झाले म्हणजे मला परत करा माझे ( ५० रुपयांची नोट देतो. )

बाळा०:—( दिवाकराच्या पायावर डोकं ठेवून ) दिवाकर, एक वेळ या आपल्या धाकट्या भावाला क्षमा करा. ( अपटूडेट नुसता भामट्यासारखा पहात उभा राहातो ) होऊं नये पण झालं माझ्या हातून हें. आतां हॉटेलची पायरी म्हणून पुन्हां चढायचा नाहीं मी.

दिवाकरः—हा फार्स मला वाटतं एकदां माईजवळ झाला होता पूर्वी. छे. छे. तुम्हांला क्षमा करण्यांत कांहीं अर्थ नाहीं. ही क्षमा म्हणजे तुमच्या दुर्गुणाला वाढीस लावण्यासाठीं घातलेलं खत आहे.



**रमाः**—करा माझा खून करा! पण हत्याराचा कायदा आडवा येत असेल! मग दुसरी एखादी युक्ती सुचवूं ? [पृष्ठ ५४



**बाळा०**:—नकाहो असे निष्ठूर होऊं नका, कराच तुम्ही एक वेळ क्षमा. माझ्या करतां नसेल करायची, तर माझ्या माईकरतां, दादाकरतां, उपेकरतां, कोणाकरतां तरी पण या आपल्या पाठच्या भावाला क्षमा करा—

**दिवा०**:—(स्वगत) क्षमेची भूल देवून याला मेस्मराइज्ड केलाच पाहिजे (उघड) (दुकानदारास) बरं सध्यां जा तुम्ही ती नोट घेऊन, पुढं काय करायचं तें मी आपल्याला मागाहून कळवीन आणि पुन्हां......

**दुका०**:—छे. छे. छे. भाऊसाहेब आतां पुन्हा कसलं आलं आहे यांना उधार. मी तर नाहींच द्यायचा पण लोकांनांही देऊं द्यायचा नाहीं. बरं येतों मी नमस्कार.

( दिवाकर, अपटूडेट, बाळासाहेब पुढें येतात मागें पडदा पडतो. )

**दिवा०**:—बाळासाहेब खरोखर तुमच्याकडे पाहिलं म्हणजे मला फार वाईट वाटतं. तुमच्यासारख्या थोरामोठ्यांच्या मुलांनीं अशा तऱ्हेनं वागून यःकश्चित एका हॉटेलवाल्याकडून आपली अब्रु कोर्टांत खेचवावी म्हणजे केवढें लांछन हें ?

**बाळा०**:—चुकलों दिवाकर चुकलों.

**दिवाकर**:—नुसतं चुकलं म्हणून भागत नाहीं बाळासाहेब. मनुष्याचं पाऊल एकदां वाकडं पडलं कीं पुन्हां तें सरळ होणं भारी मुष्कीलीचं आहे. आज तुम्ही हें चोरून ५० रुपये बिल केलंत. उद्यां हें बिल बिनबोभाट मिटवायला चोरी करण्यास प्रवृत्त व्हाल. नव्हे माझी पक्की खात्री झाली आतां कीं हें हॉटेलच्या बिलाचें लचांड वारण्याकरितां कालच्या त्याच्या खोलींतल्या चोरींत तुमच्या दोघांचं अंग होतं. ( दोघेही तटस्थ ) काय ही कारस्थानं छपविण्यासाठीं दुसऱ्या एकाद्या कारस्थानाची मांडणी चालली आहे—वाटतं ? पण एवढं लक्षांत असूंद्या कीं आपण ही गोष्ट कबूल केल्याखेरीज हें हॉटेलचें प्रकरण असं तसं मिटणार नाहीं.

**बाळा०**:—दिवाकर कोणच्या तोंडानं ही गोष्ट मी नाकबूल करूं ? ( मागें पडतो. ) पण......( तो त्याच्या उठावितो. ) नाहीं दिवाकर

हें माझं पाप घरांत कुणाला कळणार नाहीं असं अभिवचन मिळा-ल्याखेरीज.........

**दिवाकरः**—हा वेड्या हीच का तूं माझ्या स्वभावाची पारख केलीस ? कुटुंबामध्यें भेद करावयाचेंच माझ्या मनांत असतें तर आज-पर्यंत नसतं का मला तसं करतां आलं ? पण एवढं सांगून ठेवतों तुला कीं कालच्या प्रकरणावरून चिडीला जाऊन भालचंद्र आपल्याला कोर्टात खेचील तेव्हां, किंवा तुमच्या कुटुंबाच्या कल्याणार्थ त्याला कोर्टात खेचायची-देव करो आणि तसं न होवो-आपल्यावर पाळी आल्यास तुम्हा दोघांना त्याच्याविरुद्ध साक्ष द्यायची वेळ आली तर तुमची तयारी पाहिजे.

**बाळा०**:—कबूल पण आम्हाला या फिर्यादीच्या कचाट्यांतून सोडवा.

**दिवाकरः**—तुमच्या व तुमच्या कुटुंबाच्या कल्याणार्थ मला तुम्हाला माझ्या कचाट्यांत धरलं पाहिजे कांहीं दिवस. आतांचे माझे ५० रुपये हॉटेलबिल वारायला घेतले म्हणून आपल्याला प्रॉमिसरी द्यावी लागेल. पैशाची मला किंमत नाहीं, पण पुढं मागं उपयोगी पडणारा लेख अस-लेला बरा. आणि कालची चोरी भालचंद्राच्या सांगण्यावरून आम्हीं त्याच्या मदतीनं केली, पण लोक जमल्यावर सारं शिताफीनें त्याच्याच आंगावर लोटलं असाही लेख पाहिजे आपल्या दोघांचा. माझ्याजवळ आपल्यासारख्या फिकल् माइंडेड् माणसांची नुसती तोंडी कबुली कांहीं कामाची नाहीं. उलट घातुक व्हायची एकादे वेळीं. चला तर आधीं अपटूडेटच्या खोलींत जाऊन हें सारें उरकून घेऊं. आणि मग घरीं जाऊं. तिथंही आपल्याबद्दल तरफदारी करण्याची वेळ येणारच आहे माझ्यावर आपल्या सकाळ पासूनच्या बाहेर राहाण्याबद्दल.

( जातात. रंगनाथ व नाना०. ये०)

**नाना०**:—पाहिलेल्या प्रकारावरून बरीच गुंतागुंती आणि डांवपेच आहेत या बाबतींत. बरं कसंही करून तूं मात्र आज रात्रीं यायला चुकूं नकोस हां. आणि हें बघ मी इथं आहें ही गोष्ट कोणाला सांगूं नकोस.

( जातात. )



## प्रवेश २ रा

[ रमेची खोली—रंगनाथ व रमा. ]

**रंगनाथ**—काय सांगूं बाईसाहेब, तुमची स्थिती पाहून माझ्या पोटांत कसं अगदीं भडभडून येतं बघा. दिवाकरबापू इथं आल्यापासून या घराची कळाच बिघडून गेली आहे. तुमच्यासारख्या अशिलाच्या लेकरावर असा भलताच आरोप करणाराची जीभ.........

**रमाः**—रंगनाथ नको; हा सारा दैवाचा खेळ आहे.

**रंगनाथः**—बिचारा भालचंद्र मेल्यापेक्षां मेला झाला आहे. नाना-साहेब इथं आले असते तर फार बरं झालं असतं.

**रमाः**—नानासाहेब तरी परकेचना ? शिवाय नवऱ्यानं मारलं, पावसानं भिजवलं, राजानं प्रजेला लुटलं तर गाऱ्हाणं कोणाकडे न्यायचं ? आम्हा बायकांचा जन्मच वाईट; पण या जन्मींच काय धिंडवडे व्हायचेत ते होऊं दे, पुन्हां नको.

**रंग०**:—बायकांचा जन्म वाईट आणि आमच्यासारख्या पुरुषांचा तरी काय चांगला ? आपण गंगाजलाप्रमाणं निर्मल आहां असं आमचं मन धडधडीत साक्ष देत असतां आपले होत असलेले हाल उघड्या डोळ्यांनीं पहात स्वस्थ बसलों आहोंत ना ? निष्पाप भालचंद्राच्या अंगा-वर पापाचा चिखल उडवून त्याला माणसांतून उठवलें. आपल्यासारख्या सतीची नाहीं त्या अश्लील शब्दांनीं विटंबना करून देहदंड केला याचं परिमार्जन आमच्या हातून कसं होणार ? तरी पण याच्या मुळाशीं भयंकर रहस्य असून त्याचा स्फोट शेवटीं आमच्या हातून व्हावा या एकाच आशेनें मी इथं तुकडे मोडीत आहें नाहीं तर या घराच्या पिंजऱ्यांत अन्नफलावर पोसलेल्या या द्विजानं केव्हांच भरारी मारली असती. गृहलक्ष्मी लाथाडलेली पाहण्यापेक्षां खाल्या घरचे वांसे मोज-ण्याचं पाप पत्करून आजपर्यंतच्या अन्नावर लाथ मारून खुशाल चौप-दरी फिरविली असती. इतकंच नव्हे तर तुमच्या अन्नावर पोसलेल्या या देहानं कृतघ्नतेचं दावं तोडून, धनीपणाचं जूं झुगारून दिलं असतं

आणि शिंग फुटलेल्या रमाकांताला कालच शिंग मारलं असतं. पण याच्या बुडाशीं असलेल्या कारस्थानाचे डोळे जेव्हां फोडूं तेव्हांच याचे डोळे उघडतील.

**रमाः**—म्हणजे ! तुम्हांला कांहीं निराळाच संशय येतो आहे कीं काय ?

**रंगनाथः**—होय, पण हा पहा मूर्तिमंत संशयच इकडे येत आहे. ( जातो. )

**रमाकांतः**—( प्र. क. ) कोण तो घाईघाईनें लपत छपत गेला ? भालचंद्र कीं काय ? दिवाकरानं त्याला अर्धचंद्र देऊन अर्धंच काम केलं म्हणायचं. कारण हा चोर अजूनही हिच्या चोरून भेटी घेतोच वाटतं ? अगदीं उलट्या काळजाचा निर्ढावलेला निर्लज्ज दिसतो ? याला याचा जाब विचारून अद्दल घडविलीच पाहिजे. ( जातो. )

**रमाः**—हें काय ? त्या बंगलींत तावदानांतून कुणाचा अस्पष्ट चेहरा दिसतो आहे ? दिवाकर ! आणि तो हातवारे करून कुणाशीं बरं बोलतो आहे ? दुसरं कोण ? भालचंद्र ? बंगलीचं दार बंद आहे ! भालचंद्राला त्यांनीं तिथं कोंडून ठेवलं आहे कीं काय ? अगबाई (पाहून) दिवाकराच्या हातांत त्याचा हात आहे. दोघांची झटापट चालली आहे वाटतं ? आतां कसं करावं बरं ? अगबाई एका हातांत बांगड्या दिसतात, मग त्या वन्स वाटतं ? पण त्या तर आपल्या खोलींत पेटी वाजवीत बसल्या आहेत. मग तें कोण ? माईसाहेब ! दिवाकराच्या हातांत हात आणि दार बंद......( आणखी कांहीं पहाते व एकदम दृष्टी फिरवून अंगावर शहारे आल्यासारखी उभी रहाते ) परमेश्वरा किती निर्दोष चित्र हें ? तें पहा तीं बाहेर पडलीं. हें तुला कसं सहन होतं ?

**रमाकान्तः**—( प्र. क. ) हें मी कसं सहन करूं ? तो तर गेलाच पण ही अरे अजूनही तिची दृष्टी त्याच्या कडेसच लागून राहिली आहे. ( उघड ) जारिणी, झाली एवढी आपल्या पतीची शोभा पुरे न झाल्यामुळें भालचंद्राला आज गुप्त भेटीसाठीं पुन्हां बोलाविलं होतंस वाटतं ?



कालच्या प्रसंगानं तुमच्या कामवासनेला उलटी भरती येऊन तिला जाहीर मान्यता मिळाली असं वाटतं काय ?

**रमाः**—काय बोलतां हें, आपल्या जिभेला हाड आहे का ?

**रमाकान्तः**—नाहीं, आणि म्हणूनच तुझीं हाडं नरम करायला त्या दिवशीं या मऊ जिभेनं मला कठोर आज्ञा केली नाहीं पण आतां तीच जीभ हाडाइतकीच कठीण होऊन तुझीं हाडं पिचवून टाकील हें लक्षांत ठेव. धडधडीत नवऱ्याच्या उरावर पाय देऊन त्या भाल्याला.........

**रमाः**—नका नका ! पुढील नुसते शब्द सुद्धां मला भाल्याहून ज्यास्त जखम करतील. पण मजवर असा ओंगळ आरोप करतांनां आपण कांहीं तरी विचार केला आहे का ? मी तुमची सहचारिणी ना ?

**रमाकांतः**—सहचारिणी कीं स्वैराचारिणी ! अझुनही असं बोलण्याचा तुला कोणत्या निर्लज्जपणानं धीर होतो.

**रमाः**—कां बरं, माझं निष्पाप मन निष्कलंक वर्तन व निरपेक्ष पतिपूजा या देवतात्रयीच्या सहाय्याच्या जोरावर मी असं बोलतें. माझ्या नांवाची काळोखी आपल्याला लागली ही कल्पनाच आपल्याला काळोखांत नेत आहे. पतिराज त्या दिवशीं भालचंद्रावर आणलेल्या किटाळाचं कारस्थान कोणी कसं विणलं याचा एक फारच लांबचा पण मधला धागा मला आतांच सांपडला आहे. पण त्या धाग्याची धग आपल्या संतापाग्नीची आंच वाढवील म्हणून मी आपल्याला एवढंच सांगतें कीं मी अत्यंत शुद्ध आहे व भालचंद्र माझा भाऊ आहे.

**रमाकांतः**—तुझ्या भावाचा भाव मी त्या दिवशीं रात्रींच कळून चुकलों आहे.

**रमाः**—आपण चुकलां आहांत एवढंच नव्हे तर चुकतां आहां. आपल्या संशयाचं निरसन करायचं असेल तर ज्या संशयी दृष्टीनं आपण मी व भालचंद्र यांच्याकडे पहातां, त्याच दृष्टीच्या तीक्ष्णतेनं त्या बंगलीच्या खिडकीच्या कांचा फोडून थोड्या वेळांपूर्वी पाहिलं असतंत म्हणजे तिथं दिवाकर आणि माई हें जहरी जाळं आपल्या नाजूक कौशल्यानं विणीत

असतांना दिसलीं असतीं. त्यांनला मुख्य धागा दिसण्याइतके आपण भाग्यवान नाहीं.

**रमाकांतः**—निर्लज्जे कोणत्या अघोरवाणीनें तूं हें बोलत आहेस. तूं आपल्या स्वैराचाराच्या पापकुंडांत माझ्या अब्रूची आहुती दिलीस आणि आतां आपल्या जिभेच्या स्वैरतेचं तूप ओतून तें कुंड अधीकच पेटवितेस! जारिणी ( तिच्या अंगावर धाऊन जातो. )

**रमाः**—हं आपल्या निर्मल बायकोला आपल्या तोंडाच्या खातेऱ्यांत लोळवून तिला नीच बाजार बसवीची कळा आणतां ? आपल्या कुलवतीनं तीचा उपमर्द करून स्वतःला मर्द म्हणवितां ? अशा मर्दाचा कुलवतीनं तरी कां मुलाजा राखावा ? पण तें मला कर्तव्य नाहीं. मी जारिणी नाहीं तर पतिव्रता आहें हें सिद्ध करण्यासाठीं या कारस्थानाचे धागे एकमेकांवर घासून त्या यज्ञाचा अग्नि पेटवितें आणि मग आपल्याला त्या यज्ञांतले यजमान करून वाटेल त्या आहुती टाकून त्याची सांगता करायला सांगतें.

**रमाकांतः**—आपल्या अब्रूची राख केल्यावर इतरांच्या अब्रूचा खून करायला किती उशीर ?

**रमाः**—असं म्हणण्यापेक्षां इतरांच्या अब्रूचा खून करतांनां स्वतः-लाच जर दुष्कृतीचा खून चढला तर स्वतःचा खून...आत्महत्या करावी लागते.

**रमाकांतः**—खून आणि आत्महत्या. आत्महत्या करूं का हिचा खून करूं ?

**रमाः**—करा माझा खून करा ! पण हत्यारांचा कायदा आडवा येत असेल ! मग दुसरी एखादी युक्ती सुचवूं ?

**रमाकांतः**—रमे मी जर अस्सल हिंदु नवरा असतों, बायको म्हणजे चैनीच्या दूधदुभत्यासाठीं विकत घेतलेलं जनावर अशी जर माझी समजूत असती......

**रमाः**—अशीच आहे ! लग्नाच्या दाव्यानं बांधलेली गरीब गाय म्हणुनच माझा असा कोंडमारा चालला आहे.

**रमाकांतः**—तशीच जर माझी समजूत असती तर नुसता कोंडमाराच



काय पण परपुरुषाकडे नुसतं पाहिलंस म्हणून तुझे डोळेच फोडले असते (दिवाकर व माई प्र. क.)

**दिवाकरः**—(स्व.) हिचे डोळे फोडले असतेस तर तो प्रकार तरी हिच्या दृष्टीस पडला नसता ?

**माईः**—पण आतां काय ?

**दिवाकरः**—हिलाच आतां नकटी करून सोडली पाहिजे.

**रमाः**—मग मी तर त्या पेक्षांहि घोर अपराध केला आहे पण आपण हिंदू नवऱ्याप्रमाणं रानटी नाहीं म्हणून नुसती ठार करण्याची सौम्य शिक्षा द्या. पुन्हां हत्याराची अडचण असेल. नाथ (पाय धरते) आपण दाटी करीत असलेल्या वस्तऱ्यानं माझा गळा सोडवा आणि सोडवा मला ह्या जाचाच्या नरकांतून.

**रमाकान्तः**—म्हणजे जिवंतपणीं मला पोलीसच्या हातीं ढकलून मोकळी, शाबास!

**रमाः**—तसं कशाला ! एक कागद आणा म्हणजे मी आत्महत्या केली आहे असं त्यावर लिहून ठेवतें आपल्या हातानं माझ्या देहाचं सोनं झालं म्हणजे त्या सुवर्णदेहाला स्वर्गांत जागा मिळेल. म्हणूनच आपणच माझं बरं वाईट करा असा माझा आग्रह आहे. नाहींतर मी केव्हांच आत्महत्या केली असती. त्या कागदानं खुनाची आत्महत्या ठरेल व मला स्वर्ग व आपल्याला स्वर्गीय शांतता मिळेल. नाथ माझी ही शेवटची इच्छा पुरवाच. ( पाय धरते )

**रमाकान्तः**—सोड, सोड, रमे. विचारांच्या काहुरानं मला घेरी आली नसती तर मी तुला अशीच ढकलून देऊन मोकळा झालों असतों.

( पडतो, रमा सावरते दिवाकर व माई येतात.)

**माई०ः**—चांडाळणी काय करतेस काय ? रमाकान्ताला मारतेस कीं काय ?

**दिवाकरः**—आधींच तो बिचारा विचारांनीं मेला आहे. रमाकांत काय झालं ? माझ्या खिशांत स्मेलिंग सॉल्ट आहे. (बाटली नाकाशीं, रमाकांत सावध )

रमाकान्तः—( स्व. ) दिवाकर माई ! कीं भालचंद्र आणि रमा !

दिवाकरः—अरे हा तर वेडा होण्याच्या बेतांत आला.

रमाकान्तः—(स्व.) जगावं कीं मरावं ? खून कीं आत्महत्या...(जातो)

दिवाकरः—माई मी रमाकांताच्या मागं जातों. ( जातो )

माई०:—आणि मी हिची व्यवस्था लावतें. रंगनाथ हिला आजपासून कोंडून ठेव.

रंगनाथः—होय तें तर माझ्या नशिबालाच लागलं आहे. ( जातात )

---

## प्रवेश तिसरा.

उषाः—काय, वहिनीला कोंडून ठेवलें तें कशासाठीं ? असा तिनं अपराध तरी काय केला ? दादा अलीकडे असं मार्थेफिरूसारखं काय करतो हा ? परवां तें पत्र लाथाडलं, त्यानंतर पहिल्या भेटींतच बायकोच्या अंगावर हात टाकला आणि आज तर कोंडूनच ठेवलीन. हा आहे तरी काय प्रकार ? याच्या मुळाशीं वहिनीचा अजागळपणा आहे कीं दादाचं रोमान्सचं खूळ आहे ? नाहीं तरी इंग्रजी कादंबऱ्या वाचून दादा थोडासा बहकलेलाच आहे, आतांशा त्याला जिकडे तिकडे काव्यच दिसायला लागलं आहे. नाहींतर वहिनीसारख्या साध्याभोळ्या, निर्मळ मनाच्या आणि सरळ चालीच्या बायकोला इतकी कडक शिक्षा ? वास्तविक याचा बंदोबस्त माईनंच केला पाहिजे, पण तिलासुद्धां त्यांत कांहीं वावगं दिसत नाहीं. मोठं आश्चर्य आहे कां आपला मान राखून घेण्याकरितां ती या नवराबायकोच्या नाजुक भानगडींत पडत नाहीं ? कदाचित् सावत्रपणामुळें ती भीत असेल पण मला तसं कांहीं भिण्याचं कारण नाहीं. माहेरचं मूळ तोडून सासरीं आणलेल्या गृहलक्ष्मीची योग्यता मोलकरणीपेक्षांही कमी लेखून घरीं त्यांना असं उपाशीं तापाशीं कोंडून ठेवून लाथाबुक्क्यांचा खुराक लावायचा आणि बाहेर बोलतांना मात्र यांना गृहदेवतेची पदवी द्यायची. काय हा पुरुषांचा मानभावीपणा ! नाटकांत विनोदादाखल 'स्त्रीजात तेवढी निमकहराम' असा टाहो



कानीं पडतो पण व्यवहारांत खरोखरीच 'पुरुष जात तितकी हरामखोर' अशी दौंडी पिटून साऱ्या स्त्रीजातीला खडबडून जागं करावंसं वाटतं. पण आपलाच दाम खोटा तिथं दुसऱ्याला बोलून काय उपयोग ? आम्हा बायकांत धमकच कमी; नाहीं तर काय हे पुरुष आमच्यावर अरेरावी गाजवतात ? तें कांहीं नाहीं मी तर याचा छडा लावून दादाच्या मूर्खपणाचं माप त्याच्या पदरांत सोळा आणे घालणारच (जाऊं लागते) अग बाई, पण खोलीला कुलुप आहे नाहीं का ? किल्ली कशी मिळेल मला ? रंगनाथाजवळच पहिल्यानं चवकशी करावी. रंगनाथ, अरे रंगनाथ (रं. प्र. क.)

रंगनाथः—काय आज्ञा आहे बाईसाहेब ?

उषाः—वहिनीच्या खोलीची किल्ली आहे ना तुजजवळ ?

रंग०:—मी हो म्हणावं म्हणून वकिली प्रश्न विचारलात वाटतं हा ? बरं आहे, पुढं ?

उषाः—पाहूं बरं.

रंग०:—(दाखवून) ही पहा (ती हात पुढं करतेतो हात मागं घेतो)

उषाः—म्हणजे ?

रंगनाथः—म्हणजे ती आपल्याला द्यायचा हुकूम नाहीं.

उषाः—मला द्यायला हुकूम ? कोणाचा हुकूम ?

रंगना०:—हुकूम......माईचा.

उषाः—माईचा हुकूम! कां म्हणून! वहिनी म्हणजे कोणी कैदी आणि तिला पळवून नेण्याकरितां मी तुझ्याजवळ किल्ली मागतें वाटतं? वहिनी तुझी मालकीण हें नातं तूं विसरलास वाटतं ?

रंग०:—अहो खुद्द मालकच जर हें नातं विसरला तर माझ्यासारख्या नोकराची काय कथा ? यथा राजा तथा प्रजा.

उषाः—तें कांहीं नाहीं. आण बघूं ती किल्ली इकडे ( रंगनाथ कांहींच बोलत नाहीं) आण म्हणतें ना ती इकडे.

रंग०:—ती मला आपल्याला देतां येत नाहीं.

उषाः—तुला देतां येत नाहीं तर मी घेतें. (झोंबून घेते व जाऊं लागते)

रंग०:—अहो अहो बाईसाहेब, माईसाहेब...

उषाः—बाईसाहेब नाहीं नी माईसाहेब नाहीं. (जाते)

रंग०:—आतां ही बया कोणाची किल्ली फिरवणार आणखी ?

(जातो. पडदा पडतो)

रमाः—(स्वगत विचार करीत बसली आहे) माझ्या सुखाची ही अशी परवड होत असतांना तिकडच्या मनाला कितीतरी क्लेश होत असतील याबद्दलच मला फार वाईट वाटतं. माझ्या नशिबीं तर सुख नाहींच, पण तिकडं जरी सुखांत रहाणं झालं असतं तरी सुद्धां मला एकप्रकारें आनंद झाला असता. पण दोन्हीही गोष्टी हातांतल्या नाहींत. आपला शेंडा ना बुडखा. इकडचं मन माझ्याविषयीं विनाकारण जास्तच कलुषित होत चाललं आहे. देवा मागील जन्मीं असं कोणचं पाप माझ्या हातून घडलं आहे म्हणून या जन्मीं तूं मला आणि माझ्यामुळं माझ्या साऱ्या माणसांना असं नाहक छळतोस ? एकदां वाटतं, करतील तितका छळ सोसून तिकडच्या अर्ध्या वचनांत राहून आपलं कर्तव्य करावं. पण या कोंडमाऱ्यानं तोही मार्ग बंद झाला आहे. इथून जर मी सुटलें......

उषाः—(प्र. क.) तर काय करशील वहिनी ?

रमाः—कोण वन्सं ? आणि तुम्ही या वेळीं इकडशा ? वरं वाटतयना आतां तिकडे ? आधींच प्रकृती अशक्त आणि तशांत या चांडाळणीमुळें मघाशीं डोक्याला शीण झालेला कशाला देवानं मला जन्माला घातलंन ?

उषाः—आहाहाहा ! वैनी कशाला म्हणजे ? कुल स्त्रियांची परंपरा कायम राखण्यासाठीं, आम्हा कुमारिकांना पतिसेवेचं खडतर व्रत शिकविण्यासाठीं दादाला पश्चात्तापानं पावन करून सुखी करण्यासाठीं आणि शेवटीं आपल्या आत्मयज्ञानं आर्य स्त्रियांची उज्वलता जगाच्या निदर्शनाला आणण्यासाठीं, समजलीस ? केवळ नाटकी प्रणयाच्या कल्पनांनीं वेडावलेल्या माझ्या दादाकडून तुझा हा असा नाहक छळ होत असतांना तूं तो मनावर न घेतां, उलट त्याच्याच स्वास्थ्याची चौकशी करावी म्हणजे लाथ मारणाऱ्याचे पाय चुरण्यासारखेंच आहे. वैनी ही तुझी औदार्याची तपश्चर्या पुढं मागं खात्रीनं फळाला येईल.



रमाः—माझ्या तपश्चर्येचं पर्यवसान तिकडच्या सुखांत झालं म्हणजे मला तिचं फळ मिळाल्यासारखेंच आहे.

उषाः—अगदीं असंच होणार. कारण ही एका आर्यस्त्रीची सात्वीक इच्छा आहे. हें एका पतिव्रतेचं हक्काचं मागणं आहे, आणि त्याला माझ्या सारख्या निर्दोष कुमारिकेच्या इच्छाशक्तीची जोड आहे. भक्ताच्या हाकेला ओ देणाऱ्या भगवानाला या आपल्या तिहेरी हाकेला ओ दिलीच पाहिजे. वहिनी या कलियुगांत माणसांत जरी माणुसकी नसली तरी देवांत अजून देवपण आहे. माणसं करून करून काय करणार ?

माई०:—(प्रवेश करून) काय करणार ? एकी बरोबर दोघींनाही कोंडून ठेऊन वठणीवर आणणार समजलीस ?

उषाः—आई, दादांच्या लहरी स्वभावाला आळा घालायचा सोडून तुला सुद्धां त्याचं हें करणं बरं वाटतं, कारण दादाची चूक मी सुधारली त्याबद्दल तुला राग आल्यासारखा दिसतो. बिचारी वहिनी......

माई०:—माहीत आहे मला पुरी. पुरे करा आपल्या वहिनीची वकीली. आलीस कशाला तूं इथं आधीं ? रंगनाथाजवळुन किल्ली हिसकावून घेऊन तुला हा लांडा कारभार करायला सांगितला कुणी ?

उषाः—माझ्या स्त्री हृदयानं. आई तूं कांहीं म्हण पण मला वैनीचा असा विनाकारण छळ झालेला बिलकूल खपायचा नाहीं.

माई०:—विनाकारण छळ ? अस्सं, हिनं भारलं वाटतं तुला ? तरीच म्हटलं माझ्याविरुद्ध ब्र न काढणारी माझी उषा आज एकाएकीं अशी इतकी बोलभांड कशानं झाली !

रमाः—पण असं म्हणायला मी केलं तरी काय ?

माई०:—तें त्या दिवाकरांना जाऊन विचार.

उषाः—कोण दिवाकर ? काय सांगणार दिवाकर.

दिवाकरः—(प्र. करून) तें तुझ्यासारख्या कुमारीला कळणं उचीत नाहीं. शहाणी असशील तर आल्यापावलीं परत जा कशी ?

उषाः—उचीत असो वा नसो मला तें कळलंच पाहिजे. त्याशिवाय मी इथून हालणार नाहीं.

माई०:—उषे, भलताच हट्ट धरूं नकोस. नाहींतर गोष्टी भलत्याच थराला जातील. चल मुकाट्यानं बाहेर हो. मला खोलीला कुलूप घालायचं आहे.

उषा:—तू पुष्कळ घालशील पण मी घालूं दिलं पाहिजेना ?

रमा:—बस्सं, माझ्याकरतां तुम्हीं कशाला नाहीं तो त्रास घेतां ? माझं काय व्हायचं असेल तें होऊं द्या.

माई०:—तर तर तर तर तर काय ग बाई तरी ऐकणाराला वाटेल कीं जशी कांहीं आम्हीं हिला उगीचच्या उगीच उभी भाजूनच काढतों आहों ? 'गोगलगाय नी पोटांत पाय.'

दिवाकर:—( स्व. ) हें प्रकरण आतां असं बिझायचं नाहीं. आतां थोडीशी नारदीच लढवली पाहिजे. ( उघड ) उषाताई वास्तवीक आपला माईंच्या बोलण्यावर विश्वास बसायला हवा होता. पण जाऊं द्या. यांना इथं ठेवण्याचें कारण—बाईट आहे तें अगदीं. पण आपल्याला ऐकायचेंच असेल तर तो पहा आपला दादा ईझीचेअरवर बसला आहे त्यालाच जाऊन विचारा म्हणजे झालं.

उषा:—हो, हो, मला आली आहे त्याची भीती. ही पहा आतां विचारून येतें. ( धांवतच जाते ).

माई०:—याला म्हणावं डोकं ( दोघंही झपाट्यानं बाहेर जातात. ) ( कुलूप लावतात. )

रमा:—परमेश्वरा. ( असें म्हणते तोंच पडदा पडतो )

---

## प्रवेश ४ था.

[ स्थळ:—बाग. पात्रें:—रंगनाथ, भालचंद्र, व नानासाहेब. ]

नानासाहेब:—एकूण गोष्टी इतक्या थरावर गेल्या अँ ?

रंगनाथ:—नानासाहेब, अहो अजून काय झालं आहे ? नुकतिच कुठं सुरुवात आहे ही. या माईच्या थेरामुळं किती तरी थर बनायचेत अजून.



भाल०:—आपण माझ्या पत्राप्रमाणं टाकोटाक आलांत-खरोखर मला किती तरी धीर आला आहे-नाहीं तर माझ्या ताईचे आणि तिच्या बरोबरच साऱ्या कुटुंबाचे होणारे धिंडवडे उघड्या डोळ्यांनीं पाहण्या पलीकडे मला कांहीं करतां येणं शक्य दिसत नव्हतं.

नाना०:—घराचे धिंडवडे ! भालचंद्र माझ्या प्रिय मित्राच्या मरणानंतर त्याच्याच बायकोनं, या माईनं अशा अनाचाराला उद्युक्त व्हावं, दिवाकरासारख्या लफंग्या फटिंगाच्या नादीं लागून आपल्या बरोबरच त्या स्वर्गीय आत्म्याची अब्रू अशी धुळीला मिळवावी, अनायासें हातीं आलेली संपत्ती अशी चोरापोरीं वैरावी, तुमच्यासारख्या निर्दोष गृहस्थावर, सीतेसारख्या शीलवती सुनेवर शितोंडा उडवावा, उषेसारख्या चाणाक्ष पोरीची सांगड दिवाकरासारख्या उडाणटप्पू गळेकापूशीं घालून तिच्या जन्माचं पुरं मातेरं करावं, आणि इतक्या साऱ्या अकलेच्या दिवट्यांच्या काळजीनं आजपर्यंत पिढ्यान पिढ्या जतन करून उज्वल राखलेल्या माझ्या मित्राच्या कुलशीलावर असला हा डांबरी मुलामा चढवावा यापेक्षां अधिक अधःपात तो कोणता ? रामराव भावी अधःपाताच्या भितीनं का तूं या जगाला असा अकालीं अखेरचा रामराम ठोकलास ? तुझ्या मुखावरील मृत्यूची ती भीषण छाया, माईचा तो हृदयस्पर्शी विलाप, रमाकांताची ती दीनवाणी दृष्टी व क्षणोक्षणीं कमी होणाऱ्या दीपज्योतीप्रमाणं तुझ्या नाडीच्या वाढत्या मंदपणांत त्या पवित्र हातावर तुझ्या कुटुंबव्यवस्थेच्या वचनांत गुंतलेला माझा हात, रामराव याचं मूर्तिमंत चित्र माझ्या मानसचक्षूंसमोरून कांहीं केल्या हालत नाहीं. रामराव माझ्या वचनपूर्तीच्या आशेनं मागल्या आठवणीनं तूं जर आज स्वर्गांतून खालीं डोकावलेंस तर तुला एक अत्यंत हिडीस असा देखावा दिसेल. माईच्या त्या जुन्या विलापाचा लोप होऊन तिच्या नव्या विलासाला आलेला ऊत पाहून रमाकांताच्या दीनवाण्या दृष्टीच्या जागीं छचोर प्रणयाची फुललेली सृष्टी पाहून आणि तुझ्या थंड पडत जाणाऱ्या हातांतला वचनांत अडकलेला माझा तो हात तुझ्याप्रमाणंच थंड पडलेला पाहून तुला काय वाटत असेल, किती

यातना होत असतील, माझ्या कर्तव्यभ्रष्टतेबद्दल तुला माझा किती संताप आला असेल या नुसत्या कल्पनेनेंच अंगावर कसे अगदीं शहारे येतात. रामराव, अपुऱ्या अशा वचनपूर्तीसाठीं तूं आपल्या पुण्याईचें उदक माझ्या हातावर सोड, ईश्वरीकृपेचा वशिला बांध, मित्रत्वाला दैवी सामर्थ्याची जोड दे. आणि या तुझ्या अभागी मित्राला वचनाच्या ऋणांतून मुक्त करण्यासाठीं नेहमींच्या स्नेह भावानें मदत कर. नाहीं तर तुझ्या आत्म्याला स्वर्गांत सुद्धां नर्कयातना भोगाव्या लागतील, आणि मला वचनभंगामुळें आजन्म अन्तःकरणाच्या टोंचण्या सोसाव्या लागतील. अरेरे कोण ही शोचनीय स्थिती ! माई, माई, काय केलंस तूं हें.

**रंगनाथः**—नानासाहेब सध्यांचा प्रश्न माईनं काय केलं हा नसून आपण काय करायचं हा आहे.

**नानासा०**—आपण काय करायचं ? आपण........

**भालचंद्रः**—नानासाहेब इतका डोक्याला शीण देण्यापेक्षां तुम्हीं त्या दिवाकराला एकदम पोलीसच्या ताब्यांत कां नाहीं देत ?

**नानासाहेबः**—अविचार होईल या शंकेमुळें. भालचंद्र पोलीसचें प्रकरण तुला वाटतं तितकं सोपं नाहीं. शिवाय दिवाकराला गोत्यांत आणायला त्याच्याविरुद्ध पुरावा तरी काय आहे तुमच्याजवळ ? उलट त्याच्या जवळच्या तुमच्या विरुद्ध असलेल्या पुराव्याच्या जोरावर तुम्हाला मात्र तो गोत्यांत आणील.

**भालचंद्रः**—ही हें नव्हतं माझ्या लक्षांत आलं. पण मग आतां याला तोड काढायची ?

**नानासाहेबः**—तो......ड......मला वाटतं असंच कांहीं दिवस नमतं घेऊन यांची अंडींपिल्लीं बाहेर काढल्याशिवाय कांहीं मार्ग नाहीं.

**रंगनाथः**—पण तीं काढायचीं कशीं ? मांजराच्या गळ्यांत घांट बांधायची कुणीं ?

**नानासाहेबः**—अरे बांधायचं राहूं दे बाजूला आधीं घांट तर आण कुठं आहे ती.



**रंगनाथः**—अहो घांटांना काय तोटा. घांटा हव्या तितक्या आहेत.

**नानासाहेबः**—मग बांधणारेही हवेतितके आहेत. कांट्यानंच कांटा काढला पाहिजे. हें पहा तूं घरांत आहेसच तेव्हां तूं त्याच्या घरांतील हालचालींकडे लक्ष ठेव. हा भालचंद्र तुला बाहेरून मदत करीलच. आणि मी, बाळासाहेब आणि अपटूडेट या पठ्ठयांच्या पाळतीवर राहून बाहेरचं काम उरकतों. असा आंतून बाहेरून सारखा दुहेरी मारा सुरू केल्यावर रमाकांताच्या त्या जानी दोस्ताला तोंडघशी पाडून जमीनदोस्त करायला कितीसा वेळ लागणार आहे ? खरोखर या दिवाकराच्या गोटांतलं एक का माणूस फोडतां आलं असतं तर, काय सांगूं तुला हां हां म्हणतां याला उघडा पाडतां आला असता. भेदनीतीचा अवलंब केल्याशिवाय असले किल्ले सर करायला मनस्वी त्रास पडतो.

**भालचंद्रः**—पण याच्या या कडेकोट बंदोबस्तामुळें तसं कांहीं जुळेलसं दिसत नाहीं.

**रंगनाथः**—अगदीं असंच कांहीं म्हणतां येत नाहीं. आहे, एक माणूस फुटण्यासारखं आहे. कालच त्या माणसाची आणि दिवाकराची खडाजंगी उडाली आहे.

**भालचंद्रः**—आणि तें माणूस म्हणजे बहुतेक उषाच असली पाहिजे. (रंगनाथाकडे पाहतो. रंगनाथ चपापतो.) कां रंगनाथ ? हें भविष्य मी ताईला घेऊन आलों त्याच दिवशीं केलं होतं.

**नानासाहेबः**—भोळी बिचारी पोरगी. अगदीं लहानपणापासून बापाच्या वळणावर आहे. पण या अधुनिक शिक्षणाच्या रोमान्समुळं त्या सैतानाच्या जाळ्यांत सांपडून धडपड करते आहे.

**भालचंद्रः**—पण त्यांतून सहीसलामत सुटण्याइतकी तडफ मात्र तिच्या अंगांत आहे खास.

**रंगनाथः**—अरे वाः ही तडफ इकडे धडपडत आली वाटतं. आणि बरोबर जाळं विणणारा कोळीही आहे की.

**भालचंद्रः**—(स्व०) अरे त्यानं तर या फुलपाखराला पुरं जाळ्यांत अडकवलेलं आहे.

नानासाहेबः—कोण दिवाकर आणि उषा! मग मला आतां काढता पाय घेतलाच पाहिजे इथून. कांहीं दिवस माझं शरसंधान गनिमी काव्यानंच चाललं पाहिजे. या सामाजिक नाटकाचा शेवट जगाच्या निदर्शनास आणण्यासाठीं मलाही तात्पुरता नटवेषच धारण केला पाहिजे. बरं मी जातों आतां. तुम्ही मात्र जपून असा. (जातो)

रंगनाथः—भालचंद्र या सावजाला अशा वेळीं एकटंच इकडे आणण्यामध्यें यांत दिवाकराचा कांहीं तरी कावा दिसतो आहे. तेव्हां आपण जरा आड होऊन पाहूं कांहीं कानावर पडलं तर.

भालचंद्र—अशा चोरट्या प्रेमाला राजरोसपणा आला म्हणजे सत्याच्या पाठीस लागलेल्या आमच्या सारख्या राजरोस माणसांना चोरटेपणानं ऐकलंच पाहिजे. (जातात) (उषा व दिवाकर प्रवेश क.)

दिवाकरः—आतां तरी पटलीना खातरी आपली नाहीं ना आतां रोष आमच्यावर.

उषाः—रोष असता तर मी आज पुन्हां आपल्याबरोबर बागेंत फिरायला आलें असतें का?

दिवाकरः—आतां कुठं माझा जीव भांड्यांत पडला. किल्लीच्या वेळचं आपलं तें उग्र स्वरूप पाहून या प्रेमाच्या बालेकिल्ल्यावरून माझा कडेलोटच होतो कीं काय अशी भीती पडली होती.

उषाः—पण तो सर झाला याबद्दल आतां तरी आपली खात्री पटली ना? एकुण बायकांच्या रोषाला पुरुष भारीच भितात म्हणायचे.

दिवाकरः—भितात म्हणजे? अग एकाद्या देवळांतल्या देवतेचा कोप झाला तरी चालेल पण या प्रेमदेवतेचा नुसता रुसवासुद्धां त्यांच्या अंगावर काटा आणतो. त्या देवतेवर साध्या पाण्याच्या अभिषेकाची एकदां धार धरून तिला पंच पक्कानांचा नैवेद्य दाखवला कीं देवता शांत होते पण या प्रेमदेवतेवर प्रेमाश्रूंच्या कैक संततधारा धरून पंचपक्कानाच्या ऐवजीं प्रत्यक्ष पंचप्राणांचा जरी नैवेद्य दाखविला तरी त्या आपल्या रुष्ट त्या रुष्टच.



उषा—हा Compliment वाटलं?

दिवाकरः—नाहीं, वस्तुस्थिती आहे आपली. तुझीसुद्धां तुझ्या वहिनीवरून खात्री पटली असेलच.

उषाः—वहिनी इतकी कजाग असेल असं माझ्या स्वप्नींसुद्धां आलं नव्हतं.

दिवाकरः—(स्व.) स्वप्नांतसुद्धां होणें अशक्य पण त्याची या सत्यसृष्टींत मांडणी करून मी हिलाच काय पण साऱ्यांना चकवलं याबद्दल शाबासकी द्यायला कोणी नसल्यामुळं माझी मलाच पाठ थोपटून घ्यायचा मोह उत्पन्न होतो.

उषाः—कोण ग बाई हें धारिष्ट? दादाच्या अंगावर वहिनीनं हात टाकला म्हणतां?

उषाः—कोण माझ्या दादाची ही शोचनीय स्थिति—दादा......

दिवा०ः—याः अगदीं हाकेसरसा दत्त!

उषाः—कोण माझा दादा?

दिवा०ः—तुझा नव्हे तुझ्या वहिनीचा तो पळपुटा दादा. परवांचा आपला पै पाहुणा.

उषाः—कोण भालचंद्र? आणि ही पीडा इकडे कशाला? आणि बरोबर कोण दिसतं आहे तें?

दिवा०ः—तो तुझ्या घरांतला जांबुवंत?

दिवा०ः—अग तो एकाकाळीं तुझ्या वडलांचा विश्वासनिधि, घरांतला लांडा कारभारी, पण आतां मालकाची पोळी खाऊन चोरांची टाळी वाजवणारा जंगली जरत्कारू रंग्या......

उषाः—कोण रंगनाथ आणि भालचंद्राबरोबर?

दिवा०ः—मग त्यांत एवढं आश्चर्य वाटायचं काय कारण आहे?

उषाः—म्हणजे?

दिवा०ः—अग चोराला काळोखाची मदत अवश्य असते.

उषाः—अग बाई, कांहीं तरी कुजबुजताहेत वाटतं आपापसांत.

दिवा०:—यांची हजरी घ्यायला ही संधी चांगली आहे. उषे, थांब, ते इकडेच येताहेत. आपण जरा बाजूला जाऊं म्हणजे हे काय तारे तोडतात हें दिसून येईल. काळोखांतच तुटलेला तारा अधिक स्पष्ट दिसतो.

( दिवा० व उषा जातात. भालचंद्र व रंगनाथ प्रवेश करतात. )

रंग०:—आपल्याला पाहून यःपलाय केलं वाटतं या चोरांनीं ?

( दिवाकर उषा येतात )

उषाः—कोण चोर ?

दिवा०:—अग त्या चोराला साथीदार झाल्याकारणानं त्याला सारेच चोर दिसूं लागले आहेत.

उषाः—रंगनाथ आतां कां दातखिळी बसली सांग ना कोण चोर ते?

भाल०:—चोरून या बागेंत आलें ते ?

दिवा०:—आणि प्रत्यक्ष घरांत चोरी केलें ते ? भालचंद्र तुझी फिरलेली नजर. अझुनही कायम आहेना ? कायद्याच्या करड्या अंमलात तुझा हा अमल उतरला असतां पण माईनं त्या दिवशीं गय केली.

रंगनाथः—माईनं त्या दिवशीं गय केली म्हणूनच या घरांत आज असा सांवळा गोंधळ माजुन राहीला आहे. माईचीच दिशाभूल नडते आहे. दिवाकरबापू जिथं तिथं आपल्याला त्यादिवशीं भालचंद्राच्या बाबतींत कल्पनातींत यश आलं म्हणून आपल्या या वल्गना बरं.

भालचंद्रः—पण त्या यशाची तिथंच परमावधी झाली आहे. तेव्हां आतां या पुढं त्याला ओहोटी लागणार हें पक्कं लक्षांत ठेव. उंच चढणारी लाट पर्वताच्या उत्तुंग शिखरावर जरी गेली तरी तेथुन माघार घेऊन सागराच्या पृष्ठ भागावर धाडकन आपटून पार फुटून जाते हें विसरूं नकोस.

दिवाकरः—पण लाटेच्या एका आंदोलनांतच तुमच्या सारख्या माशांचा जीव, घाबरा होईपर्यंत, उलथा पालथा होतो......

रंग०:—पण एकादा मासा मेला म्हणून लाट कांहीं त्या शिखरावर टिकून रहात नाहीं. तिच्या कपाळी अखेरीस चिंधड्या ह्या ठरलेल्याच.

उषाः—रंगनाथ, दर्जा सोडून काम चाललं आहे.



रंग०:—ताईसाहेब असल्यावेळीं दर्जाच्या दरडावणीनं दडपून जाणारा हा लेचापेचा शागीर्द नव्हे. हें काम करण्यासाठीं नुसता दर्जा सोडूनच काय पण तो तोडूनसुद्धां हा रंगनाथ तुमच्या कुटुंबाच्या कल्याणाकरितां असाच झगडत रहाणार. ताईसाहेब परवांपासून माझ्या नोकरपेशाची आठवण तुम्ही मला ही पाचव्यानं देतां आहां. असा अपमान सोसून तुमच्या घरांत केवळ तुकड्याच्या आशेनं मी नोकरीला राहिलों असं कां तुम्हाला वाटतं ? या म्हाताऱ्याच्या अंगात वाटेल तितके कष्ट उपसून या वीतभर पोटाची खळगी भरण्याची धमक अद्याप आहे. पण केवळ आण्णासाहेबांच्या—त्या पुण्यात्म्याच्या—तुझ्या पूज्य वडिलांच्या वचनांत गुंतल्यामुळं मला इथुन हलतां येत नाहीं. त्याच्या मुलांचे पाय जमिनीला लागल्याशिवाय मला माझा पाय बाहेर काढतां येत नाहीं. बाकी तुम्हाला आतां पंख फुटलेच आहेत म्हणा—पण उलट्या भराऱ्या मारतां म्हणूनच माझा जीव तिळ तिळ तुटतो.

दिवा०:—आणि त्या तिळ तिळ तुटणाऱ्या जीवांच्या कुसक्या नासक्या तुकड्यावरच हा मासा (भालचंद्राकडे बोट करून) पोसला जातो आहे वाटतं ? अहो स्वामिनिष्ठ बारगीर आपल्या म्हणण्याप्रमाणेच या पंख फुटलेल्या पिलांना आपल्या या अशा मायाची पाखरमायेची आतां जरूरी नाहींत समजलांत ? आपल्याला काळं करायचं असलं तर खुशाल करा.

भाल०:—आपल्याला याची जरूर नव्हतीच—उलट अडचण भासत असेल नाहीं.

रंग०:—पण याच्या तोंडाला काळं फासल्याशिवाय हें म्हातारं खोड या जगांतून काळं करणार नाहीं.

उषाः—रंगनाथ, आतां मात्र तुला तोंड काळं करावंच लागेल.

दिवा०:—उषे, हें जळतं घर भालचंद्राशिवाय भाड्यानं कोण घेणार ? करून करून करणार कुठं काळं हा ?

उषाः—कुठं कां करीना मसणांत.

दिवा०:—हें मात्र अगदीं सोळा आणे बोललीस. आतापर्यंतच्या

याच्या या भडकण्यांवरून बहुतेक तीच वेळ आलेली दिसते. कारण जातांना दिवा मोठा होतो असा जगाचा अनुभव आहे.

भाल०:—पण मोठ्या झालेल्या दिव्याची झळ कोणाला ना कोणाला तरी लागतेंच.

दिवा०:—त्यानं कदाचित आपलेच अंग भाजण्याचा जास्त संभव आहे.

भालचंद्रः—रंगनाथ, मला वाटतं आतां जावं; वाऱ्याशीं भांडण्यांत कांहीं अर्थ नाहीं.

दिवाकरः—आतां हा असला युक्तिवाद सुचायचाच. त्याशिवाय तुमचा पाय इथून कसा निघणार ?

रंग०:—आमचा पाय इथून निघून आम्हीं कार्याला लागल्या-शिवाय आपण माईच्या घरांत रोंवलेले आपलें पाय आम्हांला काढतां येणार नाहीं.

दिवा०:—त्या पायांचा पाया किती भक्कम आहे हें समजण्याची कर्तबगारी तुमच्या अंगांत नाहीं.

भाल०:—कर्तबगार कोण हें लवकरच कळेल—तुमचा आमचा सामना ठरला आहे खरा. ( जाऊं लागतो. )

दिवा०:—आणि त्या सामन्याच्या सलामीचा हा पहिला पळता पवित्रा वाटतं ? बाकी हल्लीच्या युगांतील ही सनदशीर चळवळ आहे—शिस्तीची पिछेहाट आहे—अगदीं गॅलंट रिट्रीट आहे. उषे, कसे जोडे मारल्यासारखे गेले—

उषाः— अहो पाप नेहमीं खालींच पहातं.

दिवा०:–(स्वगत) काय पाप खालीं पहातं ? पण हा सिद्धांत मी माझ्या बाबतींत बिलकूल खरा ठरूं देणार नाहीं. आतां विषयच बदलावा. (उ.) आतांचा हा प्रसंग म्हणजे अगदीं नाटकांतला प्रवेशच झाला म्हणायचा.

उषाः—भालचंद्र कसा अगदीं हीरोसारखा बोलत होता.

दिवाकरः—आणि तो थेरडा आपल्याला सव्हीरो समजत होता,

उषाः—पण व्हिलन् कोण ?

दिवाकरः—( स्व. ) व्हिलन् कोण ? पोरी तूं अजून अजाण आहेस.



उषाः—कां प्रयोगाच्या सोईकरितां हीरो व व्हिलन एकच होतें ?

दिवाकरः—हें नाटक जाऊं दे पण आजच्या नाटकाची काय वाट ? तूं येणार ना ? आज आपण तर " भयंकर सूड " पाहणार–( स्व. ) उगवणार.

उषाः—आलें असतें पण आधींच आमच्या शाळेंत ॲट्होमच्या पार्टीची एंगेजमेंट् ठरलेली आहे. सॉरि हो दिवाकर !

दिवाकरः—बस्स् तूं नाटकाला नाहीं आलीस तरी चालेल. या एकाच नजरेच्या फेंकीनं माझं काम झालं. रमाकांताला माणसांतून उठविण्याकरितां हें नवविकासित पुष्प माई मला अर्पण करणार आहे. पण या फुलासाठीं एकट्या रमाकांतालाच काय पण अशा हजारों रमाकांतांना केवळ माणसांतूनच नव्हे तर जगांतूनसुद्धां उठविण्याला हा दिवाकर बेदरकारपणें कलीकाळाच्या असुरी शक्तीचा अवलंब करील.

( पडदा पडतो. )

---

## प्रवेश ५ वा.

( अपटूडेटाची खोली—अपटूडेट. )

अपटूडेटः—( कॉटवर स्वयंवरातील चित्राकडे पाहात ) " खडा मारायचाच झाला " बस बस. बस, बस, कलीजा कसा पण अगदीं तोडून घेतलान् बेट्यानं या वेळेला अगदीं ॲक्टिंग पण ॲक्टिंग. कोण ती आवाजांतली माधुरी, नखऱ्यांतली खुमारी, डोळ्यांतली चमक, उभं रहायची लकब–अहाहा सारंच कांहीं और बुवा अगदीं. या वेळच्या नीटस नजरेकडे पाहिलं म्हणजे अगदीं असं वाटायला लागतं कीं, या शाळेच्या नर्ककुंडाला शेवटचा रामराम ठोकून एकदम याच्या स्वर्गवासाची वाट धरावी. ( इतक्यांत दारावर ठोठावण्याचा आवाज- ) हू इज देअर ? ( मी बाळासाहेब आहे. ) (उठून कडी काढून बाळा-साहेबाला आंत घेऊन ) अहो वुइ बी गंधर्व, अस्सं आलं पाहिजे

म्हटलं ॲक्टिंग आपली कंपनी स्थापन झाल्यावर बरं कां ? खरच बाळ्या काय सांगूं तुला. कालच्या स्वयंवरांत यानं असलं कांहीं मारूं काम केलन् म्हणतोस कीं बस्स. अरे गडकऱ्यांच्या भावबंधनांतल्या धुंडीराजाच्या भाषेंत सांगायचं म्हणजे ''खरोखर मरावं आणि या कालच्या रुक्मिणीच्या पोटी यावं '' काय वेड्या कालचा चॅन्स अगदीं आपल्या हातानं फुकट गमावलास तूं–आणि त्याला कारण काय म्हणे तर परीक्षेंत नापास झालास म्हणून–अरे झक मारते ती तुझी परीक्षा आणि शाळा कालच्या याच्या ॲक्टिंगपुढं. असा ॲक्टिंगचा एकेक ठसका ठेऊन देत होता कीं नुसतं पहातच रहावं. ॲक्टिंगनं ऑडियन्सला कसं अगदीं गारीगार चारीमुंड्या चीत या पुरुषी परीनं केलन् काल ! तशांत आवाजही असा लागला होता कीं नुसती भिंगरी. जशी कांहीं अस्मानची अप्सरा गाते आहे–आपण तर आपल्यापुढं रंगभूमीवर एक नट गातो आहे ही गोष्ट अजीबात विसरूनच गेलों होतों. बाळ्या खरंच तूं लेका कमनशिबी. इतक्या दिवस कानींकपाळीं ओरडतों तुझ्या मी पण, तुझ्या म्हणून अजून डोक्यांत उतरत नाहीं. अरे या मारक्या गुरुमूर्तींच्या दावणीकडे पाठ फिरवून, साऱ्या जगाला आपल्या गुणांची गवसणी घालून थिएटरमध्यें स्वखुषीनें खेंचून आणणाऱ्या या एकाच गुरुदैवताकडं धांव घे कीं तुझं न भूतो न भविष्यति असलं कल्याण होईल नव्हे मी पहिल्यानं सांगितलं तेव्हांच जर ऐकलं असतंस तर आज झालेलं दिसलं असतं–हे अपटूडेट व बाळासाहेब एकाद्या सर्व-मान्य कंपनीचे चालक झाले असते. पण तुझ्या डोक्यांत भरले आहेतना बटाटे ! आणि आतां तर ही परीक्षा नापास झाल्यापासून ते आणखी कुजायला लागलें आहेत.

**बाळा०**:– बरं पण मला वाटतं आपला हा उपदेशाचा अभिषेक पुरा झाला आतां.

**अपटूडेट**:— पुरा कसा झाला ? नाहीं झाला अझुन पुरा, आणि ही देवता भक्ताचे मनोरथ पूर्ण करीपर्यंत तो पुरा होणार नाहीं आणि तसं होईपर्यंत मी माझी उपदेशतपस्याही सोडणार नाहीं. भगीरथ प्रयत्न



करून या माझ्या गंधर्वांच्या गायनगंगेच्या पुण्यस्पर्शानं माझ्याचशा काय पण सर्व भारतीयांच्या मागल्या पुढल्या ४२ कुळांचा उद्धार करीन, कधींहीं रहाणार नाहीं.

**बाळा०**:— अपटूडेट, मेहरबानी करून ही थट्टा पुरे कर. आय् ॲम् इन् ए पोझीशन् टु एनजॉय इट्. आय् हॅव्ह कम फॉर माय बुक्स. माझीं काय काय पुस्तकं आहेत तुझ्याकडे ? ( बुक शेल्फकडे जातो. )

**अपटूडेट**:— (स्वगत) बरंच स्मशान वैराग्य अंगीं बाणल्यासारखं दिसतं आहे राजेश्रीच्या आज. माईसाहेबांच्या नेत्रांजनाचा प्रभाव दिसतो आहे हा. ठीक आहे माईसाहेब आज इतके दिवस नव्या नव्या नादांच्या अंजनानं या बाळ्याच्या डोळ्यांतलि स्वभाविक शक्ति काढून घेऊन मी जें माझ्या डोळ्यानीं त्याला पहायला लावलं तें कांहीं अशी सटीसामाशींच्या नेत्रांजननानं त्याची स्वाभावीक दृष्टी त्याला परत मिळावी म्हणून नव्हे.

**बाळा०**:— अरेच्या इथंतर माझ्यापैकीं एकही पुस्तक दिसत नाहीं. ( परत येऊन ) हें पहा अपटूडेट हें हंसणं आणि ही थट्टा पुरें आतां माझीं पुस्तकं.

**अपटूडेट**:— तुझीं पुस्तकं-भारत पुस्तकालयांत ( बा०–म्हणजे ? ) म्हणजे कालचं नाटक पाहून आल्यावर सकाळीं सारीं होतीं नव्हतीं तेवढीं पुस्तकं भारतपुस्तकालयांत नेऊन विकलीं. असा बावरल्या सारखा कावरा बावरा पाहायला लागूं नकोस. तुझीं पुस्तकं तुला पाहिजेच असतील तर परत विकत आणून देतों तिथून. त्याची नको तुला काळजी. पण जरा बसशील कीं नाहीं. आतां तुमची आमची दिशा अगदीं डायमेट्री-कली अपोझिट होणार तेव्हां आजचा दिवस तरी या वुइ बी आय. सी. एस.–वुइ बी नाहीं म्हटलं तरी चालेल म्हणा-संगतीचा लाभ घडूं या चार घटका ( बाळा० बसतो अपटूडेट गॅलरींत जाऊन चहा व फराळाचं मागवतो. परत येतांना सिगारेट पेटवून येतो ) मग आज-पासून आपण या व्हर्जीनियन ब्यूटीलाही काडी मोडून दिली असेल नाहीं ? कां तितकं नाहीं अझून वैराग्य अंगीं बाणलं ?

बाळा०:— तितकं नाहीं आणि इतकं नाहीं. आज पासून साऱ्या चैनींना फाटा अगदीं.

अपटूडेट:— अगदीं शपतेवर बायकॉट साऱ्यांना ?

बाळा०:— नाहीं, तशी कांहीं अगदीं शपत घेतली नाहीं. पण शक्य तितका प्रयत्न करायचा मनापासून.

अपटूडेट:— मग माझं थोडसं ऐकाल तर बरं होईल. वास्तविक आपल्या सारख्याला मी उपदेश करणं म्हणजे महामूर्खपणाच धाडस करण्यासारखं आहे.

बाळा०:— हे पहा अपटूडेट असं शद्वागणिक मला हिणवायचं असेल तर हा मी चाललों आपला.

अपटूडेट:— एकूण आपली आतां कायमची ताटातूट होणार तर ! असो ! परमेश्वरी सूत्रच जर तसं असलं तर त्याला काय कुणाचा इलाज! ठीक आहे पण बाळासाहेब एक अखेरच विचारावस वाटतं म्हणून विचारतों कीं, ही आपली विचारांची शिदोरी कुणी दिलेली आहे कीं, स्वतःची आहे.

बाळासाहेब:— दोन्हीही प्रकारची आहे. कांहीं माई, दादा, ताई, वहिनी, डॉक्टर यांनीं दिलेली आहे आणि कांहीं स्वतःची आहे.

अपटूडेट:— अस्सं मला वाटलंच होतं हे असं अठरा धान्याचं कोडबोळं असेल म्हणून. पण आपल्याला तें पचेल कीं नाहीं याचा विचार केला आहे कां आपण ? बाळासाहेब आज एक तप जो समुद्रांत राहून कोरडा राहिलास तो आतां याच्यापुढें कितीसा ओला होणार आहेस हें लोकांनीं सांगण्यापेक्षां तुझं तुलाच जास्त स्पष्ट तऱ्हेनें कळायला पाहिजे.

बाळा०:— आजपर्यंतच्या बाळासाहेबाविषयींची तुझी ही विचारसरणी अगदीं बरोबर आहे पण आजचा बाळासाहेब मागचा नव्हे.

अपटूडेट:— बाळासाहेब ही निव्वळ भूल आहे तुला नव्या बाळासाहेबाची, अरे हे नवे बाळासाहेब म्हणजे लोकांच्या विचारांच्या धूपानें जागं झालेलं तुझं अविचाराचं भूत आहे समजलास. ही दिली शिदोरी



संपून उपाशीं मरण्याची पाळी केव्हां येईल हें कांहीं मला सांगतां येत नाहीं.

बाळा०:— अपटूडेट असल्या या संदिग्ध भाषणापासून मला कांहीचाही बोध न होतां उलट मी जास्तच गोंधळांत पडत चाललों आहे. तेव्हां जरा स्पष्ट उलगडा...

अपटूडेट:— बाळासाहेब. खरच कां तूं आपली परिस्थिती ओळखली नाहींस—तुझ्या कुटुंबातली छिद्र खरचं कां अझून तुला दिसली नाहींत ?

बाळा०:— कुटुंबातली छिद्र ? माझी परिस्थिति ! ! अपटूडेट कां असा संदिग्ध बोलतों आहेस अझून ?

अपटूडेट:—म्हणजे खरोखरचाच आंधळा डोळस आहेस तर तूं. कां हीं ही पॉलिसी आहे लोकांच्या पोटांत शिरायची ?

बाळा०:— पॉलिसी ? कसली बाबा पॉलिसी ? मी कांहीं तुझ्यासारखा पॉलिसी होल्डर नाहीं.

अपटूडेट:— ( स्वगत ) आणि म्हणूनच तर हा डाव टाकला आहे. ( उघड ) म्हण पॉलिसी होल्डर म्हण कांहींही म्हण पण स्पष्टपणानं जें कांहीं माझ्या डोळ्यांना दिसतं तें तुला सांगणं माझं कर्तव्य आहे असें मला वाटतं मग तुला तें पटलें नाहीं तरी चालेल. निदान माझं मन तरी मला खात रहायचं नाहीं मी माझ्याकडून सांगितलें नाहीं म्हणून. पण नको, नाहींतर कर्तव्य पूर्तीच्या भरांत तुला अप्रिय असं कांहीं तरी मी बोलून जाईन—नव्हे मला बोलणें भाग पडेल. आणि उगीच कारण नसतांना तुझ्या माझ्यामधें वांकुडपणा येईल. शिवाय लोक काय म्हणतील ते निराळंच पण लोकांशीं मला कांहींच कर्तव्य नाहीं. बाकी माझ्या आजच्या अप्रिय बोलाची तुला पुढं आठवण होऊन पश्चातापही होईल, पण तें बैल गेल्यावर झोपा बांधायचा विचार करण्यासारखं होणार आहे. बरं जाऊं या तें. माझ्या विनंतीला मान देऊन आपण आपला अमूल्य वेळ खर्च केला त्याबद्दल मी आपला फार ऋणी आहे.

बाळा०:— अपटूडेट आजपर्यंत एकच कां होईना पण माझा अगदीं

जिवश्च कंठश्च मित्र म्हणून तुझ्याकडे बोट दाखवायला मला आधार होता.

**अपटूडेटः**— अरे होता कां म्हणतोस तो अझूनही आहे आणि पुढंही राहील आणि तोही नुसत एक बोट दाखवायला नव्हे तर वाटेल तितकी बोटें दाखवायला ? आतां आपण बडे पदवीधर होणार.

**बाळा०ः**— नकोरे असा पदोपदीं हिणवूंस. तुझ्या या प्रखर संदिग्धतेच्या आचीनं ह्या पदव्या जागींच विरघळायला लागल्या आहेत. कां उगीच अंत पहातोस माझा !

**अपटूडेटः**— ( स्व. ) आले, आले, डोंगराच्या उतरणीवर, आतां; यांच्या मेंदूला जरासा जोराचा हिसडा दिला कीं येतील आपोआप नीट सरळ वाटेवर. बाळासाहेब, माईसुद्धां सारे तुम्ही आज या दिवाकराच्या ओंजळीनं पाणीं पितां तें कां रे ? दिवाकर म्हणजे कोण आहे असं समजतां तुम्हीं ?

**बाळा०ः**— कोण म्हणजे आमच्या कुटुंबाचा हितकर्ता.

**अपटूडेटः**— असं कोणतं आपल्या कुटुंबाचं हित साधलं आहे त्यानं ?

**बाळा०ः**— अरे कोणतें म्हणून काय विचारतोस ? पहिल्यानं तर बाबा वारल्यावर जे आम्ही अगदीं असहाय झालों होतों त्या वेळेला त्यानीं आमच्या दादाला धीराचा हात दिला, ( कां दाखवला ? ) मनासारखी बायको न मिळाल्यामुळें बहकलेल्या आमच्या दादाच्या मनाला आळा घालून त्यानींच त्यांनां ठिकाणावर ठेवलं अझून. बाबाच्या मागं ताईला चांगलं स्थल कसं मिळेल ही माईची काळजी त्यांनींच दूर केली. अरे अशा एक ना दोन किती तरी गोष्टी आहेत माई तर म्हणते कीं, ऐन प्रसंगीं मदत करायला परमेश्वरानें तिला हा एक भाऊच उभा केला आहे म्हणून

**अपटूडेटः**— पण मी तर म्हणतों कीं, तुम्हाला हा भाऊबंदच उभा राहिला. एकूण दिवाकर म्हणजे मामा तर. पण कामापुरता म्हणून अचानक उभा राहिलेला हा अनाहूत मामा. कसं झालं तरी मामा आहे बरं. असा संशयी मुद्रेनें माझ्याकडे पाहूं नकोस दिवाकराची तुमच्या आश्लांगी



लागण्याची 'की नोट' मी पूर्ण ओळखली आहे. आणि म्हणजे ती तुमची --माया कारे आपण आपल्या बचावासाठींच भालचंद्रावर आळ आणला पण तशाच नव्हे त्याहीपेक्षां भेसुर आळाचं चित्र भालचंद्राविरुद्ध रमाकांताच्या डोळ्यांपुढें उभें करण्यांत दिवाकराचा तुमच्या कुटुंबाचें कोणतं हित साधण्याचा हेतू होता ? जगांत शुद्धप्रेम नांवाची चीजच मूळ पैदा झाली नाहीं असा ज्याच्या प्रेमाच्या थिअरीचा वेस तो म्हणे तुझ्या ताईवर प्रेम करून तिला पावन करणार ! वा काय पण अर्ग्युमेंटचा फ्रो अगदीं गिरसप्पाचा धबधबा. नाहीं तुझ्या डोळ्यांना या गोष्टी दिसायच्या नाहींत. चोराचीं पावलं ओळखायला चोरच बनावं लागतं. अरे बाबा सांगितलें तर तुला आश्चर्य वाटेल. तुमच्या घरांत अहोरात्र चाललेल्या माई दिवाकराच्या द्वंद्व--युद्धांतील दिवाकराचे पवित्रे प्रत्यक्ष माईला दिवाकराच्या opponent ला दिसण्यासारखें नाहींत तर तुम्हा कच्याबच्यानां काय दिसणार ?

**बाळा०ः**— दिवाकर माईचा opponent ?

**अपटूडेटः**— होय तसंच आहे तें तुमच्या हिताचं हितकर चिलखत घालून माईला हितकर्ता वाटणारा दिवाकर खरोखर तिचा आणि तुम्हां सर्वांचा हितशत्रु आहे. याचा पडताळाच पहावयाचा असेल तर रोजीं उधळायला मिळणाऱ्या त्याच पैशाचं Ration बंद करा कीं, तेंच हिताचं चिलखत पार झुगारून देऊन खरा दिवाकर माईचा opponent दिवाकर—तुमच्या सौख्याच्या होळीचा होळकर दिवाकर, तेव्हांच उघडा पडेल. मुळांत कांहींही नसतां दिवाकरानं फैलावलेल्या रमेच्या बदफैलीपणामुळं वेडावलेला तुझा दादा प्रेमाच्या भुलथापानीं बनलेली लग्नानंतरची बटीक उपा, रांधा वाढा, उष्टीं काढा वगैरे काम करणारी दीड दमडीची मोलकरीण—बाळासाहेब, तुझी माई, वाटेल त्या वेळीं हकानं काम सांगायला तुझ्यासारखा हरकाम्या बोळ्या—आणि या साऱ्यावर फुकटची मालकी गाजविणारा—आयत्या बिळावरचा तो नागोबा दिवाकर ! आतां दुसरं चित्र. परमेश्वरानं दिलेल्या देणगीचं योग्य चीज करून तूं जर एकाद्या नामांकीत नाटक मंडळीचा एक दोन वर्षे आश्रय करशील

तर एकाद्या सर्वमान्य कंपनीचा मालक होऊन आपलं स्वताचं तर कोट कल्याण करुन घेशीलच पण पन्नासांचा पोशिंदा होशील. अरे परमेश्वर एकेकाच्या आंगीं एक एक गुण देतो तो ( ट्रस्टी नाटक कंपनीच्या मॅनेजराच्या वेषांत येऊन अपटूडेटचं वाक्य पुरं करतो. ) तो त्याचा खरा उपयोग आणि सर्वांगपूर्ण विकास करण्याकरतांच देत असतो. असा कुजत ठेऊन मातीमोल करण्याकरितां देत नसतो असंच ना अगदीं आपलं म्हणणं मि. अपटूडेट Mr. Uptodate I hope you will kindly excuse me for hearing you out. खरोखर आपली ती रसाळ खडी, व अधिकारयुक्त कांती, मुद्देसूद रीतीनं आपल्या मताचं मंडन करण्याची प्रतिभासंपन्न शैली, इ० गुणावर लोलुप होऊन आडून ऐकणं पाप आहे असं माहित असून सुद्धां मोहानं मी त्या ठिकाणीं खिळल्यासारखाच झालों. खरोखर पुढं मागं आपण नाटककार म्हणून नांव काढणार या महाराष्ट्रांत. आणि हेच वाटतं आपण काल नांवाजलेले आपले गंधर्व दोस्त बाळासाहेब ? वा: रूपांत तर काल वर्णन केलंत त्यापेक्षां कांकणभर जास्तच आहेत. खरोखर आवाजी आणि अभिनय यांत वेल् अप् होतील तर...uptodate:–अहो होतील कशाला आहेतच ते आधीचें. गाणं व अभिनय हीं Instincts आहेत त्यांच्या बाबतींत.

**नाना०**:—मग तर काय महाराष्ट्र रंगभूमीचं भाग्य उदयालाच आलं म्हणायचं. ही बाळासाहेब अपटूडेट्ची जोडी साऱ्या जगाला आपल्या गुणामुळं नागासारखी डोलवायला लावील यांत कांहींच शंका नाहीं. बरं तर घेतों आतां आपली रजा—

**अपटूडेट्**:—वा:, आलेत काय, जातां काय, जरा बसा कीं आल्यासरसे, कुणिकडे आलां होतां, कां आलां होतां—

**नाना०**:—उगीच आपला सहज इकडून जात होतों तों जातां जातां आपल्याला भेटून जावं उभ्या उभ्या म्हणून वर आलों तों आपल्या गुणांनीं मला जागींच खिळून ठेवलं तबल पंधरा मिनिटं.

**अपटूडेट्**:—बरं पण कालच्या त्या appointment चं काय झालं?



**नाना०**:—व्हायचं काय माझ्याकडून तयारी आहे. तुमचंच काय तें तुम्ही बघा.

**अपटूडेट्**:—अहो आमचं काय बघायचं. आधीं सारं बघूनच काल तुमच्याकडे आलों होतों.

**नाना०**:—तें खरं हो पण मघाच्या आपल्या Argument च्या Flow चा रोख मध्येंच शिंकलेल्या माशीला उडवून लावण्याकडे होता म्हणून म्हणतो.

**अपटूडेट**:—ऊ: अशा तर कैक वेळा माशा शिंकल्या आहेत आजवर. अहो तो परीक्षा नापास झाली म्हणून वार्षिक प्रसूति वैराग्याचा झटका होता.

**नाना०**:—ठीक आहे तर मग–उद्यां किती दुपारीं तीनला ना ? दोनच्या सुमारास आपल्याकडे माणूस पाठवतो. खरोखर तुम्ही दोघं म्हणजे एका भावीं Ideal नाटक कंपनिच्या कोनशिला प्रमाणं भासतां मला आज ?

**अपटूडेट्**:—आणि त्याचा बसविण्याचा समारंभ आपण आपल्या हस्तें पार पाडावा म्हणून काल मी आपणांकडे मुद्दाम आलों होतों,

**नाना०**:—बरं येतों आतां.

**अपटूडेट**:—कांहीं चहाबिही...

**नाना०**:—छे छे चहाबिही कांहीं नको चहानं पोट फुटायची वेळ आहे आतां. ( जातो)

**अपटूडेट्**:—मग काय ठरला विचार बाळासाहेब ?

**बाळासाहेब**:—मी कांहीं तुझ्या विचाराबाहेर नाहीं यांत काय तें समजून घे. ( पडदा पडतो )

---

## प्रवेश ६ वा.

**दिवाकर**:—या व्यहरांत नाहींच पण हार्टलेस व्हिलन्स निर्माण करणाऱ्या प्रतीभासंपन्न कवीच्या लेखणींतून सुद्धां लव्हलेटरचा असा विपरीत उपयोग कोणाला कधीं पहावयास सांपडला नसेल. हे उषेचें लव्ह-

MODERN COLLEGE

लेटर आणि आजच्यासारखी नामी संधी यांच्या या विषारी मिश्रणानं रमाकांताला दुनियेंतून उठवायाला कितीसा वेळ लागणार आहे ? थिएटर-मध्यें रमाकांत माई वगैरे मंडळी नाट्यरसाचें व ॲटहोमपार्टीमध्यें उषा कोलिङ्कचे घुटके घेत असतांना मी तयार करीत असलेल्या या विषारी मिश्रणाची त्यांनां अंधुक कल्पना तरी असेल कां ? हेडेकचं निमित्त करून मी ईकडे येण्यासाठीं बाहेर पडलों त्या वेळीं नाटकाला विशेष रंग चढल्यामुळं रमाकांत माझ्याबरोबर आला नाहीं हें फार बरं झालं. दुर्दैवी रमाकांता रंगभूमीवरील नाटकांतला नटवा सूड पहाण्यापेक्षां आपल्या घरांत कडव्या सुडाचें हें खरं नाटक पाहिलं असतंस तर त्या नाटकी व्हिलन पेक्षां या खऱ्या व्हिलनलाच तूं अधीक शाबासकी दिली असतीस. मृत्युनंतर होणाऱ्या यातनांची कल्पना मनुष्याला जिवंतपणीं होत नाहीं यांत कांहीं नवल नाहीं पण कधीं कधीं जिवंतपणीं सुद्धां होणाऱ्या भावी यातनांची कल्पना मनुष्याला शिवत नाहीं. आतां पहिल्यानें रमेची खोली गांठली पाहिजे. ( जातो. भालचंद्र येतो. )

**भालचंद्रः**—बारा वाजले ! नाटकाला गेलेला दिवाकर एकटाच असा परत कां आला ? घरांत रमा एकटी आणि याचं हें अवेळीं परत येणं–यांत कांहीं तरी काळंबेरं असेल कां ? जाऊं कां मी याच्या पाठोपाठ? पण परवां सारखं उलट यानंच माझ्या अंगावर कांहींतरी किटाळ आणलं तर ?—पण ताईवर एकादा भलताच प्रसंग गुदरला तर ?... डोक्यांत कसं अगदीं काहूर माजून राहिलं आहे. अशा या अपरात्रीं—परकी घरांत—एकदां बेअब्रू झाली असतांनां मी पुन्हां प्रवेश करायचं धाडस करूं का ? माझी झालेली बेअब्रू—पण ताईची होणारी बेअब्रू ——छे भूतकालापेक्षां भीषण भविष्यकाळालाच मला तोंड दिलं पाहिजे. —पण माझा घरांत प्रवेश—हा दिवाकर आंत असतांना माझा घरांत प्रवेश कसा होणार ? ( विचार करून ) अस्संच करावं, म्हणजे वेळ आल्यास उपयोगीं पडतां येईल. ( जातो )

(पडदा उघडतो. रमेची खोली. रमा विचार करीत बसली आहे.)

**रमाः**—कुठलंच सुख नाहीं मग या झोंपेचं तरी सुख या अभागी



रमेला कां मिळावं ? पुरुषांनीं स्त्रियांशीं निष्ठूर व्हावं ही हल्लींची जगरूढी आहे. पण स्त्रियांनीं स्त्रियांशीं निष्ठूर होणं म्हणजे स्त्रीहृदयाची जाणीव नसल्यासारखंच आहे. ( विचारमग्न ) घर फिरलं म्हणजे घराचे वासे सुद्धां फिरतात- मग परवांच माझ्या दारावर तो मेला अपट्डेट्—काय मेल्याचं नांव तरी ?–उलटून पडला यांत काय नवल ? आणि माई-वगैरे साऱ्या मंडळींनीं त्याचा कांगाव्याचा नायटा करून तिकडे सुद्धां तें खरं वाटायला लावलं. कानांनीं ऐकलेलं खरं आणि मी प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहिलेलं खोटं अशी तिकडची भावना झाली तेव्हां माझं दुर्दैव नव्हे तर काय ? आमच्या संसारांत माती कालविणारा हा मेला दिवाकर......

( दिवाकर प्रवेश करितो )

**दिवाकरः**—मेला नाहीं तर तुझा नक्षा उतरण्याकरीतां हा प्रत्यक्ष तुझ्या पुढं उभा आहे.

**रमाः**—कोण दिवाकर ?

**दिवा०ः**—होय तोच मी अझून ओळख पटली नाहीं वाटतं ?

**रमाः**—होय पटली. अशा अपरात्रीं परस्त्रीच्या खोलींत तुम्हाला पाहिल्यावर तुमची ओळख कोणाला पटणार नाहीं.

**दिवा०ः**—प्रसंग ओळखलास हें फार चांगलं झालं.

**रमाः**—नुसता प्रसंगच काय पणं तुम्हाला, माईच्या त्या बंगल्यांतल्या चोरट्या प्रियकराला—दिवाकरालाही मी केव्हांच ओळखलं आहे.

**दिवा०ः**—माईचा चोरटा प्रियकर चोरून कां होईना पण तुला या दिवाकराचं प्रिय करण्याची आज्ञा करीत आहे.

**रमाः**—काय म्हटलं ? दिवाकराचं प्रिय करण्याची आज्ञा ?

**दिवा०ः**—होय तेच माझे शद्ब.

**रमाः**—दिवाकर, कुणा समोर बोलतां हें तुम्हीं ? तुमची जीभ अशी वाहवली तरी कशी ?

**दिवा०ः**—तुझी वाहवली तशी. रमे रमाकांताला आपल्या कह्यांत आणण्यासाठीं त्याच्या कानांत ओतलेल्या विषानं तुझी अब्रू आज ठार होण्याचा प्रसंग आला आहे. तूं माईच्या बाबतींत घेतलेली भलतीच शंका

आज तुझ्या बाबतींत खरी ठरणार आहे. आणि भलत्या नात्यानं आमचं नांव भ्रष्ट करण्यांत होणार आहे.

**रमाः**—कुलीन स्त्रियांनां भ्रष्ट करणं म्हणजे आपल्या हाताचा मळ असं माईच्या मलीन हातावरून तुम्हाला वाटत असेल कदाचित, पण पांची बोटं सारखीं नसतात हें लक्षांत असूं द्या.

**दिवा०ः**—पण तीं अशीं पाहिल्याशिवाय कशीं कळतील ? ( हात धरतो )

**रमाः**—दिवाकर बऱ्या बोलानं माझा हात सोडा नाहींतर......

**दिवाकरः**—नाहींतर तुला या वेळीं काय करतां येईल ?

**रमाः**—काय करतां येईल ? ( पाण्याचा तांब्या घेते--तो काढून घेऊन दिवाकर झुगारून देतो तों खिडकीच्या तावदानावर अपटून कांचा फुटतात. ) अहाहाहा, दिवाकर तुमच्या पापानं पोळलेलं पाणी त्या कांचावर पडल्यामुळं माझ्या विटंबनेचा टाहो परमेश्वराच्या कानांवर घालण्याकरितां ही पहा त्या कांचांनीं एकदिलानं किंकाळी मारली. परमेश्वरा...

**दिवा०ः**—त्या तुझ्या पोंचट परमेश्वराचं पिशाच्च म्हणजे त्या रंगनाथाचं जिवंत पिकलेलं प्रेतच कीं नाहीं ? येऊं दे त्याला कीं त्या रंगनाथाची रंगपंचमीच करतों. ( रंगनाथ–''उषाताई, धांवा धांवा चोर चोर करीत प्रवेश करतो अरे हा साधा चोर नसून कामांध शिरजोर आहे. रंगनाथाची व दिवाकराची झटापट रंगनाथ ट्रंकेवर आदळतो. जखम होते ) रमे तुझ्या पातिव्रत्याच्या प्रभावानं हा थेरडा रंगनाथ खरोखरच रांगतां रंगनाथ होऊन रक्तानं अगदीं रंगून निघाला आहे. ( रंगनाथ उठण्याची धडपड करतो ) काय मरते वेळीं धडपड ? दिवा जातांनां मोठा व्हायचाच मर ( लाथ मारतो, तो पडतो ) परमेश्वराचं पिशाच्च तर गाडून टाकलंच आतां एकाद्या देवीच्या नावानं हांका मार म्हणजे तिचंही दिव्य करून टाकतों. ( उषा प्रवेश करते )

**उषाः**—ही पहा तुमची देवी, करा पाहूं हिचं दिव्य ?

**दिवाकरः**—कोण उषा, तुझं दिव्य करायला अजून अवकाश आहे.




दिवाकरः—लग्नाचं पाहतां येईल काय पुढें? मग त्या पूर्वींच भ्रष्टतेचा शिक्का तुम्हां दोघींना एकमेकींचे साक्षीदार ठेवून हा दिवाकर अस्सा—

[ पृष्ट ८१ ]

[पृष्ठ ८८

दिवाकरः—रमाकांत हें पत्र पहा आणि हें चित्र पहा.



**उषाः**—सोडा, आधीं वहिनीचा हात सोडा ! ( तो सोडीत नाहीं. )

**दिवा॰**—उषे तुला खरा प्रकार ठाऊक नाहीं. तूं इथून चालती हो, उगीच भलत्याच भानगडींत पडूं नकोस.

**उषाः**—आपण हें भलतंच आरंभिलें आहे तेव्हां मला इथं राहिलंच पाहिजे. दिवाकर मी तुमची प्रणयीनी.........

**दिवा॰ः**—असशील, पण उष्ट दुध प्यायल्यावरच प्रणयीनिशी प्रणय करतात.

**उषाः**—मग त्याचीच ही पूर्वतयारी चालली होती वाटतं ? दिवाकर एकाद्या राक्षसाप्रमाणं आपण परस्त्रीचा अभिलाप-प्रत्यक्ष माझ्या दादाच्या तुमच्या जिवलग मित्राच्या, कुलस्त्रीची विटंबना आणि तीही पुन्हा आपल्या वाग्दत्त वधूसमोर ! कोण हा निर्लज्जपणा ?

**दिवाकरः**—कोण कुणाचा मित्र आणि आणि कोण कुणाची वाग्दत्त वधू ? राजरोस लग्नानंतर चिठ्यांचपाठ्यांचे चोरटे प्रकार आढळतात, तर नुसत्या वाग्निश्चयाच्या मंत्रानं पातिव्रत्याचा. जप कोण करणार होय कीं नाहीं रमे ?

**उषाः**—अस्सं काय ? कामांध पुरूष निर्लज्ज असतात हें कांहीं खोटं नाहीं.

**दिवा॰ः**—निर्लज्ज ! उषे तूं आपल्या भावी पतीला भावी कां पतीला काय बोलतेस ? हा तुझा उद्दामपणा लग्नाच्या मंत्रांनीं मारला जाऊन माझ्या दयेच्या दृष्टीवर तुला तुझं दीनवाणं आयुष्य कंठायचं आहे हें विसरूं नकोस.

**उषाः**—पहिल्यानं वहिनीचा हात सोडा, लग्नानंतर पुढच्या पुढं पाहतां येईल.

**दिवा॰ः**—लग्नाचं पहातां येईल काय पुढें ? मग त्या पूर्वींच भ्रष्टतेचा शिक्का तुम्हां दोघींनां एकमेकींचे साक्षीदार ठेवून हा दिवाकर हा अस्सा ( झोंपाळ्यावरी ) रमाकांताच्या अर्धांगीवर चोरून छापा घालणाऱ्या चोरा-परच्या मोराचा हा दिव्य दुहेरी पिसारा पाहून भालचंद्रा तूं जर या ठिकाणीं

आतां असतास तर तुझ्या डोळ्याच्या खांचाच (भालचंद्र खिडकींतून उडी घेऊन दोघींनां सोडवितो )

**भालचंद्रः**—( उडी घेतांनां ) थांब माझ्या डोळ्याच्या खांचा करण्या-पूर्वी तुलाच खाचेंत गाडतों.(झटापट-माणसं बाहेर येतात उषा दार उघडा-वयास जाते. भालचंद्र रमेच्या बाजूला उभा ) ताई कोण हा तुझ्यावर प्रसंग

**रमाः**—दुर्दैवाचा दारुण दुर्विलास हा ( रडूं लागते )

**भाल०ः**—नको ताई अशी रडूं नकोस. तुझ्या सुखाला आरंभ व्हायला आतां फारसा अवकाश नाहीं ( सर्व येतात ) रमाकांत हें पत्र पहा आणि हें चित्र पहा-

**माई०ः**—अगबाई कोण अगोचर कार्टी ही आणि किती निर्लज्ज हा भाल्या ?.

**रमाकान्तः**—अरेरे, कोण हा निर्लज्जपणा ! या दृश्यापेक्षां या पत्रांत आणखी कोणता तर्क दृष्टीस पडणार ? ( पत्र गळून खालीं पडतें उषा तें उचलते ) या पेक्षां मरण पुरवलं ! रमाकान्त तुझ्या तळमळणाऱ्या जीवाला आत्महत्येशिवाय दुसरं औषधच नाहीं.

**उषाः**—दादा, दादा, असं भलतंच बोलूं नकोस थांब थांब मी तुला सर्व कांहीं सांगतें ( जाते. )

**दिवा०ः**—( स्व. ) अरेरे, तें पत्र त्या कार्टीच्या हातांत पडलं कुच फिकर नहीं. आतांचा बार तर खूप बहारीचा उडाला

**रमाः**—हाय रे दैवा ( पडते )

**अपटूडेटः**—मि. भालचंद्र आपल्या या उज्वल चारीत्र्याच्या चित्रपटाचा हा हप्ता केवळ बाळासाहेबांच्या आग्रहामुळं मला पाहावयास सांपडला. काय हा पुन्हा सांवळागोंधळ ?

**दिवाकरः**—अरे बाबा, त्याचा हा दुसरा अंक आहे.

( अंकाचा पडदा. )

**अंक २ रा समाप्त.**

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

**स्थळ**—रंगभूमी. अपटूडेट एका सभ्य गृहस्थाच्या,

व नानासाहेब मॅनेजरच्या वेषांत प्रवेश करितात.

**नानासा०ः**—कसं काय अपटूडेट, सारं सामान जिथल्या तिथं मिळालं ना ? कांहीं कमी तर नाहीं ना पडलं ?

**अपटूडेटः**—छे छे, सारं कांहीं यथास्थित मिळालं. काहीं कमी नाहीं पडलं. पहा तर खरं हा प्रवेश, म्हणजे हा बाळा नाटकासाठींच जन्माला आला आहे असं वाटेल तुम्हाला.

**नानासा०ः**—अहो ' योजकस्तत्र दुर्लभः ' मग आतां उशीर कसला? ( स्व० ) अनायासं कृष्णरावाची कंपनी इथंच असल्यामुळं माझ्या सोंगाच्या बतावणीला कोण हा सत्याचा मुलामा चढला ? ( उ० ) हं मग होऊं द्या सुरवात.

**अपटूडेटः**—त्याच विचारांत आहें. पण आधीं नेपथ्यांतलं काम संपलं असल्यास एकदां बाहेर येऊन जाण्याविषयीं नटीला आज्ञा करून नाटकारंभाच्या पुरातन परंपरेची पूर्तता करूनच करावी सुरवात. म्हणजे या नाट्याचार्यांचा रोष होऊन प्रथमग्रासे मक्षिकापातः नको व्हायला. ( बुइंगकडे जाऊन ) आंतलं काम संपलं असल्यास जरा बाहेर येऊन जा बरं प्रिये. ( कानोसा घेऊन ) काय, तुझ्याकडून सारी तयारी आहे, बाहेर यायची कांहीं जरूरी नाहीं म्हणतेस ? ( पुन्हा कानोसा घेऊन ) काय, माझ्या पुरतंच मी पाहूं ? म्हणजे, माझी तयारी नाहीं असा का तुझा समज आहे ? तर मग हा पहा ( दोघे दोन बुइंगजमध्यें जातात. ) ( पडदा उघडतो. चंचलेची खोली )

**चंचलाः**—( हातांत पुस्तक घेऊन ईझिचेअरवर बसलेली. दारावर थापा. त्रासल्यागत ) कोण ग बाई हा त्रास ! साऱ्या दिवसांत आतां

कुठं पुस्तकाला हात लागला तों यांचा आपला दारावर हात आहेच. आज शनिवार, ऑफिसांतून दोन वाजतां निघालांत ते पांच वाजतां घरीं उगवतां वाटतं ? तो मेला भोलानाथही कुठं गांजा फुंकून बसला आहे आज. दोन वाजतां येऊन चहा करून याल म्हणून कितीतरी वाट पाहिली आपली मी, पण आपलं कुठं आहे घरीं लक्ष ? घरीं बायको चहावांचून मरेना का मेली तर.

रंगरावः—( त्रासिक स्वरानं ) अग पण दार तर उघड. किती वेळचा थापा मारतों आहें मघापासून.

चंचलाः—तुम्हाला आतांशा थापा मारायची संवयच झाली आहे. आज काय म्हणे पार्टीच होती. उद्यां काय म्हणे गाणंच होतं, परवां सत्यनारायणच होता अशा निमित्तानं रात्रीच्या रात्री बाहेर काढतां. कांहीं वाटत नाहीं का जिवाला ?

रंगरावः—( विशेष त्रासून उचलल्या आवाजांत ) अग पण दार उघड म्हणतों ना आधीं.

चंचलाः—( आदळ आपट करून दार उघडून दारांतच ) कां, आवाजाची पट्टी चढलीशी ?

रंगरावः—तुझ्या तोंडाच्या पट्याशीं निदान सूर तरी मिळाला पाहिजे ना?

चंचलाः—अस्सं, माझ्या तोंडाचा पट्टा, आणि इकडचं तोंड अगदीं शिवूनच टाकलं असेल नाहीं ? साळसूद ग बाई साळसूद. एक तोंडांत मारली तर दुसरा गाल पुढं कराल नाहीं ? अगदीं धर्मराजाचे नवे अवतारच कीं नाहीं ? ( तो जाऊन इझिचेअरवर हात-पाय ताणून हुश्श करीत बसतो. त्याच्याकडे पाहून ) अग बाई भटाला दिली ओसरी नी भट हळूहळू पाय पसरी. तशांतलीच ही गत झाली म्हणायची. तुम्हाला मी चांगलं उठून दार उघडलं तों तुम्ही थेट अगदीं खुर्चीच गांठलीत ? ( तो हुश्श करून घाम पुसतो. ) अग बाई बाई बाई, भारीच श्रम झाले असतील नाहीं ? काय हो झालं इतकं अगदीं हुश्श करून दमायला ? मोटभर धुणं धुतलंत, चार पायली



दळण दळलंत, का गाडाभर भांडीं घासलींत ? नुसते ऑफिसचे चार कागद उलथेपालथे करून जर श्रमाचे इतके चोचले करतां तर मग बायकांच्या जन्माला आलां असतां तर काय केलं असतंत.

रंगरावः—तुझ्यासारखंच तोंडाची तोफ करून नवऱ्याला त्या तोफेच्या तोंडीं दिलं असतं.

चंचलाः—अस्सं, एकूण मी तुम्हाला दररोज तोफेच्या तोंडीं देतें तर ! रोजच्या मरणाची संवयच झाली असेल नाहीं ? प्राणिमात्र एकाच मरणाला भितो पण तुम्ही मात्र रोज त्याला तोंड देतां ?

रंगरावः—न देऊन कसं भागेल ? जिवंत रहायचं आहे ना मला ?

चंचलाः—( तोऱ्यानं ) अस्सं, अस्सं. समजतात हो मला हीं असलीं घालून पाडून बोलणीं. पण काय हो, इतका वेळ कुठं गेली होती आपली थिडका ? कां तिनं सोडलं नाहीं इतका वेळ आपल्याला ?

रंगरावः—( आश्चर्यानें ) ती ?

चंचलाः—( वेडावून ) हो तीच.

रंगरावः—ती कोण ?

चंचलाः—( फणकाऱ्यानं ) तें आतां आपल्या मनाला विचारा. शनिवारची गोल्डन नाइट दिवसाच उरकून घेतलीत वाटतं ?

रंगरावः—( शांतपणानें ) हो एका अर्थी तसंही म्हणायला हरकत नाहीं म्हणा. आजचा ' डे ' गोल्डनच.

चंचलाः—अगदीं उघड उघड सांगतां कीं हो ? जनाची नाहीं तर मेली मनाची तरी असायची होती ?

रंगरावः—अग, ती आतां या घरांत राहील कशी ? आपलं लग्न झालं तेव्हांच तिनं काढता पाय घेतला आहे या घरांतून. बरोबर आहे; एका म्यानांत दोन तलवारी कशा रहाणार ?

चंचलाः—म्हणजे ती या घरांत होती तर पूर्वी ?

रंगरावः—अग, नुसती घरांतच काय, पण मी जाईन तिथं नेहमीं माझ्याजवळच असे ती.

कुठं पुस्तकाला हात लागला तों यांचा आपला दारावर हात आहेच. आज शनिवार, ऑफिसांतून दोन वाजतां निघालांत ते पांच वाजतां घरीं उगवतां वाटतं ? तो मेला भोलानाथही कुठं गांजा फुंकून बसला आहे आज. दोन वाजतां येऊन चहा करून घाल म्हणून कितीतरी वाट पाहिली आपली मी, पण आपलं कुठं आहे घरीं लक्ष ? घरीं बायको चहावांचून मरेना का मेली तर.

**रंगराव:**—( त्रासिक स्वरानं ) अग पण दार तर उघड. किती वेळचा थापा मारतों आहें मघापासून.

**चंचला:**—तुम्हाला आतांशा थापा मारायची संवयच झाली आहे. आज काय म्हणे पार्टीच होती. उद्यां काय म्हणे गाणंच होतं, परवां सत्यनारायणच होता अशा निमित्तानं रात्रीच्या रात्री बाहेर काढतां. कांहीं वाटत नाहीं का जिवाला ?

**रंगराव:**—( विशेष त्रासून उचलत्या आवाजांत ) अग पण दार उघड म्हणतों ना आधीं.

**चंचला:**—( आदळ आपट करून दार उघडून दारांतच ) कां, आवाजाची पट्टी चढलीशी ?

**रंगराव:**—तुझ्या तोंडाच्या पट्ट्याशीं निदान सूर तरी मिळाला पाहिजे ना?

**चंचला:**—अस्सं, माझ्या तोंडाचा पट्टा, आणि इकडचं तोंड अगदीं शिवूनच टाकलं असेल नाहीं ? साळसूद ग बाई साळसूद. एक तोंडांत मारली तर दुसरा गाल पुढं कराल नाहीं ? अगदीं धर्मराजाचे नवे अवतारच कीं नाहीं ? ( तो जाऊन इझिचेअरवर हातपाय ताणून हुश्श करीत बसतो. त्याच्याकडे पाहून ) अग बाई भटाला दिली ओसरी नी भट हळूहळू पाय पसरी. तशांतलीच ही गत झाली म्हणायची. तुम्हाला मी चांगलं उठून दार उघडलं तों तुम्ही थेट अगदीं खुर्चीच गांठलीत ? ( तो हुश्श करून घाम पुसतो. ) अग बाई बाई बाई, भारीच श्रम झाले असतील नाहीं ? काय हो झालं इतकं अगदीं हुश्श करून दमायला ? मोटभर धुणं धुतलंत, चार पायली दळण दळलंत, का गाडाभर भांडीं घासलींत ? नुसते ऑफिसचे चार कागद उलथेपालथे करून जर श्रमाचे इतके चोचले करतां तर मग बायकांच्या जन्माला आलां असतां तर काय केलं असतंत.



**रंगराव:**—तुझ्यासारखंच तोंडाची तोफ करून नवऱ्याला त्या तोफेच्या तोंडीं दिलं असतं.

**चंचला:**—अस्सं, एकूण मी तुम्हाला दररोज तोफेच्या तोंडीं देतें तर ! रोजच्या मरणाची संवयच झाली असेल नाहीं ? प्राणिमात्र एकाच मरणाला भितो पण तुम्ही मात्र रोज त्याला तोंड देतां ?

**रंगराव:**—न देऊन कसं भागेल ? जिवंत रहायचं आहे ना मला ?

**चंचला:**—(तोऱ्यानं ) अस्सं, अस्सं. समजतात हो मला हीं असलीं घालून पाडून बोलणीं. पण काय हो, इतका वेळ कुठं गेली होती आपली धिंडका ? कां तिनं सोडलं नाहीं इतका वेळ आपल्याला ?

**रंगराव:**—( आश्चर्यानं ) ती ?

**चंचला:**—( वेडावून ) हो तीच.

**रंगराव:**—ती कोण ?

**चंचला:**—( फणकाऱ्यानं ) तें आतां आपल्या मनाला विचारा. शनिवारची गोल्डन नाइट दिवसाच उरकून घेतलीत वाटतं ?

**रंगराव:**—( शांतपणानें ) हो एका अर्थी तसंही म्हणायला हरकत नाहीं म्हणा. आजचा ' डे ' गोल्डनच.

**चंचला:**—अगदीं उघड उघड सांगतां कीं हो ? जनाची नाहीं तर मेली मनाची तरी असायची होती ?

**रंगराव:**—अग, ती आतां या घरांत राहील कशी ? आपलं लग्न झालं तेव्हांच तिनं काढता पाय घेतला आहे या घरांतून. बरोबर आहे; एका म्यानांत दोन तलवारी कशा रहाणार ?

**चंचला:**—म्हणजे ती या घरांत होती तर पूर्वी ?

**रंगराव:**—अग, नुसती घरांतच काय, पण मी जाईन तिथं नेहमीं माझ्याजवळच असे ती.

चंचलाः—म्हणजे, तिला घेऊन आपण राजरोस नाचत होतां कीं काय ?

रंगरावः—मी तिला अगदीं माझा जीव कीं प्राण समजत होतों. तूं आल्यावर नाइलाजास्तव तिला सोडचिठ्ठी द्यावी लागली मला. अझूनसुद्धां मधून मधून डोकावते ती. पण तुझ्यापुढं यायचा तिला धीरच होत नाहीं.

चंचलाः—( रागानें ) माझ्या देखत आणि या घरांत ये तर खरं म्हणावं घरांत कशी येतेस ती, केरसुणीखालीं न बडवीन तर नांवाची चंचलाच नव्हे.

रंगरावः—आहेस, नांवाप्रमाणं आहेस, बोलशील तसं करशील. आणि म्हणूनच बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाऊलें ही म्हण आपल्या घरांत पदोपदीं लागू पडते आहे.

चंचलाः—( मान उडवून ) पण ती कशांत ? नुसत्या तोंडपाटिलकींत. प्रत्यक्ष वर्तन मात्र अगदीं त्याच्या विरुद्ध. आल्याबरोबर माझ्या ईझिचेअरवर अगदीं सताड आडवे पडलांत. तरी बरं, आणखी तिला घेऊन येऊन माझी शोभा नाहीं केलीत.

रंगरावः—खरोखरच ती शोभा आहे. अग नुसत्या मलाच काय, पण साऱ्या पुरुष जातीला—नव्हे अखिल महिलावृंदाला ती शोभा आहे—तें एक भूषण आहे—तो एक अलंकार आहे.

चंचलाः—अग बाई, इतकी कां ती सुंदर आहे ? अशा पुतळीचं नांव तर कळूं द्या नुसतं ?

रंगरावः—नांव......तें मात्र रोमँटिक नाहीं. अगदीं जुनं पुराणं आहे व म्हणूनच ती आपली जुन्या पुराण्या लोकांनाच धरून असते.

चंचलाः—जुने पुराणे म्हणजे वृद्ध ना ? पण ते आपल्यासारखे रंगेल मात्र पाहिजेत असंच ना अगदीं ?

रंगरावः—एकूण आपल्या मतें मी रंगेल आहें तर ? आज माझ्या रंगराव या नांवानं चीज झालं बुवा.

चंचलाः—आपल्या नांवाचं चीज झालं असेल, पण त्या आपल्या



सुंदर चिजेचं नांव नाहीं कळलं अझून मला. अशी उडवाउडव करून नाहीं हो ऐकायची मी ?

रंगरावः—पण उडवाउडव केली कुणी ? तूं कीं मी ? आपण आल्या बरोबर तिला उडवून लावून वर उडवाउडवीचं पाप माझ्या माथीं ?

चंचलाः—तें कांहीं नाहीं. नांव कळल्याशिवाय मी कांहीं अन्नग्रहण करणार नाहीं आज.

रंगरावः—पण नुसतं पाणीग्रहण तरी ? आपलं चहाचं.

चंचलाः—तें सुद्धां नांव कळल्याशिवाय आधीं नाहीं.

रंगरावः—अस्सं. महायुद्धांतील युद्धाच्या अटी सुद्धां इतक्या खडतर नसतील बुवा. मग काय नांव सांगूं म्हणता ?

चंचलाः—नुसतं सांगता कां ? वाटलं तर उखाण्यांत घ्या कीं ?

रंगरावः—बरं, सांगाल तसं. 'बाबावाक्यं प्रमाणं' चा काळ जाऊन 'शिक्षित पत्नीवाक्यं प्रमाणं' चा काळ आला आहे खरा. काय, उखाणा पाहिजे म्हणता ? ठीक. 'रंगरावाचा विवाह आला चंचलेशीं घडून, आणि त्याच घरभरणीवर लाज गेली तुलामला सोडून'. (हंसतो) कळली का कोण ती ?

चंचलाः—हो कळली बरं. मला नव्हतं माहिती आपण इतके आडवे असाल म्हणून.

रंगरावः—आडवे असाल काय, अद्याप आहें ना खुर्चीवर, आणि त्यानंच तर ही लाज बाहेर काढली. ( हुश्श् करतो )

चंचलाः—अग बाई, पुन्हा हुश्श् ? लाजवंतीचं पुराण सांगून पुराणीकबुवांना थकवा आला वाटतं ?

रंगरावः—अग: नेहमींच्या देवळांतल्या पुराणांत श्रोत्यांना थकवा येतो, इथं पुराणीकबुवांनाच आला झालं. ( हुश्श )

चंचलाः—अग बाई, बरंच दमायचं झालेलं दिसतं. थोडा वारा घालूं का ? ( पंखा शोधते कुठे गेला सांपडत नाहीं. ) कुठंच मेला सांपडत नाहीं.

रंगनाथः—नाहींच सांपडायचा तो. वेळेवर सांपडला तर आम्ही

चंचलाः—म्हणजे, तिला घेऊन आपण राजरोस नाचत होतां कीं काय ?

रंगरावः—मी तिला अगदीं माझा जीव कीं प्राण समजत होतों. तूं आल्यावर नाइलाजास्तव तिला सोडचिठ्ठी द्यावी लागली मला. अझूनसुद्धां मधून मधून डोकावते ती. पण तुझ्यापुढं यायचा तिला धीरच होत नाहीं.

चंचलाः—( रागानें ) माझ्या देखत आणि या घरांत ये तर खरं म्हणावं घरांत कशी येतेस ती, केरसुणीखालीं न बडवीन तर नांवाची चंचलाच नव्हे.

रंगरावः—आहेस, नांवाप्रमाणं आहेस, बोलशील तसं करशील. आणि म्हणूनच बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाऊलें ही म्हण आपल्या घरांत पदोपदीं लागू पडते आहे.

चंचलाः—( मान उडवून ) पण ती कशांत ? नुसत्या तोंडपाटिलकींत. प्रत्यक्ष वर्तन मात्र अगदीं त्याच्या विरुद्ध. आल्याबरोबर माझ्या ईझिचेअरवर अगदीं सताड आडवे पडलांत. तरी बरं, आणखी तिला घेऊन येऊन माझी शोभा नाहीं केलीत.

रंगरावः—खरोखरच ती शोभा आहे. अग नुसत्या मलाच काय, पण साऱ्या पुरुष जातीला—नव्हे अखिल महिलावृंदाला ती शोभा आहे—तें एक भूषण आहे—तो एक अलंकार आहे.

चंचलाः—अग बाई, इतकी कां ती सुंदर आहे ? अशा पुतळीचं नांव तर कळूं द्या नुसतं ?

रंगरावः—नांव......तें मात्र रोमँटिक् नाहीं. अगदीं जुनं पुराणं आहे व म्हणूनच ती आपली जुन्या पुराण्या लोकांनाच धरून असते.

चंचलाः—जुने पुराणे म्हणजे वृद्ध ना ? पण ते आपल्यासारखे रंगेल मात्र पाहिजेत असंच ना अगदीं ?

रंगरावः—एकूण आपल्या मतें मी रंगेल आहें तर ? आज माझ्या रंगराव या नांवाचं चीज झालं बुवा.

चंचलाः—आपल्या नांवाचं चीज झालं असेल, पण त्या आपल्या



सुंदर चिजेचं नांव नाहीं कळलं अझून मला. अशी उडवाउडव करून नाहीं हो ऐकायची मी ?

रंगरावः—पण उडवाउडव केली कुणी ? तूं कीं मी ? आपण आल्याबरोबर तिला उडवून लावून वर उडवाउडवीचं पाप माझ्या माथीं ?

चंचलाः—तें कांहीं नाहीं. नांव कळल्याशिवाय मी कांहीं अन्नग्रहण करणार नाहीं आज.

रंगरावः—पण नुसतं पाणीग्रहण तरी ? आपलं चहाचं.

चंचलाः—तें सुद्धां नांव कळल्याशिवाय आधीं नाहीं.

रंगरावः—अस्सं. महायुद्धांतील युद्धाच्या अटी सुद्धां इतक्या खडतर नसतील बुवा. मग काय नांव सांगूं म्हणता ?

चंचलाः—नुसतं सांगता कां ? वाटलं तर उखाण्यांत घ्या कीं ?

रंगरावः—बरं, सांगाल तसं. 'बाबावाक्यं प्रमाणं' चा काळ जाऊन 'शिक्षित पत्नीवाक्यं प्रमाणं' चा काळ आला आहे खरा. काय, उखाणा पाहिजे म्हणता ? ठीक. 'रंगरावाचा विवाह आला चंचलेशीं घडून, आणि त्याच घरभरणीवर लाज गेली तुलामला सोडून'. ( हंसतो ) कळली का कोण ती ?

चंचलाः—हो कळली बरं. मला नव्हतं माहिती आपण इतके आडवे असाल म्हणून.

रंगरावः—आडवे असाल काय, अद्याप आहें ना खुर्चीवर, आणि त्यानंच तर ही लाज बाहेर काढली. ( हुश्श् करतो )

चंचलाः—अग बाई, पुन्हा हुश्श् ? लाजवंतीचं पुराण सांगून पुराणीकबुवांना थकवा आला वाटतं ?

रंगरावः—अग; नेहमींच्या देवळांतल्या पुराणांत श्रोत्यांना थकवा येतो, इथं पुराणीकबुवांनाच आला झालं. ( हुश्श )

चंचलाः—अग बाई, बरंच दमायचं झालेलं दिसतं. थोडा वारा घालूं का ? ( पंखा शोधते कुठे गेला सांपडत नाहीं. ) कुठंच मेला सांपडत नाहीं.

रंगनाथः—नाहींच सांपडायचा तो. वेळेवर सांपडला तर आम्ही

हिंदू कसचे ? धैर्यधराच्या भामिनीलाही नव्हताच सांपडला तो वेळेवर.

चंचलाः—आहाहाहा, आपण धैर्यधर वाटतं ?

रंगरावः—म्हणजे, शंकाच आहे वाटतं अजुन ? अग, तुझ्या तोंडाला तोंड देण्याचं मी इतका वेळ धैर्य केलं तें का धैर्यधर असल्याशिवाय ? अग नुसता धैर्यधर नव्हे, तर सवाई धैर्यधर आहें. कारण भामिनी कांहीं तुझ्याइतकी फटकळ नव्हती खास.

चंचलाः—या सवाई मापाची अलीकडल्या लोकांनां संवयच लागलेली आहे म्हणायची.

रंगरावः—नाहीं नाहीं, इतिहासप्रसिद्ध राजमान्य चाल आहे ही.

चंचलाः—अहो राजमान्य. उठायचं म्हटलं आतां.

रंगरावः—कां मी आरामखुर्चीवर पडलेला पहावत नाहीं ? जरा आराम करूं दे थोडा वेळ.

चंचलाः—अहो, तुमचा आराम होतो. पण मला राम म्हणायाची पाळी आली आहे ना चहावांचून.

रंगरावः—अरे हो तुझी प्रतिज्ञा विसरलोंच होतों कीं मी.

चंचलाः—नुसती प्रतिज्ञाच काय. पण थोड्यावेळानं तुम्ही मलासुद्धां विसराल. उठा, आधीं चहा करा पाहूं.

रंगरावः—चहा करा पाहूं ? म्हणजे खरोखरच तूं मला चुलींत कोंवणार कीं काय आतां ? अरे बापरे !

चंचलाः—कां इतका अगदीं धोंडासा पडला छातीवर नुसता चहा करायला सांगितला तर ? आम्ही मात्र तुमचीं वाटेल तीं कामं करावींत, आणि नुसतं आज कुठं भोलानाथ आला नाहीं म्हणून......बरं पण मी सांगितलेला डबा तरी आणलात का बिस्किटांचा ?

रंगरावः—डबा......हो आणला आहे.

चंचलाः—कचरतसं उत्तर येतं आहे !

रंगरावः—त्यांत बिस्किटं नाहींत म्हणून.

चंचलाः—बिस्किटं नाहींत त्यांत ? मग जुन्या बाजारांतून रिकामाच डबा आणलात वाटतं ?



रंगरावः—तसा कांहीं अगदींच रिकामा नाहीं तो......पण उघडल्या बरोबर रिकामा होणार आहे.

चंचलाः—म्हणजे, पाहूं तर खरं असला कसला चमत्कारीक डबा आहे तो.

रंगरावः—( ऑफिसमध्यें नेलेला फराळाचा डबा उघडून तिच्यापुढें धरतो. )

चंचलाः—ही काय ही भलतीच थट्टा ? ( म्हणून डबा दूर लोटते' डबा खालीं पडून सांडतो. )

रंगरावः—हें काय ? भूक ना लागली होती तुला ? आणि म्हणून तर उघडल्याबरोबर रिकामा होणारा डबा म्हटलं मी मघाशीं.

चंचलाः—बिस्किटं नाहींत तीं नाहींत आणि वर शिळ्या तुकड्यांचा डबा करता वाटतं माझ्यापुढं ?

रंगरावः—म्हणजे, रोजच्या आमच्या ऑफिसच्या डब्यांत शिळे तुकडेच असतात वाटतं ? आणि तुला मात्र हंटलीपामर्सचीं खुसखुशीत बिस्किटं पाहिजेत. वा खासा न्याय !

चंचलाः—( लडिवाळपणानें ) तें कांहीं नाहीं. मला आतां डबा पाहिजे.

रंगरावः—बरं, जशी राणीसरकारची आज्ञा. ( डबा काढून उघडावयास लागतो )

चंचलाः—आतां यांत काय ? सिगारेट्स् असतील. डबाच सांगतो आहे. ( रागानं ) आणा पाहूं त्या सिगारेट्स् इकडे, जाळूनच टाकते कशा. ( ती डबा हिसकावून घेते. तो झांकण धरतो. डबा उघडतां. तिच्या हातांत डबा व त्याच्या हातांत झांकण राहून दागिने खालीं पडतात. डबा खालीं टाकून आश्चर्यानें ) अग बाई, हें काय ?

रंगरावः—अग ह्या सिगारेट्स् यांच्यावर पुरुषांच्या उड्या पडत नसून बायकांच्या पडतात एवढंच. ( ती दागिने उचलावयास जाते ) अग हात लावूं नकोस, भाजतील बिजतील एकादे.

चंचलाः—भाजूं देत भाजले तर. आम्हां बायकांना हात भाजायची संवयच असते.

रंगराव:—मग संवईच्या हलक्या हातांनीं चहा करणं कांहीं जड नाहीं जायचं.

चंचला:—(लाडानं) हो नाहींच जायचं.

रंगराव:—'उष्णं उष्णेन शाम्यते' याच न्यायानं हाताचा जडपणा या तोड्यांच्या जडपणानं नाहींसा झाला वाटतं? व्हायचाच तो खरोखर चंचले, त्राटिकेला वठणीवर आणायला प्रतापरावानं उगीच आडरानांत शिरून चवदाव्या रत्नाचा प्रभाव दाखवला, त्यापेक्षां भरबाजारांत शिरून अशा रत्नजडित दागिन्यांची प्रभा दाखवली असती तर आजच्याप्रमाणं कसं चुटकीसरसं काम झालं असतं.

चंचला:—म्हणजे, मी त्राटिका आहें वाटतं?

रंगराव:—नाहीं होतीस......उगीच आपलं वाटलं.

चंचला:—(हंसून) तितकं तें असायचंच बायकांच्या अंगीं बोलून चालून बायकाच आम्हीं. बरं पण एक विचारतें. इतके दागिने करायला सवड कशी झाली?

रंगराव:—(हंसून) अग ही लढाई—म्हणजे घरांतली नव्हे, वॉर अलाउन्स मिळाला वॉर अलाउन्स. तें युद्ध तसं मिटलं आणि हें असं मिटलं.

चंचला:—मग आतां पीससेलिब्रेशन.........

रंगराव:—(तिला आलिंगन देऊन चुंबनाकरितां तोंड पुढें नेतांना हें असं साजरं करायचं. (पडदा पडतो.)

नानासाहेब:—(पुढं येऊन) बाळासाहेबाला दिलेले ते खरे ठसउशीत दागिने कुठं तरी पाहिल्याचं आठवतं—नव्हे माझ्या ते पक्के ओळखीचे वाटतात-शंकाच नको. रमाकांताच्या लग्नांत मिच सोनाराकडून आणलेले ते दागिने. या अपटूडेट्नं रमरावांच्या घरांतून वाहणाऱ्या सुवर्णगंगेंत आपला बराच हात धुवून घेतल्यासारखा दिसतो. तरी आंत जाऊन एकदां खात्री करून घ्यावी. उगीच शंका नको, आंत जातो)

अपटूडेट:—(प्र. क.) बसा म्हणावं शंख करीत आतां बाळासाहेबाच्या नावानं आतां कांहीं माझ्या तावडींतून सुटत नाहीं तो.



नानासाहेब:—(प्र. क. स्व.) शंकाच नको. तेच ते. बाळासाहेबाच्या बावळटपणाचा फायदा घेऊन ते हस्तगत तर करून घेतले मी आतां ही दुक्कल माझ्या तावडींतून सुटणं शक्य नाहीं.

अपटूडेट:—(मॅनेजरास) कसं काय मॅनेजरसाहेब, कसा काय उठला सीन?

नानासाहेब:—तें काय सांगावं मि० अपटूडेट्, अगदीं कल्पनातीत उठला. पात्र पण पात्र हुडकून काढलंत बुवा. पुढं मागं स्वतंत्र कंपनी काढलीत तर मात्र विसरूं नका हां या गरीब मॅनेजरला.

अपटूडेट:—माझं ध्येयच आहे नट होण्याचं, आणि त्याला बाळासाहेबाची जोड, आहे का नाहीं माणिक कांचन योग? पण त्यांतले त्यांत तुम्हाला विशेष असं काय आवडलं?

नानासाहेब:—आतां काय सांगावं बुवा? अहो सारंच जिथं उत्कृष्ट तिथं अमूक एक चांगलं असं कसं सांगावं?

अपटूडेट:—तरी पण, तरी पण......

नानासाहेब:—आतां तसंच सांगायचं म्हटलं म्हणजे एक गोष्ट मात्र मला स्ट्राइक् झाली. आणि ती म्हणजे तुमच्या डब्यांतलीं तीं हंटली फामर्सचीं बिस्किटं-त्या सिगारेट्स. कुठून आणलेत बुवा इतके अगदीं एकजात खरे नग?

अपटू०:—अहो कुठून म्हणजे? माझी काय गावांत कमी पत समजलांत काय? (बाळासाहेब अर्धवट वेष उतरलेला असा धावऱ्या घाबऱ्या प्रवेश करतो) शिवाय पहिल्याच प्रसंगीं बाळासाहेबासारख्याला खोटे दागिने घालायला द्यायचे? छट्?

बाळासा०:—कोण माझ्या छातींत धस्स झालं डबा रिकामा पाहिल्याबरोबर; सांगून तर आणायाचेस गृहस्था आणलेस तर?

अपटू०:—(आश्चर्यानं) काय आणले? कोणी आणले?

बाळा०:—आश्चर्यानं गांगरून) म्हणजे तूं नाहींसच का आणलेस दागिने! मग कोणी पळवले कीं काय?

नानासाहेब:—(साश्चर्य) काय, तुमचे दागिने पळवले आणि

रंगराव:—मग संवईच्या हलक्या हातांनीं चहा करणं कांहीं जड नाहीं जायचं.

चंचला:—(लाडानं) हो नाहींच जायचं.

रंगराव:—'उष्णं उष्णेन शाम्यते' याच न्यायानं हाताचा जडपणा या तोड्यांच्या जडपणानं नाहींसा झाला वाटतं? व्हायचाच तो खरोखर चंचले, त्राटिकेला वठणीवर आणायला प्रतापरावानं उगीच आडरानांत शिरून चवदाव्या रत्नाचा प्रभाव दाखवला, त्यापेक्षां भरबाजारांत शिरून अशा रत्नजडित दागिन्यांची प्रभा दाखवली असती तर आजच्याप्रमाणं कसं चुटकीसरसं काम झालं असतं.

चंचला:—म्हणजे, मी त्राटिका आहें वाटतं?

रंगराव:—नाहीं होतीस......उगीच आपलं वाटलं.

चंचला:—(हंसून) तितकं तें असायचंच बायकांच्या अंगीं बोलून चालून बायकाच आम्हीं. बरं पण एक विचारतें. इतके दागिने करायला सवड कशी झाली?

रंगराव:—(हंसून) अग ही लढाई—म्हणजे घरांतली नव्हे, वॉर अलाउन्स मिळाला वॉर अलाउन्स. तें युद्ध तसं मिटलं आणि हें असं मिटलं.

चंचला:—मग आतां पीससेलिब्रेशन.........

रंगराव:—(तिला आलिंगन देऊन चुंबनाकरितां तोंड पुढें नेतांना हें असं साजरं करायचं. (पडदा पडतो.)

नानासाहेब:—(पुढं येऊन) बाळासाहेबाला दिलेले ते खरे ठसउशीत दागिने कुठं तरी पाहिल्याचं आठवतं—नव्हे माझ्या ते पक्के ओळखीचे वाटतात शंकाच नको. रमाकांताच्या लग्नांत मचि सोनाराकडून आणलेले ते दागिने. या अपटूडेटनं रामरावांच्या घरांतून वाहणाऱ्या सुवर्णगंगेंत आपला बराच हात धुवून घेतल्यासारखा दिसतो. तरी आंत जाऊन एकदां खात्री करून घ्यावी. उगीच शंका नको, आंत जातो)

अपटूडेट:—(प्र. क.) बसा म्हणावं शंख करीत आतां बाळासाहेबाच्या नावानं आतां कांहीं माझ्या तावडींतून सुटत नाहीं तो.



नानासाहेब:—(प्र. क. स्व.) शंकाच नको. तेच ते. बाळासाहेबाच्या बावळटपणाचा फायदा घेऊन ते हस्तगत तर करून घेतले मी आतां ही दुक्कल माझ्या तावडींतून सुटणं शक्य नाहीं.

अपटूडेट:—(मॅनेजरास) कसं काय मॅनेजरसाहेब, कसा काय उठला सीन?

नानासाहेब:—तें काय सांगावं मि० अपटूडेट्, अगदीं कल्पनातीत उठला. पात्र पण पात्र हुडकून काढलंत बुवा. पुढं मागं स्वतंत्र कंपनी काढलीत तर माव विसरूं नका हां या गरीब मॅनेजरला.

अपटूडेट:—माझं ध्येयच आहे नट होण्याचं, आणि त्याला बाळासाहेबाची जोड, आहे का नाहीं माणिक कांचन योग? पण त्यांतले त्यांत तुम्हाला विशेष असं काय आवडलं?

नानासाहेब:—आतां काय सांगावं बुवा? अहो सारंच जिथं उत्कृष्ट तिथं अमूक एक चांगलं असं कसं सांगावं?

अपटूडेट:—तरी पण, तरी पण......

नानासाहेब:—आतां तसंच सांगायचं म्हटलं म्हणजे एक गोष्ट मात्र मला स्ट्राइक् झाली. आणि ती म्हणजे तुमच्या डब्यांतलीं तीं हंटली फामर्सचीं बिस्किटं–त्या सिगारेट्स. कुठून आणलेत बुवा इतके अगदीं एकजात खरे नग?

अपटू०:—अहो कुठून म्हणजे? माझी काय गावांत कमी पत समजलांत काय? (बाळासाहेब अर्धवट वेष उतरलेला असा घाबऱ्या घाबऱ्या प्रवेश करतो) शिवाय पहिल्याच प्रसंगीं बाळासाहेबासारख्याला खोटे दागिने घालायला द्यायचे? छत्?

बाळासा०:—कोण माझ्या छातींत धस्स झालं डबा रिकामा पाहिल्याबरोबर; सांगून तर आणायाचेस गृहस्था आणलेस तर?

अपटू०:—(आश्चर्यानं) काय आणले? कोणी आणले?

बाळा०:—आश्चर्यानं गांगरून) म्हणजे तूं नाहींसच का आणलेस दागिने! मग कोणी पळवले कीं काय?

नानासाहेब:—(साश्चर्य) काय, तुमचे दागिने पळवले आणि

तुम्ही कुठं होतां अहो ही कंपनी आहे अठरा प्रकारचीं माणसं इथं असायचीं चला मला तावडतोब शोध लावला पाहिजे. बाकी चोर तसा कबूल होणं शक्य नाहीं. हें पहा वेळ दवडणं चांगलं नाहीं. मी पोलीस चौकीवर जाऊन पोलीस आणतों तोंपर्यंत तुम्ही दारांत बसून रहा. आंतला मांणूस बाहेर कीं बाहेरचा माणूस आंत अगदीं कोणच्याही सबबी-वर सोडायचा नाहीं.

**अपटू०**:—( स्व. )चोरीचा मामला आणि हळू हळू बोंबला. ( उ. ) अहो अहो मॅनेजर साहेब इतकी पोलीस चौकीवर जायची घाई कशाला, केली असेल कोणी थट्टा विट्टा आमची.

**नाना०**:—अहो ही कसली प्राणखाऊ थट्टा मी जाणारच. तुम्हाला काय ? मी पडलों कंपनीचा मॅनेजर. मला उद्यां जगांत वागायचं आहे. ( जातो )

**अपटूडेट**:—अहो अहो करीत त्याच्या मागं जातो )

**बाळा०**:—बारे कंपनी जातो—)

---

## प्रवेश २ रा

[ **स्थळ**:—रमाकांताची खोली. **पात्रें**:—रमाकांत ( साचिंत ) ]

**रमाकांत**:—पत्नी म्हणजे पतीचा दुसरा प्राण असतो असं म्हणतात, माझ्या बाबतींत हें विधान अजिबात खोटें ठरून, पत्नी म्हणजे पतिप्राणाचं हरण करण्याकरतां, दैवाच्या दारुण दुर्विलासानं त्याच्यावर सोडलेला, अचूक नेम साधणारा विषारी बाण आहे हेंच प्रत्यक्ष प्रमाण माझ्या अनुभवाला येत आहे. पत्नी—प्रेम—संसार—आश निराशेच्या झगड्यांत निराशेच्या तीक्ष्ण शस्त्रानें घायाळ होऊन मृत्यु शय्येवर कुजत पडलेल्या आशेचे हे असंबद्ध प्रलाप, उराशीं बाळगून, जीव धरून असणाऱ्या, निराशेच्या हातच्या खेळण्याचा—माझ्या-सारख्या हतभागी जीवाचा उद्धार करण्याचं सामर्थ्य फक्त एका



मृत्यूच्या हातीं आहे. दुःसह दुःख दूर करणारा मृत्यूवांचून दुसरा कोणी मला दिसतच नाहीं. " जगण्यासारखं कांहीं असेल तोंपर्यं-तच मरणांत मौज आहे " ही राष्ट्रशाहीर गडकरी यांची वाणी किती सार्थ आहे ! या कविश्रेष्ठानं, आपल्या एकाच बोलानं, आपलं सारं हृदगत मला—नव्हे साऱ्या जगाला जाहीर केलं आहे. मी यापूर्वींच मरायला पाहिजे होतों; कारण जगण्याजोगं असं माझ्या आयुष्यांत काय राहिलं आहे ? गृहसौख्यावर पडलेला दरोडा- आत्यंतिक निराशा , आणि दारुण मनोभंग, या त्रिदोषानं मला अगदीं आस-न्नमरण केलं आहे. तरी पण अझुन मला मृत्यू कां येत नाहीं ? कां मलाच मृत्यूची भिती वाटते ? आपल्या पतिसुखाचा होम झाल्यावर आपल्या कोमल बालकांचा मोह आवरून, अबला म्हटली जाणारी साध्वी स्त्री पतीच्या शवाबरोबर, स्वतःला जिवंत जाळून घेते; मग मला माझ्या पत्निसुखाचा खून झाल्यावर सुद्धां, स्वतःचा खून करण्याची भिती कां वरं वाटावी ? एकाद्या अबलेपेक्षां का मी नादान आहें ? नादान ! होय रमाकान्ता, तूं नादान नव्हेस तर काय ? प्रेमविषयक उदात्त कल्पनांची आजन्म जोपासना करणाऱ्या मला, या कुटलेच्या प्रेमचेष्टा—नव्हे—प्रत्यक्ष पुरुषाचं आलिंगन पाहून सुद्धां, या दुःखी जीवाला दुःखमुक्त करण्याचा सोपा मार्ग सांपडत नाहीं—कळत असून वळत नाहीं—यापेक्षां आणखी नादानपणा तो कोणता ! भ्रष्ट पावित्र्य, वैवाहिक प्रेमाची विटंबना, आणि पवित्र पातिव्रत्याचा चुराडा, या सर्व दुर्गुणांची खाई मी आतां या पवित्र मृत्यूजलानंच विझवणार ! हीं सारीं अपमानाचीं भुजं, या मृत्यूमंत्राच्या वशीकरणानंच गाडणार ! ( हातांत वस्तरा घेऊन ) हा मंत्र, माझ्या मनोनिग्रहाच्या भात्यांतील एक अमोघ बाण आहे; हें शस्त्र म्हणजे, माझ्या दुःखाला शेवटचा निर्वाणीचा खलिता आहे; हें वीतभर पातं माझ्या सर्व दुःखाचा निःपात करणारं आहे. या महामंत्रानंच मी मृत्यूला प्रसन्न करून घेणार आहें आणि तोच माझ्या सर्व दुःखावर रामबाण उपाय आहे. बा शस्त्रा विश्वासानं जवळ केलेल्या पत्नीप्रमाणं, तूं माझा विश्वासघात करणार नाहींसना !

माझ्या अर्धांगावर ताबा चालवून, तिनं केलेल्या माझ्या विटंबनेवर, माझ्या सर्वांगावर ताबा चालवून, तूंच आतां पांघरुण घाल. तिच्या कपाळावरील कुंकमतिलक. अकालीं पुसला जाऊन, तिचं कपाळ पांढरं फटफटीत होईल, ही भीती न बाळगतां, तिनं माझ्या तोंडाला लावलेली काळोखी पुसून टाकून तूं तें उज्वल कर. फांशीं जाणाऱ्या इसमाची शेवटची इच्छा पुरवितात त्याचप्रमाणं आत्महत्या करणाऱ्या मनुष्याची माझी–माझ्या सर्व दुःखाचा एकाच घावांत शेवट कर ही माझी शेवटची इच्छा तूं पुरव म्हणजे झालं ( मारून घेऊं लागतो इतक्यांत दिवाकर येऊन त्याचा हात धरतो ) कोण हा काळ ! (त्रासून) अरेरे मला स्वस्थपणें मरूं सुद्धां देत नाहींत.

**दिवाकरः**—कसं आणि कां मरूं देणार ? अरे दीडदमडीच्या बायकोसाठीं आपल्याबहुमोल जिवाचं मोल ? फारच जबर किंमत बोवा ही ! अरे तूं पुरुषासारखा पुरुष, त्यांतून शिकलेला, गर्भश्रीमंत' आणि तशांत हिंदू–एक सोडून छप्पन्न पोरी तुझ्यापुढें लोटांगण घालीत येतील. हिंदुस्थानांत ''पॉलिगमी'' ला राजाश्रय जरी नाहीं तरी भक्कम रुढीचा आणि पोक्त शास्त्रांचा आहे. मग असा अविचार कां ? शिक्षणाचं चांगलंच चीज केलंस म्हणायचं ! तुझ्या ठिकाणीं मी जर असतों तर या असल्या बायकोला लाथ मारुन बाहेर काढून, तिच्या उरावर तत्क्षणींच एक सवत आणून नाचविली असती; पण तूं तर तिला रंगढंग चालूं ठेवायला मोकार सोडून, आपण मरून, तिच्या वाटेंतील कांटा आपण होऊन नाहींसा करतो आहेस. प्रत्यक्ष नवऱ्याच्या उरावर जिथं असली थेर करते ती त्याच्या पश्चात तर–पण जाऊंदे. ती कल्पना कशाला ? तुला आतां एकांतांत ठेवणं धोक्याचं आहे. बायकोप्रमाणें तुला ही आतां एखादा कोंडवाडा दाखविला पाहिजे. फरक इतकाच तुझी बायको एकांतांत तर तूं मात्र चारचौघांत—चल (हात धरून नेतो नंतर आत्महत्येचं पत्र उचलतो) दिवाकर प्र. क.या–पत्रावर पत्रं–या दिवाकराच्या भाग्याची अझूनही चढतीकमान आहे त्या लव्हलेटरचा, तसा उपयोग केला आतां या रमाकांताच्या आत्महत्येच्या



कबुलीजबाबाचा, विचार करून वेळ पडल्यास असा उपयोग करावा. दुर्दैवी भोळ्या रमाकान्ता, माझ्या हातांत तुझ्या मरणाचं पत्र नसून प्रत्यक्ष मरणच आहे. माझ्या दयेवरच तुला जगायचं आहे. मानी उषे आतां तूं माझ्या विरुद्ध रमाकान्ताचे कान कितीही फुंकलेस तरी पालथ्या घड्यावर पाणी, कारण रमाकान्ताला आज मी पुनर्जन्म दिला आहे असंच त्याचं मन त्याला साक्ष देणार. पण पुनर्जन्मानंतर मरण हें येणारच असतं तें मात्र माझ्या मर्जीची वाट पाहील. रमाकान्ता, संशयपिशाचानं झपाटल्यामुळें, तूं आपल्या हातांनीं मेला असतास, तर तुझ्यावर असली ही अकृत्रीम स्नेहांकित कृतज्ञतेची छाप बसवून या पत्राचा वाटेल तसा फायदा मला कसा घेतां आला असता ? आणि म्हणूनच मी तुला जगवलं, आजची याची चंचल वृत्ती, वस्तरा पाजळणं, आपल्याशींच वेड्यासारखं मधून मधून पुटपुटणं, ते भलतेच हातवारे, आणि डोळ्यांत चढलेला खून, या गोष्टींवरुन याच्यावर ठेवलेली पाळत अखेर अशी फळाला आली म्हणायची ! खाटकाचा सुरा पाहिला म्हणजे बकऱ्याला आपलं मरण दिसतं असं म्हणतात. पण याच्या हातांतला वस्तरा पाहिल्यावर स्वतः याच्यापेक्षां याचं मरण मलाच दिसलं असं म्हणायला कांहीं हरकत नाहीं आणि पुढेंही काय याच्या मरणानं माझ्याच डोळ्यांनीं याला शोधलं पाहिजे. ( जातो )

---

## प्रवेश तिसरा.

### ( माई, रमाकांत, उषा. )

**माई०**:—उषे तूं काय बोलते आहेस याचा नीट विचार कर.

**उषाः**—मी विचार केला नाहीं असा का तुमचा समज आहे ? मी नेहमी विचार करूनच बोलतें.

**रमाकांतः**—पण उषे या बाबतींत तरी निदान अविचार होतो आहे असं मला वाटतं. तुझ्या आणि दिवाकराच्या दाट परिचयाला प्रीतीचं स्वरूप आलं आहे अशी आमचीच काय पण सर्वांचीच समजूत होती...

**माई०**:—आणि म्हणूनच मी तुम्हां दोघांना इतकी स्वतंत्रता दिली होती. दिवाकरासारख्या सद्गुणी तरुणांशीं तुझं पुढलं आयुष्य सुखांत जाणार या बद्दल मी स्वतःला धन्य समजत होतें पण तुझ्या या आजच्या भाषणानं विरस केला.

**उषाः**—माई तुझा विरस करण्याकरितां नव्हे तर माझ्या संसाराचा विरस टाळण्याकरितां मला हें असें पायरी सोडून बोलावं लागतं आहे.

**माई०**:—तूं बाई शिकलेली मुलगी अखेर आपल्या वळणावर गेलीस. एवढं बरं झालं तरी मी सारखी रात्रंदिवस कानीं कपाळीं ओरडत होतें कीं पोर लहान आहे तोंवर कुठं तरी तिचं जुळवून टाका म्हणून, पण बाय-कांची अक्कल चुलीपुरती असं म्हणून आपण स्वर्गी निघून गेले नी चूल सोडून शाळेंत शिरलेली ही अक्कल आतां मला निस्तरायला ठेविली. यापेक्षां निकडच्या आधीं माझंच कांहीं बरं वाईट झालं असतं तर कसं सोन्या-पेक्षां पिवळं झालं असतं, पण आतां काय त्याचं, म्हणतात ना अडकली गाय नी फटके खाय. पण उपे दिवाकराच्या अंगीं असा तूं कोणचा अवगूण पाहि-लास कीं त्यामुळं तुला आपल्या प्रेमाचा ओघ बदलावा लागला? खरं म्हटलं म्हणजे दिवाकरासारखं स्थळ धुंडून मिळावयाचं नाहीं. त्याची हुषारी, कल्पकता, परोपकार बुद्धी वगैरे गुण नांवाजण्यासारखे आहेत तशांत आपल्यावर त्याचे इतके उपकार आहेत कीं त्याची फेड सालंकृत कन्यादानानं सुद्धां होणार नाहीं. उषे तुझ्या या दादाचे प्राण काल त्यानंच ना वांचविले? तो जर आयत्यावेळीं आला नसता तर वेडेपणानं त्यानें काल आत्महत्या केली असती ना? अशा कुटुंबाच्या निरपेक्ष हित-चिंतकाला, त्या जिवलग मित्राला, आधीं हृद्गत प्रगट करून मग असं झिडकारणं उषे तुझ्यासारख्या शिकल्यासवरल्या मुलीला शोभत नाहीं. तुझ्या या वर्तनानं आमची शोभा व्हावी असं का तुझ्या मनांत आहे?

**उषाः**—माझ्या मनांत काय आहे हें आतां मी तुम्हाला सांगितलं आहे. पण ते तसं कां याचं कारण दादा तूं तरी मला विचारूं नयेस. इतक्या उघड गोष्टी उघड्यांनीं राहिल्यावर दादा तूंच सांग माझा निश्चय वावगा आहे काय!



**रमाकांतः**—बा शशा विश्वासानं जवळ केलेल्या पत्नीप्रमाणं. तूं माझा विश्वासघात करणार नाहींसना ? [पृष्ठ ९३]



**माई॰:**—( स्वगत ) उघड्या डोळ्यांनीं ? उघड्या डोळ्यांनीं हिनं काय बरं पाहिलं ?

**रमाकांत:**—उषे त्या गोष्टीशीं तुझा कांहीं संबंध नाहीं. तुझ्या त्या नादान वहिनीची आणि त्या हलकट भाल्याची तरफदारी करण्यामध्यें तुझा कांहीं तरी गैरसमज झालेलासा दिसतो आहे.

**उषाः**—पण दिसलं तें खरोखरीच झालं असल्यानंतर गैरसमज कसला ? दादा प्रत्यक्ष मी तुझी बहीण डोळ्यांदेखत घडलेल्या गोष्टी सांगत असतां त्याच्यावर तुझा विश्वास बसत नाहीं आणि त्या दिवाकराच्या सांगण्यावर इतका विश्वास बसतो म्हणजे मोठेंच चमत्कारिक आहे. या तुमच्या फाजील विश्वासामुळंच तो इतका शेफारला आहे.

**माई॰:**—उषे तूं मात्र फार शेफारलीस आहेस. कार्टे कुणाला ग अरे तुरे करतेस ? दिवाकराच्या सद्गुणांच्या पासंगाला सुद्धां पुरण्याइतकी तुझी योग्यता नाहीं. जरा कुठं एस फस करायला आलं कीं या पोरी उलट्या गोष्टी शिकवायला लागतात, आणि वाटेल त्या माणसावर असं हवं तसं तोंड टाकायला लागतात. उषे तें कांहीं नाहीं. वागनिश्चयाप्रमाणं आम्हीं पसंत केलेलं स्थळ तुला पत्करलंच पाहिजे. लग्नासारख्या गोष्टींत वडील माणसांना अक्कल शिकवायला आली आहे. पोरीच्या जातीला इतका चवचालपणा शोभत नाहीं.

**उषाः**—पोरीची जात ? म्हणजे गोठ्यात बांधलेली गरीब गाय आहे, कांकीं मालकांनीं वाटेल त्याला विकावी किंवा वाटल्यास कसायाच्या हातांत द्यावी. पोरीनीं असं कोणतं पातक केलं आहे कीं आपल्या जन्माच्या सुखःदुखाचा प्रश्न सुद्धां त्यांना उघडपणें सोडवतां येऊं नये ? आपलं बरं वाईट कळत असून सुद्धां त्यांनीं लोकांच्या हातून पाणी प्यावं. मुलीचा जन्म इतका वाईट आहे काय कीं त्यामुळें ती जन्मल्याबरोबर सरळ नाकं मुरडून वाकडीं व्हावींत, असा तोंड दाबून बुक्यांचा मार खायला ही उषा कांहीं परकरांतली शेंबडी लेंबडी एक अष्टवर्षी नाहीं. मला हिताहित कळतं आहे. आणि म्हणूनच मी तुम्हाला साफ

सांगतें कीं मी दिवाकराशीं लग्न लागून दुःखाचा जन्म घालविण्या-पेक्षां मी आजन्म कुवार राहून जन्मानं दुःख सोसायला तयार आहें.

**माई०**:—तूं तयार आहेस पण आम्हीं तयार नाहीं. दुःखाचा जन्म म्हणे? जशी काय तो तुला तापल्या तव्यावर उभी करणार आहे अगदीं.

**उषा**:—तापला तवा जन्मभर पुरवला पण त्या दिवाकराच्या साव-लींत एक क्षणभर सुद्धां राहायला मी तयार नाहीं. त्याच्या नुसत्या नावानं सुद्धां करपून निघेन.

**माई०**:—अस्सं! इथपर्यंत तुझी मजल गेली आं?

**रमाकान्त**:—(स्वगत) इतकं इचं मन विटायला काय कारण झालं असेल बरं? या रमेचं तर हें कवटाळ नसेल ना? कां दिवाकरच तसा आहे? पण छे.

**माई०**:—रमाकांत ही कार्टी भारीच वेताल झाली आहे. हिला आतां अवसर देतां कामा नये. उद्यां ती माझं अमवयाशींच लग्न करा किंवा त्या मेल्या भाल्याशींच लग्न लावा असा हट्ट धरून बसायची, तें कांहीं नाहीं ठरल्याप्रमाणें हिचं लग्न दिवाकराशींच लागलं पाहिजे. नाहींतर जगांत आपल्याला तोंड काढायला जागा राहाणार नाहीं.

**रमाकान्त**:—ताई तूं या गोष्टीचा आणखी शांतपणं विचार कर. भल-त्याच कामांत असा उतावीळपणा चांगला नाहीं हा लग्नाचा प्रश्न आहे.

**उषा**:—आणि म्हणूनच मीं त्याचा काटेतोलपणानं त्रिवार विचार करून हें माझं मत ठाम ठरवलं आहे.

**माई०**:—आणि मी ही पण म्हणूनच दिवाकराशीं तुझं लग्न ठाम ठर-वलं आहे. मुकाट्यान तुला या लग्नाला कबूल झालं पाहिजे.

**रमाकांत**:—उषे काय आरंभलं आहेस तूं हें? माझ्या संसाराची माती झाली......

**उषा**:—नाहीं दादा, झाली नाहीं तर ती तूं आपल्या संशयानं आणि दिवाकराच्या मदतीनं केलीस; आणि तीच मदत माझ्यावर लादून तुम्ही माझ्याही संसाराची माती करूं पहात अहां.

**माई०**:—काय; काय म्हणते ती कार्टी? कार्टे इतका वेळ तुझं ऐकून



घेतलं पण आतां मात्र थोबाड रंगवून काढीन. बोल आमच्या म्हणण्या-प्रमाणं लग्न करायला तूं तयार आहेस कीं नाहीं?

**उषा**:—नाहीं

**माई०**:—नीट विचार करून बोलते आहेस हें तूं?

**उषा**:—होय.

**माई०**:—पहा बरं.

**उषा**:—पाहिलं माई, एकदां नाहीं दोनदां नाहीं, पण हजारदां मी माझं भविष्य पाहिलं. आणि म्हणूनच मी साफ सांगतें कीं, तुम्ही जरी मला उभी चिरलीत तरी त्या दिवट्या दिवाकराशीं लग्न लावायला मी जिवंतपणीं तयार होणार नाहीं.

**माई**:—तर मग कार्टे तुझ्यासारख्या हटवादी पोरीला उराशीं बाळगून घरांत ठेवायला मी बिलकूल तयार नाहीं. चल चालती हो.........

**उषा**:—ही पहा चाललें! माई ही भिती तूं कुणाला घालतेस? घराच्या बाहेर पडल्यावर या टिचभर पोटाच्या भितीनं मी पुन्हां घरांत येईन असं का तुला वाटतं? पण हें खूब समज कीं शिक्षणाच्या अभावीं हातीं पोळपाट लाटणं घेऊन लोकांचीं भांडीं खरवडण्याची जरी माझ्यावर पाळी आली तरी सुद्धां परत येऊन मी हें लग्नाचं मरण पतकरलं नसतं. (दिवाकर येतो) लग्नाचं मरण पत्करून मेलेलं अन्न खाण्या-पेक्षां अन्नाशिवाय मरण बरं. दादा मी तर चाललेंच पण माझं घर मला पारखं होण्यापूर्वी तुम्हाला पारखं असलेलं तुमचं भविष्य उघड सांगितल्याशिवाय राहावत नाहीं. दादा दिवाकरानं या कुटुंबावर पुष्कळ उपकार केले असतील, पण दिसतं तसं नसतं, आणि म्हणूनच जग फसतं हें लक्षांत ठेऊन दिवाकराशीं तुमचं वर्तन असूं द्या नाहीं तर उद्यां या घरावर काय दुर्धर प्रसंग येतील हें एका परमेश्वराला ठाऊक (जाते.)

**रमाकांत**:—आवेशाच्या भरांत उषेनं जर खरोखर घर सोडलं तर लोक मला काय म्हणतील?

**माई०**:—काय म्हणायचें आहे? अशी अगोचर कार्टी घरांत राहून

सुद्धां अजूनचं दिवे पाजळणार, बाई बाई बाई बाई शर्थ झाली बाई या अलीकडच्या पोरीच्या चटोरपणापुढं.

**रमाकांतः**—छे, छे, कांहीं झालं तरी तिला परत ही फिरविलीच पाहिजे. ( जातो. )

**माई०**:—पाहिलंत ना दिवाकरपंत हें ? होता कां कधीं ऐकिवांत तुमच्या असला प्रकार?

**दिवाकरः**—अहो प्रत्यक्षच जर दिसतो आहे तर ऐकिवांत कशाला ? पण हा अपमान दिवाकर कधींच विसरणार नाहीं. उषा मरणापूर्वी तुला माझ्याशीं लग्नच पतकरावं लागेल.

**माई०**:—अस्संच झालं पाहिजे. या शिवाय या घराची घडी आपल्या मनाजोगी बसणार नाहीं.

( पडदा पडतो )

---

## प्रवेश ४ था.

(**स्थळ**:—रमेची खोली. रमा पोथी वाचीत बसली आहे. रमाकांत हळूच येऊन तिच्या मागें तिला न दिसेल असा उभा राहतो. )

**रमाः**—' पती म्हणजे परमेश्वर ' ( एवढं म्हणून थोडं थांबून पुन्हा तेंच म्हणते व पोथींत खूण म्हणून ठेवलेल्या रमाकांताच्या फोटोला समोर धरून ) होय ना ? पण परमेश्वर-निराकार परमेश्वर भक्तांच्या आळवणीनं साकार होऊन त्यांच्यावर प्रसन्न होतो; मग लग्न झाल्यापासून मी इतक्या विनवण्या करीत असतां माझे ईश्वर माझ्यावर कां बरं प्रसन्न होत नाहींत? माझे ईश्वर साकार असून सुद्धां त्यांना प्रसन्न करून घेण्यासाठीं मी त्यांच्या या कृत्रीम स्वरूपाचं ध्यान करतें तें त्यांना मान्य नाहीं कीं त्या स्वरूपाइतकंच कृत्रीम आहे असं वाटतं ? पण देवा तें तें तसं कृत्रीम नाहीं याची मनोमन साक्ष आपल्याला केव्हांच पटायला पाहिजे होती नव्हे मी म्हणतें ती आपल्याला पटलीही असेल. आणि आपल्याला माझं नुसतं वारंसुद्धां असह्य वाटतं म्हणून आपल्याला सोडून मी आपल्या या तसबिरीचं ध्यान करतें त्यांत अपराध कोणाचा ? माझा



कीं आपला ?.........पण हें काय ? मी कुणीकडे वहावत चाललें ही ? देवांचा अपराध म्हणायला मला काय अधिकार? परमेश्वरा माफ करा... बोलूं नये तें बोललें त्याबद्दल रागावूं नका. अपराध आपला नाहीं अपराध सर्वस्वी माझा आहे. आपल्या पसंतीप्रमाणें मला वागतां येत नाहीं हा अपराध, देवा, माझा आहे. आपण अगदीं निष्कलंक निरपराधी आहां .........पण केवळ त्या राक्ष......पण कुणाच्याही बुद्धीनं आपण बुद्धिभ्रष्ट झालां—माझे देव बुद्धिभ्रष्ट झाले म्हणणं म्हणजे त्यांनां तितका कमीपणा आणणं, त्यांच्यावर फार नाहीं थोडा अपराध शाबीत करणं, त्यांची अप्रत्यक्ष निंदाच करणं नव्हे का ? वेडे पतिदेवाबद्दल—तुझ्या परमेश्वराबद्दल असले निंदाव्यंजक प्रलाप काढण्याचा तुला काय अधिकार ? परवां आपली पायरी सोडून त्यांनां शिणवलेंस, आपल्या देहाचं सोनं होण्याकरितां कां होईना पण त्यांनां भलत्याच शस्त्राचं नांव सुचवून त्यांच्या देहाची माती करण्याचा प्रसंग आणलास तेवढं पुरे नाहीं झालं वाटतं ? दिवाकर कसेही असोत, त्यांनीं तुझे कितीही घोर अपराध केले असोत पण त्या दिवशीं त्यांनां परमेश्वरानं ऐनवेळीं त्यांच्या खोलींत जायची सद्बुद्धि दिली आणि तुझ्या सौभाग्याचं रक्षण करवलं म्हणूनच ना आज तुझ्या कपाळीं हें कपाळभर कुंकूं लावण्याचं भाग्य आलं, नाहीं तर आपल्या अंगावर आपल्याच हातानं केवढा अनर्थ ओढवून घेत होतीस याची कांहीं तुला कल्पना ? कसं तुला पाप लागणार नाहीं आणि कशी तूं आपल्या देवांच्या आदराला पात्र होशील ? प्रभु रामचंद्रानीं लोकांच्या सांगण्यावरून सीतादेवीवर भलताच आरोप ठेवून त्यांनां रानावनांत टाकलं तरी पण रामप्रभूंची निंदा सीतामाईनीं कधीं एका शब्दानं केली नाहीं कीं तिला नुसता क्षणभर आपल्या मनांत थारा दिला नाहीं म्हणूनच ना अखेरीस त्या श्रीरामचंद्राच्या आदराला पात्र होऊन राष्ट्रीय आदिमातेच्या पदवीला पोंचल्या! नाहीं, पतिदेवा, आपला कोणचाही अपराध नाहीं, सर्वस्वी माझा आहे. देवा, मी अजाण आहें, पापी आहें, पण आपली आहें व आपण किती जरी दूर लोटलीत तरी सदैव आपलीच राहाणार; आणि आपली थोरवी, आपलं यश व आपले देवगुण गातगातच केल्या

पापाचं क्षालन करणार. माझा प्राक्तनयोगच तसा त्याला आपण काय करणार ? मला आपण दूर करतां म्हणून आपलं महत्व मी कधींही कमी लेखणार नाहीं. देवी दमयंतीच्या दुर्दैवामुळं नलराजाला तिला झोपेंत सोडून जावं लागलं म्हणून त्यांचं पुण्यश्लोकपद थोडंच नाहींसं झालं ? ज्याचं दैव त्याच्याबरोबर. देवा आपण माझे त्राते, माझे स्वामी, माझे देव आणि मी माझं भाग्य म्हणून आपल्या पवित्र चरणांजवळ परमेश्वरी सूत्रानं आलेली दासी. माझी लायकी नसतांही माझ्या सुदैवानं लाभलेल्या या पदापासून मला दूर करूं नका. आज नाहीं उद्यां आपल्या पदधूलीनं माझ्यावरची पापाची घाण नाहींशी होऊन मी आपल्या कृपेनं निष्पाप होईन तेव्हां मला आपली म्हणा. देवा मी भिकारी आणि आपण दाते आहां माझ्या पदरांत एवढी कृपेची भिक्षा घालून मला पावन करा. देवा, ( हात जोडते ) होईल ना घालून एवढी भिक्षा मला ?

**रमाकांतः**—( अगदीं भडभडून आल्यामुळं तिच्या पायांशीं बसून हुंदका देत ) भिक्षा ! देवी तुझा अधिकार भिक्षा मागायचा नाहीं तर ती घालायचा आहे. आहाहाहा, रमे तुझं खरं स्वरूप......

**रमाः**—माझ्या देवांच्या कृपादर्शनानं उज्वल झालं. नाथ, माझ्या दीनवाण्या हांकेसरशी धांवून येणाऱ्या माझ्या परमेश्वरा, आपली जागा ती नसून ( त्याला उठवून कोचावर बसवते ) ही आहे. त्या जागेवर माझा हक्क आहे ( त्याच्या पायाजवळ बसते. )

**रमाकांतः**—( हुंदका देऊन व तिचे हात धरून तिला उठवीत असतां ) तुझा हक्क आजपर्यंतच्या पायमल्लीमुळं......

**रमाः**—पावन होऊन आपल्या पायाशीं कायमचा खिळला गेला. माझा परमेश्वर आज मला नवसाला पावला, माझं दैव आज उदयाला आलं, नाथ आज आपण मला धन्य केलंत.

**रमाकांतः**—रमे, बदमाष लोकांच्या छद्मी वृत्तीला बळी पडून तुझ्या सौजन्याचा, स्त्रीहृदयाचा, निःस्वार्थी प्रेमाचा आजवर मी अयोग्य फायदा घेतला. आपल्या प्रेमछत्राखालीं तूं मला सावरून धरीत असतांनासुद्धां मी तुला आजपर्यंत सारखी दुःखांत खिचपत ठेवली, एक दिवससुद्धां सुख तर बाजूलाच राहिलं पण सुखाची नुसती सावलीसुद्धां तुला लागूं दिली नाहीं, तुझ्या मनाची, मानाची माती माती करून टाकली; आणि उषेनं जर काल माझ्या डोळ्यांत झणझणीत अंजन घातलं नसतं तर मी तुझ्यावर आणखी कोणत्या तऱ्हेचे अनर्थ गुजरवून गोष्टी कोणच्या थराला नेल्या असत्या तें एक परमेश्वर जाणे. रमे......



**रमाः**—मागच्या आठवणी उकरून काढून नसता जीवाला त्रास करून घेण्यांत काय बरं अर्थ आहे ? झालं गेलं वारलं, परमेश्वरकृपेनं सारं कांहीं मनाजोगं झालं. आतां काय त्याचं ? आतां मागल्या गोष्टीबद्दल एक अक्षरसुद्धां बोलूं द्यायची नाहीं मी.

**रमाकांतः**—पण आजपर्यंत डोक्यांत सांठलेला उकिरडा......

**रमाः**—बदमाषांनीं आपल्या डोक्यांत घर करतांना बरोबर आणला होता, तो त्यांची तिथून हकालपट्टी झाल्याबरोबर ते आपल्या बरोबर घेऊन गेले.

**रमाकांतः**—पण त्याची घाण......

**रमाः**—तीही त्याच उकिरड्याच्या मालकाच्या वजनाखालीं किंचित् कालपर्यंत झांकून गेलेल्या सद्गुणसूर्यकिरणांनीं पार बाहेर घालवून लावली. तिचा आतां मागमूससुद्धां राहिला नाहीं.

**रमाकांतः**—रमे आजवर तुझ्या हृदयावर वेळीं अवेळीं निष्कारण घातलेल्या घावांनीं झालेल्या जखमा......

**रमाः**—त्या साऱ्या आपल्या प्रेमामृतामुळं तिथल्या तिथं अगदीं जागच्याजागीं भरून आल्या.

**रमाकांतः**—जखम भरून आली तरी वण हा रहातोच.

**रमाः**—पण तो केव्हां ? इहलोकच्या साध्या औषधानीं जखम भरून आली तर. स्वर्गीय प्रेमामृतांत जखमेचा वणच काय पण तिची आठवणसुद्धां बुजवून टाकण्याची शक्ती असते. नाथ, माझ्या परमेश्वराच्या या प्रसन्नमुद्रेनं नुसत्या जखमांचीच काय पण माझ्या स्वतःचीसुद्धां आठवण मी पार विसरून गेलें आहे. नाथ आपल्यासारख्या जवाहिऱ्याच्या नकळत संसारसागराच्या तळाशीं खोल खोल रुपून बसलेलं,

आजवर माझ्या दृष्टीला पारखं झालेलं प्रेमाचं माणीक आपण मला आज नजर केलंत. नाथ, हृदयाची हृदयाला ओळख पटली, माझ्या जन्माचं सार्थक झालं, मनींचं कोड पुरलं. नाथ......

**रमाकांतः**—रमे, रोमान्सच्या भडक रंगाच्या नसत्या कल्पनेनं वेढोप होऊन दृष्टी बहिरावल्यामुळं तुझ्या बाहिरंगाची निर्दोष अंतरंगाच्या प्रतिबिंबाची मला पारख झाली नाहीं आणि अंतरंगापर्यंत तर तिला जातांच आलं नाहीं. या माझ्या पापाचं प्रायश्चित्त रमे तुला—मला माझ्या पापापासून परावृत्त करण्यासाठीं अहोरात्र कायावाचामनेंकरून झटणाऱ्या माझ्या सहधर्मचारिणीला असं माझ्या पशुवृत्तीला—राक्षसी वृत्तीला—नीच—नीचतर—नीचतमवृत्तीला बळी पडून भोगावं लागलं! देवी, आजपर्यंत माझ्या संशयी, पापी, गढूळ दृष्टीला या अमोल हिरकणीची पारख न होतां गारगोटी समजून मी तिला माझ्या पायदळीं तुडविली—इतकंच नव्हे तर मला आंधळं करून माझ्यादेखत माझ्या घरांत राजरोस धुडगूस घालणाऱ्या त्या पाजी हरामखोर दिवा......

**रमाः**—हें काय हें असं बरं? काढूं नये म्हणतें ना त्या मागच्या आठवणी, उगाच डोक्याला शीण करून काय बरं हंशील?

**रमाकांतः**—अहाहा, रमा......माझी रमा......

**रमा**—आपली रमा...आपल्या चरणाची दासी रमा. अहाहा नाथ आज आपण या दीन दासीला कांचेची पांच केलीत. नाथ......

**रमाकांतः**—नाहींस, रमे तूं कांच नाहींस. कांच जर असतीस तर पायदळीं तुडवल्याबरोबर तुडवणारालाच जखम करून त्याला आपल्यापुढं हात टेकायला लावले असतेस नाहीं, रमे तूं परप्रकाशित कांच नाहींस तूं स्वयंप्रकाशित हिरकणी आहेस. संशयाच्या गडद अंधकारांत मला माझा अचूक मार्ग दाखवणारी देवता आहेस. रमे तूं मला गुरुच्या ठिकाणीं आहेस.

**रमाः**—भलतंच! असं उलटं कसं होईल?

**रमाकांतः**—रमे हें कलियुग आहे. कलियुगांत सारे व्यवहार उलटेच



व्हायचे हें पुरातन ऋषींचं भविष्यकथन आहे शिवाय तुला गुरु व्हायला मी नालायक आहें.

**रमाः**—असं मी मुळींच बोलूं द्यायची नाहीं.

**रमाकांतः**—तुला शिकवण्यासारखं असं चांगलं ज्ञान माझ्याजवळ काय आहे?

**रमाः**—पुष्कळ आहे. पण शिष्यिण होण्याला मी अपात्र आहें असं वाटल्यावरून माझं शिष्यत्व हिकडून नाकारणं झालं आहे. पण नाथ, लग्नानंतर स्त्रियांचं गुरुदैवत पतीच असतं ना? पतीनं पत्नीचं शिष्यत्व नाकारून भागायचं नाहीं बरं!

**रमाकांतः**—पण त्या घरांतल्या गुरुंची योग्यता गोठ्यांतल्याइतकीच असली तर......

**रमाः**—माझ्या गळ्याची शपथ आहे अँ आतां जर कुणी असं कांहीं आपल्याला बोलून घेतलं तर. मेलं वेड घेऊन पेडगांवाला जाता तरी बरं होतं? तरी बरं कीं आजपर्यंत अहोरात्र मी आपल्याकडून सारखे उपदेशाचे पाठ समजावून घेत आहें.

**रमाकांतः**—कसला उपदेश? अचकट विचकट शिव्यांची लाखोली एकाद्याला विनाकारण कशी वहावी, हक्कांची पायमल्ली कशी करावी आणि हें सारं निमुटपणं सहन करून तोंडाला कुलूपकिल्ली कशी घालावी हाच कीं नाहीं? पण इतके दिवस सारखं शिकत असून आमची शिष्यीण अगदींच कशी तरबेज झाली नाहीं बुवा? नाहीं म्हणायला तोंडाला कुलूपकिल्ली घालायच्या बाबतींत दिसते आहे बरीच प्रगति. कां, याच सदुपयोगत्रयीचे पाठ मिळत आले आहेत ना आपल्याला—आपल्या भाषेंत सांगायचं म्हणून म्हणायचं—आपल्या या गुरूपासून?

**रमाः**—नाहीं, मुळींच नाहीं. आपला अंदाज सपशेल चुकला. माझे गुरु मला कधीं वाईट असं कांहींच शिकवीत नाहींत. अगदीं खराखुरा, नीतितत्वाला अनुसरून सारखा उपदेश करितात. सकाळ दुपार संध्याकाळ वाटेल तेव्हां मला वेळ सांपडला कीं माझे गुरु माझ्यावर उपदेशाचा अनुग्रह करीत असतात.

**रमाकांतः**—मोठं कोडं आहे बुवा हें ?

**रमा**ः—पण कोड्यांतच गोडी असते.

**रमाकांतः**—पण ती केव्हां कोडं उलगडल्यावर. तोंपर्यंत डोकेंफोडच असतें ती ?

**रमाः**—मग गोडीकरितां कोडं उलगडण्याचा प्रयत्न करावा.

**रमाकांतः**—कोडं...उलगडायचं......छे बुवा. नाहीं कांहीं आमच्या ध्यानांत येत......हरलों आम्ही.

**रमाः**—पण काय हरून झालं ? पैजेंत कांहीं तरी पणाला लावावं लागतं काय लावून होतं आहे पणाला इकडून ?

**रमाकांतः**—हें कलियुग आहे हें मी मघाशींच तुला सांगितलं. तेव्हां द्वापारयुगांत धर्मराजानं आपली बायको पणाला लावली होती आज आपण त्याच्या उलट करूं. चला हरलों मी...

**रमाः**—हृदयासकट बरं का पण ?

**रमाकांतः**—अरे वा, हातांत सांपडल्याबरोबर वरींच बंधनं लपेटायला लागलीस की तूं माझ्या भोंवतीं ? बरं बुवा कबूल. 'पण' बोलून दाखवूं का चारचौघांत शब्दशः ? हो उद्यां नाकबूल गेलों तर साक्षीदार...

**रमाः**—इश्श भलतंच! पण पहा बरं, हंसायचं नाहीं हो मला अगदीं.

**रमाकांतः**—जशी राणीसरकारची आज्ञा.

**रमाः**—मग मला सांगायचं एकलव्यानं शस्त्रविद्या कशी बरं संपादन केली ?

**रमाकांतः**—अस्सं अस्सं, पण प्रत्यक्ष हाडामासाचा गुरुच जिथं उपदेश करण्याला नालायक तिथं मातीची गुरुमूर्ती काय उपदेश करणार माती ? बाकी तेवढी देईलही म्हणा तो कदाचित्. शिष्यानं गुरुला संतुष्ट केलं कीं गुरु जवळ काय असेल त्याचा शिष्यावर अनुग्रह करीत असतात. आतां ह्यांच्याजवळ मातीशिवाय दुसरं कांहीं नाहीं तेव्हां आपल्यावर बहाल मर्जी झाल्यावर त्यांच्यापासून माती मिळेल एवढं खरं.

**रमाः**—डोकवायला लागली हो हळू हळू पुन्हा आत्मनिंदा.

**रमाकांतः**—रमे ही आत्मनिंदा तर खरीच; पण पश्चात्तापानं आपोआप फुटून निघालेल्या कबूलीजबाबाच्या स्वरूपांत आत्मनिंदा दीनवाणं गोड रूप धारण करते आणि तिचं तें केविलवाणं स्वरूप आपल्या, अगदीं आपल्या लोकांनां दाखवण्यांत मालकालामुद्धां एकप्रकारचा सुखकर दुःखाचा आनंद उपभोगायला मिळतो......बरं बघूं तर खरं आपली गुरुमूर्ती, शिराळशेटएवढा मोठा धेलाशेट आहे कीं देव्हारांतल्या देवांतला बाळकृष्ण आहे तो ?



**रमाः**—आहेत आपले लहानसरच. पण मघाशीं जें एवढं मातीवर प्रवचन देऊन झालं तें सारं वाया गेलं. माझी गुरुमूर्ती मातीची नाहीं. एकलव्याच्या गोष्टीबरहुकूम तंतोतंत सारं कसं जुळेल ? उपमा नेहमीं एकदेशीय असते नाहीं का ?

**रमाकांतः**—अरे वा, चित्रकलेच्या जोडीला काव्यकलाही यायला लागली म्हणायची आपल्याला ? बरं पण दाखवता ना आपली—आणि अर्थात माझी प्रतिकृति !

**रमाः**—दाखवतें, पण हंसायचं नाहीं हो बिलकुल.

**रमाकांतः**—कबूल.

**रमाः**—ही पाहिलीत माझी गुरुमूर्ति. ( फोटो दाखवते ) ( रमाकांत 'आहाहाहा' करून तिच्याकडे पहात स्तंभित असा उभा रहातो ) कां नाथ, आपण बोलतसे नाहीं. या माझ्या नाथमूर्तीच्या ऐवजीं मी या चित्रांचे पाय धरले म्हणून माझ्या विचित्रपणाचा राग तर नाहीं ना आला ?

**रमाकांतः**—राग, राग,—देवी माझा राग तुझ्या प्रेमांत विरून प्रेमरूप झाला. आहाहाहा ( सचिंत असा उभा रहातो ).

**रमाः**—मग चेहरा असा सचिंत कां ? चिंतेचं मूळ संशय आतां नाहींसा झाला.

**रमाकांतः**—पण संशयाची आठवण अजून बुजली नाहीं. त्या आठवणीनं माझ्या डोळ्यासमोर एक भेसूर चित्र—तुझ्या या दुःखांतल्या सुखदायी चित्राची व तुझी ताटातूट माझ्या हातून झाली असती तर...

**रमाः**—नाथ मी माझ्या हृदयसिंहासनावरील माझ्या पतिराजाचं,

माझ्या गुरुमुर्तीचं अहोरात्र ध्यान करून करून आपण प्रसन्न होईपर्यंत काळ कंठला असता. त्यांत एवढं वाईट काय वाटून घ्यायचं !

**रमाकांतः**—( तिला आलिंगन देऊन ) अहाहाहा, रमे आज आपल्या प्रेमानं तूं मला खालीं पाहायला लावलंस......पुस्तकी रोमान्सनं खुळावलेल्या आपल्याला सुशिक्षित म्हणवून घेणाऱ्या तरुणांनीं पहा, आपल्यामतं नॉन्नरोमँटिक असलेल्या आपल्या आर्य देवतांच्या हृदयांमधे डोकावून पहा आपल्या संसाराची विस्कटलेली घडी त्यांच्या प्रेमळ सहाय्यानं पुन्हा नीट बसवा. आणि स्वतःच्या भडकलेल्या रोमान्सला पाठमोरे होऊन चल रमे—अधुनिक वेड्या रोमान्सपेक्षां गतकालीन आर्यसंस्कृती म्हणजे संसारसुखाचा स्वर्गीय सोपान आहे हें आपल्या कृतीनं आजपासून दाखविण्याची, आपल्या प्रेम परमेश्वराला स्मरून आपण शपथ घेऊं—चल.

---

## प्रवेश ५ वा.

**उषाः**—मानवी स्वभावाचें कृष्णस्वरूप या दिवाकरानं आपल्या कृतीनं मला उघड रीतीनं दाखविल्यामुळं भालचंद्राच्या या पत्राबद्दलही मला शंका येते. दुधानं तोंड पोळलं म्हणजे ताकही फुंकून प्यायची मनुष्याला इच्छा होते तसंच तर नसेल ना हें? कां खरोखर दिवाकराची कारवाई आहे ही ? माझ्या लव्हलेटरचा दिवाकरानें दुरुपयोग केल्यामुळं या पत्राबद्दलची माझी शंका दुणावते. पण काय वाटेल तें होवो जिवाचा धडा करून मी तर त्या बागेंत जाणार.पत्राप्रमाणं खरोखरच जर नानासाहेब आले असले तर दिवाकराला चांगलाच हात दाखवायाला सांपडेल. त्याच्याशीं चतुर्भुज होण्याच्या विचारांत मी जी घाई दाखविली त्याच घाईनं सरकार कडून चतुर्भुज केला पाहिजे ( जाते ) ( पडदा उघडतो— बागेंत भालचंद्र )

**भालचंद्रः**—( जवळ करंडी ) रमाकांताच्या राशीला हा दिवाकराचा ग्रह लागल्यापासून माझे ग्रह फिरुन माझ्या प्रत्येक कृतीचा आजपर्यंत



जसा विपर्यास होत आला तसाच आजच्या या उषेच्या भेटींत होईल कीं काय अशी मला भीती वाटते. पण परमेश्वराला स्मरून करीत, असलेल्या सत्याच्या सेवेंत या नानासाहेबांच्या देण्यानं अखेर माझ्या सेवेचं चीजच होणार.

**उषाः**—खरोखर भालचंद्र आपल्या सेवेचं चीज लौकरच होणार.

**भालचंद्रः**—मागं दोनदां झालं तसंच ना ?

**उषाः**—असं कां म्हणतां आपण ? आपणा सर्वांचे ग्रह आतां पालटायला लागले आहेत.

**भालचंद्रः**—असं म्हणायला नानासाहेबांच्या येण्याचा आधार आहे खरा.

**उषाः**—पण काय हो नानासाहेब आमच्याकडे कसे नाहीं आले ?

**भालचंद्रः**—त्याचें कारण ( कानांत सांगतो ) म्हणून—

**दिवाकरः**—(स्वगत) एकूण माईचा तर्क खरा ठरला आणि या फुलपाखरानं आपल्या प्रीतीचा रंग बदलला तरीच-मगाच्या वल्गनेच्या भराऱ्या. पण पोरी तूं खुब समजून रहा कीं हा दिवाकर उडत्या पाखराची शिकार करण्यांत तरबेज आहे तो तुझे व तुझ्या सुंदर कावळ्याचे पंखच काय पण पायसुद्धां मोडून तुला माझ्या घरांत आणि याला बिनभाड्याच्या घरांत लंगडं करुन ठेवील. माझ्या सांगण्याप्रमाणें अपटूडेटनें याला फराळाची करंडी तर पोंचविली. आतां या भाल्याच्या भालीं कैदखाना ठरलेलाच.

**उषाः**—शिवाय दादाचेंही मन निवळत चाललें आहे इतकेंच नव्हे तर दिवाकराचा पाजीपणा लक्षांत येऊन त्यानं त्याला घरांत येण्याची बंदी सुद्धां केली आहे.

**भालचंद्रः**—काय-दिवाकराला बंदी ? कारण (दोघेही कुजबुजतात)

**दिवाकरः**—( स्वगत ) बंदी दिवाकराला कां हें तुला आतां या ठिकाणींच कळेल.

**उषाः**—पण भालचंद्र ही आपल्या जवळ करंडी कसली ? कुठं गांवाला निघायचं म्हणून ही फराळपाण्याची तयारी आहे वाटतं ?

**भालचंद्र**:—फराळाचें आहे खरें पण हें फराळाचं इथून गांवाला निघालं नसून गावाहून इथं आलं आहे.

**उषा**:—म्हणजे घरची भेट बीट आली आहे वाटतं ?

**दिवाकर**:—( स्वगत ) होय भेटच आली आहे पण ती सध्यां घरची नसून विनभाड्याच्या घरची आहे.

**भालचंद्र**:—होय, घराहून आईनें धाडली आहे ती. वास्तविक पाहतां आम्हा कॉलेजच्या विद्यार्थ्यांनां हातीं पैसे भरपूर असल्यामुळें इथं कांहींच कमी नसतं उलटी चैन असते. पण मातेच्या प्रेमळ हृदयाला आमचे हालच होतात असं वाटतं.

**उषा**:—अहाहाहा ! मातेचें प्रेमळ हृदय पण तेंही या अभागिनीला दुर्दैवानं लाभलं नाहीं.

**भालचंद्र**:—उषाताई तुम्ही असं कां म्हणतां ? माईचं तर तुमच्यावर अलोट प्रेम आहे.

**उषा**:—भालचंद्र आहे असें म्हणण्यापेक्षां होतं असं म्हणा.

**भालचंद्र**:—कां भूतकाल कां ?

**उषा**:—हें दिवाकराचें भूत आमच्या घरांत नांचतं म्हणून.

**भालचंद्र**:—उषाताई, या सलगीबद्दल माफ करा. पण त्या भूता भोंवतीं आपलेंही प्रेम एक वेळीं नाचत होतं.

**उषा**:—होतं खरं पण या सैतानी धांगडधिंग्यांत तें पायदळीं तुडवलं जाऊन मातीला मिळालं. माझ्या आशा साऱ्या जळून खाक झाल्या; आतां जन्मभर निराशेच्या......

**भालचंद्र**:—तिकडे रमाकांत उदासीन, माझी ताई तशी दुःखी आणि तुम्ही या अशा ? काय या सैतानाच्या असुरीलीला ? मानवी पिशाच्यानं झपाटलं म्हणजे नांदतं घर असं बसतं. उषाताई तुम्हाला इतकं निराश व्हायचं काय कारण आहे ? तुम्ही सुशिक्षीत अहा रूपसंपन्न अहा, शिवाय गर्भश्रीमंत अहा. तेव्हां असं पायदळीं पडलेलं तुमचं शुद्ध प्रेम कोणीही तरूण आपल्या मस्तकीं धरण्यांत धन्यता मानील.

**उषा**:—भालचंद्र इतकी कुठं मी भाग्यवान आहें? लोकनिंदेच्या गाळांत



पडून गढूळ झालेलं माझं प्रेम शुद्ध आहे असं कुणाला वाटेल ? त्यांतून मी थोडीशी प्रौढ आणि शिकलेली मग काय विचारतां ? मला पाहिल्या बरोबर लोकांच्या बोटाची खडी ताजीम होऊन लोक मला नाकं मुरडतील. आणि त्यांनीं तरी असं कां करूं नये ? गुत्यांत जाऊन दूध प्यालयाचें कितीही आड्डाहासानं सांगितलं तर तें कुणाला खरं वाटेल काय ?

**भालचंद्र**:—पण उषाताई बाह्यांगावरून अंतरंगाची परीक्षा करणं धोक्याचं आहे हें आपल्याला नाहीं का दिवाकरावरून कळलं ? तसंच ही थिअरी लोकांना पटवून दिली म्हणजे पुष्कळांना जरी नाहीं तरी थोड्यांनां खरं वाटेल. माझेंच उदाहरण पहा माझ्यावर दिवाकरानं दोन बालंटं आणलीं पण तुम्हाला माझं खरं अंतर्गत कळलं म्हणूनच ना तुम्ही इतक्या विश्वासानं माझ्या जवळ आलांत ?

**उषा**:—पण माझं अंतर्गत कळून मला या जगांत विश्वासानं जवळ कोण करणार ?

**भालचंद्र**:—करील, उषाताई,

**उषा**:—( स्वगत ) समदुःखी असल्याशिवाय दुसऱ्याच्या दुःखाची कल्पना येत नाहीं म्हणतात तें खरं असेल का ? ( उघड ) भालचंद्र समजा मी शुद्ध आहे, अंतर्बाह्य शुद्ध आहे असं मी तुम्हालाच सांगितलं तर तें तुम्हाला कितपत खरं वाटेल ?

**भाल०**:—मी निर्दोष आहें हें आपल्याला जितकें खरं वाटतं तितकं शिवाय मनाची शुद्धता शब्दानीं कळत नसते त्याला हृदयांतच डोकावून पाहिलं पाहिजे. उषाताई मी तुमच्या हृदयांत डोकावून पाहिलं तर......

**उषा**:—अजूनही दिवाकराची मूर्ती त्या ठिकाणीं दिसेल असं का तुम्हाला वाटतं ? नाहीं, भालचंद्र त्या ठिकाणीं आतां ती राक्षसी मूर्ती नाहीं. त्याच दिवशीं त्या मूर्तीचे तुकडे तुकडे करून ते पश्चात्तापाच्या अग्नींत फेंकून दिलेले आहेत.

**भालचंद्र**:—मग त्या हृदय सिंहासनावर आतां कोणाची मूर्ती विराजमान झाली आहे ?

**उषाः**—दुसरी कोणती असणार? भालचंद्र दिवाकराच्या प्रेमाच्या काजळानें उजळून निघून स्वच्छ झालेल्या माझ्या आरशासारख्या हृदयांत त्या दिवशीं ज्या पुरुषानें दोन अबलांची अब्रू राखिली त्याच तेजस्वी पुरुषाचं प्रतिबिंब यांत झळकतं आहे.

**भालचंद्रः**—उषे अगदीं खरं ना हें?


**उषाः**—शंका वाटत असल्यास या माझ्या हृदयांत डोकावून पहावं. भालचंद्र, असें माझ्याकडे बघतां काय? या चर्मचक्षूंनीं ती मनोमंदिरांतील मनोहर मूर्ती दिसणार नाहीं. तिला पाहावयाला हे असे हृदयाचे डोळेच उघडले पाहिजेत (आलिंगन देते).

**भालचंद्रः**—आहाहाहा, हा भालचंद्र आजचा हा प्रेमाच्या आयुष्यांतला पहिला दिवस......

**दिवाकरः**—पहिला कीं शेवटला हें आतांच ठरणार आहे. भालचंद्र तुझ्या प्रेमाच्या आयुष्याच्या सुरवाती बरोबरच तुला आयुष्याचें प्रेम सोडावं लागेल. उषे मिठी सोडलीस हें फार बरं केलंस कारण लौकरच या भालचंद्राला नाजूक उषेच्या ऐवजीं कठीण लोहश्रृंखला मिठी मारणार आहेत. या चोराचा पाय तुरुंगांत आहे.

**उषाः**—असं काय तर मग नाहींच सोडीत मिठी. यांचा एकच पाय ..य पण दोन्ही पाय जरी तुरुंगांत गेले तरी ही उषा त्यांनां अशी मिठी मारून त्यांची सहचारिणी होणार आणि तुझे डोळे हे अस्से फोडणार!

**दिवाकरः**—माझे डोळे फोडणार असं म्हणण्यापेक्षां फोडणार होतीस असं म्हणणं जास्त शोभेल. कारण तुझ्यासारख्या हिणकस छान छबेलीला सहचारिणी पदाचा बहुमान देणं म्हणजे पुरुषांनीं स्वतःची डोळेफोड करून घेण्यासारखंच आहे. सहचारिणी! तुझ्यासारख्या चवचाल चटक चांदणीला सहचारिणी हें बहुमोलाचं विशेषण लावणं म्हणजे त्या शब्दाची आणि त्याबरोबरच आर्य स्त्रीपरंपरेची विटंबना करण्यासारखंच आहे. माझ्या सहवासानं तुझ्या मनोदधीमध्यें ज्या प्रेमलहरी उचंबळूं लागल्या त्यांनां आज या भालचंद्राच्या चंद्रदर्शनानें लाटांचं स्वरूप आलं आहे आणि मला वाटतं प्रेमाची आपली ही भरती अशीच एकसारखी



भालचंद्रः—आहाहाहा, हा भालचंद्र आजचा हा प्रेमाच्या आयुष्यांतला पहिला दिवस... [पृष्ठ ११२]

MODERN COLLEGE

वाढत जाऊन त्यांत कामुकतेचं तुफान होऊन आणखी एकाद्या तिसऱ्याच्या उपटसुंभाची खालीनं पुरी फटफजीती होणार. उषे तुझ्या या प्रेमराज्यांतली ही पतिपरंपरा वाढतां वाढतां तुला या कलियुगांत प्रतिद्रौपदीपदावर नेऊन बसवणार खास ? हल्लींच्या काळांत एकाद्या बालविधवेच्या पुनर्विवाहासाठीं समाजांत रणं माजतील पण अशा अविवाहित सुशिक्षित प्रौढ कुमारिकेला द्रौपदीपद अगदीं बिनबोभाट मिळेल. हिंदू समाजांतील प्रत्येक सुशिक्षित कुमारिका जर अधुनिक द्रौपदी बनेल तरच शिक्षणाचा खरा उपयोग ? धन्य तें शिक्षण आणि धन्य त्या आर्यस्त्रिया!

उषाः—दिवाकर, आर्यस्त्री या शब्दाचा नुसता उच्चार करण्याची सुद्धां तुमची पात्रता नाहीं. तुम्ही जन्मानं कदाचित् आर्य असाल पण कृतीनं अनार्य-नव्हे त्याच्याही पलीकडे—मानवकोटीच्याही पलीकडे म्हणजे राक्षस आहांत.

दिवा०:—काय राक्षस !

उषाः—हो हो राक्षस.

दिवाकरः—(स्व.) नाहीं, अजून नाहीं. तुम्हा सर्वांची रक्षा करीन तेव्हांच मी त्या बहुमानाच्या पदवीला पोंचणार आहें.

उषाः—कां, आपल्या चारित्र्याचं सिंहावलोकन चाललं आहे वाटतं ? पण आपल्या पापाचा डोंगर पाहून प्रत्यक्ष सिंहाची छाती सुद्धां दडपून जाईल. दिवाकर, मित्रद्रोह, एका असहाय पतिव्रतेचा छल, सज्जनांशीं निष्कारण वैर, कुमारिकेचा शाप आणि कुटुंबाचा तळतळाट या पापांच्या पंचमहाभूतांच्या बनलेल्या या पुतळ्याला राक्षस ही संज्ञा फिकीच पडते. अशा या पापाच्या पुतळ्याच्या नांवानं लग्नाची पुतळी माझ्या गळ्यांत बांधली गेली नाहीं हें मी माझं भाग्यच समजतें.

दिवाकरः—पण अशा पुतळीबरोबर लग्न करून तुझ्या भाग्याबरोबरच भालचंद्राच्या दुर्भाग्याला सुरवात होते त्याची काय वाट ? भालचंद्र माझ्या पुढं आलेलं हें पंचपक्वान्नाचं उष्टावलेलं ताट मी आपल्याकडे भिरकावतों.

उषाः—उष्ठवलेलं ताट ! दिवाकर, कोणच्या निर्लज्जपणानं आपण हें बोलतां ? आजपर्यंत या उषेला आपला पापी स्पर्श कधींच झालेला नाहीं. मी अगदीं धुतल्या तांदुळाप्रमाणं शुद्ध आहे.

दिवा०:—पण धुतल्या तांदुळांतच पाणी मुरलेलं असतं.

भालचंद्रः—दिवाकर, आपले हे निरर्गल प्रलाप स्वभावजन्य कौटिल्याला अनुसरूनच आहेत. हा मला दिलेला इशारा नसून उषेची निष्कारण बदनामी आहे ! वस्तुस्थिती नसून तिचा विपर्यास आहे ! ! सत्य नसून आपल्याला मिळालेल्या अपयशाचा सूड आहे ! ! !

दिवा०:—पण लोक आपल्या या संबंधाकडे कोणत्या दृष्टीनं पाहतील याचा कांहीं विचार ? लोकापवादाची कांहीं चाड...

उषाः—लोकापवाद ! लोकापवादाला काय म्हणून भीक घालावी ? हे लोक म्हणजे शुद्ध आंधळे असतात—नव्हे आपल्यासारखे अपटुडेट जंट्लमेन् त्यांना आंधळे करितात आणि त्यामुळंच आमच्या सारख्या कुमारींचं सत्शील त्यांना दिसत नाहीं.

भाल०:—आणि तें त्यांना दाखवावं हाच उषेचा पाणिग्रहण करण्यामधें माझा उद्देश आहे.

दिवा०:—पण पाणिग्रहणापूर्वीं लागलेलं तें ग्रहण ?

उषाः—तें केव्हांच सुटलं, त्याची साक्ष या राहूच्या उलख्या वाल्गनाच देत आहेत.

भाल०:—आणि ग्रहण सुटल्यानंतर प्रशांत व निर्दोष चंद्रिकेप्रमाणं हिचा निर्दोष मुखचंद्रही हिच्या पावित्र्याची साक्ष देतो आहे. दिवाकर हिची ही अचल दृष्टी, ही करारी मुद्रा, हें निर्दोष मुखमंडल कोणत्याही सहृदय मनुष्याला हिच्या पावित्र्याची ग्वाहीच देत आहे.

उषाः—आहाहाहा, आज माझ्या जीविताचं सार्थक झालं प्रभु रामचंद्रानं सीतादेवीला जें बहुमानाचं लेणं दिलं नाहीं तें लेणं आज भालचंद्रांनीं आपल्या हातानं माझ्या अंगावर चढवलं आहे.

दिवाः—नव्हे आपल्या सुंस्वरूपाच्या व नकली प्रेमाच्या अभिमानं भालचंद्राला भुरळ पडून त्याच्याकडून तूं जवळ जवळ हें हिरावून घेतलं आहेस. भोळ्या भालचंद्रा हा पावित्र्याच्या सुवर्णाचा पत्रा तूं लाखेवर ठोकतो आहेस याची तुला कल्पना तरी आहे का ? लाखेला झाकू पाहाणाऱ्या सोन्याला अखेरीस आपल्या सद्गुणाला मुकावं लागून—नव्हे आपल्या हातानं त्यांना लाखरूपी लावेच्या घशाखालीं घालून या जगांत हिणकस लाखेप्रमाणं पैशापासरी होण्याचा प्रसंग येतो हें व्यवहारांतील सत्य विसरून तोंडघशी पडूं नकोस.



भाल०:—मी लाखेवर सोनं चढवतों कीं रत्नाभोवतीं कोंदण तयार करतों याची साक्ष आमचीं भावी सुखकर आयुष्यंच जगाला देणार आहेत त्याला तुझ्यासारख्या सूडानं पेटलेल्या कुडमुड्या जोशाची कांहीं जरूरी नाहीं.

उषाः—दिवाकर, माझ्याविषयीं भालचंद्राच्या मनांत विकल्प आणण्याचा वृथा प्रयत्न करायचं सोडून देऊन आपल्या वाटेनं सरळ जाण्यांतच आतां शहाणपणा आहे. आपली शोभा जर टाळायची...

दिवा०:—शोभा शोभा तुझी कीं माझी हें लवकरच समजेल तुला. एकाला प्रेम दाखवून दुसऱ्याचा हात धरून तिसऱ्याच्या घरांत चवथ्याशीं हितगुज करतां करतां पांचव्याच्या धनावर दृष्टी ठेवणारी तुझी ही वृत्ति कुलवधूची किंवा वारवधूची म्हणून जगाकडून तुला जर विचारलं नाहीं तर नांवाचा दिवाकर नाहीं, उषा भालचंद्र तुम्हां दोघांनाहीं वजाऊन सांगतों कीं पुरता विचार करा गाठ कोणाशीं आहे हें लक्षांत घ्या आणि मग पुढचं पाऊल पुढं टाका आट्टहासानं जरी तुम्ही धर्मानं पतिपत्नि झालांत तरी कर्मानं एकमेकांचे हितशत्रूच व्हाल हें पक्कं लक्षांत असूं द्या ( स्व. ) काय करूं रे तळपायाची आग कशी मस्तकाला जाऊन पोचते यानां असं एके ठिकाणी पाहून. अजून अपटूडेट पोलीस घेऊन कसा येत नाहीं.

उषाः—त्या आगीनं तूं मेला पाहिजेस ( पोलीस येतात )

दिवाकरः—हा पहा तो हरामखोर आणि ते दागिने.

भालचंद्रः—दागिने, कुठले दागिने ?

दिवाकरः—माईच्या ट्रंकेतून चोरून आणलेस ते

**उषाः**—हा काय प्रकार ? ( पोलीस झडती घेतात दागिने काढतात अपटूडेट फराळाचें खातो )

**पोलीसः**—अहो खाता काय असे विक्षीप्तासारखे ?

**अपटूडेटः**—अहो न खायला काय झालं हा काय मुद्देमाल आहे थोडाच. मुद्दे मालाला जपायचं.

**पोलीसः**—भालचंद्र हे माईचे दागीने. आपल्याजवळ कसे आले ?

**उषाः**—कसे म्हणजे मी ते यांना दिले

**पोलीसः**—आपण कोण ?

**उषाः**—मी माईची मुलगी आणि हे दागीने मला माईनं दिलेले होते.

**दिवाकरः**—( स्वगत ) घात केला या कार्टीनं ( उघड ) पोलीस माईचें नांव पुढं करून भालचंद्राला पाठीशीं घालण्याकरितां ही कांहीं तरी बात झोंकून देत आहे, हे दागीने भालचंद्रानें चोरून आणले आहेत.

**पोलीस**—माईच्या जबानी शिवाय तुमचा अट्टाहास व्यर्थ आहे.

**दिवाकरः**—ठीक आहे माईची जबानी घ्या पण ह्याला......

**पो॰ जमादारः**—( पोलीसास ) चलारे यांना बरोबर घेऊन-हो तुम्हालाही बरोबर आलं पाहिजे आमच्या.

**दिवाकरः**—अलबत, मी तर बरोबर येणारच चोरी पकडल्याचें श्रेय...

**अपटूडेटः**—काय दिवाकरपंत हा काय गोंधळ ?

**दिवाकरः**—हा सावळागोंधळ

**अपटूडेटः**—अंक तिसरा वाटतं ?

**अंक ३ रा समाप्त.**

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

**स्थळः**—माईसाहेबांचें घर

**माई॰ः**—( स्वगत ) रमाकान्तानं दिवाकराला घरांत येण्याची बंदी कां बरं केली ? दिवाकराचं खरं स्वरुप उषेनें त्याच्या नजरेस आणलंसं दिसतं. माझ्याबद्दल तर त्याचं मन अझून साफ आहे. आणि म्हणूनच माझा डाव अझूनही साधण्याची मला आशा वाटते. तरी पण दिवाकराच्या मदतीशिवाय या बाबतींत मला पुढें पाऊल टाकतां येत नाहीं. आणि दिवाकराला तर ही अशी बंदी. तें कांहीं नाहीं हरप्रयत्नांनीं दिवाकराची बंदी रद्द करून, रमाकान्ताचं वेड वाढवून त्याला माणसांतून उठविला पाहिजे एक, किंवा दिवाकराच्या हट्टी हृदयावर, अपमानानलाची ठिणगी झाडून, त्याच्या घडाडून पेटलेल्या ज्वालेनें रमाकान्ताचा होम करून, त्याला कायमचाच या लोकांतून उठविला पाहिजे एक. या शिवाय तिसरा मार्गच नाहीं. वास्तविक पहातां या नाटकाचा शेवटचा अंक, रमाकान्ताच्या आत्महत्येंतच व्हायचा पण दिवाकराच्या, शिक्षारस संपादन करण्याच्या मुत्सद्देगिरीमुळें त्याला हें असं भलतंच स्वरुप आलें. नाहीं तर एव्हांना मी माझ्या इच्छेप्रमाणें भरतवाक्य संपवून......पण जाऊं दे. ( सर्व येतात ) ......( दिवाकरास ) दिवाकर काय आहे हा प्रकार ?

**दिवाकरः**—( माईस ) माई या प्रकाराचं स्पष्टीकरण......(मधेंच)

**पोलीसः**—दिवाकर, या आपल्या माई वाटतं ?

**दिवाकरः**—होय विचारा यानां आणि घ्या आपली खातरी करून या दागिन्यासंबंधीं. यांचेच हे चोरीला गेलेले दागिने. ( माई-स्वगत दागिने, माझे दागीने आणि चोरी ! हें काय ? ) ( एकीकडे माईस )

भालचंद्राला अडकवायचा या धोरणानं यांच्या प्रश्नांच्या उत्तरांचा रोख असूं द्या.

**पोलीस**:—दिवाकरपंत, आमच्या नियमाप्रमाणं, बाईची जबानी होईपर्यंत, आपण त्यांच्याशीं बोलूं नये. आपल्यासारख्याला हें......

**दिवाकर**:—छे छे मला काय बोलायचं आहे हा पहा मी बाजूला होतों. ( माईस ) जपून ताळमेळ पाहून उत्तरं......नाहींतर हा डाव फसेल ( बाजूला होतो. )

**पोलीस**:—बाई, हे दागीने आपल्या ओळखीचे आहेत का ?

**माई०**:—हो नसायला काय झालं ? हे तर माझेच दागीने !

**पोलीस**:—मग ते यांच्या पाशीं कसें गेले? आपण यानां दिलेत कीं...

**उषा**:—मी मघांशीं सांगितलं ना कीं माईनं नव्हे मी त्यांना दिले म्हणून.

**दिवाकर**:—उषे, पोलीसचा प्रश्न तुला नसून माईला णाहे.

**उषा**:—तें आपण मला सांगायला नको. आपण कांहीं पोलीस प्रॉसिक्यूटर नाहीं.

**पोलीस**:—दिवाकरपंत, असा आमच्या चौकशींत व्यत्यय आणणं बरं नाहीं. बाई तुम्ही ही मध्यें न बोललेलं बरं. ( माईस ) मग हे दागीने चोरीस गेले नव्हते ना ?

**माई०**:—( स्वगत ) ते मी यानां आतां कसं सांगूं हा कांहीं तरी दिवाकराचा पेंच असला पाहिजे.

**पोलीस**:—पण तुम्ही यानां ( उषेकडे ) तरी हे दागीने दिले होते काय ?

**माई०**:—( दिवाकर माईकडे पाहतो, माई गांगरते ) आतां काय सांगूं ? नाहीं म्हणूं? मग माझ्या पोरीवर चोरीचा आळ...( दिवाकर खुणावतो ) काय माझ्या पोरीविरुद्ध पुरावा......आणि माझ्या तोंडून छे तिची अब्रु म्हणजे माझी अब्रु, नाहीं या बाबतींत दिवाकराच्या नेत्रपल्लवीकडे डोळेझांकच केली पाहिजे.

**पोलीस**:—बाईसाहेब असं विचारांत पडण्याचं कांहीं कारण नाहीं.



उलट अशानं आम्हां पोलिसांना संशयाला जागा दिल्यासारखं होतें. आपण आम्हाला घाबरूं नका. खरं असेल तें सांगा.

**माई०**:—होय मीच ते तिला दिले होते.

**दिवाकर**:—पण ते कांहीं याला देण्यासाठीं नव्हे.

**पोलीस**:—पण तो प्रश्न कांहीं तुमचा आमचा नाहीं, या बाईचा आहे. मुलीची ही गोष्ट त्यांना पसंत नसेल तर त्याबद्दल त्या करतील कांहीं निराळी व्यवस्था. दिवाकरपंत येथें आम्हांला आपण व्यर्थ बोलावून आमच्या दुसऱ्या कामांत हरकत आणलीत ती निराळीच.

**दु. पोलीस**:—शिवाय आपण आम्हांला खोटी बातमी दिलीत म्हणून आपल्यावर काम चालवावें असं मला वाटतं. या सभ्य गृहस्थावर असला आरोप आणण्यामध्यें आपला कांही तरी डाव असावा असंच मला वाटतं आपल्यासारख्या सभ्य मनुष्याला असं करणं शोभत नाहीं. ( पहिला पोलीस ) याचं नांव, डाव, ठिकाण लिहून घे पाहूं, ( स्व. ) आपल्या यादींत याचं नांव पाहिजे.

**प. पोलीस**:—दिवाकरसाहेब असं इकडं या. ( दिवाकर त्याला [illegible] देतो. ) पोलीसला बातमी देतांना ती खरी असल्याची खबरदारी घ्या. ( पोलीसला ) चला यांच्या खाजगी भानगडीशीं आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं. ( त्याचा हात दाबतो. ) आपण गुन्ह्यांचे जबाबदार. कांहीं झालं तरी चालेल, पण गुन्हा या सदराखालीं तें आलं नाहीं म्हणजे झालं. बाईसाहेब, या दिवाकरपंतांच्या गैरसमजुतीमुळं आम्हांला आपणांस व या सद्गृहस्थास त्रास द्यावा लागला नाईलाज आहे.

**दु. पोलीस**:—अहो अशा गैरसमजुती होतातच. परवां एकानं कपाटांत चोर दडून बसल्याची बातमी ठाण्यावर आणली; लगेच आम्हीं चार पांचजण हत्यारबंद होऊन तेथें गेलों. आतां कपाट उघडायचं कसं आणि कुणी ? त्या कपाटाला वेढा दिला. आणि दारावर नागव्या तरवारीचा पहारा ठेवून समोर एक पोलीस बंदुक रोखून बसवून कुऱ्हाडीनें दार फोडलें.

उषाः—इतक्या शिताफीनें आरोपी पकडला अं ?

प. पोलीसः—बाईसाहेब, दार मोडून पडल्यावर, तो आरोपी कपाटाच्या वरच्या खणांत दबा धरून बसला होता.

माई०ः—काय वरच्या खणांत ?

दु०पोलीसः—अहो तो एक बोका होता.

सर्वः— एक बोका (हंसतात.)

उषाः—त्या बोक्याला धरायला इतकी जय्यत तयारी ?

प. पोलीसः—आतां पहा. म्हणजे झालं कसा गैरसमज होतो तो बाकी मांजर गुरगुरलें तेव्हां माझ्या हातांतली बंदुक पडली.

दु. पोलीसः—बरं आहे दिवाकरपंत रामराम (जातात.)

उषाः—भालचंद्र ऐकलीतना बोक्याची गोष्ट ?

भालचंद्रः—हो हो तसाच एक बोका, या घरांत मलई खायला सोकावला आहे.

उषाः—अहो तो बोका नव्हे बोके संन्याशी आहे. त्यानेंही आज बडगा पाहिला आहे.

भालचंद्रः—तोच बडगा लवकरच त्याच्या पाठींत बसल्याशिवाय राहणार नाहीं.

उषाः—दिवाकर— आतां तरी खोड्याच्या कपाळीं कुऱ्हाडीचा घाव कसा पडतो याची साक्ष पटली कीं नाहीं ? कां राहिली आहे कांहीं अजून बाकी ? तसं असलं तर पुन्हां प्रयत्न करून पहा म्हणजे, असत्याबरोबर, असत्यवाद्याचाही पुरा कपाळमोक्ष होईल. त्या दिवशीं दादानं इतकी शोभा करून आपल्याला घरांत येण्याचा मज्जाव केला तरी निर्लज्जपणानें आपण आज हा असा तमाशा केलांत अं ? दुसऱ्या एखाद्यानं या घराची सांवली सुद्धां घेतली नसती. पण अशा जातिवंत मुर्दाडाला, आपादमस्तक पापानं न्हालेल्या या पुतळ्याला, समाजाच्या या शनिला, आमच्या घराण्याला पछाडणाऱ्या या समंधाला यम तरी कसा विसरला कोण जाणे ? भालचंद्र,



चला आपण दादालाच इकडे पाठवूं. त्याशिवाय हें पिशाच्च इथून हालणार नाहीं.

भालचंद्रः—दिवाकर, मला फराळाचं पाठविण्यासाठीं, तुला टोपली विकत आणावी लागली असेल पण आतां, सरकारी टोपल्या वाहण्यासाठीं तूला फुकट फराळ मिळावा अशी व्यवस्था करून मी तुझ्या उपकार ऋणांतून मुक्त होणें, माझं कर्तव्य आहे (उ. भा. जातात.)

दिवाकरः—तुम्हां दोघांच्या या वाग्बाणानें माझा अर्धवट निजलेला सूड आतां अगदीं खडबडून जागा झाला हें मी तुमचे उपकारच समजतों. तुमचे वाग्बाण म्हणजे युद्धाचं आव्हान समजून त्याचा मी मोठ्या आनंदानें स्वीकार करतों. माई.........

माई०ः—मला यावेळीं कांहींच सुचत नाहीं. ती कार्टी त्या रमाकान्ताला बोलवायला गेली आहे. तो कदाचित् येईल आणि उगीच डोक्यांत राख घालील.

दिवाकरः—आतां या सर्वांच्या डोक्याची राख रांगोळी केली पाहिजे.

माई०ः—होय तें नुसतं भांडण भांडून होणार नाहीं. तुम्हीं या वेळीं जा आणि संध्याकाळीं हळूच माझ्या खोलींत बागेकडच्या दरवाजानं या म्हणजे आपण नक्की बेत ठरवून यांचा कायमचा निकाल लावूं. त्याशिवाय आतां तुम्हाला न मला सत ना गत. (जातो)

दिवाकरः—(पुढें येऊन स्वगत) जा जिवंत मुर्दाड, घराण्याचा समंध, समाजाचा शनी—उपे, या शेलक्या विशेषणांनीं माझी पूजा बांधतांना, आपण किती अविचार करतां आहांत, याचा परिणाम किती भयंकर होईल, याची, पोरी, तुला जाणीव नाहीं. तुझ्या दादानं मला घरांत येण्याचा मज्जाव केल्याबद्दल त्याला, किती घोर प्रायश्चित मिळणार आहे, याची तुला अंधुक कल्पना जर असती तर आजच्या इतका उद्धटपणा तुझ्या जिभेनं उच्चारणं साफ नाकारलं असतं, माईच्या मातृप्रेमाला अपमान करून तूं भालचंद्राला पाठीशीं घातलंस पण ज्याच्या पाठीशीं पाठ लावून तूं आलीस त्या तुझ्या भावाला आतां कुणाच्या पाठशीं घालणार? सूडानं जळणाऱ्या या दिवाकराला वाक्‌ताडन करतांना, आपण

एकाद्या जातिवंत मुर्दाडाला, मेंग्यामारुतीला, वर्मी घाव घालतों आहोंत असेंच तुला वाटलं असेल. पण वस्तुस्थिती तशी नसून तू एका जातिवंत नागाला दुखावते आहेस हें पक्कं लक्षांत ठेव. सापत्न भावाच्या तेलानें सारखी धडधडत असलेली, माईची दिवटी माझ्या हातांत असतांना, या घराला भडाग्नी द्यायला मला कितीसा उशीर (जातो.)

---

## प्रवेश २ रा

**नानासाहेबः**—(पठाणाच्या वेषांत) योगायोग जुळून यायचा असला. म्हणजे हा असा येतो. कृष्णरावाची कंपनी अनायासानं इथें असल्यामुळें कंपनीच्या व्यवस्थापकाच्या भूमिकेंत अपटुडेट् बाळासाहेबांच्या जोडीला तें तसं हस्तगत करून रमेच्या दागीन्याच्या चोरीच्या जोरावर अपटूडेटच्या नाड्यापुड्या बंद करण्याचं एक साधन हातीं आणून ठेवलें. अपटूडेटनें कोणा पठाणाचे पैसे काढून आपलीं थकलेलीं बिलें भरलीं असें काल सहज त्या हॅाटेलवाल्याच्या बोलण्यांत आलें म्हणून तोच पठाण आपण बनून आज हे पठाणी पेंडे दिवाकराला चारून त्यच्या पोटांत शिरण्याचा डाव टाकला आहे. या दोघां लफंग्यांचीं कारस्थानं मझ्या पोलीस इन्स्पेक्टर स्नेह्याच्या कानावर घालून जरूर पडल्यास वाटेल तेव्हां मदत मिळविण्याची व्यवस्था मी कालच करून ठेवली आहे. आतां त्यांची फारशी भीति नको पण तोंपर्यंत त्यांचे सैतानी डांवपेच आणखी कुठल्या थराला गेले आहेत ते अजमावतां येईल नुसत्या संशयावरून त्यांना नुसती पोलीसची तंबी देऊन भागाणार नाहीं. कांहीं तरी प्रत्यक्ष कृति करतांना गांठून त्याबद्दल त्यांना भरपूर प्रायश्चित्त दिलें पाहिजे. अरे वा बोलतां बोलतां दिवाकराचे मकाण आलें कीं (जातो. पडदा उघडतो)

**दिवाकरः**—(बसलेला) परवां ऐन आत्महत्या करीत असतांना रमाकांताचा हात धरण्यामध्यें माझ्या हातून थोडा अविचारच झाला म्हणायचा. माझी मुत्सद्देगिरीची घमेंडच भोंवली ही मला. नाहीं तर आतां हें रमाकांताच्या खुनाचं सव्यासव्य करण्याचं कांहींच प्रयोजन



नव्हतं-सहजासहजीं घडून येणाऱ्या गोष्टीचं मी माझ्या हातानं असं हें भांगडं करून ठेविलं.

**पठाणः**—(प्रवेश करून) सलाम अलेकम, आपलंच नांव दिवाकरपंत नाहीं ?

**दिवाकरः**—(स्व॰) हे कोण हे दढीखां ? चेहऱ्यावरून तर पक्के इब्लिस, दांडगे दरोडेखोर, अगदीं अस्सल गळेकापू गनीम दिसताहेत राजेश्री. (उ.) कोण आपण ?

**पठाणः**—मी एक पठाण आहें.

**दिवाकरः**—पठाण आणि माझ्याकडे ?

**पठाणः**—होय, आपली आणि अपटूडेट या नांवाच्या इसमाची दोस्ती आहेना ?

**दिवाकरः**—बरं असेल, त्याच्याशीं तुला काय करायचं आहे ?

**पठाणः**—मला काय करायचं आहे ? साहेब त्या तुमच्या दोस्ताकडून माझे बरेचसे पैसे येणं आहे.

**पठाणः**—बरं असतील. पण त्यांच्याशीं माझा काय संबंध ? त्याच्याकडून वसूल करून घे जा.

**पठाणः**—तें रास्त आहे साहेब. पण आपण त्यांचे जिगरदोस्त, आपल्या जोरावर तो आज माझे पैसे नाकारतो आहे. साहेब त्याला चार समजुतीच्या गोष्टी सांगून माझे पैसे चुंबीत आणून द्यायला सांगा

**दिवाकरः**—फार अधिकाराच्या दरडावणीनं दाबूं पहाता हो मला? अशा दरडावणीला भीक घालून कशी तरी तुमची ब्याद टाळण्याकरितां मी माझ्या तिजोरींतून याचं देणं वारीन असं का आपल्याला वाटतं ? माझी तिजोरी भरभक्कम भरलेली असली तरी ती असले लोकांचे भूर्दंड भरायला नाहीं आणि आधीं मी तुम्हाला असं विचारतों कीं असल्या ओळखीच्या ना पाळखीच्या उनाड पोराला तुम्ही काय पाहून पैसे कर्जाऊ दिलेत हो ?

**पठाणः**—काय पाहून ? त्याची पत पाहून. आज दोन वर्षें तो आमच्याकडून पैसे उसने नेतो.

दिवाकरः—( स्व. ) आणि फोर्जरी चोऱ्यामाऱ्या करून ते, परत करतो; तरीच म्हटलं हा यःकश्चित भटुर्ग्याचा पोरगा इतका अपटूडेट् कसा रहातो ? आतां समजलें. फॅशनचे चोचले पुरविण्याकरितां यांचे पैसे काढायचे व त्या फॅशनच्याच जोरावर कुठं तरी राजरोस डल्ला मारून त्यांची भरपाई करायची वारे लाटेगंगाराम कुळ आणि त्यांचे पठाणी सावकार ? ( उ- ) पण समजा त्याच्या पतीचं आतां दिवाळं निघालं असलं तर ! काय घेणार हो त्या दिवाळखोराचं आतां आपण ?

पठाणः—काय घेणार ? पैसे घेणार माझे.

दिवाकरः—आणि नाहीं मिळाले तर ?

पठाणः—नाहीं मिळाले तर ( सुरा काढून दाखवतो ) हें पठाणी कायद्याचं कलम लागू करणार.

दिवा०:—काय जीव घेणार ?

पठाणः—कां यांत आपल्याला आश्चर्य काय वाटलं एवढं ? अहो बेदम मारून हड्डी नरम करीन किंवा ठार करून टाकीन त्याचा कुणाला पत्तासुद्धां लागू देणार नाहीं.

दिवाकरः—कायदा, पोलीस ह्याची कांहीं कदर आहे कीं नाहीं आपल्याला ?

पठाणः—कायदा ? कायदा कागदांत. अहो मानला तर कायदा; पोलीसला हें कळतंच कशाला आधीं, आणि कळलं तरी बाहेर येतं कशाला ? प्राण घेतांना गळ्यावर गच्च धरलेला हात अमलदाराच्या खिशांत जरा सैल सोडला म्हणजे झालं. अहो खून जिरवण्याची ही नेहमींची रीतच आहे.

दिवाः—खून करण्यापेक्षां जिरवण्याची विशेष कारवाई आहे खरी.

पठाणः—साहेब खून करणं आणि तें जिरवणं हा तर माझ्या हातचा नुसता मळ आहे.

दिवा०:—( स्वगत ) याची दृष्टीही म्हणा तेंच सांगते आहे. असला अट्टल खुनी आयताच आपल्या पायांनीं घरीं चालत आला म्हणायचा ! टाकावेत अपटूडेटचे पैसे चुकते करून आणि रमाकांताच्या नरडीला



द्यावा ह्याचाच हात. पण पैसे मात्र जबर मोजावे लागतील.

पठाण—अहवत खून जिरविण्यासाठीं ओतावा लागलेला पैसा पुन्हां खून करूनच मिळवावा लागतो. कां बोलतसे नाहीं साहेब ? शंका येते कीं काय ? प्रचीती दाखवूं ? बोला कोणाचं शीर कापून आपल्यापुढं हजर करूं आतांचे आतां ? हं पण याच्याबद्दल पैसे मिळाले पाहिजेत हो आधीं. पैशाशिवाय एक पाऊल उचलायचें नाहीं आम्हीं.

दिवाकरः—( स्व. ) जागच्या जागीं बसून सोळा आणे काम व्हायचा रंग दिसतो आहे. याला म्हणतात नशिबाची रेघ......... पैसे मात्र जबर मोजावे लागतील.

पठाणः—साहेब, माफ करा, पण आपल्या चेहऱ्यावरून पाहतां आपल्याला सुद्धां माझी गरज आहेशी दिसते. तसं असेल तर सांगा पण पैसा पाहिजे. पैसा भरपूर तर काम पुरेपूर.

दिवाकरः—पैशाचं कायहो काम मनाजोगं झाल्यावर.

पठाणः—कामाचं काय हो पैसे मनाजोगं मिळाल्यावर. बोला ( कान पुढं करतो. तो सांगत असतांना) ( स्वगत ) अरे हरामखोरा, पुरा सांपडलास माझ्या तावडींत. ( दाढीवरून हात फिरवीत ) जिते रहो बेटी, अबीतख तेरा काम है. ( उ. ) हात्तिच्या एवढंच. अहो यांत तर कांहींच नाहीं. वेळ ठरवून घर पहायला या, घर पसंत पडलं कीं ती वेळ सांगून ठेवा कीं काम फत्ते.

दिवाकर( कानांत ) अशी बतावणी करायची त्याला तिथं आणतांना.

पठाणः—ती तुम्ही कशीही कराहो. एकदां आंत आणून घाला कीं केलाच गारद म्हणून समजा. ( हातानं पांच बोटं दाखवून ) इतके हजार घेईन. बँकेचा चेक पाहिजे. कामानंतरच्या तारखेचा दिला तरी चालेल. पण तो आतां आणि तोही इतक्या हजारांचा.

दिवाकरः—काय करावं ? चेक द्यावा कीं न द्यावा ? खरोखर अडला नारायण गाढवाचे पाय धरी. द्यावा झालं पुढच्या तारखेचा चेक. नच झालं काम तर जाऊन कॅन्सल केला. ( चेक देतो )

हा चेक, पण मी येईन तेव्हां आपण घरीं राहिलं पाहिजे अं. नाहींतर जाल बाहेर.

**पठाण**:—छे, छे, साहेब ( स्व. ) मी तर बाहेर जाणारच नाहीं पण आपण तरी सरळ बाहेर जाल कीं नाहीं याची शंकाच आहे. ( उ. ) ये बुढेकी और आपकी मुलाखत हूये हम् हर्दम किस्मतकी रोहान समजतां हूं ! सलाम ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश तिसरा.

**बाळासा**०:—दुधानं तोंड पोळलं म्हणजे ताकसुद्धां फुंकून पितात. पण माझ्या बाबतींत मात्र या माझ्या पोळलेल्या तोंडाला दुधाकडेच धांव घ्यायचा प्रसंग आला आहे. हॉटेलबिलाकरितां केलेल्या परवांच्या चोरीची धोंड अपटूडेटच्या मध्यस्थीनं भालचंद्राच्या गळ्यांत बांधतां आली. पण आज कसं करावं ? या कंपनीनं आम्हाला पहिल्याच प्रवेशांत हात दाखवल्यामुळं हिच्याशीं होणारा संबंध सोडून आतां दुसऱ्या कंपनीमध्यें प्रवेश केला पाहिजे. पण असली संपन्न कंपनी तरी कुठली शोधून काढावी ? नाहींतर नाटकाची हौस पुरतांपुरतां आमच्या हौसेचेंच नाटक व्हायचं ! कुठली तरी कंगाल प्रासादिक नशिबीं आली कीं, त्या कंपनीच्या अर्धपोटीं मुर्दांबरोबर आमचीही उपासमार होऊन मरायची पाळी यायची. आजकाल नाटक कंपन्या म्हणजे दरिद्री देणेकऱ्यांची दावण ! म्हणून एकादी चांगलीशी कंपनी मिळून आपलं बस्तान उत्तम तऱ्हेनें बसेपर्यंत आपल्याला आपली अशी कांहीं शिल्लक जवळ पाहिजे. आणि ती शिल्लक घरांतल्या शिलकेंतूनच ओढली पाहिजे. त्या दिवशीं अपटूडेटनं आणलेल्या किल्लया या मुंबईच्या सोनेरी टोळींतून आणल्या कीं काय कोण जाणे. अमूक एका कुलपाला यांतली एकादी किल्ली लागत नाहीं असं नाहींच मुळीं. ( किल्लयांचा झुबका वाजतो. पावलं वाजतात. ) आं, पावलांचा आवाज ? इथंही आमचं कमनशीब आडवं येतसं दिसतं. कोण



माई, दिवाकर इकडेच येताहेत. ते मला आंत कां आलास म्हणून विचारतील पण मी आतां बाहेर कसा जाऊं म्हणून कोणाला विचारूं? अरे बापरे आलेच वाटतं ( पलंगाखालीं लपतो. )

( माई० व दिवाकर प्रवेश करतात. )

**माई**०:—तरी मला भीती वाटलीच होती कीं तुमची ती त्या दिवशींची मुत्सद्देगिरी आपल्या अंगावर शेकणार म्हणून. त्या दिवशीं जर त्याला सुखानं आत्महत्या करूं दिली असतीत तर आज हा असा पश्चाताप कशाला करावा लागला असता ?

**दिवाकर**:—पश्चाताप ! कसला पश्चाताप ? आजपर्यंतच्या उभ्या आयुष्यांत काळा कीं गोरा तो अझून मला माहीत नाहीं आणि यापुढेंही या दिवाकराला पश्चातापाचं दर्शन होणं नाहीं. माई जातिवंत कारस्थानाच्या मार्गांत पश्चातापाच्या पापाला आडवं पडण्याचा धीरच होत नाहीं.

**माई**०:—पण मग आतां हा डाव फसला.........

**दिवाकर**:—डाव टाकला तो फसला म्हणून काय झालं ? चढतो तोच पडतो, पण पडल्यावर पडल्याजागीं तोंड वासून पडणं किंवा दुप्पट जोरानं उठून उसळीसरशीं शेंड्याला हात घालणं हें पडणाऱ्याच्या कुवतीवर अवलंबून असतं.

**माई**०:—पण आतां याला तोड ?

**दिवा**०:—याला रमाकांताची मान तोडण्याशिवाय आणि ती आजच तोडण्याशिवाय दुसरी तोड नाहीं.

**माई**:—पण हें व्हावं कसं आजच्या आज ?

**दिवा**०:—माई हे निराशेचे उद्गार तुमच्याच का तोंडून निघतात ? या डॉक्टर शेजारीं ऑपरेशनच्या वेळेला नर्स म्हणून उभ्या राहाणाऱ्या माई त्या आपणच का ? बाळासाहेबांचं बस्तान नीट बसवण्यासाठीं रमाकांताचें प्रस्थान कायमचं या जगांतून हलवण्याची भिष्मप्रतिज्ञा करणाऱ्या माई त्या आपणच ना ?

**माई**०:—दिवाकर तें सारं खरं पण परवांच्या अनपेक्षित समारोपानं

हा चेक, पण मी येईन तेव्हां आपण घरीं राहिलं पाहिजे अँ. नाहींतर जाल बाहेर.

**पठाणः**—छे, छे, साहेब ( स्व. ) मी तर बाहेर जाणारच नाहीं पण आपण तरी सरळ बाहेर जाल कीं नाहीं याची शंकाच आहे. ( उ. ) ये बुढेकी और आपकी मुलाखत हूये हम् हर्दम किस्मतकी रोहान समजतां हूं ! सलाम ( पडदा पडतो. )

---

## प्रवेश तिसरा.

**बाळासा०**:—दुधानं तोंड पोळलं म्हणजे ताकसुद्धां फुंकून पितात. पण माझ्या बाबतींत मात्र या माझ्या पोळलेल्या तोंडाला दुधाकडेच धांव घ्यायचा प्रसंग आला आहे. हॉटेलबिलाकरितां केलेल्या परवांच्या चोरीची धोंड अपटूडेटच्या मध्यस्थीनं भालचंद्राच्या गळ्यांत बांधतां आली. पण आज कसं करावं ? या कंपनीनं आम्हाला पहिल्याच प्रवेशांत हात दाखवल्यामुळं हिच्याशीं होणारा संबंध सोडून आतां दुसऱ्या कंपनीमध्यें प्रवेश केला पाहिजे. पण असली संपन्न कंपनी तरी कुठली शोधून काढावी ? नाहींतर नाटकाची हौस पुरतांपुरतां आमच्या हौसेचेंच नाटक व्हायचं ! कुठली तरी कंगाल प्रासादिक नशिबीं आली कीं, त्या कंपनीच्या अर्धपोटीं मुर्द्यांबरोबर आमचीही उपासमार होऊन मरायची पाळी यायची. आजकाल नाटक कंपन्या म्हणजे दरिद्री देणेकऱ्यांची दावण ! म्हणून एकादी चांगलीशी कंपनी मिळून आपलं बस्तान उत्तम तऱ्हेनें बसेपर्यंत आपल्याला आपली अशी कांहीं शिल्लक जवळ पाहिजे. आणि ती शिल्लक घरांतल्या शिलकेंतूनच ओढली पाहिजे. त्या दिवशीं अपटूडेटनं आणलेल्या किल्लया या मुंबईच्या सोनेरी टोळींतून आणल्या कीं काय कोण जाणे. अमूक एका कुलपाला यांतली एकादी किल्ली लागत नाहीं असं नाहींच मुळीं. ( किल्लयांचा झुबका वाजतो. पावलं वाजतात. ) आं, पावलांचा आवाज ? इथंही आमचं कमनशीब आडवं येतसं दिसतं. कोण



माई, दिवाकर इकडेच येताहेत. ते मला आंत कां आलास म्हणून विचारतील पण मी आतां बाहेर कसा जाऊं म्हणून कोणाला विचारूं? अरे बापरे आलेच वाटतं ( पलंगाखालीं लपतो. )

( माई० व दिवाकर प्रवेश करतात. )

**माई०**:—तरी मला भीती वाटलीच होती कीं तुमची ती त्या दिवशींची मुत्सद्देगिरी आपल्या अंगावर शेकणार म्हणून. त्या दिवशीं जर त्याला सुखानं आत्महत्या करूं दिली असतीत तर आज हा असा पश्चाताप कशाला करावा लागला असता ?

**दिवाकरः**—पश्चाताप ! कसला पश्चाताप ? आजपर्यंतच्या उभ्या आयुष्यांत काळा कीं गोरा तो अजून मला माहीत नाहीं आणि यापुढेंही या दिवाकराला पश्चातापाचं दर्शन होणं नाहीं. माई जातिवंत कारस्थानाच्या मार्गांत पश्चातापाच्या पापाला आडवं पडण्याचा धीरच होत नाहीं.

**माई०**:—पण मग आतां हा डाव फसला.........

**दिवाकरः**—डाव टाकला तो फसला म्हणून काय झालं ? चढतो तोच पडतो, पण पडल्यावर पडल्याजागीं तोंड वासून पडणं किंवा दुप्पट जोरानं उठून उसळीसरशीं शेंड्याला हात घालणं हें पडणाऱ्याच्या कुवतीवर अवलंबून असतं.

**माई०**:—पण आतां याला तोड ?

**दिवा०**:—याला रमाकांताची मान तोडण्याशिवाय आणि ती आजच तोडण्याशिवाय दुसरी तोड नाहीं.

**माईः**—पण हें व्हावं कसं आजच्या आज ?

**दिवा०**:—माई हे निराशेचे उद्गार तुमच्याच का तोंडून निघतात ? या डॉक्टर शेजारीं ऑपरेशनच्या वेळेला नर्स म्हणून उभ्या राहाणाऱ्या माई त्या आपणच का ? बाळासाहेबाचं बस्तान नीट बसवण्यासाठीं रमाकांताचं प्रस्थान कायमचं या जगांतून हलवण्याची भीष्मप्रतिज्ञा करणाऱ्या माई त्या ह्याच ना ?

**माई०**:—दिवाकर तें सारं खरं पण परवांच्या अनपेक्षित समारोपानं—

MODERN COLLEGE

भालचंद्राची रमाकांतानं क्षमा मागितल्यापासून--मन कसं अगदीं गांगरून गेलं आहे. पुष्कळ जिवाचा धडा करतें पण......

दिवाकरः—आपल्या पहिल्या पणाच्या पूर्तीत हा अपशकुनी पण जर आडवा येत असेल तर तुमचं तें कुटुंब जाणे आणि माई तुम्ही जाणे. हा पहा मी चाललों कसा. पण एवढं मात्र लक्षांत ठेवा कीं सौख्यसोपानाच्या शेवटल्या पायरीपर्यंत सान्या पायऱ्या सुरळीतपणं चढून गेल्यावर एकच शेवटली एकच-महत्वाची एकच पायरी चढून जायच्या वेळचा हा तुमचा अवसानघातकीपणा तुम्हाला तुमच्या बरोबरच उषाबाळासाहेबांना जन्माचा भोवेल. उषा आज हव्या इतक्या आनंदातिशयानं आपल्या दादावहिनी भोवतीं पिंगा घालीत असली तरी लौकरच तिला आपल्या आईच्या नावानं खडे फोडायची पाळी येणार. तुमच्या बाळासाहेबाची अक्कल तर तुम्हाला माहितीच आहे. त्याच्या कपाळीं रमेची पोरं संभाळपणं, त्याचं गूमूत काढणं इत्यादि महत्वाचीं कामं येऊन त्याला रोजचे दोन्ही वेळचे शिळे तुकडे आईनं काढलेल्या अश्रूबरोबरच खावे लागणार आणि माई, आपली तर दैना विचारूंच नका. सासूचं दोन दिवसाचं राज्य संपल्यानंतरच्या—माई तुमचा पूर्वेतिहास डोळ्यापुढं आणा, रमेशीं आजपर्यंत आपलं वर्तन कसं होतं याचं सिंहावलोकन करा, आणि आपला नादानपणा कबूल करून नव्हे जाहीर करून आपला अधिकार आपल्या हातानं दुसऱ्याच्या-रमेसारख्या हाडवैरी सावत्रसुनेच्या स्वाधीन केल्यावरच्या आपल्या गुलामगिरींतल्या आयुष्यक्रमाचा चित्रपट डोळ्यासमोर म्हणजे सुनेच्या राज्यांत आपली कशी काय बरदास्त रहाणार आहे याची आपल्याला जाणीव होईल. माई अजुन धीर न सोडतां नेटानं इच्छित कार्य तडीस नेण्याचा विडा उचला अजूनसुद्धां-पुष्कळ-नव्हे तुमच्या मनाप्रमाणं अगदीं सारं कांहीं यथास्थित रीतीनं पार पडण्याचा संभव आहे—नव्हे अगदीं खात्री आहे.

माई०:—दिवाकर, मला का हें कळत नाहीं का ? पण मन मेलं धीरच धरीत नाहीं.

दिवा०:—पुन्हा हा अपशकुनी पण ? जाऊंद्या झालं. ज्याची त्याला



आंच नाहीं तिथं माझ्यासारख्या तिऱ्हाइतानं कंबर कसण्यांत काय अर्थ आहे ? रडत राऊताला घोड्यावर बसवला म्हणजे तो आपलं नाक कापून घेऊन दुसऱ्याला अपशकून करायचा. ठीक आहे माई' घेतों मी रजा. फुकट आपल्या नादीं लागून काळाचा अपव्यय केला मी ! शिवाय वर लोकांकडून हंसं, उपहास व अपमान करून घेतला तो वेगळाच. नाहींतर रमाकांताकडून आणि भालचंद्राकडून वाईटपणा घ्यायचं काय कारण होतं मला ? पण मीच मूर्ख. बायकांची जात अवसानघातकी हें माहिती असूनसुद्धा इतके दिवस मी एका बाईच्या ओंजळीनं पाणी प्यालों...बरं आहे जातों मी आतां.

माई०:—( हुंदके देत) दिवाकर मी तुमच्यापुढं पदर पसरतें, पायां पडतें काय काय वाटेल तें करतें पण मला आणि माझ्या बाळांना असं असहाय स्थितींत सोडून जाऊं नका हो. सांगा काय वाटेल तें सांगा--तुमच्या तोंडांतून शब्द निघण्याचा अवकाश कीं मीं तो झेललाच म्हणून समजा. असे निष्ठुर होऊं नका. आमच्या भावी आपत्तीकडे अशी डोळेझांक करूं नका हो......

दिवा०:—पण याचा विश्वास कसा धरायचा ?

माई०:—आतां आपला विश्वास बसायला मी काय करूं ? मी खरं सांगतें अंतःकरणापासून सांगतें,—अगदीं बाळाची शपथ घेऊन सांगतें कीं तुमचा प्रत्येक शब्द तुमची प्रत्येक आज्ञा मला शिरसावंद्य आहे म्हणून.

दिवा०:—( स्व. ) अस्सी, नाक दाबलं कीं तोंड उघडतं. आच्छा आतां जास्त नाक दाबण्यांत अर्थ नाहीं ( उ. ) ठीक आहे आतां घरीं जाऊन मी तुमच्या नावानं एक चिठ्ठी पाठवतों ती आपल्या एका जिवलग मैत्रिणीकडून आली आहे असं घरांत सांगा त्यांत ' एक उत्तम योगी आमच्याकडे आलेला आहे, रात्रींच्या गाडीनं जाणार आहे. सूनबाईची प्रकृती परवां बरीच अशक्त झालेली पाहिली म्हणून आपणास मुद्दाम लिहीत आहे. रात्रीं साडेनवाचे सुमारास गाडी पाठवीन तेव्हां

सूनबाईनां घेऊन ये, अनमान करूं नकोस' असा मजकूर असेल तो ऐकून रमाकांत आपल्या बायकोला घेऊन जा म्हणून सांगेल पण 'आजपर्यंतच्या जगाच्या अनुभवावरून जगावर भरंवसाही ठेवतां येत नाहीं व अविश्वासही दाखवतां येत नाहीं पण माझी बरेच वेळेला दिशाभूल झालेमुळं तुझ्यासारखा जाणता माणूस बरोबर असणं बरं ' इ० काय सुचेल तें—मात्र प्रसंगाला धरून—सांगून त्याला बरोबर आणायला चुकूं नका. मी ठरल्यावेळीं गाडीवानाला पत्ता देऊन गाडी पाठवतां गाडीवान सोडील त्या घरांत मुकाट्यानं शिरा—पुढील सारी व्यवस्था माझ्याकडे. यांत का काडीइतकं कमी पडलं तर मग मात्र तुम्ही जाणें आणि तुमचं घर जाणे मी म्हणून तुमच्या भानगडींत पडायचा नाहीं.

**माई**:—पण भालचंद्र......

**दिवाकर**:—त्याची काळजी तुम्हाला नको. ती सारी व्यवस्था करूनच हा बेत मी योजला आहे, ठीक आहे जातें मी आतां. पण हा बाण जर हुकला तर......

**माई०**:—दिवाकर आतां कोणत्या शब्दांनीं मी आपली खात्री करूं ?

**दिवाकर**:—आच्छा घोडेमैदान जवळच आहे. ( जातो. माईही त्याच्यामागं सचिंत जाते )

**बाळा०**:—दिवाकराची चिठ्ठी म्हणजे मैत्रिणीकडून आलेली चिठ्ठी. गाडीवान सोडील त्या घरांत शिरा, पुढली व्यवस्था माझ्याकडे लागली. भालचंद्राची व्यवस्था करूनच हा बेत—दादाच्या खुनाचा बेत...... असाच्या असा दादाकडे जाऊन सारं सांगूं का ? पण आतां माई थोडीच त्याला एकटं सोडणार आहे ? ( वाकून पाहून ) ती गेलीसुद्धां त्याच्या खोलींत, बरं पण असा घोटाळत किती वेळ बसणार मी इथं. तें कांहीं नाहीं. ताईच्या शाळेंत जाऊन तिलाच आणली पाहिजे म्हणजे तीच सारा बंदोबस्त करील या प्रकर्णाचा ( जातो. )

---

## प्रवेश ४ था

स्थळः—मॅनेजरची खोली.

**नानासाहेब**:—कांहीं म्हण पण अशी ही माझी त्रिगुणात्मक मूर्ती,



आज एकाच प्रसंगांत, जगाची त्रिविधता सर्वांना पटवून देणार आहे.

**भालचंद्र**:—आपलं हें वेपाचं तिरंगी निशाण, आजच्या मोहिमेंत फत्ते मिळविणार असें मी त्रिवार खात्रीनें म्हणूं काय ?

**नानासाहेब**:—तसं म्हणायाला आतां कांहीं हरकत नाहीं कारण तीच वेळ आतां आली आहे. माईची मजल स्वार्थी मानवकोटीच्या पलीकडे गेली, का त्या नरराक्षसानं नेली कोण जाणे पण सापत्नमत्सरानें सुडाशीं मैत्री संपादली आणि त्या जोडगोळीनें, या जहरी जोडीनें, सावत्र मुलाला, सावित्रीच्या आर्जव देवतेकडे नेण्याची तयारी बेमालुम आंखली आहे.

**भालचंद्र**:—पण आतां मात्र, आपल्याशींच सामना असल्यामुळें, त्याचेच दांत त्याच्या घशांत बेमालुम जातील असं वाटतं.

**नानासाहेब**:—पण हे सर्व सोहाळे माझ्या डोळ्यां देखत कशाला ? हें विधी-लेखन दुसरं काय ? यावेळीं सुखदुःखाच्या संमिश्र भावनेनें, अंतःकरणांत कोलाहल माजून, या हलाखीच्या स्थितीबद्दल एका डोळ्यानं दुःखाश्रू......

**भालचंद्र**:—आणि याचा शेवट गोड होणार, या आशेनें दुसऱ्या डोळ्यानं आनंदाश्रू बाहेर पडायला, यशोरवाच्या घंटेची वाट फार वेळ पाहावी लागणार नाहीं. All is well that ends well ज्याचा शेवट चांगला तें सर्व चांगलं असं म्हणतात.

**नानासाहेब**:—पण त्या बरोबरच स्त्रीबुद्धी प्रलयंगतः असं म्हणतात खरोखर भालचंद्र, माईची ही बायकी बुद्धी...का दिवाकराची ही सैतानी बुद्धी......पण प्रलय मात्र होणार होता खास.

**भालचंद्र**:—पृथ्वीप्रलयाचे वेळेस, एका वटपत्रावर चित्स्वरुप दिसूं लागलं त्या प्रमाणें या गृहप्रलयाचे वेळीं या ठिकाणीं, या आम्रवृक्षाखालीं असणारं हें ब्रह्मस्वरुप प्रगट होऊन या घराची शांतता अभंग राहणार.

**नानासाहेब**:—एकदां असं वाटतं कीं, असल्या घोर चुकीबद्दल मालकाला थोडें फार प्रायश्चित्त मिळावं, पण या बायकांच्या भाबड्या कारभारात, नेहमीची दिरंगाई चालूं ठेवली तर सगळंच ओंफस होईल.

**भालचंद्रः**—शिवाय यांच्या चुकीबद्दल भलत्यालाच प्रायश्चित्त मिळेल तर त्याची काय वाट ?

**नानासाहेबः**—प्रायश्चित्त-विधी साठीं, होम सुरु झाला म्हणजे पाहूं त्यांत कुणाच्या आहुती द्यायच्या त्या. ( उषा घाईनं प्र. क. )

**उषाः**—( प्र. क. ) ( स्वगत ) अगबाई, हा मेला दाढीदिक्षीत इथं कोण आहे. काय वैरानं वेळ साधली ? आतां यांच्या देखत, मी भालचंद्राशीं त्या गोष्टीसंबंधानें बोलूं तरी कशी ? भालचंद्र...

**भालचंद्रः**—( पाहून ) कोण ? उषा-अशी धावऱ्या धावऱ्या कां आलीस ? ये बैस थोडी विश्रांती घे.

**उषाः**—( स्वगत ) कसली कपाळाची विश्रांती ! ( उ. ) भालचंद्र आपल्याशीं थोडें बोलायचं आहे.

**भालचंद्रः**—थोडेंच ? बरीच काटकसरी दिसतेस तूं? संसारांत काटकसर चांगली पण ती नुसती बोलण्यांतच नको. मितभाषीपणा हा सद्गुण खरा......पण दांपत्यप्रेमाच्या दरबारांत तो दुर्गुणच—नव्हे—गुन्हा ठरेल.

**उषाः**—( त्रासून ) ( स्व. ) आतां काय करावं ( उघड ) भालचंद्र ही थट्टेची वेळ नाहीं.

**भालचंद्रः**—असं म्हणणं म्हणजे अशा प्रशांत वेळेची थट्टा करण्यासारखंच आहे. ( ती स्वतःशीं पुटपुटते ) बोल बोल अशी थबकूं नकोस.

**उषाः**—( हळूच भालचंद्रास ) अहो आतां यांच्या देखत काय सांगूं?

**भालचंद्रः**—प्रसंग बांका मग ये बुद्धेकू ( नाना०दाख. ) कहना काका. हे माझे एक पेशावरचे स्नेही आहेत सांग सांग काय असेल तें. हे जिवाला जीव देतील.

**उषाः**—ते जीव देतील. पण जीव देण्याचा हा प्रश्न नसून जीव घेण्याचा आहे.

**भालचंद्रः**—मग तसं सुद्धां हे करतील. वाटेल त्याला यांची तयारी आहे.

**उषाः**—आतां मात्र मला कांहीं सुचेनासं झालं आहे. तुम्हीं अशी



थट्टा आरंभलीत तर मी इथून निघून जाईन ( लांब उभी राहते. )

**भालचंद्रः**—( हळूच ) नानासाहेब पाहिलात ना कसा झणकारा आला तो. निघून कोठें जाणार हो ही ?

**नाना०ः**—तिला म्हणावं काय सांगायचं तें आतांच सांग नाहींतर आपली जा. पाहूं तर खरं कुठवर ओढून धरते ती !

**उषाः**—भालचंद्र.

**भालचंद्रः**—हें कोण आणखी ? कोण उषा ? अरे वा ? तूं अझून तिथंच उभी; मला वाटलं मघाशींच तूं रागाच्या फणकाऱ्यांत निघून गेलीस सुद्धां.

**उषाः**—म्हणजे, माझ्याकडे नुसतें लक्ष द्यायला सुद्धां तुम्हाला परवडत नाहींना ?

**भालचंद्रः**—अग सारं लक्ष तुझ्याकडेच लागल्यामुळें, तूं इथं आहेस का नाहीं हें पाहण्याचं लक्षांत सुद्धां राहिलं नाहीं. बरं तें सोडून द्या. इतक्या घाईनं इथं येण्याचं कारण काय ?

**उषाः**—अहो ( त्याच्या कानांत कुजबुजते. )

**भालचंद्रः**—छेः शक्य नाहीं. दिवाकर म्हणजे तुझ्या दादाचा जिवलग स्नेही......

**उषाः**—अहो हळूच बोला. तो तुमचा काबुली का पेशावरी ऐकेल ना ?

**भालचंद्रः**—त्यांनी ऐकलं तर त्यांना सुद्धां खरं वाटणार नाहीं. कायहो.........

**उषाः**—अहो पायां पडलें; त्याची उगीच वाच्यता नको. नाहींतर सगळंच फसायचं. मी विश्वासानं तुमच्याकडे आलें. तें त्याची अशी दवंडी पिटविण्यासाठीं नव्हे. नानासाहेब आले आहेत म्हणता ते तरी इतका वेळ कुठें दडी मारून बसले आहेत कोण जाणे ? का " येणार येणार " म्हणून नुसत्या जाहिरातीच होत्या.

**भालचंद्रः**—माझ्या या अपरिचित मित्राबद्दल तुला आतांपर्यंत अविश्वास वाटत होता; आतां माझ्याबद्दलही वाटायला लागला वाटतं ?

**नानासाहेब**:—तुमचं कांहीं प्रायव्हेट बोलायचं असेल तर मी इथून जातों.

**उषा**:—(स्व.) आतां कसं बरं करावं? मोठी पंचाईत आली आहे. दादानं यांचा अपमान केला त्याचा परस्पर सूड घेतला जात आहे हें बरं असं तर भालचंद्रांना वाटत नसेल?

**भालचंद्र**:—याच्यामुळें आपल्या कार्यांत विघ्न न येतां, तें कदाचित् लवकरच टळण्याचा संभव आहे. याच्या ओळखी फार मोठ्या आहेत.

**उषा**:—भालचंद्र, माझं मस्तक कसं भ्रमण करायला लागलं. आतां मी कसं करूं?

**भालचंद्र**:—कांहीं करूं नकोस, जरा स्वस्थ बैस, आणि विश्रांती घे.

**उषा**:—भालचंद्रः—माझ्या दादानं, तुमचे घोर अपराध केले असतील, भयंकर मानखंडाना केली असेल, पण त्याबद्दल आपण यावेळीं असे निष्ठूर होऊं नका. भालचंद्र कांहीं करा–या पाव्हण्याची मदत होईल म्हणतां तर ती घ्या आणि माझ्या दादाला त्या राक्षसा......

**भालचंद्र**:—तो राक्षस, तुझा दादा ती माई–झाडून सर्वांची त्या अंधार कोठडींत.

**उषा**:—नका असे निष्ठूर होऊं नका. तुमच्या बाबतींत झालेल्या अन्यायामुळें या होणाऱ्या अन्यायाला निष्ठुरपणानें तुम्हीं ही पुष्टी देऊं नका. आपल्याशीं बोललेल्या चार प्रेमाच्या शब्दाची किंमत म्हणून तरी आपण आपल्या मनांत सूडाला थारा देऊं नका.

**भालचंद्र**:—आतां सूड घ्यायची वेळ अगदीं जवळ आली आहे. अशा वेळीं सूडाला थारा न देण्याइतका मी साधू नाहीं.

**उषा**:—भालचंद्र, माझ्या हृदयांत डोकावून पहातां आपल्याही उदार हृदयाची ओखळ पटली पण आजच्या या......

**भालचंद्र**:—त्या उदार हृदयानें आज मला जिवावर उदार होऊनच अन्यायाचा सूड घेण्यास सांगितलें आहे आणि त्या दिवशींच्या तुझ्या पवित्र व प्रेमळ स्पर्शानेंच हें दिव्य करण्याचें साहस माझ्या अंगीं आणलें आहे आणि त्याला या माझ्या मित्राची योग्य अशी जोड लाभली आहे.



**उषा**:—आपल्या या संदिग्ध बोलण्यानं मला जास्तच भीती वाटूं लागली आहे. भालचंद्र (पाय धरते) माझ्या दादाला सुरक्षित.

**नानासाहेब**:—ये क्या आफत है, और ये लडकी कौन भालचंद्र यह है तो क्या?

**उषा**:—मी आपली धर्मकन्या आहें असं समजा. (बाहेरून अपटूडेट 'मॅनेजरसाहेब' अशी हांक मारतो) हें काय मॅनेजर कोण?

**भालचंद्र**:—जो सर्व मॅनेज् करील तो.

**उषा**.—आज तुम्हीं थट्टा करण्याचं नवीन व्रत धारण केलें आहे वाटतं?

**भालचंद्र**:—तसं म्हणण्यापेक्षां, जुन्या व्रताच्या उद्यापनाचा हा विधी आहे असं म्हणावं लागेल (भालचंद्र व नानासाहेब कुजबुजतात दुसरी हांक

**उषा**:—हे दोघे आपसांत काय कुजबुजतात कांहीं कळत नाहीं (तिसरी हांक) आणि बाहेर कोण हांका मारतं आहे?

**नानासाहेब**:—(भालचंद्रास) उसकु दरवाजा खोलो और आप जरा अंदर बैठो (भालचंद्र कडी काढून तो व उषा आंत जातात)

**उषा**:—(जातानां) काय आहे गौडबंगाल.

**भालचंद्र**:—(जातानां) तें तुला आपोआप कळेल चल (जातात)

**अपटूडेट**:—(प्र. क.) आं! हा तर कुणी पठाण दिसतो आहे; मग मॅनेजर कुठं गेले? कां रे भय्या, मॅनेजरसाहेब कुठं गेले? माझें त्यांच्याशीं काम होतें;

**नानासाहेब**:—वो गये हैं थेटर में,

**अपटूडेट**:—मग त्यांनीं यावेळीं ॲपॉइंटमेंट कशी केली? हे हिंदू लोक असेच; सांगितल्यावेळीं कधीं चुकून सुद्धां जायचे नाहींत किंवा यायचे नाहींत; आणि म्हणे स्वराज्य पाहिजे.

**नानासाहेब**:—आप तो भी हिंदू हय या नहीं?

**अपटूडेट**:—तें जाऊं दे त्याच्याशीं तुला काय करायचं? ही पठाणी जात फार अबुज बोवा! बरं त्यांना हें कार्ड, आल्यावर दे (कार्ड देतो व जाऊं लागतो).

**नानासाहेब**:—साव, आप जरा बैठकर आराम करो वो अबी आयेगा

**अपटूडेटः**—हमकू बैठनेकू टाईम नहीं.

**नानासाहेबः**—बैठना चाहिये.

**अपटूडेटः**—म्हणजे

**नानासाहेबः**—मंजी ये क्या मायना है-तुम इधरसे जाना नहीं ऐसा हमकु हुकम है.

**अपटूडेटः**—हुकुम ? कोणाचा हुकुम ?

**नानासाहेबः**—साब, तुम हमको पैछानते नही मगर हम तुमकु बराबर पैछानते हय. ए पागल !

**अपटूडेटः**—काय पागल ! मूं संभाल के बात करो. यहां कुच मोंगलाई नहीं है.

**नानासाहेबः**—मोंगलाई नही तो आँग्लाई हय. इसवास्ते तुमारे सरीखे अपटूडेट जंटलमेन बडे सफाईसे धूम मचाते हय ये हरामखोर.

**अपटूडेटः**—काय हरामखोर ! दुसरी शिवी Insult (वही काढून) तुमारा नाम क्या ?

**नानानाहेबः**—ये बदमाश

**अपटूडेटः**—बदमाश बदमाश ! तिसरी आतां मात्र तुझं नांव घेतलंच पाहिजे बोल.

**नानासाहेबः**—ये बकवा बंद करो, सब सुनो फेर लिख लेव. तुम वो दागिने चुराया है इसवास्ते तुमकु हम पोलीसके हातमें देनेकी जरुरात है, चलो हमारे साथ. समजा अबी कुच लिखलेना तो ले लेव.

**अपटूडेटः**—काय पोलीस अरे नशिबा ( कपाळाला हात लावतो).

**पोलीस**—( प्र. क. ) तुम्हीं कोण ?

**नानासाहेबः**—मी कोण तें हें पहा ( पत्र देतो )

**पोलीस**—( पत्र वाचून ) ठीक आहे आपल्याप्रमाणें व्यवस्था करूं तुम्हीं हो कोण ?

**अपटूडेटः**—मी आ आ......काय सांगू

**नानासाहेबः**—अहो चोर म्हणून सांगा.

**अपटूडेटः**—काय चोर ?



**नानासाहेबः**—( जवळ जाऊन ) अहो दागिनेचोर,पोलीस यांचं मग पाहूं कारण हे आपल्यावरोबरच आतां रहाणार आहेत.

**पोलीसः**—पण आमचं मुख्य काम राहिलंच. येथें भालचंद्र म्हणून कुणी रहात असतो ना ? त्याच्यावर एक आरोप आहे. रंगनाथ नांवाच्या एक वृद्ध नोकराला त्यानें जबर दुखापत केल्याबद्दल त्याचे विरुद्ध एका बाईचा अर्ज आहे.

**अपटूडेटः**—काय भालचंद्राचा तपास या मॅनेजरच्या खोलींत ? अहो पोलीस बहाद्दर आपला कांहीं तरी गैरसमज झालासा दिसतो.

**पोलीसः**—मॅनेजरची खोली ? कोण मॅनेजर ? आपण गप बसा.

**अपटूडेटः**—भय्या अबी कुच बोलो.

**नानासाहेबः**—चुप बैठो.

**पोलीसः**—साहेब आम्हाला भालचंद्र पाहिजे.

**नानासाहेबः**—सरकारी कामांत मी हरकत करूं इच्छीत नाहीं. मि. भालचंद्र आपल्याकडे कोण आलें आहे. ( भालचंद्र व उषा येतात. )

**पोलीसः**—( स्व. ) हा पठाणी गृहस्थ कोणी बडा अधिकारी दिसतो. Detective तर नसेल ?

**अपटूडेटः**—( स्व. ) कोण भालचंद्र इथं ? तें कोण उषा ? मग हा पठाणी पठ्या कोण—अपटूडेट—अपटूडेडची वेळ आली.

**भालचंद्रः**—काय पोलीस ?

**पोलीसः**—आपल्यावर हा आरोप आहे. ( कागद दाखवितो. ).

( भालचंद्र व उषा वाचतात. )

**भालचंद्रः**—रंगनाथाला मी दुखापत केली असें या अर्जांत आहे.

**उषाः**—त्या दिवाककराचें हें काम–दादावर तो प्रसंग आणि इकडं पण हा प्रसंग–देवा कसारे हात धुवून पाठीमागें लागलास?

**भालचंद्रः**—देव नाहीं तो दिवा लागला आहे.

**रंगाः**—( प्र. क. ) तो दिवा विझविण्यासाठींच माझा हा प्राणाचा दिवा [illegible] पण जीव धरून आहे. पोलीस चला मला कुणी काय

दुखापत केली हें सर्व मी तुमच्या कचेरींत सांगतों. उषे रडूं नकोस आतां तरी तुझे डोळे उघडलेना ?

उषाः—रंगनाथ, आतां सर्वांचे डोळे मिटायची वेळ आली तेव्हां माझे उघडून करायचें काय ? ही उघडझांप शेवटचीच.

भालचंद्रः—कालाची एक उघडझांप होण्यापूर्वी त्याचे डोळे कायमचे मिटले तर तुमचे साफ उघडले म्हणायचे.

रंग०ः—पोलीस चला.

पोलीसः—हा काय ब्रह्मघोटाळा आहे कांहीं कळत नाहीं.

रंग०ः—म्हणूनच म्हणतों तो ब्रह्मसमंध हातीं लागला कीं बाकी हा सर्व घोटाळा कळेल.

भाल०ः—व टळेल ही.

रंगनाथः—असं खास होणारच याची साक्ष म्हणजे हें सैतानी पिल्लू, त्याचा बगलबच्चा, आपल्या ताब्यांत आहे. चला.

उषाः—देवा यावेळीं मी काय मागूं? (जातात.)

---

## प्रवेश ५ वा.

स्थळः— पठाणाचें घर. पात्रें—पठाण

पठाणः—इथपर्यंत तर नाटक सुरळीतपणें पार पडलें. पोलीसचें प्रकरण माझ्या एका पत्रानें तें तसं मिटलं; आतां दिवाकराच्या कृष्णकारस्थानाचा शेवटचा धागा खेंचून त्यांतच त्याला अटकवला म्हणजे काम झालं. रमामाकान्ताला मारण्यासाठीं दिवाकर आपल्या पायांनीं येणार आणि दुसऱ्यासाठीं खणलेल्या खड्यांत आपण स्वतःच समाधी घेणार. आमचा गाडीवाला ठिकाण चुकणं शक्य नाहीं. ऐनवेळेला रंगनाथानं येऊन बाणी मात्र छान मारली; नाहीं तर अशा बुरख्यांतल्या गाडीवाल्याच्या हुद्यावर कोणाची नेमणूक करावी हा मोठा पेंचच होता. जुनीं खोडं लोणचं घालून ठेवावींत असं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं. ही युक्ती त्यानं जर



सुचविली नसती तर मला खास सुचली नसती. अरे मंडळी येऊं लागली (उषा व भालचंद्र प्र. क.)

उषाः—बरं झालं बाई, रंगनाथानं आयत्या वेळीं येऊन आपल्यावरचं किटाळ वारलं. तसंच माझ्या दादावरचंही हें संकट......

भालचंद्रः—शूः या ठिकाणीं तोंडांतून एक अक्षरही काढायचं नाहीं.

पठाणः—इतकंच नव्हे पण डोळ्यांनीं पाहायचं सुद्धां नाहीं; पण ते आपला देहस्वभाव सोडणार नाहींत म्हणून त्यांना ऱ्या गवसण्या घाला.

उषाः—(स्वगत) काय प्रकार आहे कांहीं कळत नाहीं. मघाशीं या पठाणाच्या खुणेवरून रंगनाथ एकाएकीं घाईघाईनें निघून गेला, तर खुद्द हा पठाण आतां शुद्ध मराठी भाषा बोलूं लागला. त्याच्याशीं असलेल्या भालचंद्राच्या सलगीवरून हा कोणी तरी आमचा हितचिंतक दिसतो; पण ही बकाली वस्ती, हे अडवळणी रस्ते, व ही भयाण जागा पाहिली म्हणजे कादंबऱ्यांतील चोरांच्या अड्यांची आठवण होऊन अंगावर कसे शहारे येतात. (दारावर थाप ऐकूं येते) (भिऊन) हें कोण आणखी ? भालचंद्र खरोखरच हा चोरांचा अड्डा...( पठाण-गप्प बस. इशारा देतो.

पठाणः—चोरांचीं पावलं ओळखण्यासाठीं, या गवसण्या घालून तुम्ही चोर बना, आटपा लवकर.

भालचंद्रः—हो चोराचीं पावलं ओळखायला चोरच बनलं पाहिजे. (आंत जातात.)

दिवाकरः—(पठाणानें कडी काढल्यावर प्र. क.) कैसा क्या दोस्त सब आलबेल ?

पठाणः—जी हां, दरोबस्त; ( शीळ घालतो. उषा भालचंद्र सुरे घेऊन येतात ) देखलीजीये साहेब हमारी तयारी !

दिवाकरः—(स्व.)अरे हा तर अट्टल दरोडखोर दिसतो. याचं हें पार म्हणजे सिनेमांतील बँकमेलिंगची गुहाच ! अच्छा ये लोगोंकू जरा छपाके रखो. शिकार आरही है. हम बी जरा बाजू होते. अबी आप हुशियार है ये ख्याल रखना भला क्या !

**पठाणः**—आप इसकी कुचभी फिकीर मत करो. सब बराबर हो जाता है. (दिवाकर जातो. रंगनाथ, माई, रमाकान्त व रमा यानां घेऊन येतो.) आयीये, आयीये साब बैठिये.

**माई०ः**—हकीमसाहेब ही माझी सून, काय झालं आहे कोण जाणें? सारखी वाळत चालली आहे डॉक्टर, वैद्य, ज्योतिषी, पंचाक्षरी, अंगारे, धूपारे ताईत सारं कांहीं झालं पण गूण येईल तर शपथ. अखेर माझ्या मैत्रिणीकडून आपली कीर्ती ऐकून आपल्याकडे आलें आहे. तेव्हां चांगलं औषध देऊन हिला आतां खडखडीत बरी करा.

**पठाणः**—माईसाब दवा देना ये हमारा काम लेकिन गून देनेवाला तो उप्पर बैठा है, ये तो अल्लाकी मेहरबानीसे हो जाता है. अच्छा तपासणीके वास्ते आप दोनो बी अंदर आव. (रमाकान्तास) साब माफ करो हम अबी आताहै (तिघे जातात).

**रमाकान्तः**—अच्छा जाव; कुछ हरजा नहीं! (स्वगत) उगीच माईचा नाद आहे झालं; आजपर्यंत कैक धन्वंतरी कोळून पाजले तिथें हे दाढीदिक्षीत अश्विनीकुमार काय रडणार! (दिवाकर प्र. क. रमाकान्त स्तिमित होतो).

**दिवाकरः**—रडणार नव्हे रडवणार समजलास ?

**रमाकान्तः**—कोण दिवाकर! आज उभ्या महिन्यांत आपण कुठं रस्त्यांतसुद्धां भेटला नाहींत. त्यावरून आपली आमच्या घरांतली ती शेवटलीच झाली असं मला वाटलं होतं.

**दिवाकरः**—पण तसं नसून या घरांतली ही भेट शेवटची होणार आहे. रमाकान्त मघाशीं तूं जी या हकीमाला अश्विनीकुमाराची उपमा दिलीस ती उलट्या अर्थानं आतां या क्षणीं सार्थ होणार आहे. स्वर्गीय अश्विनीकुमारांची दुक्कल, या पृथ्वीतलावर, या हकीमाच्या व या दिवाकराच्या रूपानें आज वावरत आहे. पण ते अश्विनीकुमार स्वर्गवासी झालेल्या जीवाला पृथ्वीवर आणतात तर हे अश्विनीकुमार, पृथ्वीवरील जीवांना स्वर्गांत गाडून देतात, एवढाच काय तो फरक; स्वर्ग व पृथ्वी यामध्यें इतकें हें अंतर असायचंच. तो हकीम कदाचित् तुझ्या



बायकोला रोगमुक्त करून तिच्या यातना कमी करील;पण हा (स्वतःला) हकीम तुला जीवन्मुक्त करून, तुझ्या कायमच्या यातना नाहींशा करणार आहे. रमाकान्त, साशंक दृष्टीनें माझ्याकडे काय पाहतोस? पूर्वीच्या दिवाकराची आठवण होऊन माझ्या भाषणाबद्दल शंका.........

**रमाकान्तः**—नाहीं शंकाबिंका कांहीं वाटत नाही. तुझ्या कृष्ण कृत्यांबद्दल मी अगदीं निःशंक आहें.आणि म्हणूनच आपल्याला माझ्या घराची पायरी चढण्याची बंदी केली होती......

**दिवाकरः**—आणि तीच बंदी आतां तुला भोंवणार आहे. रमाकान्त माझा अपमान करतेवेळीं तुला आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या पण आतां त्याबद्दल प्रायश्चित्त भोगतांना मात्र माझे पाय धरूं नकोस म्हणजे झालं. तूं केलेल्या अपमानाच्या मुहूर्तावरच माझा सूड जन्मास आला आणि त्याचं हें पूर्ण वाढीचं स्वरूप पाहून तूं दचकूं नकोस म्हणजे झालं.

**रमाकांतः**—तुझा अपमान! अपमान व्हायला आधीं मान असावा लागतो!

**दिवाकरः**—तो होता कीं नव्हता—नव्हे आहे किंवा नाहीं हें दाखविण्यासाठींच तुला आज इथं आणलं आहे. तुझे डोळे उघडे असतांना जी गोष्ट तुला दिसली नाहीं ती, आतां ते मिटून दिसणार आहे; पण ती दिसल्यावर ते मात्र कायमचे मिटलेले राहतील. रमाकांत मानापमानाच्या कात्रींत मला पकडण्याचा अट्टाहास करतानां तूं मात्र या पठाणाच्या कचाट्यांत सांपडलास.

**रमाकान्तः**—(साश्चर्य) काय पठाण! (पठाण. प्र. क.)

**पठाणः**—जी हां.

**दिवाकरः**—हाच पठाण, हा दाढी दिक्षीत, तुझा अश्विनीकुमार, कां पाहतोस? या हकीमाची जडीबुट्टी आधींच लागू पडली वाटतं?

**पठाणः**—इसका प्रभाव वैसाही अजब है. (दिवाकर व पठाण निघून जातात).

**रमाकान्तः**—(स्वगत) अरेच्या, या पठाणी हत्यारानं, माझा

खून करायचा या नराधमाचा विचार दिसतो ! समजलों—हे हकीमसाहेब माईच्या मैत्रिणीनें—म्हणजे या दिवाकरानंच दाखविले असावेत. आतां माझ्या रमेचं कसं होईल ? बाळासाहेब उषा कुणाच्या आधारावर राहतील ? या हरामखोरानं माझ्यावर चांगलाच प्रसंग आणला म्हणायचा ! नुसत्या आरडाओरडीनं कांहीं व्हायचं नाहीं. अगदीं धीर न सोडतां कांहीं तरी युक्ती काढली पाहिजे.

**दिवाकरः**—रमाकान्त, परवां माझा अपमान करतांना, आपली अशी मान जाण्याचा प्रसंग आपल्यावर येईल असं तुला स्वप्नांत तरी वाटलं होतं का ?

**रमाकान्तः**—दिवाकर, मान जाणं म्हणजे कांहीं तोंडच्या गोष्टी नाहींत!

**दिवाकरः**—तोंडच्या नाहींत या हातच्या आहेत समजलास ?

**रमाकान्तः**—पण तेच हात हातकड्यांमध्यें अडकतील त्याची काय वाट?

**दिवाकरः**—ते तूं आपल्याच हातांनीं ( पत्र दाखवून ) हे असे आधींच सोडवलेले आहेस. या आरशामध्यें माझं प्रतिबिंब ज्याला त्याला निर्दोषच दिसेल.

**रमाकान्तः**—अरे हें काय ? मीच लिहिलेलें पत्र हें.

**दिवाकरः**—होय तेंच तें.

**रमाकान्तः**—दिवाकर तूं मनुष्य आहेस का कोण आहेस ?

**दिवाकरः**—मी कोण ? सूडानं पेटलेला सैतान, अपमानाच्या तेलानं जळणारा दिवा, आणि धिःकारणीच्या कठोर शब्दमंत्रानीं बनलेला काठिण्याचा पुतळा आहें. परवांच्या तुझ्या आत्महत्येचा खून करून, आज तुझ्या खुनाची आत्महत्या करणारा तुझा हाडवैरी आहें. आत्महत्येच्या वेळीं इतरांनां वांचविण्यासाठीं, आपण राखलेली दूरदृष्टी, आज आपल्याला आलेली यमराजाची चिठ्ठीच आहे. आणि चिठ्ठीबरहुकूम, आपल्याला जपून जिवानिशीं न्यायला यमराजानें आपले हे यमदूत पाठविले आहेत तेव्हां स्वर्गारोहणाची तयारी करा.

**रमाकान्तः**—( स्व. ) आतां मात्र सर्वस्वी घात झाला ! ( विचार करून ) एवी तेवी मरणारच, मग नामर्दासारखें हात जोडून मरण्यापेक्षा



यांच्याशीं चार हात केलेलं काय वाईट ! हा पठाण गैरसावध दिसतो तेव्हां त्याच्यावर हल्ला करून त्याच्या हातांतलं शस्त्र काढून घ्यावें व या हरामखोराला दाखवावा हात आणि शेवटीं मारतां मारतां मरावं ! ( पठाणाच्या अंगावर धांवून जाऊन, त्याच्या हातांतील शस्त्र काढून घेऊन दिवाकरावर फेंकतो तो तें चुकवतो ).

**पठाणः**—या अल्ला ! ये तो बिलकूल सैतान है ! (उषा व भालचंद्र येतात)

**दिवाकरः**—ए सैतान, ऐसा चूपी देखके क्या खडा रहा है? सवाई सैतान कू बुलाव ( पठाण शीळ घालतो;बुरखा वेषांत दोन पोलीस येतात. ( त्यांची झटापट होते त्यांत रमाकान्त त्यांचीं शस्त्रें काढून घेतो).

**दिवाकरः**—( स्व. ) रमाकान्तासारखा, चहाच्या पाण्यावर पोसलेला पहिलवान, तीन पठाणांना भारी ? शक्य नाहीं. यांत पठाणाचाच कांहीं तरी पाजीपणा असला पाहिजे. तें कांहीं नाहीं, या पठाणावरच कुरघोडी केली पाहिजे. आतां डाव बदलून टाकावा. हें खुनाचं घोंगडं याच्या गळ्यांत अडकवण्यासाटीं आधीं आपण येथून पसार व्हावं आणि पोलीसला वर्दी द्यावी म्हणजे परस्पर ही गँग पकडली जाईल, शिवाय आपण अजूनही शहाजोग ठरूं. जातानां माईलाही घेऊन गेलं पाहिजे. माई माई चला चला लवकर (माई व रमा बाहेर येतात बाहेर जातांना दिवाकर माईचा हात धरून, पोलीस पोलीस, हा पठाण या माईचा खून... खून खून......असें ओरडतो व पळून जायचा प्रयत्न करतो, रमाकांत माईचा दुसरा हात धरतो )

**रमाकान्तः**—माई, चाललीस कुठं ! (दिवाकर माईचा हात सोडून जातो. )

**माई०**:—मी......मी......दिवाकर......

**रमाकान्तः**—काय ? अजूनही त्या दिवाकराची संगत सुटत नाहीं का ! अशी इथं उभी रहा ( पोलीस दिवाकराला अडवून प्र. क. )

**पोलीसः**—पोलीस म्हणून तुम्हींच ओरडलात ना ?

**दिवाकरः**—होय ( पठाणाकडे बोट करून ) अगोदर या हरामखोराला पकडा.

**पठाण:**—( दिवाकराकडे बोट करून ) प्रथम त्या हरामखोराला पकडा.

**दिवाकर:**—कोण मी हरामखोर ? अहो मी तुम्हाला खुनाची बातमी दिली ना ! ( जाऊं लागतो )

**पोलीस:**—( त्याला अडवून ) अहो हरामखोर नसाल कदाचित् पण बातमी देणारे म्हणून तर उभे रहाल ? मागं एकदां आपण चोरीची खोटी बातमी दिली आहे तें आठवतं का साहेब ? बरं तें जाऊं द्या. ही तर खरी आहे ना ? सांगा तर आरोपी नंबरवारी......

**दिवाकर:**—(स्व.) ठीक आहे. आतां प्रत्येकाला गुतवितों (उ.) आरोपी नंबर वन् ( पठाणाकडे ) आरोपी नंबर टू (रमाकान्ताकडे)(स्व.)या गाडी वाल्यानं माझा मघाशीं इन्सल्ट केला नाहीं का.' ( उघड ) ( त्याच्याकडे बोट करून ) आरोपी नंबर थ्री. या सर्वांनीं या माईला पेंचात पकडून खुनाची भीती घातली......

**उषा:**—( भालचंद्रासह प्र. क. ) हें काय नवीन संकट ! आणि या पठाणाच्या नादीं लागून......( भालचंद्र तिला गप बसण्याची खूण करतो)

**रमाकान्त:**—(स्व.)कोण! उषा आणि भालचंद्र! आणि या पठाणाच्या कटांत ! या चोरानं हीं सारीं मेंढरें आपल्या कळपांत ओढलीं का काय का हा भालचंद्राचा सूड आहे ? का उषेचें मला वांचविण्याचं कौशल्य आहे?

**रमा:**—कोण वत्सं आणि दादा ! अगबाई तुम्ही इकडं कशीं ?

**माई॰:**—कोण उषा व भालचंद्र ! या मेल्या भालचंद्रानं बिब्बा घातला वाटतं आमच्या कारस्थानांत; पण दिवाकरानीं चांगलीच लढवली. आतां पाहूं !

**दिवाकर:**—ही उषा आणि भालचंद्र मग हा दाढीदिक्षीत कोण ?

**पठाण:**—( दाढी व पोषाक काढतांना ) मी कोण ! पोलीस पकडा मला ! दिवाकर मी कोण मी रमाकान्ताचा ट्रस्टी, ( दिवाकर माई—अरेरे घात झाला असें म्हणतो ) अपटूडेट बाळासाहेबांचा मॅनेजर, तुझा पठाण, व या रमेचा हकीम या गँगचा नायक आहें. ( रमाकान्त, रमा, उषा आश्चर्य करून आनंदीत)

**भालचंद्र:**—यांचा मुखीं परमेश्वर असं म्हणतात, तोच परमेश्वर आज



या नानासाहेबांच्या रूपानें, ताईच्या पातिव्रत्य प्रभावानं, तुम्हां सर्वांच्या रक्षणासाठीं, इथं प्रत्यक्ष अवतरला असं म्हणायला कांहीं हरकत नाहीं. आतां तरी यांची पटली ना ओळख ?

**नानासाहेब:**—आतां याची मात्र पोलीसला चांगलीच ओळख करून दिली पाहिजे म्हणजे पोलीसांची तर नव्हेच, पण इतःपर दुसऱ्या कोणाचीही या घराण्यासारखी दिशाभूल होणार नाहीं. पोलीस यांना आपल्या ताब्यांत घ्या ( पोलीस त्याला पकडतात )

**पोलीस:**—साहेब, आपण यांची आम्हाला पूर्ण ओळख करून दिलेली आहेच पण यांच्या कटांत आणखी कांहीं असतीलच कीं नाहीं.

**रंगनाथ:**—( गाडीवाल्याच्या वेषांत ) हो हो तर; आपण सांगत असाल तर आतां त्यांना घेऊन येतों. आहेच माझी गाडी जोडून तयार!

**उषा:**—अहो हा सुद्धां त्यांच्याच पैकीं कुणी असेल. खास ओळखी वांचून गाडीवाल्याची गुप्त कामगिरी याच्यावर सोंपवली नसावी. पळून जाण्यासाठीं याचा कांहीं तरी डाव असेल.

**रंगनाथ:**—( गाडीवानाचा वेष काढीत ) ताईसाहेब, दिवाकराच्या खास ओळखीची निशाणी माझ्या कपाळावर झळकत असतां मला पळून कसं जातां येईल. ही पाहिली कां ती निशाणी दिवाकर बापूहि...

**उषा रमाकान्त माई:**—कोण रंगनाथ! तुझ्या स्वामिनिष्ठेची ध्वजा...

**नानासाहेब:**—पुरे त्यांना घेऊन ये जा ( रंगनाथ जातो ) याचं सर्व श्रेय भालचंद्रांना देणं जरूर आहे.

**रमाकान्त:**—अहाहा भालचंद्र, कोण हा आपल्या मनाचा उदारपणा! संशय-पिशाचानं माझी नजरबंदी केल्यामुळें या क्षणापर्यंत आपलं खरं स्वरूप दिसलं नाहीं. आपण माझ्या घराण्याच्या कल्याणाकरतां, जिवापाड मेहनत करीत असतां तिला भलतंच ओंगळ स्वरूप देऊन मी आपल्याला बोलूं नये तें बोललों, आपला, न भूतो न भविष्यति असा अपमान केला, आपल्याला घराबाहेर घालवून दिलें, इतकंच नव्हे पण रंगनाथाला मारहाण करून, जखमी केल्याबद्दल,आपलं नांव या

नरराक्षसानं पोलीसला कळवलं, त्या अर्जांत साक्षिदार म्हणून मी नांव दिलं. इतकं असूनही आपण जर मला व माझ्या घराण्याला वांचविण्याचा प्रयत्न करीत आहा तेव्हां अशा हितचिंतकाच्या आधाराशिवाय माझं जीवीत सुखमय होणार नाहीं म्हणून आपण या अंधाला आपल्या आधाराची दृष्टी द्यावी ( पाय धरतो )

**भालचंद्रः**—छेः छेः रमाकान्त यांत मी विशेष तें काय केलं ? माझ्या जागीं दुसरा कोणी असता, प्रत्यक्ष आपण असता तरी असंच केलं असतं. उठा, उठा, ( त्याला उठवितो व माझे पाय सोडून बरोबरीच्या मित्रत्वाच्या नात्यानें भेटा पाहूं ( भेटतात ) आपल्याला वांचविणारा, आपल्याला तारणारा देव खरोखर मी नसून हे नानासाहेब आहेत; मी एक त्यांचा दास आहें.

**नाना०ः**—हो या पठाणाच्या हस्तकाच्या पेशावरून, तसं नाहीं असं म्हणतां येत नाहीं.

**रमाकान्तः**—(नाना०चे पाय धरून) नानासाहेब या वयानें वाढलेल्या पण अज्ञानानं नाडलेल्या, आपल्या मूर्ख मुलाला आपण कोणती उपमा देता ?

**नानासाहेबः**—ऊठ, रमाकान्त भोळसर, विद्वान, रेमॅन्टिक्, वेडे व संशयी श्रीमंत लोकांची या जगाच्या मायावी बाजारांत, अचूक दिशाभूल करणारे दिवाकर कांहीं थोडे नाहींत, त्याप्रमाणें रमाकान्तानांही कांहीं वाण नाहीं.

**रमाकान्तः**—नानासाहेब क्षमा करा. चूक झाली माझी. नुसता संशय आणि त्यानंच मी माझ्या गृहलक्ष्मीला लाथाडलं ! संशय हा नुसता शब्द सुद्धां माझ्याच्यानं आतां ऐकवत नाहीं. शिव शिव कोण दिशाभूल ही?

**उषाः**—नानासाहेब या आपल्या मुलीलाही आपण क्षमा केली पाहिजे.कारण दुष्टाच्या सहवासांत राहून दिशाभूल झाल्यामुळें हिच्या हातून कांहीं कालपर्यंत सज्जनांचा छळ झाला आहे.

**रमाकान्तः**—ज्या हातांनीं सज्जनांचा छळ झाला तोच हात सज्जनांच्या ताब्यांत दिला म्हणजे तसा छळ त्याच्या हातून पुन्हा होणार नाहीं



( उषेचा हात भालचंद्राच्या हातांत देतो ) पसंत आहे ना आपल्याला हें नानासाहेब ?

**नानासाहेबः**—अगदीं पसंत ( रंगनाथ, अपटूडेट व बाळासाहेब येतात) (हकीमाच्या पोषाखाखालीं मॅनेजरचा पोषाख असतो) रंगनाथ—ही घ्या दुकल; नानासाहेब.

**बाळासाहेब व अपटूडेटः**—कोण मॅनेजर हे नानासाहेब अरे बापरे ( भितात )

**नाना०ः**—कसं काय बाळासाहेब, ओळख पटली कीं नाहीं ?

**बाळासाहेबः**—ओळख पटली, आणि या व्हॅगॅबान्ड अपटूडेटची संगतही कायमची तुटली. नानासाहेब मी या अपटूडेटच्या भूलथापांना भुलून फारच वाहवलों होतों—स्त्रीपार्ट घेऊन नाटकांत जाण्यापर्यंत माझी मजल गेली जन्माचं नुकसान करून घेतलं असतं पण त्याची मला क्षमा करा.आतां मी आपल्या व दादांच्या शब्दाबाहेर जाणार नाहीं. पुढें मागें हा बाळासाहेब आपल्याला एम. ए. झालेला दिसेल.

**नाना०ः**—मि० अपटूडेट ओळख पटलीना ? आपली दिशाभूल...

**अपटूडेट०ः**—हं ओळख पटली व त्याबरोबर एक युक्तिही सुचली. माझी दिशाभूल झाली नाहीं, तर होणार होती, ती आपण तात्पुरते म्यानेजर झाल्यामुळें टळली. आपण मला क्षमा करालच, कारण केवळ आपल्या म्यानेजरी नटवेपानें, मी एक चांगला होतकरु नट आहे असें मला कळलें व माझ्या आयुष्याच्या नौकेला एक चांगली दिशा लागली. आतां हा अपटूडेट साऱ्या गोष्टी सोडून नाटकांत जाणार व त्याबरोबरच नाट्यकलेचा व साऱ्या समाजाचा उद्धार करणार, मी इंडियन गॅरिक होणार " बोलो इंडियन गॅरिक की जय. "

**नाना०ः**—माई तुम्ही कांहींच बोलत नाहीं ! माई रमाकान्त उषे करतां का होईना पण या दिवाकराच्या कारस्थान किरणांच्या प्रकाशानं आपले डोळे तरी साफ उघडले ना ?

**दिवाकरः**—दिवाकराच्या कारस्थान किरणांचा उगम माईच्या आपल्या सर्वांपासून होता हें विसरतां कामा नये.

**रंगनाथः**—माईच्या सापत्नभावाला दिवाकराच्या मदतीशिवाय कांहीही करतां आलं नसतं हें विसरतां कामा नये.

**नाना०ः**—माई या विषारी सापाच्या तुळतुळीत रंगाला भाळून आपल्या घराण्यावर काय हा अनर्थ ओढून घेतलास ! तुम्ही चांगल्या समजुतदार असल्यामुळें, भालचंद्राचं पत्र येईपर्यंत मी आपल्या कुटुंबाविषयीं केव्हांस अगदीं निर्धास्त होतों पण हें सर्व कशासाठीं !

**रंगनाथः**—रमाकांताच्या संशयी स्वभावाचा फायदा घेऊन, त्याला वेडा ठरवून किंवा पार जगांतून उठवून, एकट्या बाळासाहेबाला एवढी मोठी इस्टेट लाभावी म्हणून दिवाकराच्या मदतीनं हें कारस्थान चाललं होतं.

**माईः**—( रडून ) नका नानासाहेब या अभागिनीला आणखी आपल्या कृष्णकृत्यांची आठवण देऊन डागण्या देऊं नका. मला पश्चातापझाला असं मी म्हटलं तर आपल्याला खरं तरी वाटेल काय ? मी आपली कोणत्या तोंडानं क्षमा मागूं. ( पाय धरते. )

**नाना०ः**—उठा माईसाहेब, कसं झालं तरी तुम्ही मला थोरल्या भावजयीचे ठिकाणीं आहा.

**माईः**—दिवाकराच्या संगतीनें, माझी झालेली परवड पाहून प्रत्येक सावत्र आईचे डोळे तत्क्षणींच उघडोत हेंच या पापिणीचें परमेश्वराजवळ मागणं आहे.

**रमाकान्तः**—शिव शिव, केवळ संपत्तीसाठीं, आज घराण्याची अब्रू धुळीस मिळत होती, एका कुलवधूची नाहक विडंबना, आणि एका निरपेक्ष मित्राचा छळ झाला. जी संपत्ती आज माझ्या जिवावर उठली. तीच संपत्ती एका लेखणीच्या फटकाऱ्यानें मी माझ्या सावत्र भावांच्या या बाळासाहेबाच्या नांवानं करून देतों ( लिहून देतो. ) ( बाळासाहेबास कागद देतो )

**रमाः**—अहाहा नाथ काय हें आपलं उदार चारित्र्य.

**बाळासाहेबः**—( कागद घेऊन ) ज्या संपत्तीसाठीं इतकीं पापाचीं पिशाचें पोसलीं जात होतीं ती पापमय संपत्ती बाळासाहेबाला पोसण्यास तयार असेल पण पापानं पोसला गेल्यावर माझ्या हातून शुद्ध



आचरण होणार नाहीं म्हणून मीही तिचा असा अव्हेर करतों ( कागद फाडतो ) नानासाहेब गढूळ झालेली ही सुवर्णगंगा, शुद्ध व्हावी अशी आपली इच्छा असेल तर एखाद्या अनाथ–विद्यार्थीगृहाला द्या.

**अपटूडेट०ः**—माझ्या नवीन ध्येयाचा चिमर पडल्यामुळें बाळासाहेबाला हे अनाथविद्यार्थीनीगृह आठवलें. पण नव्या चळवळीला जोम आणण्यासाठीं, नानासाहेब आपण ती रक्कम, नाट्यकलेच्या उर्जितावस्थेसाठीं द्यावी म्हणजे मृत्यूशय्येवर कुंथत पडलेली नाट्यकला संजीवनी मिळाल्याप्रमाणें जोमदार होईल. कारण मी नाट्यकलेचा पुरस्कर्ता आहें, नाट्याभिमानी आहें. भावी इंडियन गॅरिक आहें, बोलो "इंडियन गॅरिक की जय ".

**भालचंद्रः**—आपण गॅरिक तर व्हा.

**रमाकान्तः**—मग पैसा आपल्या पायांवर लोळण घेईल.

**अपटूडेट०ः**—असं म्हणता ठीक आहे बोलो " इंडियन गॅरिक की जय "

**पोलीसः**—आतां पुढचा हुकूम.

**भालचंद्रः**—साऱ्याचा शेवट गोड झाला तेव्हां मला वाटतं या प्रकरणाचा विशेष बोभाटा न करितां, दिवाकराला क्षमा......

**दिवाकरः**—क्षमा क्षमेच्या तुकड्याकडे पाहून गोंडा घोळणारा कुत्र्याच्या अवलादीचा हा दिवाकर नाहीं त्यापेक्षां ( पोलीसच्या हातांतील पिस्तूल घेऊन आत्महत्या करतो. )

**पोलीसः**—अरे माझें पिस्तूल......

**नाना०ः**—पोलीस असेच तुम्ही इनस्पेक्टरच्या घरीं जा. मी येतोंच आहे. रमाकान्त दिवाकरानं पेटविलेल्या स्वार्थी होमकुंडांत, तुम्हां प्रत्येकाची दिशाभूल झाल्यामुळें आहुती पडणार होती; पण माझ्या स्वर्गीय मित्रात्म्यानं आपल्या दैवी शक्तीनं तुम्हां सर्वांना या दिशाभूलीच्या भूलभुलावणींत वेळींच सावध केल्याबद्दल, त्या स्वर्गीय आत्म्याचे आभार मानून, आम्हां सगळ्यांना बुद्धि देणाऱ्या, विघ्नहर्त्या गणेशाची आपण प्रार्थना करूं.

शुभंभवतु ।

Stock Verified
1996-97

याच लेखकाचीं लौकरच

# रंगभूमीवर येणारीं नाटकें.

## रा. रा. गणेश कृष्ण फाटककृत

‘ सं. प्रतिज्ञाद्वंद्व, ’ ‘सं. सोनेरी चावी’ व ‘सं. पाहिजे जातीचें’

---

## रा. रा. गोपाळ माधव देवस्थळी

“ शरसंधान, ” “ देशद्रोही, ” लीलालहरी साध्वी महाराणी
( अहिल्याबाई होळकरीण )

---

## रा. रा. शांताराम गोपाळ अत्रे यांचीं

## लौकरच रंगभूमीवर येणारीं नाटकें

“हिंदसंतान,” विजय–वैजयंती, “दख्खनचा मोहरा” व
“ हिंदचा चांद ”

# आमचीं शाळाखात्यानें

## मंजूर केलेलीं पुस्तकें.

| | |
|---|---|
| चिमुकली इसापनीति–ले. **ग. ग. गडकरी.** | ऽ२ |
| मुलांकरितां मुलांच्या गोष्टी— ,, ,, | ऽ३ |
| बालबोध गोष्टी भाग १ ला, ले. **भि. वि. महाजन.** | ऽ३ |
| बालबोध गोष्टी भाग२ रा, ,, ,, | ऽ३ |
| बाल–सुभाषित ,, ,, | ऽ३ |
| पाठात्मक अंकगणित भाग १ ला, ,, ,, | ऽ५ |
| ,, ,, भाग २, रा, ,, ,, | ऽ६ |
| सोपे धडे–ले.–**म. वि. साने.** | ऽ३ |
| बालरंजनमाला भाग १ ला, ले. **वि. वि. करमरकर.** | ऽ५ |
| बालबोध संत ले. **कृ. ह. दीक्षित.** | ऽ४ |
| दशकपद्धति व मेट्रिक सिस्टीम ले. **घ. वा. चिपळूणकर.** | ऽ४ |
| नारायणरावांचा खून व स. माधवरावांचें लग्न ,, | ऽ४ |
| नेपोलियन ले–कै. **के. ना. वापट.** | ऽ१२ |
| भूस्तरशास्त्र ले. **सत्यबोध हुदलीकर.** | ऽ४ |
| आरोग्यशास्त्र ले. **डॉ. भा. म. टेंबे.** | ऽ१२ |
| थोरले माधवराव पेशवे. ले. प्रो. **द. वा. पोतदार.** | ऽ४ |
| मराठी गद्याचा इंग्रजी अवतार ,, ,, | २ |
| आपलें पुणें ,, ,, | ऽ१ |
| महाराष्ट्र देशाचा संक्षिप्त इतिहास ले. **गोडबोले.** | ऽ४ |
| प्रगती–ले. **ग. रं. दंडवते.** | ऽ८ |

ए. पी. बापट अॅन्ड ब्रदर्स,
बुकसेलर्स, पुणें शहर.

MODERN COLLEGE